# चिंतनाच्या वाटा

डॉ. निर्मलकुमार फडकुले



# चिंतनाच्या वाटा

निर्मलकुमार फडकुले

मेहता पब्लिशिंग हाऊस

■ **चिंतनाच्या वाटा/ललित**

© निर्मलकुमार फडकुले

'विवेक', १० विद्यानगर,
उत्तर सदरबाजार,
सोलापूर.

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे ३०. ✆ ४४७६९२४

■ अक्षरजुळणी
मॅक-प्रिंट,
२०/२१, 'नाथकृपा',
पटवर्धन बाग, एरंडवणा,
पुणे ४.

■ मुद्रक
प्रेसोग्राफ,
५२६, नारायण पेठ,
पुणे ३०.

■ प्रथमावृत्ती
ऑगस्ट, २०००

■ मुखपृष्ठ
शैलेश मांढरे

■ किंमत
नव्वद रुपये

■ ISBN 81-7161-954-1

रसिकहो व मराठी साहित्य प्रेमी स्नेहजनहो ,

माझे वडील प्रा.डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य मी ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे आपणासाठी प्रकाशित करीत आहे. २८ जुलै २०२० या त्यांच्या चौदाव्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या साहित्याचे प्रकाशन व्हावे व ते जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवावे हा उद्देश आहे.

पेशाने मराठीचे प्राध्यापक,अत्यंत हळवे व जीवनावर मनापासून प्रेम करणारे असे माझे वडील. केवळ साहित्यिकच नव्हे तर ते प्रख्यात वक्ते देखील होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील गावांमध्ये त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले .संत साहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी आकाशवाणी पुणे, सांगली, सोलापूर यावरून संतांच्या विविध अभंगांचे निरूपण केले आहे आजही ते आकाशवाणी वरून प्रसारित होत आहे. ते सर्व प्रसारित कार्यक्रम आपल्या भेटीस इ-साहित्य प्रतिष्ठान मार्फत आणणार आहोत. विविध शासकीय व विद्यापीठीय समित्या, अभ्यास मंडळे , बालभारती यांच्या माध्यमातून त्यांनी खूप मोलाचे कार्य केले आहे. अग्रगण्य वृत्तपत्रातून व नियतकालिकांमधून ४०-४५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी लेखन केले तेही पुस्तक रूपात प्रसिद्ध झाले . त्यांची काही व्याख्याने देखील रसिकांच्या भेटीस आणणार आहोत. त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू त्यांच्या साहित्यातून उलगडत जातील व खास करून जीवनाविषयक दृष्टिकोन त्यांच्या ललित लेखनातून आपणास समजेल. देश-परदेशातील असंख्य रसिकांनी त्यांच्या सर्व साहित्याची पुनर्प्रकाशनाची मागणी केली व ती आता पूर्ण होत आहे याचा मला आनंद आहे. या प्रकाशनाला ई साहित्यने केलेल्या सहकार्यासाठी त्यांचा मी आभारी आहे.

अजित नि. फडकुले, सोलापूर
ajitphadkule@hotmail.com
९४२२४६३६४२

’ चिंतनाच्या वाटा ’ हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ यांनी २००० साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# चिंतनाच्या वाटा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

मराठी साहित्याच्या वैभवात समृद्ध भर टाकणाऱ्या

**वि. स. खांडेकर**

आणि

**वि. वा. शिरवाडकर**

यांना आदरपूर्वक

## निर्मलकुमार फडकुले यांची इतर पुस्तके

संतकवी तुकाराम : एक चिंतन

संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना

संत सहवास

संतांचिया भेटी

काही रंग काही रेषा

लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व

साहित्यवेध

हिरव्या वाटा

आनंदाची डहाळी

जगायचं कशासाठी?

रंग एकेकाचे

परिवर्तनाची चळवळ : काल आणि आज

अमृतकण कोवळे

संतवीणेचा झंकार

सुखाचा परिमळ

संत तुकारामाचा जीवन विचार

प्रिय आणि अप्रिय

❋

# मनोगत

'चिंतनाच्या वाटा' हा माझा सहावा ललित लेखसंग्रह. काहीतरी हलकं-फुलकं, केवळ रंजन करणारं लेखन वाचकांच्या पदरात टाकण्याच्या हेतूनं यातले लेख लिहिलेले नाहीत. ललितलेखन म्हणजे वाचकांना संतुष्ट करण्यासाठी केलेलं लेखन नव्हे. चिंतनाची बैठक असल्याशिवाय ललितगद्याला अर्थ नाही.

आपल्या आजूबाजूला अनेक प्रकारच्या विसंगत घटना घडत असतात. नानाविध प्रकृतीचे लोक आपल्याला भेटतात. कोणी दांभिक असतो, कोणी अहंकारी असतो, कोणी सत्तेचा आणि संपत्तीचा गुलाम असतो. कुठं रक्तपात चाललेला असतो, तर कुठं आनंदाची आणि उन्मादाची गाणी कानांवर पडतात. हरतऱ्हेची, भिन्नभिन्न रंगढंगांची माणसं आपल्याभोवती पसरलेली आहेत. त्यांच्या मनांचे वेगवेगळे रंग टिपण्यात आनंद आहे. समाज-जीवनातल्या अस्वस्थ करणाऱ्या वृत्ती-प्रवृत्ती न्याहाळण्यातही एक प्रकारचं दु:खी समाधान आहे.

या प्रकारच्या व्यक्तींचं आणि वृत्तींचं दर्शन झालं, की माझ्या मनात विचारांचे अनेकविध तरंग उठतात. माझं मन चिंतनाच्या वाटांनी चालत राहतं. या चिंतनाला शब्द देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

ललितगद्य हा वाङ्मयप्रकार वृत्तपत्रांनी आता विकसित केला आहे. एखाद्या विशिष्ट तंत्राच्या चौकटीत तो आता सामावला जात नाही. वाचकांच्या आनंदासाठीच लिहायचं, चटपटीत आणि चुरचुरीत लिहायचं. थोडा वेळ वाचकांना उत्तेजित करायचं. असल्या माफक हेतूनं अलीकडं ललित-गद्य लिहिलं जात नाही.

चिंतनशील प्रकृतीचा लेखक वाचकनिष्ठ असण्यापेक्षा विचारनिष्ठ असतो. बाह्यत: तो खेळकर आणि क्वचित खोडकरपणानं लिहील; पण त्याला एखाद्या

विशिष्ट विचाराचं मंथन करायचं असतं. त्यामुळं तंत्र आणि शैली यांची कुंपणं आपल्या चिंतनाभोवती तो उभी करीत नाही. आपल्या अस्वस्थ मनाचे पदर उकलून दाखवणं, आपल्या काही आशा–आकांक्षा व्यक्त करणं आणि आजच्या सामाजिक स्थिती–गतीवर एखादा प्रकाशकिरण टाकणं लेखकाला अपरिहार्य वाटतं. याच पद्धतीनं मी हे लेखन केलं आहे. ते कितपत प्रत्ययकारी आहे, हे अर्थातच वाचकांनी आपल्या मनाशी ठरवायचं आहे.

'लोकमत'च्या साप्ताहिक पुरवणीतून काही काळ जे लेखन मी केलं, त्यातले निवडक लेख या पुस्तकात संकलित केले आहेत. पुस्तकरूपानं हे लेखन प्रकाशित करण्याची 'लोकमत'च्या संपादकांनी अनुमती दिली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक श्री. सुनील मेहता यांनी स्नेहभावानं 'चिंतनाच्या वाटा' प्रकाशात आणण्याची जबाबदारी स्वीकारली, याबद्दल त्यांचे औपचारिक आभार मानून मी ऋणमुक्त होऊ शकत नाही.

वाचक माझ्या चिंतनाचं रसिकतेनं स्वागत करतील, अशी आशा वाटते.

**–निर्मलकुमार फडकुले**

## अनुक्रम


सुशिक्षितांची अंधश्रद्धा/ १
मूर्खांविषयी थोडेसे/ ६
एकेक दिवा विझत आहे./ ११
मनाचे रंग/ १६
राजेशाही आणि लोकशाही/ २१
आत्मा आणि चरित्र/ २६
सुखाचा शोध/ ३१
सत्य आणि स्वप्न/ ३६
सौजन्याची ऐशी तैशी/ ४१
याला उत्तर नाही!/ ४६
कारागृहाच्या भिंती/ ५१
बहिणाईचे शब्द/ ५६
नियतीची इच्छा/ ६१
समतेचे गीत गाऊ द्या!/ ६६
जीवनाची वाट अशी चालावी/ ७१
संपत्ती कितपत सुख देते?/ ७६
या, स्वप्नांनो, या/ ८१
स्तुती आणि निंदा/ ८६
नवी पहाट उगवत आहे/ ९१
पुस्तकाची पाने/ ९५
दुसरे बालपण/ १००
शेवटचा दीस/ १०५
गटबाजी आणि माणूस/ ११०
काळ निघून चालला आहे/ ११५
माणूस माणूस म्हणतात, तो हाच!/ १२०

# सुशिक्षितांची
## अंधश्रद्धा

परदेश प्रवास करून परत आलेले विज्ञानशास्त्राचे एक प्राध्यापक वार्ताहरांना मुलाखत देताना म्हणाले, 'माझा विदेश दौरा अत्यंत यशस्वी झाला. वैज्ञानिक प्रगतीवरच देशाचा उत्कर्ष अवलंबून असतो म्हणून विज्ञाननिष्ठा ही आपली जीवननिष्ठा बनली पाहिजे.' एका वार्ताहराने 'आपला प्रवास निर्विघ्नपणे पार पडला ना?' अशी विचारणा केली. त्यावर प्राध्यापक म्हणाले, 'कोणतंही विघ्न आलं नाही. हजारो मैलांचा हा दीर्घप्रवास स्वामीजींच्या कृपेने सुरक्षित झाला. त्यांनी एक मंतरलेला ताईत दिलेला होता. त्याच्या प्रभावामुळं सारं ठीक झालं, असो. तर मुख्य मुद्दा असा की, वैज्ञानिकदृष्टी आणि मानवी प्रगती यांचा परस्परसंबंध घनिष्ठ आहे हेच मी परिषदेत वाचलेल्या निबंधाचं मुख्य सूत्र आहे.'

प्राध्यापक महाशयांची ही मुलाखत वाचून हसावे की रडावे हेच मला कळेना. मंतरलेल्या ताईतामुळे प्रवास उत्तम होऊ शकत असेल तर मग विज्ञानाच्या प्रगतीची काय आवश्यकता? स्वामीजींनी दिलेला ताईत हाच आपला रक्षणकर्ता आहे ही अंधश्रद्धा ज्यांच्या डोक्यात खोलवर गेली आहे ते विज्ञानाची कशी उपासना करू शकतील? आम्ही आजपर्यंत भोळ्या भाबड्या, अडाणी लोकांच्या अंधश्रद्धांना हसत होतो. बोकड बळी दिला की दैवत प्रसन्न होते किंवा कोंबडे उतरून टाकले की रोग बरा होतो. या प्रकारच्या अनेक गैरसमजूती अजूनही समाजात दृढ आहेत. शास्त्रीय दृष्टीच्या प्रकाशात असल्या भ्रांतिष्ट कल्पना टिकू शकत नाहीत पण शास्त्रापेक्षा रूढी अधिक बळकट असते. अंधश्रद्धांची समाजमनात खोलवर गेलेली ही हरळी कितीही उपटण्याचा प्रयत्न केला तरी तिची मुळे तग धरून रहातात. अशिक्षितांना का हसायचे? **सुशिक्षित ज्ञानसंपन्न म्हणवणारी विद्वान माणसेसुद्धा काही अंधश्रद्धांना कवटाळून बसलेली असतात. त्यांच्या वागण्याचा आणि बोलण्याचा परिणाम सामान्य लोकांवर** होत असतो. ज्ञानी मनुष्य जेव्हा भाकडकथांवर विश्वास ठेवतो, अशास्त्रीय गोष्टींचे समर्थन करतो तेव्हा कळत न कळत साधारण मनुष्य त्याचे अनुकरण करीत असतो.

एकदा एक गृहस्थ सल्ला विचारण्यासाठी आले. त्यांच्या पदवीधर मुलाला नोकरी मिळत नव्हती, बराच प्रयत्न करून ते निराश झाले होते. कुणीतरी संन्याशाने 'राम' हा शब्द लाखवेळा लिहिला तर त्याला नोकरी मिळू शकेल' असे सुचवले. मी म्हणालो, 'लक्षवेळा रामनाम लिहिल्यामुळे तुमच्या मुलाचे अक्षर सुधारेल. नोकरी

कशी मिळेल? 'राम' हे प्रयत्नांचे, पुरुषार्थाचे श्रेष्ठ प्रतीक आहे. सैन्य जमवून आणि सेतू उभारून रामाने लंकेवर झेप घेतली. रावणाला पराभूत केले. न्यायाजी ध्वजा उभारली. पण हे सर्व अथक प्रयत्नांचे फळ आहे. 'राम नाम लिहिणे' याचा अर्थ प्रयत्नवादी बनले पाहिजे. केवळ अक्षरे गिरवण्याने काय होणार आहे?'

नवससायास, गंडेदोरे, ताईत, भस्म वगैरे गोष्टींत रोगनिवारणाचे किंवा संरक्षणाचे सामर्थ्य असते असे मानायला कोणताही शास्त्रीय आधार मिळू शकत नाही. दुबळ्या मनातच अंधश्रद्धा फोफावत जाते. प्रतिकूल परिस्थितीशी झगडताना माणसे थकून जातात. ती हळवी बनतात. कुठला तरी साधू केवळ हस्तस्पर्शाने रोग बरे करू शकतो असे कोणीतरी सांगतो आणि हताश झालेले, आत्मविश्वास गमावलेले लोक त्या तथाकथित साधूच्या कृपादृष्टीची आशाळभूतपणे वाट पाहातात. त्याच्याभोवती गर्दी करतात. यात उच्च पदवीधरही असतात. समाजातली मातब्बर मंडळीही असतात. केवळ हाताच्या स्पर्शाने रोग बरा कसा होऊ शकतो या प्रश्नावर कोणीच विचार करीत नाही. उत्तर ठरलेले असते 'ही दैवी शक्ती आहे. ईश्वरी सिद्धी प्राप्त झाल्यामुळे हे चमत्कार घडू शकतात. साधू महाराज हे ईश्वराचेच अवतार आहेत' आता या युक्तिवादाला कसलेही उत्तर नाही. ईश्वरी अवतार म्हटल्यानंतर साऱ्या शंका, सारे तर्क-कुतर्क वितळून जातात. वैज्ञानिक विचारपद्धतीचा अशा ठिकाणी दारुण पराभव होतो. विज्ञानाच्या उपासकांचीच विज्ञाननिष्ठा शुद्ध स्वरूपाची नसेल तर साधारण माणसात विज्ञानदृष्टी आली पाहिजे हा आग्रह धरून सुद्धा तो निरुपयोगी ठरणार आहे. नवनवीन वैज्ञानिक शोध लावणारे शास्त्रज्ञ हे आधुनिक काळातले श्रेष्ठ तपस्वीच आहेत. सृष्टीतली गूढरहस्ये शोधून काढण्यासाठी त्यांनी अपार परिश्रम केले आहेत. आपले आयुष्य पणाला लावून कित्येकांनी विज्ञानशक्तीची अखंड उपासना केल्यामुळे आजचे जग कालच्यापेक्षा अधिक प्रगत झालेले दिसत आहे. सृष्टीतल्या सर्व रहस्यांचा उलगडा अद्यापही झाला नाही. पण 'दैवी' समजल्या जाणाऱ्या कित्येक गूढस्थळांवर विज्ञानाने प्रकाश टाकला आहे. आणखी काही रहस्यांचे आकलन होऊ शकेल. एकदम अद्‌भूताची अलौकिकाची कास का धरावी? कारण प्रयत्न चालू आहेत. कालच्यापेक्षा आणि आजच्या उद्याचे जग अधिक सुंदर व समर्थ करण्याचा प्रयत्न हे विज्ञानाच्या उपासनेचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. दुर्दैवाने सुखाबरोबरच अनेक दु:खांचीही निर्मिती या शक्तींमुळे झालेली आहे. पण त्याची जबाबदारी ती शक्ती राबवणाऱ्या माणसाच्या विवेकबुद्धीवरच आहे. सारे जग भस्मसात करून टाकणारी, जीवनाची राखरांगोळी करणारी आणि जगाला भयानक स्मशानाची अवकळा आणू शकणारी संहारक शस्त्रे सुबुद्ध व सुसंस्कृत राष्ट्रे निर्माण करण्याच्या प्रयत्नात गुंतलेली असतील तर मग सामान्य माणसाला या राक्षसी शक्तीकडे पाठ फिरवण्याशिवाय गत्यंतर नाही. आपला कोणी रक्षणकर्ता नाही अशा वैफल्याने तो

कुठल्याही काल्पनिक शक्तीपुढे लोटांगण घालील. कारण सर्वसामान्य मनुष्य तार्किक चिकित्सा करण्याच्या फंदात पडत नाही. ती त्याची कुवतही नसते.

निवडणुकीला उभे असलेले एक सुशिक्षित पुढारी सांगत होते, 'गेल्या दोन निवडणुकांत मला पराभव पत्करावा लागला. माझे ग्रह बिघडलेले होते. पण यावेळी मात्र कुंडलीतले समर्थ ग्रह मला निश्चित विजय मिळवून देणार असं जागतिक कीर्तीचे ज्योतिषाचार्य रतनलाल शास्त्री यांनी म्हटलं आहे. त्यांच्या सांगण्याप्रमाणं दररोज होमहवन चालू आहे. अनुष्ठानासाठी पुरोहित बसलेले आहेत.' यदाकदाचित हे पुढारी विजयी झाले तर होमहवनामुळेच आपण यशस्वी झालो असा त्यांना दृढ विश्वास वाटेल. उत्तम क्रिकेट खेळणारा एक फलंदाज आपल्याला चौथ्या क्रमांकावर खेळायची संधी मिळाली तरच आपण शतक काढू शकतो अन्यथा आपली फलंदाजी दुसऱ्या कोणत्याही क्रमांकावर चांगली होत नाही अशा समजुतीत होता. कारण तुला चार हा आकडा शुभ आहे असे कोणत्या तरी ज्योतिषाने त्याला सांगितले होते म्हणे. हा खेळाडूही सुविद्य होता. सायन्सचा ग्रॅज्युएट होता. सायन्सचं ज्ञान असूनही सायंटिफिक आऊटलुक मात्र त्याला आलेला नव्हता. तयार कपड्यांच्या दुकानात जाऊन अंगात तयार कपडे घालावेत तसे कित्येकांचे ज्ञान असते. ज्ञान आहे पण शहाणपण नाही ही परिस्थिती भाणसाला अशास्त्रीय विचारसरणीकडे सहज खेचून नेते, संत तुकोबांनी अशा पंडितांचा परामर्श घेताना म्हटले आहे.

पंडित म्हणता थोर सुख। परि तो पाहाता अवघा मूर्ख
काय करावे घोकिले। वेदपठण वाया गेले।

शास्त्र शिकताना त्याचे पठण करावे हे ठीक आहे. पण शास्त्रीय दृष्टीलाच पारखे झालेले शास्त्राभ्यासक इतरांना मार्ग दाखवू शकत नाहीत. उलट त्यांची स्वत:ची वाट मात्र भ्रमिष्ट कल्पनांच्या धुक्यात हरवून जाते. खऱ्या धार्मिकतेला आणि ईश्वरीभक्तीला कुणाचाच विरोध असण्याचे कारण नाही. आपल्या मनात एखादे तरी श्रद्धेचे चिमुकले घरटे असायला हरकत नाही. वैराण आयुष्याला श्रद्धेचा ओलावा मिळाला तर त्याचे प्रसन्न हिरवळीत रूपांतर होऊ शकते यात शंका नाही. माझा परमेश्वर माझा कर्तव्यात सामावला आहे या श्रद्धेने कर्म करणारा माणूस एक आगळे समाधान मिळवू शकतो. महात्मा गांधी म्हणाले होते, 'मानवतेच्या सेवेत मला तो ईश्वर दिसतो. तो आकाशात नाही किंवा खाली पाताळातही नाही. पण प्रत्येक माणसात तो मिसळून गेला आहे' श्रद्धेचे हे एक नितांत सुंदर रूप नव्हे काय? या प्रकारची श्रद्धा मनुष्याला उत्साह देते. त्याच्या थकलेल्या गात्रांत नवीन चैतन्य निर्माण करते. माझ्या बलिदानातूनच माझा देश स्वतंत्र होणार आहे असे म्हणून फासाच्या फळीवर चढलेले हुतात्मे समाधानाने मरणाला सामोरे गेले. श्रद्धेतूनच सौंदर्य, प्रेम आणि शक्ती या गोष्टी उदयाला येतात. पण काही झाले तरी श्रद्धा ही ज्ञानातूनच आविष्कृत झाली

पाहिजे. तिला वैचारिक बैठक नसेल तर तिचे रूपांतर अंधश्रद्धेत झाल्याशिवाय राहात नाही. खुळचट, भ्रममूलक अंधश्रद्धांचा आजच्या वैज्ञानिक जगातसुद्धा सुळसुळाट झालेला दिसावा यापेक्षा आश्चर्य ते कोणते?

नदीच्या पाण्यात उतरून काही मंत्र पुटपुटत आकाशाच्या दिशेने पाणी फेकणाऱ्या एका श्रद्धाळू माणसाला धर्मसुधारकाने प्रश्न विचारला, 'तू हे काय करतोस? या कृतीचा अर्थ काय?' तो भाविक म्हणाला, 'माझ्या स्वर्गस्थ पितरांना मी हे पवित्र जल अर्पण करीत आहे. माझे पितर त्यामुळे तृप्त होतील.' तो धर्मसुधारकही ओंजळीत पाणी घेऊन किनाऱ्याकडे फेकू लागला. 'बारा मैलांवर असलेल्या आपल्या शेताला आपण पाणी देत आहोत' असे स्पष्टीकरण त्याने केले. तो श्रद्धाळू भाविक उपहासाने म्हणाला, 'यात कसला शहाणपणा आहे? बारा मैलांवरच्या शेताला येथून पाणी देणारा तुझ्यासारखा वेडा मी प्रथमच पाहात आहे. हे पाणी कधीतरी पोहोचणं शक्य आहे काय? शक्याशक्यतेचा नीट विचार करूनच कोणतीही कृती करावी', आता तो धर्मसुधारक हसून म्हणाला, 'न दिसणाऱ्या स्वर्गातल्या पितरांना तू पाणी देऊ शकतोस ते त्यांना मिळतं. तर मग बारा मैलांवरील शेतापर्यंत हे पाणी का पोहोचू नये?' त्या भाविकाच्या डोक्यात कितपत प्रकाश पडला हे सांगणे कठीण आहे. तर्कदृष्ट रूढी चिवट असतात. त्यांच्यावर पुन्हा पुन्हा न कंटाळता घणाघाती प्रहार केल्याशिवाय त्या तुटू शकत नाहीत. आजही राजस्थानात मुला-मुलींची लग्ने बालपणी करण्यात धर्म आहे अशी समजूत दिसते. क्वचित कुठे तरी सती जाण्याचेही समर्थन धर्माच्या नावाखाली केले जाते. अनेक प्रकारचे अपसमज आणि रूढी धर्म व संस्कृती यांचे नाव घेत समाजात बिनदिक्कत नांदताना आढळतात. त्यांच्यावर सतत आघात होत राहिले तर वैचारिक जागृती होऊ शकेल. अशी जागृती करणारे विचारवंत आपल्या धर्मसंस्कृतीचाच उच्छेद करीत आहेत अशी ओरड कर्मठांकडून होते. त्यामुळे हे कार्य करणे कठीण होऊन बसले आहे. आमच्या धर्मभावना दुखावल्या गेल्या. आमच्या आचार-विचार संस्कृतीवर हे धर्महीन लोक आक्रमण करीत आहेत असे म्हटले जाते. वैज्ञानिकदृष्टी आणि जुन्या श्रद्धा-अंधश्रद्धा यांचा अटीतटीचा संघर्ष होणे आवश्यक असूनही तो या परिस्थितीत होत नाही. बहुसंख्य माणसे अतर्क्य, अनाकलनीय, चमत्कृतिपूर्ण गोष्टींवर डोळे झाकून विश्वास ठेवतात, एखादा स्वातंत्र्यवीर सावरकर आपल्या तर्ककठोर भाषेत काही प्रश्न विचारतो तेव्हा त्या प्रश्नांनी बरीच नाजूक मने अस्वस्थ होतात.

सावरकरांनी विचारले होते, 'ज्ञानेश्वर निर्जीव भिंत चालवू शकले, पण सजीव माणसे मंत्रबळे चालवून विंध्याद्रीच्या खिंडीत अल्लाउद्दीनाचा मार्ग रोखण्यासाठी का उभी करू शकले नाहीत?' जनाबाईचे दळण दळणाऱ्या कनवाळू देवाने त्या दळणापेक्षाही हिंदू राष्ट्रास ज्या दळणाची आवश्यकता होती ते दळण दळण्यास

सरसावून त्या हरिद्वेष्ट्याच्या राजसत्तेसच आपल्या क्रोधाच्या जात्यात दळून, भरडून, निर्दाळून का टाकले नाही? हे निरुत्तर करणारे प्रश्न आहेत. या प्रश्नांतली तर्कदृष्टी स्वच्छ आहे. म्हणूनच तर्काने यांचे उत्तर देणे कठीण आहे. भाविकांच्या दृष्टीने मात्र हे उत्तर अगदी सोपे आहे. ते असे, 'परमेश्वरी लीला अगाध आहे. तुम्हा आम्हा सामान्य माणसांना ती कधीच कळायची नाही. आले देवाचिया मना, तेथे कोणाचे चालेना, त्या परमात्म्याला जे योग्य वाटले ते त्याने केले, त्यावर टीका– टिप्पणी करण्याचा आम्हा पामरांना अधिकार नाही.' या समर्थ उत्तरामुळे सारेच प्रश्न निष्प्रभ होतात. आजच्या भारतीय समाजात अत्यंत सुशिक्षित लोकांतसुद्धा कित्येक अंधश्रद्धा घट्ट पाय रोवून उभ्या आहेत. या श्रद्धा त्यांना सोडवत नाहीत. कारण त्या सनातन आहेत. भावनेच्या खतपाण्यावर त्या धष्टपुष्ट बनल्या आहेत. भास्कराचार्य नावाच्या प्राचीन शास्त्रज्ञाला सूर्यचंद्राचे ग्रहण म्हणजे काय हे शास्त्रीयदृष्ट्या कळले होते. पण ग्रहण लागले की, राहूने सूर्याची लवकर सुटका करावी म्हणून तो मंत्रपठण करीत बसायचा अशी त्यांच्यासंबंधी आख्यायिका आहे. जे विचारांना पटते ते आचारात उतरू नये ही विसंगती आजही कायम आहे. धर्म, ईश्वर, आचारविचारातील पावित्र्य, पूजा आणि प्रार्थना या गोष्टींना विरोध असण्याचे काहीच कारण नाही. पण समाजमनाच्या भूमीत अनेक प्रकारच्या लहानमोठ्या अंधश्रद्धांनी जी असंख्य बिळे केली आहेत ती समाजाच्या वैचारिक प्रकृतीला धोकादायक आहेत. इतकेच या विचारांचे सार आहे. विचारवंतांनी समाजात कुरवाळण्यासाठी अशा शास्त्रीय विचारांचे समर्थन करण्याची कसरत करू नये. श्रद्धा माणसाचे मानसिक सामर्थ्य वाढवते. अंधश्रद्धा मात्र त्याची मन:शक्ती क्षीण करते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्या सीमारेषा जवळजवळ आहेत म्हणूनच याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

□ □ □

# मूर्खांविषयी
# ❋
# थोडेसे

आचार्य अत्रे यांना एकदा त्यांच्या एका वाचकाने प्रश्न विचारला, 'आजपर्यंत तुम्ही पुष्कळ विनोदी लेखन केले आहे. आता विनोदाचे विषय बहुधा उरले नसतील. अशा परिस्थितीत तुम्ही नवीन विनोदी लेखन करू शकाल काय?' अत्रे म्हणाले, 'तुमचा प्रश्नच विनोदी आहे. अहो, जगात मूर्खपणा आणि विसंगती भरपूर प्रमाणात आहे. तऱ्हेवाईक आणि विक्षिप्त माणसंही वाटेल तितकी दिसतात. विनोद विषयाला कधीच ओहोटी लागणं शक्य नाही. विनोदी लेखकाच्या वृत्तीनं आणि दृष्टीनं पाहिलं तर जगात सर्व क्षेत्रात विनोद सापडेल' या विधानात निश्चितच तथ्य आहे. आजपर्यंत समुद्रातून कोट्यवधी मासे बाहेर काढण्यात आले पण म्हणून समुद्रात मासे उरले नाहीत अशी अवस्था कधीतरी झाली आहे काय? जोपर्यंत हे जीवन नानाविध चमत्कृतींनी, विसंगतींनी, वैगुण्यांनी आणि मूर्खपणाने भरलेले आहे तोपर्यंत विनोदी लेखकाला विनोदाची सामुग्री कमी पडणार नाही. आपण समजतो की शिक्षणाच्या प्रसारामुळे ज्ञानाची वाढ होत आहे. जग अधिकाधिक सुजाण बनत आहे. पण हा एक भ्रम आहे. कालच्याप्रमाणे आजच्याही जगात शहाणपणाचा दुष्काळ शहाण्या माणसांना जाणवतो. मूर्खांचे ठीक असते. त्याला मूर्खपणाच्या वातावरणात सुखाने राहाता येते पण शहाणी माणसे मात्र या वातावरणात गुदमरून जातात. हॅम्लेटला जगाचा सांधा निखळल्याची आणि जीवन कुजल्याची जाणीव होत होती पण संवेदना हरवून बसलेले लोक जग सुरळीत चालले आहे असेच मानीत असतात.

समर्थ रामदासांनी 'दासबोधा'तून मूर्खांची आणि पढतमूर्खांची अनेक वैशिष्ट्ये विवरून सांगितली आहेत, ती वाचताना एखादे लक्षण आपल्यालाही लागू पडते की काय अशी भीती वाटावी इतक्या तपशीलवारपणे मूर्ख लक्षणे त्यांनी सांगितली आहेत. रामदासांनी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले होते. त्यांच्या दृष्टीला वेगवेगळ्या पातळ्यांवरचे मूर्ख आणि महामूर्ख पडलेले असावेत. त्यांचे बारकावे सांगताना ते म्हणतात.

आपली आपण करी स्तुती। स्वदेशी भोगी विपत्ती। सांगे वडिलांची कीर्ती। तो येक मूर्ख।।

स्वत:ला महान पुढारी समजणाऱ्या एका नेत्याचे भाषण ऐकण्याचा मला कुयोग आला.

आपल्यासारखा दूरदृष्टीचा लोकनायक या देशात दुसरा नाही. याबद्दल त्याची शंभर टक्के खात्री झाली होती. मूर्ख माणसे स्वत:वर नेहमीच संतुष्ट असतात. ज्ञानी माणूस दु:खी असतो. पण मूर्ख सदासुखी असतात. मूर्खपणाचा हा फायदा शहाण्यांना मात्र मिळत नाही. ते पुढारी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले, (पुढारी नेहमीच मार्गदर्शन करतात) 'आम्ही सम्राट चंद्रगुप्ताचे, अशोकाचे, शिवाजीचे महान वंशज आहोत. लढा देणे हा आपला धर्म आहे. म्युनिसिपालिटीने केलेली पाणीपट्टीतली वाढ आपण आपल्या पराक्रमाने रद्द करून घेऊ. कारण आपण रामकृष्णाचे, भीम-अर्जुनाचे आणि अकबर औरंगजेबाचे वंशज आहोत.' जमलेल्या शेकडो लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. पुढाऱ्याचे नाव घेऊन झिंदाबादच्या घोषणा केल्या. पुढारी अत्यंत सुखावले. त्यांचे मस्तक जणू स्वर्गाच्या छपराला लागत होते. आपण आपल्या ओजस्वी भाषणाने क्रांती करू शकतो. आपण गरीब जनतेच्या पदरात न्याय टाकू शकतो. बहुधा महात्मा गांधीनंतर अन्यायाच्या विरुद्ध खंबीरपणाने लढणारा नेता अशी आपली इतिहासात नोंद व्हावी या योग्यतेचे आपण आहोत असा त्यांना नेहमीप्रमाणेच साक्षात्कार झाला. 'पाणीपट्टीत केलेली वाढ आपल्या म्युनिसिपालिटीने रद्द केली नाही तर मी म्युनिसिपालिटीसमोर सकाळपासून संध्याकाळपर्यंत एक दिवस प्राणांतिक उपोषण करीन. मग माझ्या जीवाचे काहीही होवो!' ते म्हणाले, पुन्हा नेते महोदयांचा जयजयकार झाला. काही झाले तरी ते रामकृष्णांचे महनीय वंशज होते. माझ्या दुर्दैवाने या सभेत मी अडकलो होतो. पुढारी आणि जनता यात अधिक मूर्ख कोण या प्रश्नाचे उत्तर मात्र मी देऊ शकत नाही. असल्या भंपक भाषणांनी जनतेला झुलवणारे हे नेते पाहिले म्हणजे देशाच्या भवितव्याबद्दल चिंता वाटते. पण आपण चिंतेशिवाय दुसरे काय करू शकतो?

विवेकशून्य माणसांच्या हातात नेतृत्व जाणे ही एक भयानक आपत्ती असते. असे नेते आपल्या या अहंकाराच्या वर्तुळातून कधीच बाहेर पडत नाहीत. या प्रकारचे नेतृत्व सर्व क्षेत्रांत असते. योग्यतेमुळे पद मिळण्यापेक्षा योग्य 'ठरवण्यात' आलेले पुष्कळ लोक असतात. एका संस्कृत सुभाषितात म्हटले आहे, 'प्रासादशिखरावर जाऊन बसला म्हणून कावळा काही गरूड होऊ शकत नाही' हे वचन आजच्या परिस्थितीत निरुपयोगी आहे. बहुसंख्य कावळे जेव्हा प्रासादशिखरावर बसतात तेव्हा तेथील एखाद दुसऱ्या गरुडाला वनवासात जाणे भाग पडते. पद आणि पात्रता यांचे प्रमाण व्यस्त होत चालले तर ती घटना देशाच्या इतिहासाची शोकांतिका ठरू शकते. अमेरिकेचा अध्यक्ष अब्राहम लिंकन याने स्पष्टपणे बजावले होते, 'लिंकन या आडनावाच्या भांडवलावर कोणीही माझ्याकडे एखाद्या पदाची किंवा नोकरीची गळ घालू नये' लिंकन हा न्यायप्रिय होता. विवेकी होता. पण आज अनेक क्षेत्रात नाव आणि संप्रदाय यांच्या बळावर माणसे स्वत:ला श्रेष्ठ समजू लागली तर तो मूर्खपणा

देशाला महागात पडणार आहे. इतिहासात आणि पुराणांत कुळजातीला महत्त्व देण्याची चूक घडलेली आहे. त्याच चुकांची पुनरावृत्ती जो करतो 'तो येक मूर्ख' असेच रामदासांच्या भाषेत सांगावे लागेल. धर्म, शिक्षण, समाजकारण या विविध क्षेत्रांत पूर्वीचाच मूर्खपणा चालू ठेवण्याची चूक घडू नये. आपले पूर्वज शहाणे होते हे मान्य करून सुद्धा त्यांनीही काही वेडेपणाची कृत्ये केली, काही अविचारी परंपरा जोपासल्या. हे मान्य केले पाहिजे. वडिलांच्या कीर्तीचा आधार घेऊन स्वत:ची कर्तृत्वहीनता झाकण्यात फारसा अर्थ नसतो. माझा बाप शहाणा होता म्हणून त्याच्या शहाणपणाचे ढोल वाजवणारा माणूस हा मूर्खांचा प्रतिनिधी ठरतो. दुसरे असे की, पूर्वजांविषयी उचित अभिमान असायला हरकत नाही. पण पूर्वजांचे भांडवल करून नालायकांनी त्यावर गुजराण करण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये. आम्ही हरिश्चंद्राचे वंशज आहोत अशी आढ्यता एखादा भ्रष्टाचारी मनुष्य बाळगू लागला तर त्याला काय म्हणायचे?

-मूर्ख लोकांनी विनोदी लेखकांना लेखनासाठी सदैव भांडवल पुरवले आहे हे मात्र खरे. गडकरी, अत्रे, पु.ल.देशपांडे यांच्या नाटकांतून कित्येक मूर्खांच्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. 'एकच प्याल्यातले' 'आर्य मदिरामंडळ' हे वस्तुत: मूर्खमंडळच आहे. त्यांची बोलणी आणि करणी आपल्याला भरपूर हसवते. 'साष्टांग नमस्कारात' स्वत:ला कवी समजणाऱ्या कवींची जी मार्मिक चेष्टा अत्र्यांनी केली ती कुणी विसरणे शक्य नाही. 'मी मंत्री झालो' या नाटकात मंत्र्यांच्या एकेक लीला त्यांनी ज्या दाखविल्या त्याला वास्तवाचा आधार आहे म्हणून प्रेक्षक मनमुराद हसतात. 'तुझे आहे तुजपाशी'मधला 'आचार्य' हा देखील विनोदाचा उत्तम नमुना आहे. कोणत्याही कल्पनेच्या किंवा विचाराच्या आत्यंतिक आहारी जाऊन माणसे आपल्या जीवनाचा तोल हरवून बसतात आणि स्वत:ला हास्यास्पद बनवतात. या वस्तुस्थितीवरच विनोद आधारलेला आहे. राजदरबार म्हणजे मूर्खांचा बाजार. जो महामूर्ख असेल तो या दरबारात प्रतिष्ठित ठरतो हे दृश्य पाहिल्यानंतर एक हळवा कवी चिडला आणि रस्त्यावर चरणाऱ्या एका गाढवाला म्हणाला, 'हे गदर्भराजा', आपण येथे का थांबला आहात? आपलं स्थान तर राजदरबारातच आहे. कृपा करून तिथं जावं, कारण शेपटी असलेल्या कोणत्याही प्राण्याला तिथं 'अश्वराज' म्हणूनच गौरविण्यात येतं. आपण ताबडतोब गौरवांकित व्हावं.' हा उपरोध आपल्याला खळखळून हसवतो. पण हसता हसता आपण विषण्ण होतो. कारण या अतिशयोक्तीत एक विदारक सत्य कवीने सांगितले आहे. मूर्ख प्रतिष्ठित ठरतात आणि शहाणे मात्र अवमानित होतात. पण जगाचे हिशेब कित्येक वेळा चमत्कारिक आणि विसंगत असतात.

समर्थ रामदासांनी मूर्खांचे आणखी कितीतरी तपशील बारकाईने स्पष्ट केले आहेत. ते म्हणतात.

अनीतीने द्रव्य जोडी। धर्म नीतिन्याय सोडी'
संगतीचे मनुष्य तोड। तो एक मूर्ख ·

मला वाटते समर्थ रामदास हे संतपुरुष असल्यामुळे अनीतीने द्रव्य मिळवणाऱ्या माणसाला त्यांनी मूर्ख म्हटले आहे.

आज असा मनुष्य व्यवहारज्ञानी, नीतीनिपुण समजला जाईल. द्रव्य हे द्रव्य आहे, ते प्रामाणिक कष्टाने मिळवलेले असो किंवा कोणत्याही 'घोटाळ्यातून' मिळवलेले असो. त्यांची किंमत सारखीच. द्रव्य मिळवण्यासाठी चातुर्य लागते. मनुष्यस्वभावाचे ज्ञान लागते. ते पचवण्यासाठी परिस्थितीचे भान असावे लागते. आणि त्याच्या बळावर सत्ता आणि प्रतिष्ठा मिळवण्याचा धूर्तपणा असावा लागतो. समर्थ जरी अनीतीमान माणसाला मूर्ख म्हणत असले तरी त्यांच्याशी आजचे हे द्रव्यपूजक जग सहमत होणार नाही. एकदा एका शवद्वानाने लाचलुचपतीने श्रीमंत झालेल्या एका भ्रष्ट अधिकाऱ्यावर चौफेर टीका केली. मी त्याला विचारले, 'खरोखरच का तू नैतिक कारणावरून त्याचा निषेध करतोस? तुला त्याची इतकी चीड का यावी?' त्यावर तो म्हणाला, 'लाचलुचपतीनं गबर होण्याची संधी त्याला मिळाली. मी मात्र कोरडाच राहिलो. अशी काही कल्पना मात्र मला लढवता आली नाही आणि आता हा प्रतिष्ठितांच्या मालिकेत जाऊन बसला याची मला चीड आली आहे.'

संत सज्जनांच्या दृष्टिकोनातून अनीतीमान हा अज्ञानी मूर्ख असतो. पण नीती आणि अनीती यांच्या चक्रव्यूहात सापडण्यापेक्षा जो कोणत्याही मार्गाने संपत्ती मिळवतो तोच शहाणा ठरतो. पांडित्य, चारित्र्य, नम्रता, सामर्थ्य, सौंदर्य आणि आणखी अनेक गुण एका पारड्यात टाकले व दुसऱ्या पारड्यातच सोने-नाणे घातले तर ते दुसरे पारडेच जड ठरणार आहे. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' सर्व गुण सोन्याला चिकटतात. मग हे सुवर्ण सन्मार्गाने मिळवले का वाममार्गाने पदरात पाडून घेतले हे अगदीच गौण आहे. संत रामदासांनी अनैतिकता आणि अज्ञान दोन्ही एकच आहे असे मानले ते त्यांच्या प्रकृतीला साजून दिसणारे आहे. तुकारामही 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे' असे म्हणतात. त्यांच्या दृष्टीने उत्तम व्यवहार महत्त्वाचा. पण जगाच्या दृष्टीने धन जोडणे हेच सर्वाधिक महत्त्वाचे आहे. अधम व्यवहाराने संपत्ती सहज मिळत असेल तर ती स्वीकारण्यात शहाणपणा आहे. याबाबतीत व्यवहारी माणूस आणि संत यांच्यात सदैव मतभेद असणारच.

मूर्खाचे आणखी एक प्रधान लक्षण म्हणजे तो स्वतःला सर्वज्ञ समजतो. सर्व कार्यक्षेत्रात आपण सहज संचार करू शकतो. आपल्याला अगम्य असे काहीच नाही असे तो मानतो. देवदूतही ज्या ठिकाणी प्रवेश करायला धजत नाहीत तेथे महामूर्ख निःशंकपणे विहार करतो. 'भारताचा औद्योगिक विकास' या विषयावर एका लोकप्रिय सिनेमानटाचे व्याख्यान झाले. त्याला पाहाण्यासाठी प्रचंड गर्दी होती. औद्योगिक

विकासासंबंधी त्याने जे अकलेचे तारे तोडले त्यामुळे बऱ्याच लोकांची करमणूक झाली. या विषयातले त्याला ओ की ठो कळत नव्हते. तरीही हा मूर्ख अर्थशास्त्रज्ञांच्या मेळाव्यात येऊन पंधरा मिनिटे बरळून गेला. मूर्खांच्या धाडसाबद्दल अधिक काय सांगावे? शास्त्रज्ञांच्या परिषदेत पंडित नेहरूंचे उद्घाटनपर भाषण झालेले मला आठवते. नेहरू हे शास्त्रविषयाचे पदवीधर होते. देशाच्या शास्त्रीय प्रगतीबद्दल विचार करणारे आणि विज्ञानावर भर देणारे ते एक विचारवंत होते. पण शास्त्रज्ञांच्या त्या सभेत ते अत्यंत नम्रतेने बोलले या विषयावर आपल्याला बोलण्याचा काहीही अधिकार नाही आपण केवळ वैज्ञानिकांचे विचार समजून घेण्यासाठी आलो आहोत असे उद्‌गार त्यांनी लीनतेने काढले. खरा ज्ञानवंत हा नेहमीच विनम्र असतो. फळांनी लगडलेलं झाड वाकलेले असते. काटेरी झुडपे मात्र सदैव ताठ असतात. अज्ञान आणि उन्मत्तपणा यांचे समीकरण झालेले आपण अनेक क्षेत्रांत पाहातो. आपल्याला अजून पुष्कळ शिकायचे आहे हे ज्याला जाणवते तो शहाणा. आता आपल्याला शिकण्यासारखे काहीच उरले नाही असे ज्याला वाटते तो मूर्ख. अशा मूर्खपणाला जगात पूर्वीही प्राबल्य होते. पुढेही ते राहील. मूर्खपणाला औषध नाही. समर्थ रामदासांनी मूर्खलक्षणं सांगताना आणखी एक व्यापक विचार सांगितला आहे.

परपीडेचे मानी सुख। परसंतोषाचे मनी दुःख।
गेले वस्तुचा करी शोक। तो एक मूर्ख

जो दुसऱ्याच्या सुखाने आनंदित होत नाही आणि दुसऱ्याच्या दुःखाने व्याकूळ होत नाही तो एक नव्हे तर एकमेव मूर्ख समजावा.

□ □ □

# एकेक दिवा ⌘ विझत आहे

भवभूतीच्या 'उत्तररामचरित' या नाटकात रामाच्या लोककल्याणकारी, त्यागमय व्यक्तीचे प्रत्ययकारी दर्शन घडते. रामाने त्यात म्हटले आहे, -

स्नेहं दयां च सौख्यंच यदि वा जानकीम् अपि।

आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा।।

लोकाराधनासाठी मी माझ्या जीवनातील सर्वोच्च सुखांचाही त्याग करीन, मला प्राणप्रिय असलेल्या सीतेचाही त्याग करीन. 'रामराज्याची' भूमिकाच या श्लोकातून रामाने मांडलेली दिसते. घोषणा करण्याची सत्ताधाऱ्यांना सवय असते. पण रामचंद्रांची ही केवळ शाब्दिक घोषणा नव्हती. लोकाराधनासाठीच निष्पाप सीतेचा त्याग करण्याची आपत्ती त्याच्यावर आली. राजा असलेला राम आणि पती असलेला राम यांच्यात जे विलक्षण भावनिक द्वंद्व झाले असेल त्याची विस्तृत कहाणी लेखक-कवींनी फारशी वर्णिली नाही. भवभूतीने रामाच्या व्याकुळ मनाचा शोध घेण्याचा नाटकातून प्रयत्न केला आहे. राजा या नात्याने आपले कर्तव्यकर्म कितीही कठोर असले तरी प्रजेच्या इच्छेसाठी ते केलेच पाहिजे, ही रामाची भूमिका होती. यामुळे सीता अन्यायाची बळी ठरली. यात शंका नाही. पण स्वत:ला प्राणांहून प्रिय असलेल्या पत्नीचाही त्याग करण्याची कठोर कृती त्याने केली. राजा हा राज्याचा स्वामी नसून तो सेवक असतो. प्रजापालन आणि रक्षण हाच त्याचा धर्म असतो. लोकहिताकडे पाठ फिरवून आपल्या ख्याली खुशालीत गुरफटून गेलेल्या राजाला इतिहासाने भ्रष्ट मानले आहे. महाभारतात तर अशा कर्तव्यभ्रष्ट, प्रजेला छळणाऱ्या राजासंबंधी अत्यंत कठोर विचार आलेले आहेत. 'प्रजेचे रक्षण न करता जो तिला लुबाडतो आणि केवळ कर घेतो, तो राजाच्या रूपाने प्रत्यक्ष कली आहे असे समजावे. प्रजापालन करण्याची प्रतिज्ञा करून जो राजा प्रजेचे संरक्षण करीत नाही त्याला पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ठार करावे' हा विचार क्रांतीकारक आहे. पण भ्रष्टतेच्या गाळात रुतलेल्या राजाला प्रजेने या प्रकारचे शासन करावे असे सांगून प्रजेचेही राजावर योग्य नियंत्रण असले पाहिजे असे सुचवले आहे. म. गांधींच्या दृष्टीसमोर रामराज्याचे स्वप्न होते. रामायणातला राम हा त्यांचा महान आदर्श होता. त्यांच्या लेखनातून आणि भाषणांतून 'रामराज्य' हा शब्द अनेक वेळा प्रकट होत असे. 'लोक' हाच राज्याचा केंद्रबिंदू मानून लोकांसाठी राजसत्तेचा वापर करताना रामराज्याचा आदर्श राज्यकर्त्यांनी प्रमाण

मानावा असे त्यांना वाटत होते. गांधीजींच्या विचारात संताची आध्यात्मिकता जशी होती त्याप्रमाणेच लोकनेत्याची व्यवहारकुशलता होती. रामराज्यात त्यांच्या दृष्टीने या दोन्ही घटकांचा संगम झालेला होता. रामाचे राज्य ही एक पुराणकथा झाली. आज तिचे स्मरण आणि गुणवर्णन करण्यात काही अर्थ उरला आहे का? आजच्या काळात चारित्र्याची इतकी घसरण झालेली दिसते की, राम हा एक 'आऊट ऑफ डेट' झालेला कालबाह्य ठरलेला राज्यकर्ता आहे. पुराणकथा सांगून किंवा ऐकून थोडीफार करमणूक करून घेण्यासाठी असल्या रम्याद्भुत गोष्टी ठीक आहेत. आजच्या एखाद्या परिपक्व बुद्धीच्या अनुभवी राज्यकर्त्याला विचारले तर तो म्हणेल–

'राम हा एका जुनाट कालखंडातला अपवादात्मक राजा आहे. राज्यावरचा हक्क सोडून प्रथम वनवासात गेला. नंतर पत्नीचा त्याग करून स्वत: दु:खी झाला. सत्तेचा सर्वांगीण उपभोग घेण्याचं सामान्य व्यवहारज्ञानही त्याच्यापाशी नव्हतं. रामायण ही एका राजाच्या त्यागाची, दु:खाची आणि अपयशाची कथा आहे. रामात देवत्व असेल पण आजच्या राजाचे गुणधर्म त्याच्याठायी मुळीच नव्हते. भोगाकडे पाठ फिरवून केवळ प्रजेच्या सुखासाठी धडपडत राहिलेला राजा हा आज तरी एका काल्पनिक कथेचा मनोरंजक विषय आहे. त्याच्यापासून आम्ही काही प्रेरणा घ्यावी असे मात्र त्याचे चरित्र आणि चारित्र्य नव्हते. एकवचनी, एकपत्नी, या मध्ययुगीन सद्‌गुणांना आज कुणीही धूप घालणार नाही. रामाचे आकर्षण गांधीजींना वाटावे यात आश्चर्य नाही. आम्ही दुरूनच या दोन्ही महान व्यक्तींना वंदन करू पण त्यांचे अनुकरण करण्याची दुर्बुद्धी आम्हाला होऊ नये. हे खाजगीत म्हणून तुम्हाला सांगितलं. जाहीरपणानं बोलताना, 'प्रभू रामचंद्र हाच आजच्या परिस्थितीत एकमेव आधारस्तंभ आहे. या महापुरुषाच्या पावलांचा मागोवा घेत आपण चाललं पाहिजे असंच मी म्हणेन'. त्या पक्वबुद्धी, धूर्त राजकारण्याचे हे उद्‌गार यथोचितच ठरतील. हातात सत्ता आल्यानंतर तिचा उपयोग केवळ प्रचंड धनसंपत्ती आणि अमर्याद भोगसामुग्री मिळवण्यापलीकडे ज्याला दुसरा काही असू शकतो याची गंधवार्ताही नाही, त्या व्यवहारी राज्यकर्त्याला राम, कृष्ण आणि बुद्ध किंवा गांधी काय कळणार? हे त्याच्या आवाक्यातले विषयच नव्हेत. लुटारूंच्या हातात जेव्हा राज्यसत्ता जाते तेव्हा त्यांच्या समोरचे आदर्शही वेगळे असतात. काही, राज्यप्रमुखांवर अमर्याद भ्रष्टाचार करून सत्तेचा अनैतिक वापर केल्याचे आरोप केले जातात. त्यात पुष्कळ प्रमाणात तथ्यही असू शकते. पण हे सत्ताधारी आपल्या सिंहासनाला पूर्णपणे चिकटून बसतात. आपल्या पदावरून खाली उतरून आपले निरपराधित्व प्रथम सिद्ध करावे असे यांना वाटत नाही. सत्ता मनुष्याला उन्मत्त बनवते आणि संपूर्ण सत्ता त्याला संपूर्णपणे बिघडवते अशा अर्थाचे एक वचन आहे. सत्तेमुळे माणूस नैतिक मूल्ये पायदळी तुडवायला प्रवृत्त होतो हे विधान तितकेसे पटत नाही. तसे असते तर अशोक-चंद्रगुप्त-शिवाजी

आणि शाहू हे सत्ताधीश कसे निष्कलंक राहिले? भ्रष्टतेचे मूळ सत्तेत नसून ते अधम स्वार्थी प्रवृत्तीत असते हेच खरे. माणसे महत्त्वाकांक्षी असतात. शूर वीर असतात. पण त्यांच्या प्रवृत्तीतच भ्रष्ट विचारांचे जंतू बुजबुजत असतात. माकडाच्या हातात कोलीत आणि संस्कारहीन, स्वार्थी माणसाच्या हातात सत्ता ही दोन्ही सारखीच विध्वंसक असतात. स्वत:ला मध्यबिंदू कल्पून सत्तारूढ झालेले राज्यकर्ते जनतेच्या प्रेमाचे नाटक मात्र उत्तम वठवतात. वर्षानुवर्षे जनतेचे प्रश्न त्यांनी भिजत ठेवलेले असतात. आपल्या भोवती स्तुतीपाठकांचे मेळावे भरवण्यात हे कुशल असतात. पूर्वी ऐकलेली एक गोष्ट आठवते. खुशाल चेंडू राजा मद्याचे घोट घेत प्रश्न विचारतो, 'प्रधानजी, लोक सुखी आहेत ना?' मुत्सद्दी प्रधान राजच्या कर्तृत्वाचे पोवाडे गात राहातो आणि एक किरकोळ तक्रार सांगतो. 'खायला भाकरी मिळत नाही' अशी जनतेची एक लहानशी तक्रार आहे.' राजेसाहेब खळखळून हसतात. त्यांच्या दृष्टीने ही समस्या अगदीच क्षुल्लक आहे. 'भाकरी मिळत नाही तर शिरापुरी खाऊन रहा म्हणावं?' समस्या सुटली. नाचगाण्याच्या मनोरंजक कार्यक्रमाला सुरूवात होते. नर्तकींच्या पायातल्या घुंगरांचा नाद सुरू होतो. शृंगारिक लावणीची ओळ निनादू लागते. भाकरीचा प्रश्न सहजपणे निकालात निघतो. ही गोष्ट केवळ हशा पिकवण्यासाठी योजलेली असावी असे पूर्वी वाटायचे. पण ही गोष्ट जुनी झाली नाही. ती अद्ययावत आहे. शंभर टक्के वास्तव आहे. आजही तेच राजे आणि प्रधानही आपल्या आसनावर प्रतिष्ठेने बसले आहेत. त्यांच्या हिशेबी जनतेचे सारेच प्रश्न नगण्य आहेत.

आजच्या सत्ता व संपत्तीपूजक जगात राम आणि गांधी यांना विचारतो कोण? हे आदर्श परवडण्यासारखे नाहीत. ते केवळ देव्हाऱ्यात ठेवून केव्हातरी त्यांची पूजा करण्याचा अभिनय केला की काम भागते. गांधी जयंती कशी साजरी केली जाते हे सर्वांनाच माहीत आहे. कोणीतरी तथाकथित नेता अथवा सत्ताधीश आपल्या एअरकंडीशन कारमधून खाली उतरतो आणि मुद्रेवर भक्तीचा नाटकी भाव आणून गांधीजींच्या पुतळ्याला हार घालतो. क्षीण आवाजात गांधींचा जयजयकार होतो. ते प्रतिष्ठित पुढारी 'लोकहो', गांधीजींच्या मार्गाने गेल्याशिवाय गत्यंतर नाही. त्या मार्गाने आपण वाटचाल करू या'. असा मौलिक सल्ला आपल्या विचारप्रवर्तक भाषणातून देतात आणि गाडीत बसून 'महात्मा गांधी रोडने' शासकीय विश्रामगृहात निघून जातात. पुन्हा पुढील वर्षापर्यंत गांधींची कटकट नाही. एखाद्या वेळेस गांधीजींच्या पुतळ्याला अचानक वाचा फुटली तर तो हेच म्हणेल की, 'आता कृपा करून मला तुमच्या या दिखाऊ कर्मकांडातून मुक्त करा. राजकारणाला, नैतिक मूल्याचं अधिष्ठान असावं हे सांगण्यात माझा जन्म गेला. उपयोग झाला नाही. आतातरी मला या चौथऱ्यावर आत्मचिंतन करीत उभं राहू द्या.' पण प्रत्येक महापुरुषाला मृत्यूनंतर अशा प्रकारच्या

विटंबनेला तोंड द्यावे लागते हा इतिहास आहे.

सत्तेचा संबंध धूर्त राजकारण्यांनी स्वार्थाशी इतका दृढपणे जोडला आहे की, सत्ता जनकल्याणाकडे वळेल ही आशा मावळून गेली आहे. आपल्या अहंकाराच्या समाधानासाठी आणि मुख्यत: संपत्तीच्या व प्रतिष्ठेच्या झगझगीत वलयात सुखाने राहाण्यासाठी सत्ता मिळवायची असते. जनसेवा हीच ईश्वरसेवा वगैरे गुळगुळीत झालेली वाक्ये वापरून येनकेन प्रकारेण सत्ता पदरात पाडून घ्यायची असते. हे ज्यांना कळत नाही ते अर्जुनाप्रमाणे वेडा प्रश्न विचारतात, 'हस्तिनापूरचे राज्य घेऊन काय करायचे? सत्तेसाठी हिंसा आणि रक्तपाताचे पातक माथ्यावर घेण्यात काय अर्थ आहे?' अर्जुनाच्या या पोरकट प्रश्नाला कसले उत्तर द्यायचे? 'हाय कंबख्त तूने पीही नहीं' असे म्हणून त्याची कीव करण्यापलीकडे दुसरा मार्ग नाही.

आज जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सर्व प्रकारचा भ्रष्टाचार उजळ माथ्याने मिरवताना दिसत आहे. आता त्याची हळूहळू आम्हालाही सवय होत आहे. आता पूर्वीप्रमाणे मन संतप्त होत नाही.

डोळ्यांवर कातडे ओढून 'जे जे होईल ते ते पहावे' असा समजूतदारपणा अंगी बाणत आहे. प्रचंड भ्रष्टाचार झाल्याच्या सनसनाटी वार्ता वाचतानाही रक्त फारसे तापत नाही. जाऊ द्या हो! असे चालायचेच! हे काही सत्ययुग नाही. रामचंद्रासारख्या सत्यवादी महापुरुषांचा काळ आता उरला नाही. प्रवाहाशी जुळवून घेतले पाहिजे या प्रकारची भाषा कानांवर येते. अन्यायाची चीड न येणे, भ्रष्टतेमुळे प्रक्षोभ न होणे, अनैतिकतेकडे दुर्लक्ष करणे हे मानसिक बधिरतेचे ठळक लक्षण आहे असे मला वाटते. एका अर्थाने हे भ्रष्टाचाराला शरण जाण्यासारखे आहे. या परिस्थितीत माणसांची मेंढरे होतात. सत्ताधीशांना हेच हवे असते. कारण दुबळी मेंढरे कधी प्रतिकार करीत नाहीत. याबाबतीत बोलताना एक जागरूक समाजसेवक म्हणाले; 'भ्रष्टाचारांच्या गुंडगिरीपेक्षा मला सज्जनांचा भ्याडपणा हाच अधिक चिंताजनक वाटतो. समाज मनातला अग्नी जागरूक करण्यासाठी कुणीतरी फुंकर मारावी लागते. त्याशिवाय निखाऱ्यातली धग प्रकट होत नाही. गांधीजींनी हेच काम स्वातंत्र्यपूर्व काळात केलं. आपला समाज वांझ आहे असं समजू नका. अनेक गांधी तो निर्माण करू शकेल. जीवनाचा गढूळ झालेला प्रवाह स्वच्छ करणं हे समाजाच्या शहाणपणावर अवलंबून आहे' हा विचार नवरचनेचा आहे. आशावादाचा द्योतक आहे. सारीच क्षेत्रे जर बरबटलेली असतील तर ती निर्मळ करण्यासाठी घाणीबरोबर दोन हात करावेच लागतील. संत गाडगे महाराज ज्या गावात कीर्तनासाठी जात त्या गावातले रस्ते प्रथम खराट्याने स्वच्छ करीत असत. प्रथम बहिरंगाची शुद्धी नंतर गावकऱ्यांच्या अंतरंगाची स्वच्छता. संत कोणाचे ओशाळे नसतात. ते स्पष्ट बोलू शकतात. सामान्य माणसाला इतक्या निधडेपणाने जगता येत नाही. पावलोपावली अनैतिकतेशी तडजोड करता

करता त्याच्यातली न्यायबुद्धी गंजून जाते. वारा वाहील तशी पाठ द्यावी हे सूत्र त्याला स्वीकारावे लागते. परवा माझ्या एका मित्राच्या एम.ए.बी.एड. झालेल्या मुलीला शाळेत शिक्षिकेची जागा मिळाली. खरे तर पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालेल्या आणि विद्यापीठाची दोन-तीन पारितोषिके पटकावणाऱ्या या मुलीला नोकरी मिळवताना अडचण येण्याचे काही कारण नव्हते. पण तिला साठ हजार रुपयांची देणगी (लाच) देऊन ही नोकरी लिलावात विकत घ्यावी लागली. शाळेचे संचालक एक 'थोर' स्वातंत्र्यसैनिक आहेत. गांधीजींच्या नेतृत्वाखाली त्यांनी सत्याग्रह केला होता म्हणे!'

**भ्रष्टाचाराची मुळे शिक्षणाच्या क्षेत्रात देखील शेषाच्या टाळूपर्यंत गेलेली आहेत. ही सारी घाण उपसून काढण्यासाठी काय करावे हा यक्षप्रश्न आहे. भ्रष्टतेच्या क्षेत्रात राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी हे पाहिल्यावर देव, धर्म, राष्ट्रप्रेम, जनकल्याण वगैरे सारे शब्द नागडे-उघडे पडलेले वाटतात. त्यांचे कधीच वस्त्रहरण झाले आहे. सारे** काही ईश्वरामुळेच घडत असते असे म्हणतात. मग मनुष्याने या व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचे काहीच कारण नाही.

कवी अनिल यांच्या काही काव्यपंक्ती आठवतात.

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योति विझू विझू झाल्या.
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने
असे कुठेच तेज नाही!

एकेक दिवा विझत आहे. अंधार वाढत आहे. एकेक उल्का उन्मळून पडत आहे. ज्याच्या मागे विश्वासाने जावे, ज्याचा झेंडा हाती धरून नाचवावा असे व्यक्तित्व कुठेच उरले नाही. उत्साहाचे पाणी आटले आहे. अंधाराची आणि निराशेची एकेक लाट चढत आहे. सामान्यातले असामान्यत्व जागे करणारी एखादी साद केव्हा ऐकू येईल?

□ □ □

# मनाचे ※ रंग

मनासारखी चंचल, गुंतागुंतीची आणि रहस्यमय अशी दुसरी कोणती वस्तू असू शकेल का? मनाचे व्यापार इतके गूढ गहन असतात की त्यावर मानसशास्त्रज्ञालाही नीटसा प्रकाश टाकता येत नाही. एकदा श्रीकृष्णाने दुर्योधनाला धर्मोपदेश केला. दुर्योधनाने तो सारा उपदेश ऐकून घेतल्यानंतर म्हटले, 'धर्म म्हणजे काय हे मला कळतं, पण माझं मन धर्मविचाराकडं काही केल्या वळत नाही. अधर्माचाही अर्थ मला कळतो, पण अधर्मापासून माझं मन परावृत्त होत नाही'. या शब्दांतून मनाच्या अदम्य सामर्थ्याचे दुर्योधनाने जणू वर्णन केले आहे. कोणाचे मन कोणत्या वेळी कुणीकडे भरकटत जाईल हे सांगता येत नाही. बाह्यत: शांत आणि सज्जन वाटणाऱ्या माणसाच्या मनात खोलवर कोणत्या वासनाविकारांचे वादळ घोंघावत असेल हे कळणे अशक्य आहे. बहिणाबाई चौधरींनी मनाच्या उलट सुलट खेळाचे एका कवितेत वर्णन करून म्हटले आहे, 'आता भुईवर असलेलं मन पाहता पाहता आभाळात भरारी घेऊ लागतं. या मनाला आवर घालता येत नाही. त्याचं तंत्र निराळं आहे. त्याच्यावर कुठलाच मंत्र चालत नाही. देवा, हे असलं अजब मन तू कसं घडवलंस?'

मनाची झेप अतिविलक्षण असते यात शंका नाही. संयमाच्या दोऱ्या कितीही घट्ट आवळल्या तरीही हे चंचल मन त्यात कधी बांधले जात नाही हा सर्वांचाच अनुभव आहे. इंग्लिश कवी बायरनच्या संदर्भात वाचलेली एक गोष्ट आठवते. तो एका सुंदर तरुणीचा मन:पूर्वक अनुनय करीत होता. प्रेमव्याकुळ भाषेत लिहिलेली अनेक पत्रे त्याने तिला पाठवली. आपल्या मनातल्या खोल प्रेमाची तो तिला पत्रांतून ग्वाही देत होता. तिच्या सहवासाशिवाय आपले जीवन निरर्थक असून ती मिळाली नाही तर हे शुष्क, वैराण जीवन संपवण्याशिवाय आपल्याला दुसरा पर्याय नाही अशा आशयाची कित्येक पत्रे त्याने तिला लिहिली असतील. तिचा होकार मिळत नाही म्हणून हा हळवा कवी दररोज अश्रू ढाळीत होता. अखेर एके दिवशी तिच्या मनाला पाझर फुटला. बायरनच्या प्रेमाचा तिने स्वीकार केला. ज्या दिवशी तिच्याशी बायरनने विवाह केला त्याच दिवशी विवाहमंडपातून बाहेर पडताना तो तिला म्हणाला, 'आता आपण विवाहबद्ध झालो. आता तुझा तिरस्कार करण्यासाठी मला हे एक सबळ कारण मिळालं. जोपर्यंत तू अप्राप्य होतीस तोपर्यंत माझ्या मनानं तुझा ध्यास घेतला होता. आता तुझी प्राप्ती झाल्यानंतर तुझ्याविषयीचं आकर्षण ओसरून गेलं.' कवीच्या मनाचा

हा विचित्र किंवा विकृत खेळ खरोखरच आकलनाच्या पलीकडचा आहे. बायरनला आपण लहरी, विक्षिप्त, दांभिक अशी विशेषणे देऊ शकतो. पण त्याच्या मनात निर्माण झालेल्या या विचित्र लाटेचे आपण विश्लेषण करू शकत नाही. खरे तर कुणाच्याच मनाचे-स्वतःच्याही मनाचे आपल्याला विश्लेषण करता येत नाही. कधी भरतीच्या लाटा येतात. कधी पाणी शांत असते. कधी भोवरे उत्पन्न होतात तर कधी प्रचंड खळबळ माजते. संयमाच्या आणि विवेकाच्या भिंती मनातल्या प्रक्षुब्ध लाटा केव्हा जमीनदोस्त करतील ते सांगता येत नाही. इतके समर्थ असलेले मन शरीरात नेमके कुठे आहे हे देखील कळत नाही. मन हा एक अतर्क्य चमत्कार आहे. इतकेच त्याबद्दल म्हणता येते. मनाचे भिन्न भिन्न आणि परस्परविरोधी व्यापार म्हणजे मानसशास्त्रांला एक जबरदस्त आव्हान आहे. सदा अस्थिर असलेल्या या बेभरवशाच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखक, कवींनी आपापल्या शक्तीप्रमाणे केला आहे. व्यासांच्या महाभारतात सुष्टदृष्टांच्या, सामान्य-असामान्यांच्या मनांची अनेकानेक चित्रे सूक्ष्म दृष्टीने रंगवलेली आहेत. मनाचे दुबळेपण, त्याचे समर्थपण, त्याची भव्य दिव्याकडे असलेली ओढ आणि तरीही क्षुद्र वासनांच्या गुंतवळ्यात अडकून पडण्याची त्याची तयारी या साऱ्या वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन त्यात घडते. मनांच्या असंख्य रंगछटांनी महाभारत रंगलेले आहे. त्यामुळेच शतकानुशतके ते वाचकांच्या मनात ठाण मांडून बसले आहे. श्रेष्ठ साहित्यात मानवी मनाची विविध दर्शने आढळतात. धर्मराज म्हणवणाऱ्या धार्मिकाच्या मनातही केव्हातरी विकारवासनेची कशी चमत्कारिक हालचाल होऊ शकते आणि एखाद्या पतिव्रतेच्या मनाला परपुरुषाचे चोरटे आकर्षण कसे वाटत असते हे नीटसपणाने, जसेच्या तसे काढू शकणारे चित्रकार साहित्याच्या क्षेत्रात फार थोडे आढळतात. कारण मानवी मनाचा शोध करण्यासाठी लेखकाची दृष्टी जितकी सखोल तितकीच मर्मस्पर्शी आणि अलिप्त असावी लागते. हा दृष्टिकोनच दुर्मिळ असतो. भाराभर पुस्तके निर्माण होऊनसुद्धा मनाला भिडणारी, मनावर प्रभुत्व गाजवणारी अशी साहित्यकृती मात्र क्वचितच जन्माला येते. लेखक कवी यासाठीच मनकवडे असावे लागतात. खिडकीतून बाहेर डोकावून पाहावे त्याप्रमाणे माणसाच्या मनात खोलवर डोकावून पाहण्याची भेदक शक्ती असलेला कलावंत हाच रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवू शकतो. प्रत्येकाच्या मनाचे सूर आणि स्पर्श वेगळे असतात. त्यामुळेच या जीवनाला एक प्रकारची रंगत आली आहे. सारी माणसे समान असली तरी प्रत्येकांची मानसिक ठेवण दुसऱ्याहून कितीतरी निराळी असते. त्यामुळेच मनोभावनांचे उलटसुलट खेळ दृष्टीला पडतात.

कुरुक्षेत्रावर अर्जुनाला वीरत्वाचा आणि प्रतिकाराचा संदेश देताना श्रीकृष्णाने जे जीवनाचे आणि धर्माचे स्वरूप सांगितले ते ऐकून संजयाच्या डोळ्यातून आनंदाचे अश्रू ओघळू लागले. कृष्णवाणीचा त्याच्या मनावर विलक्षण परिणाम व्हावा इतकी

ती वाणी प्रभावी होती. अर्जुनाच्या मरगळलेल्या मनातही पुरुषार्थ जागा झाला. संजयाच्या मनात देखील एक परिवर्तन घडले. विचारभावनांचा उत्कट कल्लोळ तो अनुभवू लागला. कुरुक्षेत्रावर घडलेली ही साद्यंत कथा आणि श्रीकृष्णाचा प्रत्येक शब्द संजयाने धृतराष्ट्राला ऐकवला. पण धृतराष्ट्र ढिम्म बसून राहिला. त्याच्या मुद्रेवर भावनेची पुसट रेषाही उमटली नाही. संजय अंतर्बाह्य हलून गेला तरी धृतराष्ट्राचे मन तारा तुटलेल्या सतारीसारखे अबोल राहिले. धोंड्यासारखे निश्चल राहिले. या घटनेचे वर्णन ज्ञानेश्वरांनी एक अनुरूप दृष्टांत घेऊन मार्मिकपणे केले आहे, ते म्हणतात,

अहो आइकत असा अवधारा। तंव या बोला निवांतु म्हातारा।
जैसा म्हैसा नुठी का पुरा। तैसा उगला चि असे।।

कृष्णाचे विचार सुंदर शब्द कानावर पडूनही हा म्हातारा निवांत बसून राहिला. त्याच्या संवेदनाशून्य मनावर कोणताही तरंग उमटला नाही. महापुराचा लोंढा आला तरी एखादा मठ्ठ रेडा बेगुमानपणे बसकण मारून बसलेला असतो; तो उठत नाही तशी धृतराष्ट्राची मनस्थिती होती. संजय आणि धृतराष्ट्र मानसिक दृष्ट्या दोन ध्रुव होते. एक विचारशून्य, निगरगट्ट आणि संजय तरल मनाचा, ग्रहणशील वृत्तींचा रसिक होता. म्हणूनच तो रोमांचित झाला. एखादी अनुभूती सर्वांवर सारखाच परिणाम करीत नाही. उष्णतेने कोवळी फुले सुकून जातात. गळून पडतात. दगडधोंडे मात्र आहेत तसेच राहातात.

एस.टी. गाड्यांच्या पाठीमागे ठळक अक्षरात काही वेळा लिहिलेले असते, 'मनाचा ब्रेक सर्वात उत्तम ब्रेक' नाठाळ मनाच्या घोड्याचे लगाम मजबूत हाताने पकडून ठेवावेत हा अभिप्राय मान्य असला तरी भल्याभल्या वीरांची या घोड्यावरची मांड सुटून ते कुठेतरी फेकले गेल्याची कथा ऐकायला मिळते. माझ्या माहितीतल्या एका अत्यंत सत्प्रवृत्त गृहस्थाच्या मनात त्याची पंचाहत्तरी उलटल्यानंतर अशी एक वावटळ आली की तो पापभीरू, सज्जन माणूस वाकड्या वाटेने चालू लागला. खरे तर 'अवघे पाऊणशे वयमान' असलेल्या या तरुणाने मद्याच्या प्याल्यात स्वत:ला का बुडवून घ्यावे ते कळले नाही. दिवसा बारमध्ये आणि रात्री एखाद्या कॅबेरे नृत्यात तो तासन्तास रस घेऊ लागला, त्याच्या आयुष्यात कसलीही कमतरता नव्हती. प्रत्येक वर्षी एखाद्या तीर्थयात्रेला जाणारा हा सात्त्विक गृहस्थ अशा विचित्र वाटेने का चालू लागला हे आम्हाला कळेना. एके दिवशी मी धीर करून त्याला या बाबतीत विचारले. आपले मन मोकळे करताना तो म्हणाला, 'तुम्ही सारे मला दोष देत आहात हे मी समजू शकतो. आजवर माझी पाऊले सरळ पडली. सत्तर-पंचाहत्तर वर्षात मी इकडं तिकडं न पाहाता सरळ नाकासमोर चालत राहिलो. धर्मकर्मात गुंतून पडलो. स्वैर भोगाच्या वाटेनं चाललेल्या लोकांचा मी उपहास करीत होतो. त्यांच्या वर्तनाबद्दल त्यांचा तिरस्कार करीत होतो. पण खरं सांगू? भोगाच्या वाटा मला मनातल्या मनात

सारख्या खुणावत होत्या. एखाद्या पंचतारांकित हॉटेलात जाऊन तिथले कॅबेरे पाहावेत. मद्याचे घोट घेत घेत नर्तकीच्या नृत्यात तिच्या धुंद डोळ्यात बुडून जावं याचं चोरटं आकर्षण मला नेहमीच वाटत राहिलं. पण माझ्या बंडखोर मनाला मारून मुटकून मी गप्प बसवलं. ठरलेली चाकोरी सोडली नाही. नीतीपेक्षा मनावर भीतीचा पगडा अधिक होता. लोक काय म्हणतील? जग काय म्हणेल? या विचारानं मी इकडं वळलो नाही. पण फार वर्षे नियमांच्या भिंतीत कोंडून ठेवलेलं माझं मन एक दिवस उफाळून उठलं. माझे पाय मनाच्या इच्छेप्रमाणं चालत राहिले. जे आयुष्यभर जपलं ते आयुष्याच्या शेवटी माझ्या हातून हरवलं याची कधी कधी टोचणी लागते. पण आता पुन्हा पूर्वीची वाट चोखाळावी असं वाटत नाही.'

त्या गृहस्थाने आपल्या मनाचे केलेले हे विश्लेषण एका अर्थाने बरोबर होते. कोणत्याही मोहाच्या कधीही आहारी चुकूनही जायचे नाही हा आग्रह सकृद्दर्शनी संयुक्तिक वाटतो. पण ते शक्य आहे काय? विश्वामित्रासारख्या कठोर तपस्व्याच्या वैराग्यपूर्ण मनात त्याच्या आग्रहाला न जुमानता शृंगाराची हिरवळ उगवते. तर मग सामान्य माणसांबद्दल काय बोलायचे? वाऱ्याची मोट एकवेळ बांधता येईल. चिमूटभर साखर टाकून एखाद्या वेळेस समुद्र गोड करता येतील, अशक्य वाटणारे सशाचे शिंगही कुठेतरी सापडू शकेल पण वादळापेक्षाही वेगवान असलेले हे मन एका जागी बांधून ठेवता येणार नाही हेच खरे. अशा मनाची विविधरंगी चित्रे रेखाटणे हे कवी आणि नाटककार यांच्यासमोरचे मोठेच आव्हान आहे. इतिहासात भेटणाऱ्या अनेक व्यक्तींच्या विशिष्ट मानसिक ठेवणीमुळेच परिस्थितीला कलाटणी मिळालेली दिसते. हिंदी जनतेला पायाखाली तुडवून त्यांच्यावर आपण राज्य करायचे ही ब्रिटिशांची मनोधारणा होती. आपण राज्यकर्ते आहोत आणि हे काळे लोक अज्ञानी, असंस्कृत आहेत. त्यांच्यावर हुकूमत गाजवण्यासाठी परमेश्वराने आपल्याला येथे पाठवले आहे. ही ब्रिटिश सत्ताधाऱ्यांची मानसिक ठेवण बनली होती. या अहंगंडाला बुलंद आव्हान देणारी दुसरी मानसिक शक्ती हिंदी जनतेत उदयाला आली. कौरव, पांडवांच्या युद्धात किंवा राम-रावणाच्या संघर्षात याच मानसिकतेचे दर्शन होते. ते यथोचितपणे टिपणारी शोधक आणि सूक्ष्मदर्शी प्रतिभा असली म्हणजे उत्तम कलाकृती जन्माला येते. कोणत्याही साहित्यकृतीत मानवी मन हाच मध्यबिंदू असतो. शेक्सपिअरने रंगवलेल्या हॅम्लेट, ऑथेल्लो, लियर, सीझर, अयागो आणि शायलॉक यांची चमत्कृतीपूर्ण मने एका ओळीत मांडून ठेवली तर ते दृश्य कितीतरी विलक्षण ठरेल. प्रत्येकाचे ग्रह आणि आग्रह निराळे. दृष्टी निराळी. उद्दिष्ट निराळे, प्रत्येकाच्या सुखदु:खाच्या कल्पना कितीतरी वेगळ्या, प्रत्येकाचे गुणदोष त्याला तारणारे आणि मारणारे. शेक्सपिअरने मनामनांचा हा विविधांगी अभ्यास कोणत्या शाळेत केला कुणास ठाऊक? बहुधा लंडनच्या ग्लोब थिएटरमध्ये नाटक पाहायला येणाऱ्या शेकडो लोकांच्या अंतरंगात

हा डोअरकीपर दररोज डोकावून पाहात असावा. त्यातूनच त्याला हॅम्लेट आणि ऑथेल्लो भेटले असावेत. निरागस डेस्डिमोनाही या प्रेक्षकांतच त्याला दिसली असावी. या साऱ्या व्यक्तींशी हितगुज करताना त्यांच्या मनातले उलटसुलट वाहणारे वारे त्याला जाणवले आणि त्यातूनच त्याची नाटके आकाराला आली. मनातले विकार विलसित समजून घेण्यासाठी स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या मनाशी संवाद साधावा लागतो, जो आपल्या बुद्धीच्या रवीने माणसाच्या मनाची घुसळण करू शकतो त्याच्या कलाकृतीला जीवनाचे वेगवेगळे रंग लाभतात. रहस्यमय असलेल्या मनाबद्दल अनेकांनी आजपर्यंत काही ना काही सांगितले. नेपोलियनने म्हटले आहे, 'जगात दोनच प्रभावी शक्ती आहेत. तलवार आणि मन.' पण अखेर मनच तलवारीवर मात करू शकते. हातात धनुष्यबाण असूनही संभ्रमित झालेल्या मनामुळेच अर्जुन हतबल झाला. पण पुरुषार्थी विचाराचे खाद्य मिळाल्यावर त्याच्या मनाने पुन्हा पराक्रमाची वाट चोखाळली. आपले सुख आणि दुःख मनावरच अवलंबून असते. राहायला प्रासाद नाही म्हणून काही माणसे तळमळत नाहीत. त्यांना मिळणारे मानसिक समाधान महालात राहणाऱ्या लक्ष्मीपुत्रालाही मिळणार नाही. आपल्या मनाच्या सतारीवर कोणत्याही परिस्थितीत समाधानाचे सूर निर्माण करणारे आशावादी लोक असू शकतात. जो आपल्या मनाला वश करून घेतो, आपुलकीने कुरवाळतो त्यालाच ही प्रचिती येते. तुकोबांच्या शब्दात सांगायचे तर 'मन करा रे प्रसन्न' कारण मन हेच सर्वसिद्धीचे कारण आहे.

□ □ □

# राजेशाही आणि लोकशाही

सत्तेच्या उच्चासनावर बसलेले अनेक सत्ताधीश मदोन्मत्त बनल्याची इतिहासाची साक्ष आहे. सर्वसामान्य माणसांहून आपण उच्च पदावर आहोत, आपल्या ठायी अलौकिकता आहे. आपण हुकूमत गाजविण्यासाठी जन्माला आलो आहोत या कल्पनेची नशा त्यांना चढलेली असते. सत्तामद विलक्षण असतो यात शंका नाही. जगज्जेता सिकंदर अशाच अहंगंडाने पछाडलेला होता. स्वत:ला तो प्रतिपरमेश्वरच मानू लागला. यश त्याच्या डोक्यातच नव्हे तर रक्ताच्या प्रत्येक थेंबात भिनले होते. आपल्याला भेटायला आलेल्या प्रत्येक व्यक्तीने आपल्यासमोर विनम्र भावाने गुडघे टेकून आपल्या पायांना स्पर्श करावा आणि आपल्या झग्याचे चुंबन घ्यावे असा त्याने दंडक घातला होता. मोगलांच्या दरबारातही यासारखेच काही रिवाज होते. बादशहासमोर अदबीने उभे राहून, खाली जमिनीकडे दृष्टी वळवून शहेनशहाशी बोलले पाहिजे. वाकून कुर्निसात केला पाहिजे. जहाँपन्हाच्या दृष्टीला दृष्टी देऊन बोलायचे नाही असे कडक निर्बंध होते. राजेशाहीच्या युगातल्या या गोष्टी वाचताना आज हसू आल्याशिवाय राहात नाही. राजा हा विष्णूचा अवतार असतो त्यामुळे या सर्वोच्च शक्तीपुढे प्रजेने नतमस्तक झाले पाहिजे अशी समजूत रूढ होती. सिंहासनावर आलेले कित्येक राजे-महाराजे निर्बुद्ध, लहरी, अत्याचारी प्रवृत्तीचे असत. स्वामित्वाचा दर्प त्यांच्या प्रत्येक शब्दांतून जाणवायचा. आपण म्हणू ते धोरण, आपण बांधू ते तोरण, आपण करू ती पूर्वदिशा असा पराकाष्ठेचा अहंभाव. महाराजांची कृपादृष्टी आपल्याकडे वळावी, निदान त्यांची अवकृपा तरी होऊ नये म्हणून सेनापती, सरदार आणि सारे मंत्री प्रयत्न करीत असत. एडमंड बर्क नावाच्या अनुभवी राजकारण्याने म्हटले आहे, 'या राजे लोकांना क्षुद्र लोकांचा सहवास निसर्गत:च आवडतो.' आपल्याभोवती अशा क्षुद्र लोचटांचा मेळावा भरवून त्यांच्या संगतीत मौजमजा करणे हेच यांचे जीवन. दांभिकांनी केलेली स्तुती ऐकण्यात यांना भूषण वाटायचे म्हणूनच आपल्या पदरी काही भाट यांनी बाळगलेले असायचे.

ही राजेशाही किंवा हुकूमशाही आता संपुष्टात आली हे ठीक झाले. पण पूर्वीच्या सत्ताधीशांच्या स्वैरवर्तनाच्या गोष्टी वाचताना सत्तेच्या मदाने माणसे कशी झिंगून जातात हे लक्षात येते. अखेरचा पेशवा दुसरा बाजीराव रंगढगांत मशगूल झालेला असायचा. लोकहितवादींनी त्याच्या शिथिल चारित्र्यावर आणि नालायकीवर विदारक प्रकाशझोत टाकला आहे. शास्त्री, पंडित आणि भट यांनी 'बाजी हा कृष्णाचा

अवतार आहे, हा शिवाचा अवतार प्रकटला आहे' असे म्हणून त्याच्यावर प्रशंसेची फुले उधळायची आणि बाजीरावाने आपल्या ख्याली खुशालीत राज्य रक्षणाकडे दुर्लक्ष करायचे हा नित्यक्रम होता. परिणामी स्वराज्य बुडाले. इंग्रजांची मगरमिठी दीडशे वर्षे सुटली नाही. राजा-महाराजांच्या कथा वाचताना आज वाटते की, इतके कर्तव्यभ्रष्ट राजे प्रजेला मिळावेत याचा अर्थ ही राजेशाही काही अंगभूत दोषांनी भरलेली होती. आता लोकशाहीची ध्वजा डौलाने फडफडत आहे म्हणून स्वतःचे समाधान करून घेता येईल अशी परिस्थिती खरोखरच आहे काय? लोकशाहीतही राजेशाहीचे काही ठळक विशेष उतरलेले दिसतात. आज राजे, राण्या उरल्या नाहीत. छत्रचामरे राहिली नाहीत. हत्तीच्या अंबारीतून 'महाराज' डौलाने मिरवत नाहीत. भर दरबारात नाचगाण्यांच्या मैफली रंगत नाहीत. कोणी राजा आपल्या गळ्यातली मोत्यांची माळ नर्तकीच्या अंगावर खुशीने फेकीत नाही. पण तरीही राजेशाही आजही अस्तित्वात आहे. आजचे लोकनियुक्त 'जनसेवक' राजे पूर्वीपेक्षाही अधिक इतमानाने आपल्या अहंकाराचे भक्तांकडून कोडकौतुक करवून घेताना दिसतात. सत्तेच्या राजकारणात निष्काम भक्ती कधी आढळत नाही. सकाम भक्तीचे प्रदर्शन मात्र मोठ्या प्रमाणात दिसते.

एक उच्चपदस्थ सत्ताधारी आपल्या घरी चहापानासाठी येणार म्हणून त्यांच्या भक्ताने आपल्या निष्ठेचे जे अतिशयोक्त प्रदर्शन केले, ते मी पाहिले होते. बंगल्यासमोरील रस्त्यापासून ते आतल्या दिवाणखान्यापर्यंत त्यांच्या चाहत्याने (चमच्याने) उंची गालिचे अंथरले होते. गालिच्यांवर गुलाबाची आणि मोगऱ्याची फुले पसरली होती. जणू एखादे स्वर्गीय दैवत त्याच्या घरी पायधूळ झाडणार होते. आपल्या परम दैवताच्या चरणकमलांना जमिनीवरील मातीचा कणही लागू नये अशी दक्षता त्या उपासकाने घेतली होती. बंगल्याच्या प्रशस्त आवारात शेकडो रंगीबेरंगी विद्युद्दीपांचा झगझगाट केला होता. सर्वत्र सुवासिक अत्तर मधूनमधून फवारण्यात येत होते. फाटकातच वाद्यवादकांचा ताफा सज्ज होता. उंची वस्त्रे परिधान केलेल्या आणि हातात पंचारतीचे ताट घेऊन उभ्या राहिलेल्या पाच हसतमुख सुंदर तरुणी शाही पाहुण्यांच्या स्वागतासाठी सिद्ध होत्या. त्या शृंगारलेल्या बंगल्याच्या प्रवेशद्वाराजवळ आणि रस्त्यावरसुद्धा पोलिसांनी सुरक्षा व्यवस्था चोख ठेवली होती. रहदारी अडवून धरली होती. इतक्यात डौलदार इंपोर्टेड गाड्या दाराशी थांबल्या. हसतमुखाने आणि नाटकी नम्रतेने हात जोडीत 'दैवत' मध्यवर्ती गाडीतून खाली उतरले. ते 'सावळे परब्रह्म' दृष्टीला पडताच त्या भक्ताची युगायुगाची तहान जणू तृप्त झाली. कृतज्ञतेचा भाव त्याच्या मुद्रेवरून ओघळू लागला, लगबगीने पुढे जाऊन पाच फूट उंचीचा एक भरघोस लठ्ठ पुष्पहार त्याच्या गळ्यात चाहत्याने घातला. फटाफट फोटो निघाले. या दृश्याचे चित्रीकरणही झाले. भक्ताने दैवताच्या पायावर जवळजवळ लोटांगणच घातले.

सद्‌गदित स्वरात भक्त उद्‌गारला, 'साहेब-साहेब' आज मी धन्य झालो. माझ्या गरिबाच्या झोपडीत तुमचं पाऊल पडलं. आता मला सारं काही मिळालं. साहेब सेवा करण्याची संधी देत चला. माझं भाग्य मोठं म्हणून आपली माझ्यावर कृपा आहे.'

भक्तीच्या या दर्शनीय सोहळ्याचे मी आणखीही अनेक गमतीदार तपशील देऊ शकेन. पण हे दृश्य पाहिल्यावर सिकंदर किंवा मोगल राजे यांच्या राजेशाही वागण्यात काही आक्षेपार्ह होते असे म्हणता येईल काय? सत्ताधाऱ्यांचा अहंगंड पोसण्याचे काम जसे राजेशाहीत होत होते तसेच आज लोकशाहीतही अधिक 'सुसंस्कृत' पद्धतीने चालले आहे असेच विधान करावे लागेल. मी पाहिलेले दृश्य गांधी, नेहरूंनी आणलेल्या लोकशाही युगातले आहे. त्यात कसलीही अतिशयोक्ती नाही. पंडित नेहरू लोकतंत्राचे उपासक होते. कोणी त्यांच्या पायावर डोके ठेवू लागला तर 'ये क्या तमाशा है' असे म्हणून त्याला ते बाजूला सारीत. माणसाने माणसाच्या पायावर मस्तक लवविण्याची प्रथा त्यांना मान्य नव्हती. पण आज कित्येक पुढाऱ्यांना आपल्या अनुयायानं आपल्या पायाला हात लावून वंदन करावं असं वाटतं. एका अनुयायानं नुसतेच हात जोडलेले पाहिल्यावर पुढारी भडकले, ते संतापून म्हणाले, 'काय नाम्या, लई ताठपणानं वागतोस. तुझ्या पुतण्याला नोकरीत चिकटवलेलं विसरलास काय?' पुढाऱ्यांच्या आवाजात जरब होती. अनुयायाला आपली चूक समजली. लगेच ती दुरुस्तही केली. आपण आश्रयदाते आहोत आणि सारे आपले आश्रित आहेत. हा अहंकार अनेक तथाकथित नेते मंडळीत मुरलेला असतो. उगीच हुकूमशाहीलाच दोष देण्यात काय अर्थ आहे? सत्ताधारी आणि जनता यांची मध्ययुगीन मानसिकता अद्यापी बदललेली नाही. पूर्वी राजे लोक स्वत:ला चक्क 'राजाधिराज' 'महाराजेश्वर' 'सम्राट' असे म्हणवून घेत. आजचे सत्ताधारी 'लोकसेवक' 'जनतेचा दास' असे स्वत:ला संबोधतात. फरक फक्त शब्दात झाला. वृत्ती मात्र एकच आहे. लोकशाहीतल्या अशा किती गोष्टी सांगाव्यात? दक्षिणेकडच्या एका राज्यातल्या कित्येक मंत्र्यांनी मुख्यमंत्री असलेल्या एका स्त्रीचे नाव आपल्या हातावर तत्परतेने गोंदवून घेतले होते. आपल्या निष्ठेचे जाहीर प्रदर्शन करण्यासाठी त्यांनी ते कपाळावर गोंदवून घेतले असते तर बरे झाले असते. मुख्यमंत्री असलेल्या या देवींचा कोणत्याही सभेत वक्त्याने प्रथम जयघोष करायचा, देवी उपस्थित असतील तर त्यांच्या चरणांना स्पर्श करायचा आणि मग आपल्या व्याख्यानाला सुरुवात करायची. व्याख्यानाचा शेवटही प्रथम मुख्यमंत्र्यांचा जयजयकार आणि नंतर आठवण झाली तर 'जयहिंद' असे म्हणून व्हायचा. व्यक्तिपूजेचा इतका हास्यास्पद, बुद्धिहीन, असंस्कृत देखावा प्रत्यही दिसत असताना आम्ही एका लोकसत्ताक राष्ट्राचे स्वतंत्र व स्वाभिमानी घटक आहोत. 'आमचे राज्य हे लोकांचे राज्य आहे' या विधानाला काही अर्थ आहे का? राजेशाहीतही अशीच प्रदर्शने होत होती. ते मागासलेले युग होते म्हणून हत्ती, घोडे

आणि पालख्या, अंबारी यांची रेलचेल होती. आजच्या पुढारलेल्या युगात या जनतेच्या राज्यात सत्ताधाऱ्यांचे पाय जमिनीला फारसे टेकत नाहीत. ते विमानातून प्रवास करतात. परदेशातून आयात केलेल्या वातानुकूलित गाड्यांतून हिंडतात. हत्ती आणि अंबारीपेक्षा या गाड्यांची किंमत कितीतरी अधिक आहे. सामान्य माणूस मात्र कालच्याप्रमाणे आजही रखडत आहे. आपण आपल्या मतपेटीतून राज्यकर्ते घडवतो हा एक अहंकार या लोकशाहीने त्याला दिला आहे. पण तो होता तिथेच आहे असे म्हटले तर चालू शकेल. आजही व्यक्तीला विभूती मानून तिची पूजा करण्यात येते. डॉ. आंबेडकर म्हणाले होते, 'विभूतीपूजा हा लोकशाहीचा विपर्यास आहे? एखाद्या नेत्याच्या चरणी सर्व भावे लीन होण्याचा प्रकार लोकशाहीच्या चौकटीत कसा काय बसतो? मध्ययुगीन राजेशाहीचे विसर्जन करण्याऐवजी आम्ही तिचे पुनरुज्जीवन करीत आहोत. लोकशाहीचा सांगाडा आपण घेतला पण गेल्या पन्नास वर्षात या सांगाड्यात आत्मा मात्र अद्यापी निर्माण झालेला दिसत नाही. नाव लोकशाहीचे. आचार-विचार मात्र राजेशाहीचे. राणा प्रतापसिंहाने आपल्या अखेरच्या क्षणी सरदारांना एक शपथ घ्यायला लावली होती. 'चितोड मिळेपर्यंत आम्ही गवतावर झोपू. गाद्या-गिरद्या वापरणार नाही. साधे अन्न घेऊ. उंची वस्त्रालंकार वापरणार नाही'. राणा प्रतापाच्या मृत्यूनंतर सुखासीन सरदारांना ही शपथ जाचक वाटू लागली. ते खाली गवत अंथरून त्यावर गाद्या घालून झोपू लागले. प्रथम साध्या अन्नाचा एक घास घेऊन वर पक्वान्नाचे भोजन करू लागले. आत फाटकी बंडी घालून त्यावर जरतारी वस्त्रे परिधान करू लागले, अशी कथा आहे. आमच्या लोकशाहीला ही कथा साजून दिसते. वरून कीर्तन आतून तमाशा या चालीवर लोकशाहीचे वर्णन करता येईल. निवडणुकांचे स्वातंत्र्य मिळाले पण विचारांच्या आधारावर निवडणुका लढवण्यापेक्षा व्यक्तिमाहात्म्याचा उदो उदो करून निवडणुका जिंकल्या जातात. मतदारांची मते वैचारिक पातळीवर जिंकण्यापेक्षा गुंडगिरी, संप्रदायवाद, लाचलुचपत यांच्या बळावरच खेचून घेतली जातात. राजेशाहीत घराण्यांना महत्त्व होते ते आजही राजकारणात अभंग आहे. लोकशाहीसाठी ज्या प्रकारचे सुजाण, स्वतंत्र आणि सहिष्णु लोकमानस तयार व्हावे लागते ते अजूनही घडलेले दिसत नाही. याचा परिणाम म्हणजे आमचे काही नेते गुंडगिरी करून गाड्या अडवतात. आपल्याच मालकीची गाडी म्हणून कोणत्याही स्टेशनवर थांबवून उतरतात. अशा बेशिस्त घटनांची कायदा कितपत दखल घेतो हेही कळत नाही. 'मुकी बिचारी कुणी हाका' ही जनतेची अवस्था आहे. मेंढरांचे कळप वाढत आहे. मेंढरांनी फक्त मतदान करायचे असते. मेंढरांनी केवळ नेत्याच्या पाठीमागे जायचे असते. कुठे जायचे? हा प्रश्न विचारायचा नसतो. मुळात हा प्रश्न मेंढरांना सुचतच नाही.

दोन तीन वर्षापूर्वीची गोष्ट. एका राज्याचे पदभ्रष्ट झालेले एक मंत्री आपल्या दोन चार निवडक मित्रांच्या मेळाव्यात मनमोकळेपणाने आपली व्यथा सांगत होते.

त्यांच्यात कर्तृत्व, तसे काहीच नव्हते. (कर्तृत्व, विद्वत्ता, सेवाभावी वृत्ती वगैरे निकष आज अर्थशून्य ठरले आहेत.) एक नावाजलेला गुंड हीच त्यांची खरी ओळख. सत्ता गेल्यामुळे ते हळहळत म्हणत होते, 'अरं, मी खोऱ्यानं पैसा ओढला, कसली बी ददात न्हाई. मालकीची चार थेटरं आहेत. दोन-तीन बीअरबार आहेत. गावाकडं जमीनजुमला सगळं काही आहे, पण लालदिव्याची गाडी गेल्यामुळं आता लोकं माझ्याकडं येत नाहीत. पूर्वी कशी सकाळपास्नंच मानसांची रीघ लागलेली असायची. जो तो सायेब, सायेब, म्हनत पायावर डोकं ठेवायचा. मोठी मोठी माणसं यायची, तुमच्या युनिव्हर्सिटीचा व्हाईस चॅन्सलरबी दारात ताटकळत राहायचा. भाषण द्यायला या म्हणून हात जोडायचा. फोटोग्राफर, टी.व्ही. वाले, पेपरवाले सगळ्यांची झिम्मड उडालेली असायची. आता ते सगळं कमी झालं म्हणून बरं वाटत न्हाई. चार सहा महिन्यात पुन्हा लाल दिव्याच्या गाडीतूनच हिंडेन.' त्याचे दु:ख इतकेच होते, सत्तेमुळं येणारी प्रतिष्ठा आणि खोटी लोकप्रियता गेली या वेदनेने तो तळमळत होता. आता आपण जनतेसाठी काही करू शकत नाही. आपली लोकहिताची एखादी योजना अपुरी राहिली असले दु:ख त्याच्या गावीही नव्हते. अर्थात या प्रकारच्या दु:खाने व्याकुळ होण्यासाठी नेत्याचे अंत:करण विशाल असावे लागते. तो सुसंस्कृत असावा लागतो. रंजल्या गांजल्यांना हृदयाशी धरण्याची आणि त्यांच्यासाठी झिजण्याची वृत्ती असावी लागते. असे नेते राजेशाहीत काय किंवा लोकशाहीत काय फार थोडे असतात. पण अशा नेत्यांच्या परिश्रमातूनच इतिहासाला उजाळा मिळतो. माणसांची जीवने आणि मने घडतात.

□ □ □

# आत्मा आणि ॐ चरित्र

एका भल्या सकाळी माझा एक विद्यार्थी माझ्यापुढे एक जाडजूड वही ठेवून म्हणाला, 'सर, मी माझं आत्मचरित्र लिहिलं आहे. तुमचा अभिप्राय मला पाहिजे. लवकरच प्रसिद्ध करायचं आहे.' 'माझं आत्मचरित्र' या शब्दप्रयोगाचे मला हसू आले. आपण दुसऱ्याचे आत्मचरित्र कसे लिहिणार? पण हे त्याला सांगण्यात काही अर्थ नव्हता. या विशी-एकविशीतल्या पोराने आत्मचरित्र लिहावे? सांगण्यासारखे, लिहिण्यासारखे याच्या आयुष्यात काय असणार? नाही म्हणायला वर्गातल्या एका पोरीला आचरटपणाचे पत्र लिहिल्याबद्दल त्याला प्राचार्यांनी कॉलेजातून काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता. त्या मुलीची सपशेल माफी मागून ते प्रकरण या पोराने कसेबसे मिटवले होते. एवढा एकच संघर्षपूर्ण, नाट्यमय प्रसंग सोडला तर त्याच्या आयुष्यात दुसरे काहीच घडले नव्हते. अभ्यास बेताचा, आकलनशक्ती सुमार. या विद्यार्थ्याची बौद्धिक चमक कुणाला कधी दिसली नाही. सुखवस्तू घरातला हा अगदीच साधारण मुलगा आत्मचरित्र लिहितो ही खरोखरच एक अद्भुत कथा होती. त्याला मी प्रश्न विचारला. 'तुझ्या जीवनात असं काय घडलं आहे की त्याचं कथन करणं तुला आवश्यक वाटलं? आत्मचरित्र लिहिण्यासाठी आधी जगलं पाहिजे. त्या जगण्यातही काही तरी धडपड असली पाहिजे. तुझं आजपर्यंतचं जगणं मला तरी अगदीच संथ आणि सर्वसाधारण वाटतं'. सध्या मला वेळ नाही या सबबीवर मी त्याला निरोप दिला.

ज्याला आत्मचरित्र म्हणता येईल असे 'चरित्र' घडलेले असावे. आयुष्याच्या ओंजळीत अनुभवाचे बरे-वाईट क्षण भरून घ्यावे लागतात. स्वत:कडे आणि जगाकडे पाहण्याची एक विशिष्ट पण संतुलित दृष्टी असावी लागते. मनाला विचारांचे अधिष्ठान असावे लागते. कुणीही उठावे आणि खरडलेल्या गद्यप्राय मजकुराला 'कविता' म्हणावे तसे अलीकडे आत्मचरित्रांच्या बाबतीत झालेले दिसते. ज्यात आत्माही नाही, चरित्रही नाही, अनुभवांचा आधारही नाही. अशा काल्पनिक, पोरकट मजकुराला 'आत्मचरित्र' असे भरघोस नाव देण्यात काय अर्थ आहे? ज्याची जगण्यावर श्रद्धा आहे आणि जो या जीवनकलहात अनुभवांचे अनेक रंग आणि बेरंग असोशीने स्वीकारतो त्याला जीवनाची एक दृष्टी आलेली असते. त्याचे एक तत्त्वज्ञान तयार झालेले असते. मग तो कुणीही असो. तो स्टेशनवरचा हमाल असेल, दगड फोडणारा मजूर असेल किंवा सत्तेच्या रिंगणात इर्ष्येने उतरलेला राजकारणी असेल अथवा खिडकीत बसून चेहऱ्याची

रंगरंगोटी करून गिऱ्हाईकांची वाट पाहणारी वेश्या असेल किंवा भगवे कपडे परिधान करून भजन कीर्तनात रंगलेला एखादा सात्विक पुराणिक असेल. पण प्रत्येकाच्या जवळ जीवनाचे वैचित्र्यपूर्ण, अस्सल रंग असतील, त्यांच्या काही आशा-आकांक्षा असतील, वैफल्याचे आणि पराभवाचे कित्येक दाहक क्षण त्यांनी भोगलेले असतील. ज्याच्या झोळीत खऱ्याखुऱ्या अनुभवांचे भांडवल असेल त्याला आत्मकथन करण्याचा अधिकार आहे. कारण आपल्या आयुष्याची किंमत देऊन त्याने ते अनुभव वेचलेले असतात. अनवाणी पायांनी कित्येक आपत्तींच्या निखाऱ्यावरून ते चालत गेलेले असतात. जीवनानुभवांचे त्याला ज्ञान आणि भान मात्र असले पाहिजे. तुकोबांनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे,

येरांनी सांगावी रेमट काहाणी।
चित्ता रंजवणी करावया।।
तुका म्हणे येथे पाहिजे अनुभव।
शब्दाचे गौरव कामा नये।।
नका दंतकथा येथे सांगो कोणी।
कोरडे ते मानी बोल कोण
तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे।
येरा गबाळाचे काय काम? ।।

तुकोबांची अभंगवाणी ही आत्मकहाणीच आहे. 'अनुभवे आले अंगा ते या जगा देतसे' असे म्हणून आपण चित्तरंजक कहाणी लिहित नाही. 'अंतराची ओल' प्रकट करणारे शब्द शुद्धमनाने लिहितो अशी त्यांनी ग्वाही दिली आहे. आत्मचरित्र कोणत्या निकषांवर घासून पाहावे हेच जणू तुकोबांनी स्पष्ट केले आहे. या निकषावर घासून पाहिली तर किती आत्मकथने प्रामाणिक ठरतील? अनेक आत्मचरित्रे तर खोटी आणि ढोंगीपणाची असतात. कल्पनेने जुळवलेले काही नाटकी प्रसंग खरडले की ते आत्मचरित्र झाले! अशा कथनात 'आत्मा' नसतो. आत्मवंचना असते.

आत्मकथा हा खरे तर एक उत्कृष्ट वाङ्‌मय प्रकार आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक चढउतार असतात. खाचखळगे असतात. हिरवळ असते. फुलंही असतात आणि निखारेही असतात.

आयुष्याच्या प्याल्यातले अनुभवांचे हे रसायन अद्‌भुत आहे. दु:खाची चव असलेल्या या पेयाचे उत्कट आकर्षण आपल्याला असते. पण मुसळधार पावसात भिजूनसुद्धा दगडधोंडे अंतर्यामी कोरडेच राहतात. त्याप्रमाणे काही लोकांचे आयुष्य असते. एखाद्या साचेबंद चाकोरीतून ही माणसे मिळमिळीतपणे चाललेली असतात. ना कसली आशा, ना कसली आकांक्षा, सुखदु:खांचाही सहसा परिणाम नाही, घाण्याभोवती फिरत राहायचे आणि आयुष्याला एखाद्या मुंगळ्यासारखे चिकटून

बसायचे हे व्यसन त्यांना जडलेले असते. आता अशा माणसांच्या आयुष्यात सांगण्यासारखे काय असणार आहे?

आत्मकथा कुणी लिहावी हा देखील चर्चेचा एक विषय आहे. एखाद्याला आपले जीवन एखाद्या कादंबरीसारखे ललितरम्य वाटते. ना. सी. फडके यांच्या आत्मचरित्राचे नावच मुळी 'माझं जीवन एक कादंबरी' असे आहे. उत्तरायुष्यात लिहिलेल्या आत्मकथनांची नावे 'सांजवात', 'संध्याकाळ', 'दिवस असे होते' अशीही आहेत. न्या. मू. छगला यानी 'रोझेस इन डिसेंबर' असे काव्यमय शीर्षक दिले आहे. शिशिर ऋतूतले हे गुलाब पक्व सुगंधाने भरलेले आहेत. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रे' मधले रंग इतकी वर्षे झाली तरी अद्यापि ताजे आहेत. आत्मकहाण्या जितक्या वास्तव तितक्या बहारदार वाटतात. असत्य, दांभिकता अहंकार आणि इतरांची निंदानालस्ती यांचे घाणेरडे ओहोळ आत्मकथनात मिसळलेले असले की असली आत्मप्रशंसा वाचवत नाही. स्वत:च्या भोवती स्वत:च्याच हातांनी आरती ओवाळून घेण्याचा केविलवाणा प्रकार दुबळ्या लोकांच्या आत्मकथनात घडत असतो. लेखकाच्या दृष्टीसमोरचे क्षितिज व्यापक असावे लागते. आपल्याकडे तटस्थ दृष्टीने जो पाहू शकत नाही त्याचे आत्मवृत्त म्हणजे भडक आत्मस्तुतीचे मांडलेले प्रदर्शन असते. काही वर्षांपूर्वी एका प्रसिद्ध अमेरिकन नटीचे विलक्षण प्रांजळ आत्मकथन वाचताना मी भारावून गेलो होतो. 'दि एक्स्टसी अँड मी' हे त्या पुस्तकाचे नाव. तारुण्याच्या उन्मादात आणि कीर्तीच्या झगझगाटात असताना आपण किती स्वैरपणाने वागलो याची हकीकत तिने कोणताही आडपडदा न ठेवता अलिप्तपणाने सांगितली आहे. आपल्या हातून घडलेल्या प्रमादाबद्दल तिच्या मनात पश्चात्तापाची एक लहर आहे याची जाणीव वाचकांना होते. आत्मकथनात आपल्या लोकप्रियतेचे तुणतुणे वाजवीत ती बसली नाही. लोकप्रियतेच्या शिखरावर एकेकाळी असलेल्या या नटीने आपल्या यशात कितीतरी व्यक्तींचा महत्त्वाचा वाटा असल्याची कबुली दिली आहे. माझ्यासारखी सुंदर, माझ्यासारखी अभिनयनिपुण, माझ्यासारखी बुद्धिमान अभिनेत्री आजपर्यंत रुपेरी पडद्यावर आलीच नाही असला निरर्थक अहंगंड तिच्या मनात उद्भवला नाही. ती नि:संशय देखणी, आकर्षक होती. तिच्या हसण्याबोलण्यात मोहन होते. 'सहज तुझी हालचाल मंत्रे जणू मोहिते' असे कविवर्य तांब्यांच्या शब्दांतून यथार्थपणे म्हणता यावे अशीच ती होती. या रूपयौवनेचे पडद्यावर दर्शन होताच लक्षावधी प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोके चुकत होते, मग त्या प्रेक्षकांचे वय काहीही असो, पण आपल्या आयुष्याचा आढावा घेताना तिने तो शालीनतेने, सुसंस्कृतपणे घेतला आहे. अभिनयाची साधना करताना आपण किती कष्ट घेतले आणि अजूनही आपण किती अपूर्ण आहोत याचे प्रांजळ निवेदन तिने केले.

आपल्याकडेही काही कलावंतांची चांगली, वाचनीय आत्मचरित्रे आहेत.

चिंतामणराव कोल्हटकर, बाबूराव पेंढारकर, दुर्गा खोटे यांची आत्मकथने म्हणजे मराठी रंगभूमी आणि मराठी चित्रपट यांचा जिवंत इतिहास आहे. परिपक्व वयात या आत्मकथा लिहिल्यामुळे त्या वास्तवपूर्ण आणि प्रांजळ झाल्या आहेत. त्यांच्या ठायी असलेल्या कलाप्रतिभेचे जसे त्यातून दर्शन घडते तसेच कलेची परिसीमा गाठण्यास.ठी कसे रक्ताचे पाणी करावे लागते हेही जाणवते. 'शांतारामा' हे व्ही. शांतारामांचे आत्मकथनही असेच आहे. अशी आत्मचरित्रे वाचताना त्या कलावंतांच्या बरोबर आपण प्रवास करीत आहोत, त्यांच्यात जणू मिसळून जात आहोत ही अनुभूती येते.

फार वर्षांपूर्वी इझाडोरा डंकन या जगप्रसिद्ध नर्तकीच्या 'माय लाईफ' या आत्मकथेने मला झपाटून टाकले होते. एक कलावती म्हणून आपल्या जीवनातला भावनात्मक संघर्ष, शरीर आणि मन यातील द्वंद्व आणि त्यामुळे होणारी ओढाताण याचे उत्कट पण तरीही संयत चित्र तिने रेखाटले आहे. जीवनप्रवाहाला अनेक वळणे असतात. कधी तो वेगाने वाहतो, कधी तो नको तितका संथ होतो. केव्हा तरी तो उच्छृंखल होतो. त्याची गती कळते. अगतिकताही कळते, पण अर्थ मात्र समजत नाही. त्यामुळे आपण गोंधळून जातो. या नर्तकीने आत्मकथनात म्हटले आहे,

'या मानवी जीवनात काय सत्य आहे? कोणाला ते सापडले आहे? प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा गोंधळून जाईल. या हर्षखेदांच्या, आत्मिक शुद्धतेच्या आणि शारीरिक वासनाविकारांच्या झगड्यात, सुंदरतेत आणि पुरुषार्थात व जाळून टाकणाऱ्या दु:खवेदनात सत्य नेमकं कुठं आहे? ईश्वरालाच माहीत किंवा सैतानालाच ते माहीत असेल. पण खरं तर दोघेही गोंधळलेले असतील' हे चिंतन वाचताना ही नर्तकी वाचकांच्या मनात अनेक विचारांचे नर्तन सुरू करते. ते सुखदही आहे आणि दु:खदही आहे. आपल्या प्रेमानुभवाबद्दल ती लिहिते, 'प्रेम मला नवनवीन रूपात भेटत गेलं. कधी देवासारखं, कधी दानवासारखं, तर कधी सर्वसाधारण माणसाच्या रूपात. जेव्हा जेव्हा ते भेटलं तेव्हा तेव्हा हेच माझ्या जीवनातलं एकमेव प्रेम आहे असं वाटत गेलं. याचीच मी प्रतीक्षा करीत होते आणि तेच प्रेम मला मिळालं असं वाटून जायचं. माझ्या प्रत्येक प्रेमाच्या प्रकरणातून एकेक कादंबरी निर्माण होऊ शकेल. सर्व प्रेमप्रकरणांचा दु:खद शेवट झाला. एखाद्या सुखांत प्रेमाची मी वाट पाहात आहे.' इझाडोरा डंकन श्रेष्ठ नर्तकी असेल, संगीतात आणि नृत्यात व निरनिराळ्या प्रेमानुभवात बुडालेली असेल, पण ती एक अंतर्बाह्य स्त्री होती. स्त्रीच्या मनाचे अनेक कंगोरे या आत्मकथनातून हळुवारपणे व्यक्त झाले आहेत. माणसाचा सामान्यपणा आणि कलावंतांचा असामान्यपणा परस्परात मिसळून गेल्यामुळे या आत्मनिवेदनाला एक वेगळाच उत्कट रंग आला आहे. पदरात पडलेला जीवनाचा प्रत्येक क्षण साजरा करायचा ही आशावादी दृष्टी यातून दिसते. नर्तकीच्या आयुष्यात असे काय असणार आहे?

बोलून चालून एक नाचणारी बाई! तिच्या चरित्रात उथळ विकारच असणार. तिचं पुस्तक वाचण्याने काय मिळणार? असले प्रश्न उपस्थित करणारे हरीचे लाल बरेच असतात, पण कलावंतांच्या भावनिक जीवनाचे ज्यांना दर्शन घ्यायचे असेल त्यांनी असली आत्मचरित्रे वाचलीच पाहिजेत, इझाडोराने आपण 'आई' झाल्याचा विलक्षण रोमांचक अनुभव उत्कट भावनेने सांगितला आहे. असह्य वेदनेनंतर मातृत्वाची दैवी देणगी पदरात पडल्यावर ती म्हणते, 'त्या क्षणी मी नृत्यांगना नव्हते, कलावती नव्हते, मी केवळ 'आई' होते. साऱ्या कलावंतांहून श्रेष्ठ अशी माता होते. मीच परमेश्वर होते. माझ्या आनंदाचं वर्णन मी करू शकणार नाही. कारण मी लेखिका नाही. पण 'आई' होण्याच्या क्षणी जीवनाचं रहस्य मला सापडलं'. कोणत्याही आईच्या अंत:करणातला हा अमूर्त भाव तिने शब्दांकित करण्याचा प्रयत्न केला. माणूस इथून तिथून एकच आहे. प्रत्येकाच्या रक्ताचा रंग एकच आहे हे खरे असले तरी प्रत्येक माणूस दुसऱ्याहून कितीतरी निराळा आहे. प्रत्येकाच्या हृदयाची ठेवण एकच असली तरी हृदयातली भावनिक स्पंदने वेगवेगळी असतात. काही मंद असतात. काही तीव्र असतात. त्यातूनच एक जीवनगाणे तयार होते. खरे तर कलावंताचा कलाविष्कार हीच त्याची आत्मकहाणी असते. बर्नार्ड शॉ याला कुणीतरी विचारले, 'आपण आत्मचरित्र केव्हा लिहिणार?' तो म्हणाला, 'मग मी आजपर्यंत काय लिहिलं आहे? माझ्याच आत्मानुभूती माझ्या साहित्यातून व्यक्त झाल्या आहेत'. काही मनस्वी माणसांची, काही यशस्वी व्यक्तींची आणि काही तपस्वी वृत्तीच्या क्रांतिकारकांची पारदर्शी, प्रामाणिक आत्मचरित्रे वाचताना मला झालेला आनंद कधीच पुसला गेला नाही. सामाजिक अन्यायाने उद्‌ध्वस्त झालेल्या कित्येक शोषितांची आत्मकथनेही नवी जाणीव देतात. आत्मचरित्र तेव्हा प्रत्ययकारी आणि प्रभावी होते जेव्हा चरित्र आणि आत्मा दोहोंनाही एक प्रकारची व्यापकता असते. आत्म्याला स्पर्श करणारी आत्मशोधक चरित्रे फारच थोडी निर्माण होतात, पण त्यांचा सुवास मनाला सदैव उत्तेजित करतो हे काय थोडे आहे?

□ □ □

# सुखाचा ❀ शोध

'सुखी माणसाचा सदरा' ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. तो सदरा एका राजाला हवा होता. आपणही त्याच्यासारखे सुखी होऊ अशी त्याची कल्पना होती. पण सुखी मनुष्यच कोठे दिसेना. प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या तरी दु:खाने पिचून गेलेला. अखेर एका झाडाखाली एक सुखी मनुष्य बासरी वाजवीत बसला होता. आपल्याला कसलीही विवंचना नाही. कोणतेही दु:ख नाही. जीवनाविषयी कसलीही तक्रार नाही. आपण पूर्णपणे समाधानी आहोत असे त्याने प्रसन्न मुद्रेने सांगितले. तो बसला होता तेथूनच एक झरा झुळझुळत होता. वाऱ्याने झाडांची पाने सळसळत होती. त्याच्या बासरीतून सुरेल सूर बाहेर पडत होते. जणू त्याच्या तृप्त, आनंदी मनाचे ते सूर उमटत होते. राजा म्हणाला,

'तुझी भेट झाली फार आनंद वाटला. आता तुझा सदरा मला दे.' तो माणूस म्हणाला, 'सदरा? मला सदऱ्याची कधीच आवश्यकता वाटली नाही. माझ्याजवळ सदराच नाही?' ही गोष्ट इथे संपते. शाळेच्या क्रमिक पुस्तकात फार वर्षांपूर्वी ती मी वाचली होती. शिक्षकांनी त्या गोष्टीचे तात्पर्य सांगितले होते, 'सुखी माणसाला सदरा नसतो.' या गोष्टीतली चमत्कृती चित्तवेधक आहे. पण गोष्टीचा अर्थ पूर्णांशाने भल्याभल्यांनाही कळलेला नाही, असे मला वाटते. आज मनात विचार येतो, सुख सदऱ्यात नसते, वस्त्रालंकारात नसते, सिंहासनावर बसण्यात नसते. एखाद्या झऱ्याच्या जवळ हिरवळीवर बसून निळ्या आकाशाखाली बेभानपणे एखादे गीत गाण्यात असते. आजूबाजूच्या सृष्टीशी समरस होण्यात असते. निर्झराचे संगीत ऐकताना झाडाशी संवाद करण्यात असते. असेच त्या गोष्टीतून लेखकाला सुचवायचे असावे. सदऱ्याची जरूर नसणे याचा अर्थ सुखी माणसाच्या गरजा कमी असतात. जितक्या गरजा कमी तितके जीवन अधिक सुखकर असे एक समीकरण धर्मशास्त्राने मांडले आहे. जग जिंकून आलेल्या सिकंदराला आपल्या शौर्याचा उन्माद चढलेला होता. स्वाभाविकच आहे ते. ग्रामपंचायतीची एखादी किरकोळ निवडणूक जिंकली की माणसे विजयाची नशा वाढवण्यासाठी आणखी कित्येक धुंद मार्गांचा अवलंब करतात. ते आपण पाहिलेलेच असते. सिकंदर तर अफाट भूमीचा स्वामी बनला होता. आपल्या यशाच्या मदाने त्याचे डोके फिरले नसते तरच नवल! तो त्या भरात आपल्या गुरुला डायोजिनिसला भेटायला गेला. थंडीचे दिवस होते. सकाळची वेळ. गुरू कोवळ्या उन्हाची ऊब घेण्यासाठी एका खडकावर बसलेले होते. शिष्य त्यांना गर्वाने म्हणाला,

'गुरुजी बोला, तुम्हाला काय पाहिजे आहे? तुम्ही इच्छा व्यक्त करा. तुमच्या इच्छेची पूर्ती झालीच म्हणून समजा. मागाल ते देण्याचं सामर्थ्य या सम्राट सिकंदराच्या ठायी आहे.' गुरुला हसू आले. कारण शिष्याने स्वत:चा उल्लेख सम्राट असा केला होता. त्याच्या डोक्यात विजयाची अनिवार घमेंड शिरली असावी. गुरू काहीशा तुच्छतेनं म्हणाला.

'एकच इच्छा आहे. तू माझ्यासमोर उभा आहेस. माझ्या अंगावर नीट ऊन पडत नाही. तू येथून निघून जा. म्हणजे मला उन्हाचा आनंद भोगता येईल.' ही आख्यायिकाही प्रसिद्ध आहे. सुखाची अमूप साधने देण्याची शक्ती सिकंदरात जरूर होती पण डायोजिनिस हा तत्त्वज्ञ होता. निरिच्छ होता, बाह्य साधनातून सुख मिळू शकत नाही याची त्याला जाणीव होती. त्याच्या गरजा मर्यादित होत्या. निसर्गाच्या सहवासातून मिळणारे सुख त्याला पुरेसे होते. अमर्याद इच्छा आणि आकांक्षा यांच्या जंगलात सापडलेला माणूस सुखाची वाट हरवून बसतो आणि नवनवीन दु:खांच्या व संकटांच्या वाटांनी चालत राहातो. या दु:खपूर्ण वाटा लांबच लांब पसरलेल्या असतात. त्या तुडवीत जाताना माणसाची दमछाक होते. हा विचार अनेक तत्ववेत्त्यांनी मांडला आहे. हातात आलेल्या फळापेक्षा झाडावर दूर अंतरावर असलेले फळ मनुष्याला अधिक आकर्षक वाटते. त्यासाठी तो धडपडू लागतो. जिवाचा आटापिटा करतो. हातातले फळ तसेच राहून जाते किंवा ते त्याला बेचव वाटते. दृष्टी बदलली की सृष्टीत सुद्धा बदल घडल्यासारखे वाटते.

वनवासात व्यतीत केलेले प्रेमाचे आणि सुखाचे दिवस आता या राजप्रासादात मिळू शकत नाहीत याची खंत रामसीतेच्या मनात होती. 'ते हि नो दिवसा गता:' असे म्हणताना रामाच्या डोळ्यांत अश्रू आले. वनवासात गरजा कमी होत्या. वल्कले नेसण्यातही सुख होते. सीतेशी प्रणयालाप करताना रात्र संपत होती पण प्रेमसंवाद अपुराच राहत होता. शबरीच्या उष्ट्या बोरांना जी चव होती ती राजवाड्यातल्या पंचपक्वान्नातही कधी आढळली नसेल. खरे तर राजपद मिळाले होते. सिंहासनावरच्या रामासमोर राजे-महाराजे नतमस्तक होत होते. सर्व प्रकारची सुखसाधने सहज उपलब्ध होत होती. पण सामान्य माणूस म्हणून जगताना जे समाधान होते ते आता हरवले होते. बहिर्मुख वृत्तीच्या माणसाला ज्यात सुख वाटू शकते तसे अंतर्मुख असलेल्या चिंतनशील माणसाला त्यात कधीच समाधान मिळत नाही. गांधीजींच्या अंगात सदरा नाही, हे पाहून एका लहान मुलाने त्यांना एक सदरा देण्याची तयारी दर्शवली. गांधीजी हसून म्हणाले, 'एका शर्टानं माझं भागणार नाही. मला लाखो शर्टस् लागतील. ते तू कुठून देणार? त्यापेक्षा मी उघडा आहे हेच बरं आहे.' त्या मुलाला या उत्तराचा अर्थ कित्येक वर्षानंतर कळला असेल. इतके मात्र खरे की, तुमचे आमचे सुखदु:खांचे हिशेब साधे-सरळ असतात. मोठ्या माणसांच्या सुखदु:खांचे मात्र आपल्याला नीट

आकलन होत नाही. गौतम बुद्ध थंडीच्या दिवसात वाळलेल्या पानांवर सुखनैव झोपू शकत होते, पण लक्ष्मीपुत्रांना मखमली गाद्यागिरद्याही झोपेचे सुख देऊ शकत नव्हत्या. एकाने बुद्धाला प्रश्न विचारला, 'भदन्त, अपुरी वस्त्रे, कडक थंडी आणि वाळलेल्या पानांची शय्या ही अगदीच सामान्य तरतूद असूनही आपण सहजपणे कशी झोप घेऊ शकता?' त्या लक्ष्मीपुत्राला बुद्धासारखे स्वच्छ, प्रसन्न, निरुपाधिक मन लाभले असते तर हा प्रश्न पडला नसता. त्याच्या मनात रागद्वेष होते. वासनाविकार होते. व्यापार-व्यवहाराच्या अनेक विवंचना होत्या. त्याच्या मनाचा एखादाही कोपरा स्वच्छ राहिलेला नव्हता. झोप कुठून येणार?

आजचे आपले जीवन यंत्रावलंबी बनले आहे. या जीवनात स्वाभाविकता फारशी उरलेलीच नाही. कृत्रिमतेने आपण पुरते वेढले गेलो आहोत. मुंबईसारख्या औद्योगिक नगरात मनुष्य पावलोपावली यंत्रावर अवलंबून राहतो. या महानगरात राहणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मनावर विलक्षण ताण-तणाव असतात. खेड्यांचेही आता शहरीकरण झाले आहे. शुद्ध हवा आणि शुद्ध पाणी दुर्मिळ होत चालले आहे. या धावपळीच्या जगात फास्ट लोकलने प्रवास करताना माणूस माणसाला ओळखू शकत नाही. गर्दीत तो घुसमटून जातो. विद्युद्दीपांच्या झगझगाटात आकाशातली चंद्रकोर त्याला नीट दिसत नाही. नव्हे त्याला ती पाहण्याची इच्छाही होत नाही. माणसांच्या प्रचंड रांगा दिसतात. मुंग्यांच्या वारूळाप्रमाणे रस्त्यारस्त्यात माणसांची गर्दी दिसते. कोणी कोणाशी बोलत नाही. कोणी कोणाकडे पाहून दिलखुलासपणे हसत नाही. रस्त्यात चाललेला गारुड्याचा किंवा माकडवाल्याचा खेळ पहायलाही सवड नाही. हातात बांधलेल्या घड्याळाने त्यांचे सारे आयुष्यच जणू बांधून टाकलेले असते. नाना प्रकारच्या खऱ्या-खोट्या चिंतांची गाठोडी दररोज खांद्यावरून वाहून नेणारी ही माणसे सुखी असतात काय? यांच्या सुखाच्या कल्पनाही अगदीच ढोबळ असतात. मद्याच्या प्याल्यात ते सुखाचा शोध करतात. निसर्गाचे सौंदर्य पाहण्याच्या कल्पनेने कुठल्या तरी हिल स्टेशनवर जातात. पण त्यांनी डोळे भरून कधी आकाशाची निळाई पाहिली आहे, असे घडत नाही. क्षितिजापर्यंत पसरलेला सागर एकटक आपल्या दृष्टीत आणि गात्रागात्रात साठवून घ्यावा, असे त्यांना वाटत नाही. उंच डोंगरावरून कोसळणारा धबधबा पाहतानासुद्धा सिगारेटची आणि दारूची त्यांना सोबत लागते. बालकवींच्या ओळी आठवतात-

सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनी घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे

सुंदरतेच्या फुलावरचे दव चुंबून घ्यायला रसिकाचे तरल, संवेद्य मन असावे लागते. खरे तर निसर्ग आपल्याभोवती निरनिराळ्या रुपांनी फेर धरून नाचत असताना त्याचा ताल आणि लय आपल्याही अंतरंगात शिरली पाहिजे. सिगारेटचा कडवट धूर

गिळल्याशिवाय ज्यांना आनंद मिळत नाही त्यांच्या रसिकतेबद्दल काय बोलावे? आपले प्राचीन ऋषीमुनी निसर्गाच्या आनंदोत्सवात सामील होऊन गात होते. त्यांची प्रतिभा फुलत होती. तुकारामांसारखा संतकवीसुद्धा 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असे म्हणून आकाशाच्या मंडपाखाली, पृथ्वीच्या आसनावर बसून आपल्या मनाशी स्वैर संवाद करीत होता. पक्ष्यांच्या सुस्वरात आपला स्वर मिसळत होता. आज एकांताचे सुख माणसाला अनुभवता येऊ नये, ही त्यांची शोकांतिका आहे. नेहमी गर्दीत राहणारा माणूस आपल्याला एक मन आहे आणि त्यात भावतरंग उमटत आहेत, हेच विसरून गेला आहे. मनातले सुखदु:ख बाहेर पडू नये, म्हणून तो आपल्या मनाशी कधी वाद-संवाद करीत नाही. तो खळखळून हसत नाही, हुंदके देऊन मुक्तपणाने रडतही नाही. रोमांचित होण्यातले सुख त्याने कधी घेतलेले नसते. हे आयुष्य अळणी, मचूळ आहे, असे वाटून त्यात आपल्या सांकेतिक, ढोबळ कल्पनेने काहीतरी मालमसाला घालून चव आणण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्या आनंदस्वरूप आत्मज्योतीला स्वाभाविकपणे तेवत राहण्याची संधीच तो देत नाही.

माणसे अकारण दु:खी होतात याचे एक महत्त्वाचे कारण असे की, सुखाच्या साधनांना ते आत्यंतिक महत्त्व देतात. हातात एखादी सत्ता असणे हे आनंदाचे आहे. पण ती चार दिवसांची आहे. केव्हा तरी सत्ता आपल्याला सोडावी लागणार आहे, हा विवेक सत्ताधारी कधीच करीत नाहीत. सत्तेची कवचकुंडले गळून पडली की, ते केविलवाणे दिसू लागतात. सुख निर्माण करणारी बाह्य साधने अशीच चंचल असतात. ती मिळविण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. पण सारे आयुष्य पणाला लावून ही साधने हातात ठेवण्यात कसले स्वारस्य आहे? प्रत्येक सुखसाधनाला एक अंगभूत मर्यादा आहे म्हणूनच त्याला अमर्याद महत्त्व देऊन स्वत:ला दु:खी करून घेण्यात काही अर्थ नाही. काही माणसे स्वत:च्याच प्रेमात पडलेली असतात. विहिरीच्या काठावर उगवलेले एक फूल पाण्यात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबावर प्रेम करू लागते. त्याप्रमाणे काही लोक आपली एक प्रतिमा तयार करतात व तिच्याच प्रेमात बुडून जातात. ही आत्मलुब्ध माणसे स्वत:लाच सर्वाधिक महत्त्व देतात. सर्वत्र आपलीच स्तुतिस्तोत्रे गायिली जावीत. सर्वांच्या बोलण्यात आपलाच उल्लेख असावा. प्रसिद्धीचा प्रकाशझोत आपल्यावरच पडावा, अशी त्यांची इच्छा असते. अपेक्षाभंग झाला की, ही माणसे जगाला शिव्याशाप देऊ लागतात. हताश होतात. आपण उपेक्षित झालोत, याची रात्रंदिवस खंत करीत बसतात. हळूहळू त्यांचा जीवनद्वेष वाढत जातो. तुच्छतवादीवृत्तीने ती साऱ्या जगाकडे पाहू लागतात. आत्मप्रेमाचा अतिरेक हेच त्यांच्या दु:खाचे कारण असू शकते. सर्वसंगपरित्याग केलेल्या कित्येक संतमहंतांच्या मनातदेखील खोलवर ही आत्मलुब्धतेची लहर असू शकते. स्वत:ला विसरून काम करण्यातला आनंद अशी माणसे कधीच घेऊ शकत नाहीत.

पंडित नेहरूंच्या सदऱ्यावर नेहमी ताज्या गुलाबाचे एक टपोरे फूल असायचे. जणू त्यांचे जीवनप्रेम, त्यांचा जीवनानंद त्यातून प्रकट होत असे. जीवनाचे अनेक चित्रविचित्र रंग त्यांनी रसदृष्टीने न्याहाळले होते. आपल्या एका प्रसिद्ध भाषणात ते म्हणाले, 'जीवनातील आनंद कोणता? प्रश्नाचे उत्तर कठीण आहे. पण मी तुम्हाला सांगू शकतो की, जीवनातील खरा आनंद म्हणजे एखाद्या उदात्त उद्दिष्टाशी जवळीक साधणे, स्वत:ला विसरणे, स्वत:च्या छोट्या तक्रारी आणि कुरकुरी विसरून जाणे. तुमची शक्ती संपली आणि नंतर तुम्हाला अडगळीत कुणी टाकले तरी हरकत नाही. तुम्ही आपले काम केले यातच जीवनाचा खरा आनंद आहे. मी जीवनावर अमूप प्रेम केले. मात्र मी जीवनाचा गुलाम कधी झालो नाही.'

पंडितजींच्या आनंदशोधक, ध्येयनिष्ठ वृत्तीचे दर्शन घडविणारे हे उद्‌गार आहेत. उन्हात दगड फोडणाऱ्या, कष्ट करणाऱ्या मजुराने उत्तर दिले होते, 'मी दगड फोडीत नाही. या दगडातून एका देवमंदिराची उभारणी व्हायची आहे. मी मंदिर उभे करीत आहे.' स्वत:वर, स्वत:च्या परिश्रमावर आणि उद्दिष्टांवर श्रद्धा ठेऊन काम करणारा माणूस सुखी असतो, असे म्हणायला प्रत्यवाय नाही. 'तुझे आहे तुजपाशी' हे संतवचन लक्षात ठेवले तर सुखाचा शोध बाहेर कुठेतरी करण्याचे कारण पडणार नाही.

□ □ □

# सत्य आणि ⌘ स्वप्न

संतकवी चोखामेळा यांच्या एका अभंगात त्यांनी विठ्ठल दर्शनाचे तृप्त मनाने वर्णन केले आहे. अभंगाची भाषा भावपूर्ण आहे. विठ्ठल दर्शन घडलेल्या चोखोबांच्या अंत:करणातली आनंदाची उचंबळती धार या अभंगातून वाहते आहे. भक्ताच्या मनाला आलेला तृप्तीचा मोहोर आणि त्याचा सुखमय सुगंध याचे एक हृदयस्पर्शी चित्रण या दृष्टीने हा अभंग मनाला आनंद देतो यात शंका नाही. आपल्याला तो पांडुरंग कसा दिसला याचे वर्णन करताना हा संत म्हणतो–

लावण्याचा गाभा त्रैलेक्याची शोभा विटेवरी उभा पंढरीये।
पाऊले गोजिरी श्रीमुख शोभले।। ध्यान मिरवले भीमातीरी।।
वैजयंती माळा किरीट कुंडले।। परिधान केले पीत वस्त्र।।
चोखा म्हणे ऐसा लावण्य पुतळा तो आम्ही देखिला दृष्टीभरी।।

विटेवरी उभा असलेला हा विठ्ठल 'लावण्याचा गाभा' 'लावण्य पुतळा' आहे. त्याची पाऊले गोजिरी आहेत. पितांबर परिधान केलेल्या त्याच्या गळ्यात वैजयंती माळा शोभत आहेत. असा हा सौंदर्याचा देव 'तो आम्ही देखिला दृष्टीभरी' असे उद्‌गार कवीने उत्कटतेने काढले आहेत. दुसऱ्या एका अभंगात 'विठोबा पाहुणा आला आमुचे घरा' असे म्हटले आहे.

चोखा म्हणे माझ्या जीवीचा जीवन।। पाहता तनुमनू भुलोनी जाया।।

परमभक्त जेव्हा देवमूर्ती डोळा भरून पाहतो तेव्हा त्याच्या हृदयात आनंदाचे कल्लोळ उचंबळून येतात. जगातले सारे सौंदर्य आणि पावित्र्य या मूर्तीच्या ठायी एकत्रित झाले आहे असे त्याला वाटते. भक्ताला देव दिसणे ही भक्ताच्या आयुष्यातली आनंदाची आणि सौभाग्याची पौर्णिमा असते यात संशय नाही. तहानेने व्याकुळ झालेल्या हरिणाला खळाळून वाहणारा निर्झर भेटावा, विरहाने तळमळणाऱ्या प्रेमिकेला प्रियकर दिसावा तसा हा आनंदाचा, इच्छापूर्तीचा अनुभव असतो.

पण...चोखामेळ्याला खरोखरच विठ्ठलाचे दर्शन घडले काय? ज्याचे वर्णन करताना या कवीचे शब्द फुलासारखे कोमल आणि रसासारखे मधुर झाले तो पंढरीचा विठ्ठल त्याने खरोखरच पाहिला काय? का हे केवळ स्वप्नरंजन आहे? दु:खी माणसाने उसन्या आनंदाचे नाटक करावे, धाय मोकलून रडणाऱ्याने डोळे पुसून चेहऱ्यावर कृत्रिम हास्य आणावे तसा हा प्रकार नव्हे काय? कारण विठ्ठल मंदिराची पायरी

चढण्याचेही भाग्य चोखामेळ्याच्या ललाटी लिहिलेले नव्हते, कठोर वास्तव इतकेच की, जो पांडुरंग या संताला उभ्या आयुष्यात क्षणार्धही दिसला नाही तो त्याला 'लावण्याचा गाभा' म्हणतो. ही त्याने एकप्रकारे स्वत:ची करून घेतलेली करुण वंचना आहे. दूरवर उभे राहून आपला स्पर्शही इतरांना होऊ न देता मंदिराच्या शिखराकडे पाहावे आणि त्यालाच हात जोडावेत हा अस्पृश्यांच्या बाबतीत समाजव्यवस्थेचा 'शास्त्रसंमत' असा पारंपरिक दंडक होता. सवर्णांनी विठ्ठलाला मंदिरात स्थानबद्ध करून ठेवले होते आणि हा पांडुरंग कटिवर हात ठेवून हे सारे सामाजिक अन्यायाचे दृश्य पाहात होता. शूद्रातिशूद्रांना पांडुरंगाने पोटाशी धरल्याच्या कितीही आख्यायिका पोथ्यापुराणांतून आढळत असल्या तरी चोखोबांसारखा एक महान भक्त मंदिरात प्रवेश करू शकत नव्हता. भक्त आणि देव एकमेकांना भेटू शकत नव्हते. उच्च वर्णाचे लायसेन्स नसेल तर ते 'सावळे परब्रह्म' दृष्टीस पडणे शक्य नव्हते.

चोखामेळाच काय पण त्यांची पत्नी सोयरबाई, बहीण निर्मलाबाई, कर्ममेळा हा मुलगा आणि बंका हा मेहुणा आणि त्या काळातील सर्वच अस्पृश्यांची हीच स्थिती होती. अस्पृश्यतेची भिंत ओलांडून पांडुरंगाच्या चरणी माथा टेकण्याची संधी कुणालाही नव्हती इतकी ही भिंत चिरेबंदी होती.

चोखामेळ्याचे सारे कुटुंबच कविहृदयाचे आहे. काव्यप्रतिभेचा वरदहस्त या साऱ्यांच्या मस्तकावर आहे. या घराण्यातच कविता नांदत होती. आपल्या भावभावनांचे शब्दचित्र रेखाटून यांनी मराठी कवितेला नवे सामर्थ्य दिले. पण उपेक्षेच्या आणि अपमानाच्या अंधारात यांची कविता लिहिली गेली. आपल्याला विठ्ठल दिसला आणि भेटला असे हे काव्यातून सांगत राहिले, पण वास्तव मात्र पूर्ण विरुद्ध होते. विठ्ठल आणि चोखामेळा दोघांनीही एकमेकांना पाहिले नव्हते. मग आपल्याला तो किरीटकुंडले घातलेला, वैजयंती माळा ल्यालेला, त्रैलोक्याची शोभा असलेला लावण्यापुतळा 'दृष्टीभरून पाहायला मिळाला' असे चोखामेळ्याने का सांगावे? याचे उत्तर इतकेच की असे सांगण्यातले एक केविलवाणे समाधान त्याच्या दु:खार्त मनाला मिळवायचे होते. ते त्याने मिळविले. मला एक करुणकथा आठवते... आपल्याला मूल होत नाही या अनिवार दु:खाने आणि निराशेने एक स्त्री खेळण्यातल्या बाहुलीलाच आपले मूल मानून बोलत राहू लागली.

'माझी छकुली किती गोरीपान दिसते बघा. तिला दृष्ट लागेल की काय अशी भीती मला नेहमी वाटते. तिच्यासाठी शिवलेला नवा फ्रॉक तिला इतका शोभून दिसतो की, एखादी चिमुकली परी नंदनवनातून इथं आली आहे असं वाटतं. तिची घरभर दुडदुडणारी पाऊलं किती गोजिरी आहेत. गळ्यात रुळणारी इवलीशी माळ, कानातले डूल सारं सारं तिला साजून दिसतं. पुढच्याच वर्षी मी तिला शाळेत घालणार आहे, पण ही खोडकर मुलगी शाळेत नीट वागेल की नाही हीच चिंता मला लागून राहिली

आहे'.

त्या बाहुलीला पोटाशी धरून वात्सल्यभराने हे उत्कट उद्‌गार काढताना तिची मातृत्वाची तहान थोडीफार भागत असेल पण ऐकणाऱ्याचे अंत:करण पिळवटून टाकणारे तिचे उद्‌गार कुणाच्याही डोळ्यात पाणी उभे करायचे. हे वेड होते की शहाणपणा होता? वास्तवातील दु:खांवर मात करण्यासाठी तिच्या कल्पनेने ही सुखाची पाऊलवाट शोधून काढली होती? तिच्या हिशोबी ती कृत्रिम बाहुली नव्हती. ते तिच्या रक्तामांसाचा संस्कार घेऊन जन्मलेले तिचे अपत्य होते. आम्ही याला बुद्धिभ्रम म्हणत असलो तरी तिच्या दृष्टीने ते एक सुंदर सत्य होते. माणसाची बहुतेक सारी स्वप्ने वास्तव जीवनात उद्‌ध्वस्त होतात. ज्याला कोट्यधीश व्हायचे असते तो फुटपाथवर बसून बुटपॉलिशचा धंदा करीत असतो आणि आपल्या हताश मनाला दिलासा देत असतो की, या पलीकडच्या सात मजली इमारतीचा मी एक दिवस मालक होईन. काट्यांतून चालताना हिरवळीचे स्वप्न मनात ठेवणे हा काही अपराध नव्हे. माणसाची पुष्कळशी स्वप्ने केवळ अशक्य कोटीतली असतात पण ती स्वप्ने आपल्या आयुष्यात आपल्याच हातांनी कुरवाळीत बसण्यात एक आगळे समाधान आहे. संत चोखामेळ्यांची कविता त्याच्या आशावादी, स्वप्नवादी, मनोवृत्तीचा रंग घेऊन काही ठिकाणी आनंदाने उचंबळून आलेली असेल तर ते स्वाभाविकच नव्हे काय? रखरखीत वाटेने चालताना निदान आम्हाला आमच्या मनाच्या भूमीवर तरी कल्पनेची फुले फुलवू द्या असेच हा संतकवी सांगतो. तो इतका विठ्ठलमय झाला आहे की, त्याच्या मनाच्या पंढरीत विठ्ठल कायमचा वस्तीला आला आहे. तो 'लावण्याचा गाभा' त्याने आपल्या मनाच्या मनात जीवाभावाने जतन करून ठेवला आहे. या अवस्थेला कोणी शहाणा मनुष्य 'वेड' अशीही संज्ञा देईल. पण हे वेड चोखामेळ्याला लागले होते. म्हणूनच तो आपल्या भावार्त कवितेच्या आधाराने आपल्या अभावग्रस्त आयुष्यात तग धरून राहू शकला. सामान्य माणसापेक्षा कवींची स्वप्ने विशाल आणि उत्तुंग असतात. सामान्य माणूस त्याच्या तुलनेत दुबळा असतो. म्हणूनच कल्पनेच्या डोहात तो स्वत:ला झोकून देऊ शकत नाही.

संत तुकोबांच्या जीवनात कितीतरी अटीतटीचे तीव्र संघर्ष सुरू होते. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।', हे त्यांचे उद्‌गार अक्षरश: खरे आहेत. नाना प्रकारच्या संकटांनी वेढले गेलेले तुकोबा बऱ्याच वेळा व्यथित झाले असतील. पण तरीही आपल्या इच्छाशक्तीने आपल्या अंत:करणात त्यांनी एक आनंदाचा डोह निर्माण केला. त्यांच्या प्रतिभेत ही निर्माणशक्ती होती.

आनंदाचे डोही आनंदतरंग। आनंदचि अंग आनंदाचे।।
काय सांगो झाले काहीचिया बाही।। पुढे चाली नाही आवडीने।।
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा।। तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे।।

तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा।। अनुभव सरिसा मुखा आला।।

लौकिक जीवनातले सारे पराभव, सारे अपमान आणि साऱ्या अटळ आपत्ती या आनंदाच्या डोहात तुकोबांनी बुडवून टाकल्या. कवीला ही संजीवनशक्ती लाभलेली असते. त्यामुळेच कधीही न पाहिलेला विठ्ठल चोखामेळा प्रतिक्षणी पाहू शकत होता. त्याचे शब्दचित्र काढू शकत होता. तो विठ्ठल त्याच्याबरोबर त्याची कामे करीत होता. मंगळवेढ्याचे गावकुसू बांधताना चोखामेळ्याबरोबर उन्हातान्हात विठ्ठलही सोबतीला होता. तो मंदिरात नव्हता, तो चोखोबांच्या रोमारोमांत रमला होता. त्यामुळे त्यांनी त्याला पाहिला हे विधान तत्त्वत: बरोबरच वाटते. पण खरोखरच या आर्त भक्ताला विठ्ठल चर्मचक्षूंनी पाहाता आला असता तर त्याची कविता तृप्तीच्या गंधाने न्हाऊन निघाली असती. सावळ्या विठ्ठलाचे रूप रेखाटताना त्याच्या शब्दांना अधिक सौंदर्य लाभले असते. तुकोबांप्रमाणे असीम आनंदाच्या डोहात हा संतकवी डुंबत राहिला असता. आज त्याच्या काव्यांत वैफल्याने काळवंडलेले आणि दु:खाने पिळवटलेले जे व्याकुळ सूर आढळतात ते आढळले नसते. राहून राहून मनात येते की, या कवीच्या पदरात न्याय पडायला हवा होता.

संत सोयराबाईचा असाच एक हृदयस्पर्शी अभंग आहे. त्यात ती म्हणते, 'पंढरीच्या ब्राह्मणांनी चोरव्याचा छळ केला म्हणून देवानं एक नवल घडवून आणलं. चोखोबाच्या दारात रिद्धी-सिद्धी उभ्या राहिल्या. सर्व ब्राह्मण समुदाय त्याच्या घरी भोजनासाठी आला. सडे शिंपले होते. गुढ्या उभारल्या होत्या. रंगीबेरंगी तोरणे लावलेली होती. वैष्णव जन आनंदाने कीर्तन करीत होते. असंख्य ब्राह्मणांच्या पंगती भोजनासाठी बसल्या होत्या. स्वर्गस्थ देव विमानातून हा सुखाचा सोहळा दिवाळी, दसरा पाहात होते आणि सोयराबाई चोखामेळ्याला ओवाळीत होती'.

या अभंगातले हे चित्र म्हणजे सोयराबाईच्या स्वैर कल्पनेचा चमत्कृतीपूर्ण विलास आहे. तिने आपले नितांतसुंदर स्वप्न मांडून ठेवले आहे. वास्तवातले तिचे जीवन जितके दारिद्री आणि वैराण आहे तितकेच तिचे हे स्वप्न समृद्धीच्या रसरंगांनी ओथंबलेले आहे. विषमतावादी परंपरेत आपल्या पतीचा आणि आपल्या कुटुंबातील व्यक्तींचा जो असह्य छळ झाला त्याबद्दल सोयराबाईच्या मनात असंतोष खदखदत होता. उच्चवर्णीय ब्राह्मणांचा समुदाय चोखामेळ्याच्या घरी परमेश्वराने भोजनासाठी पाठवून चोखामेळ्याचा गौरव केला होता. अस्पृश्यता संपली. ब्राह्मण चोखोबाला उराउरी भेटू लागले. रिद्धी आणि सिद्धी दारात स्वागतासाठी उभ्या राहिल्या. दु:ख दैन्य मावळले. भक्तासाठी देवाने हे नवल निर्माण केले. हा अभंग वाचताना वस्तुत: मला आनंद वाटायला हवा होता. पण सोयराबाईने आपली आत्मवंचना करून घ्यावी आणि त्यातच समाधान मानावे यामुळे माझे मन विषण्ण झाले. प्रत्यक्ष लौकिक आयुष्यात चोखामेळ्याच्या त्या झोपडीसमोर एखादा तरी ब्राह्मण कधी त्याला

भेटण्यासाठी आला असेल ही शक्यताच नव्हती. अस्पृश्याची सावली अंगावर पडली तरी 'शांतम् पापम' असे म्हणून त्याला शिव्या मोजून कपड्यासकट आंघोळ करण्याची परंपरा असलेल्या त्या काळात कोणता उच्चवर्णीय त्याला भेटण्यासाठी येईल? पण दीनदलितांनी ही स्वप्ने आपल्या मनात रंगवायला काहीच हरकत नव्हती. हे सुंदर असत्य हृदयाशी कवटाळून बसलेली सोयराबाई आणि चोखामेळा हे कारुण्याचे आणि सामाजिक दु:खाचे, हताश मन:स्थितीचे विषय आहेत. दाहक सत्याचा क्षणभर विसर पडावा म्हणून कृत्रिम कल्पनेचे शीतल तुषार ते आपल्या अंगावर घेत होते.

संत चोखामेळा आणि त्याचे कुटुंब वृत्तीने कवी होते म्हणून बरे झाले. अस्पृश्यतेचे चटके त्यांना सहन करता आले पण मराठी संतकाव्यात तथाकथित दलित संतांच्या हृदयातले हुंदके अशा आर्ततेने प्रकट झाले आहेत की ते ऐकताना वाचकाचे मन अस्वस्थ व्हावे. पन्नास वर्षांपूर्वी पंढरीला पांडुरंगाच्या दारात दुसरा एक पांडुरंग आमरण उपोषण करण्यासाठी बसला. चोखामेळ्याप्रमाणेच तोही कवीवृत्तीचा होता. पण स्वप्नात रममाण होण्यापेक्षा प्रत्यक्षात मंदिराची कवाडे, भक्तांसाठी खुली झालीच पाहिजेत असा आग्रह धरून तो उपोषणाला बसला. विठ्ठलाच्या दारातच पांडुरंग उपाशी राहिला. भक्ताला जात नसते, भक्ताला वर्ण नसतो, भक्ताला केवळ परमेश्वराची भक्ती असते, ही घोषणा त्याने केली. अखेर बंदिवासातून तो विठ्ठल मुक्त झाला आणि हजारो चोखोबा व सोयराबाई तो 'लावण्याचा गाभा' पाहण्यासाठी दररोज येऊ लागल्या. काळ बदलला, परिस्थिती बदलली. पण मधल्या काळात जातिव्यवस्थेच्या दगडी भिंतीखाली किती तरी चोखामेळ्यांचा चिरडून अन्त झाला. त्याची मोजदाद कोण करणार? संत वाङ्मयाचे एक अभ्यासक मला म्हणाले, 'तुम्ही चोखामेळ्याचे निमित्त करून आपल्या समाजरचनेवर नाहक तुटून पडता, जसे ज्याचे प्रारब्ध तशी त्याची सुख-दु:ख'. मी म्हणालो, 'ही गोष्ट तुम्हाला कळणार नाही. काही कळू नये हे तुमचे प्रारब्ध आम्ही बदलू शकत नाही.'

दलित संतकवींनी लिहिलेली भक्ती कविता त्यांच्या सामाजिक प्रगल्भतेची द्योतक आहे. तिच्यातले अश्रू अस्सल आहेत. 'काय भुललासी वरलिया रंगा?' हा प्रश्न विचारणारी आणि निरुत्तर करणारी ही सामाजिक कविता आहे.

□ □ □

# सौजन्याची ऐशी तैशी

आजच्या जगात सौजन्य महाग झाले आहे असे म्हटले तर ते उद्धटपणाचे ठरणार नाही. माणसे परस्परांशी सरळपणे का बोलत नाहीत, का वागत नाहीत हा एक प्रश्न आहे. 'भूतां परस्परे पडो मैत्र जिवाचे' असे ज्ञानेश्वर म्हणून गेले. ज्ञानेश्वरांच्या पदरात लोकांकडून सौजन्याचे, नम्रतेचे किती शब्द पडले कुणास ठाऊक! याचा अर्थ आजच सौजन्य दुर्मिळ झाले असे नसून ते फार पूर्वीपासून दुर्मिळ वस्तूंच्या सदरात होते. एकदा मुंबईत, गिरगाव भागात असलेल्या गायवाडीला एका मित्राला भेटण्यासाठी जायचे होते. त्याने दिलेल्या पत्त्याप्रमाणे मी गायवाडीच्या आसपास कोठे तरी आलो. पण ती गायवाडी सापडतच नव्हती. रस्त्यातून जाणाऱ्या एका सुशिक्षित दिसणाऱ्या माणसाला मी विचारले, 'माफ करा, गायवाडीला कोणत्या रस्त्यानं जायचं ते कृपा करून सांगाल का?' त्या सभ्य गृहस्थाच्या कपाळावर अर्धा डझन आठ्या उमटल्या. अत्यंत त्रासिक चेहऱ्याने तो माझ्यावर खेकसला, 'मी रिकामटेकडा नाही. गावंढळांना पत्ते सांगायला मला वेळ नाही आणि वेळ असला तरी इच्छा नाही. खुशाल रस्त्यावर अडवून तुम्ही मला गायवाडीबद्दल विचारता? नो मॅनर्स!' तो पुढे चालू लागला. त्याचा हा अकारण शिष्टपणा पाहून मला राग आला. माझ्या ओठावर उत्तर आले होते, 'गायवाडीचा पत्ता बैलाला माहीत असतो म्हणून तर तुला विचारला.' पण मी तसे म्हणालो नाही. जिभेवर संयम ठेवला.

आपल्याला हे विशिष्ट ठिकाण माहीत नाही एवढे त्याने सरळपणाने सांगितले असते तर त्याच्यावर आभाळ कोसळले नसते. जाता जाता 'गावंढळ' अशी एक पदवी देऊन मात्र तो स्मार्ट माणूस निघून गेला. या प्रकारचे उद्वेगजनक अनुभव सर्वांनाच येतात. बसमध्ये चढताना, पोस्टाच्या खिडकीतून तिकिटे घेताना, दुकानातून एखादी वस्तू विकत घेताना, दैनंदिन व्यवहारात वावरताना उद्धटपणाचे, असंस्कृत शब्द कानावर पडतात. मनाची रुची बिघडून जाते. सौजन्यपूर्ण शब्दातून व्यवहारातली देवाणघेवाण होऊ शकते. पण माणसे सौजन्य सप्ताह असल्याशिवाय एकमेकांशी बरे बोलत नाहीत. (सौजन्याचा देखील सप्ताह पाळावा लागतो ही गोष्टच आपल्या वर्तन पद्धतीवर प्रकाश टाकणारी आहे.) सौजन्याने बोलणे आणि वागणे म्हणजे लाचारी नव्हे. सौजन्याचा शब्द माणसाच्या संस्कारित व्यक्तित्वावर प्रकाश टाकतो. आमचे एक प्राध्यापक वर्गात रागावताना देखील सौजन्य सोडून कधी बोलले नाहीत. एखाद्या विद्यार्थ्याने काही तरी असह्य व्रात्यपणा केला तर ते त्याच्याजवळ जाऊन

त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणत असत, 'माझ्या हातून असा असभ्यपणा घडला असता तर मला शरम वाटली असती. आपल्याला ती वाटत नाही याचा अर्थ आपलं मानसिक धैर्य फार मोठं आहे, पुन्हा आपल्या हातून असं घडलं तर मला वर्ग सोडून जावं लागेल.' त्यांच्या शब्दातल्या निखळ सौजन्यामुळे तो निगरगट्ट विद्यार्थी देखील विरघळून जायचा. प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातले मित्रत्वाचे नाते कधी बिघडू नये याची दक्षता ते घेत असत. आजच्या वातावरणात मात्र विद्यार्थ्यांपेक्षा प्राध्यापकांची काळजी अधिक घ्यावी लागते, असे मत काही प्राचार्य व्यक्त करतील. एक अहंमन्य प्राध्यापक विद्यार्थ्यांना भर वर्गात अपमानास्पद पद्धतीने शिव्या देत असत. एकदा तर विद्यार्थी उलटून बोलल्याबरोबर सदर उच्च विद्याविभूषित प्राध्यापकांनी पायातली कोल्हापुरी चप्पल काढून वर्गातच त्याला दाखवली आणि आपल्याला किती अस्खलितपणे शिव्या देता येतात याचे जाहीर प्रदर्शन केले.

संयम, सहिष्णुता, सौजन्य या शब्दांची ओळख देखील बुजून चालली आहे. माझ्या मते आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती सध्या जगात क्षीण होत चालली आहे.

संयम हा केवळ शब्दातच असला पाहिजे असे नाही. सार्वजनिक जीवनात वावरताना तो समाजाच्या मनात रुजलेला असावा. राज्याच्या विधानसभांतून, लोकसभेतून त्याचे दर्शन घडले पाहजे. प्रतिपक्षावर टीकेचा प्रहार करताना देखील सौजन्याचा विनयभंग होऊ नये. टीका करताना कितीही तीव्र असली तरी शब्दातून खुनशीपणा, अभद्रपणा आणि अतिरेक प्रकट होऊ नये. कारण तेथे विचारांचे समर्थन अथवा खंडन करायचे असते. व्यक्तीला खंडित करणारी उन्मत्त भाषा जेव्हा देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकसभेतून बोलली जाते तेव्हा लोकप्रतिनिधींची पातळी काय दर्जाची आहे हे लक्षात येते. सभापतींच्या अंगावर पेपरवेट भिरकावून मारण्याची वीररसपूर्ण घटना काही दिवसांपूर्वी मुंबई विधिमंडळात घडलेली होती. सुदैवाने सभापती कपाळमोक्ष होण्याच्या आपत्तीतून वाचले. अलीकडे सभापतींचा राजदंड पळविण्यात येतो. गुजरातच्या विधानसभेत तर आमदारांनी एकमेकांचे कपडे फाडून आपल्या पुरुषार्थाचे दर्शन घडविले होते. या दंगलीत काही जण जखमी झाले होते. गेल्या पन्नास वर्षात या स्वतंत्र भारतात झालेल्या प्रगतीचे हे एक चित्र आहे! नगरपालिकातल्या सभांबद्दल बोलायलाच नको! अर्वाच्य आणि असंबद्ध बोलण्याची तिथे तर चढाओढ लागलेली असते. जो अधिकात अधिक ओरडू शकतो, नवनवीन पद्धतीने शिव्यांचे फटाके वाजवू शकतो तो महनीय नगरसेवक ठरतो. तुमच्या सौजन्यपूर्ण आणि अर्थपूर्ण भाषणाला विचारतो कोण? एकदा एक सज्जन सभासद आपल्या मृदू भाषेत म्हणाले, 'बंधूनो, आपण आपलं हे शहर स्वच्छ आणि सुंदर बनविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू या. आपल्या नगराला एक लक्षणीय असं

व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देऊ. प्रत्येकाचं याबाबतीत सहकार्य मिळावं.' पण एक विरोधक उठून उभे राहिले आणि अस्तन्या मागे सारून तावातावाने म्हणाले, 'अरं, जरा आमाला कळंल असं बोला की, त्ये पुस्तकातलं बोलू नका. इचि भन, काय बी कळत न्हाई' आता यावर काय बोलायचे? मराठी माणूस हा अधिक फटकळ असतो असे म्हटले जाते. कदाचित आमचा महाराष्ट्र हा इतर प्रांतापेक्षा अधिक खडकाळ असावा. गडकऱ्यांनी महाराष्ट्राचे वर्णन करताना म्हटले आहे, 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा, अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा'. या राकट देशातली भाषा थोडी फार खरबरीत असायचीच. पण म्हणून बोलण्यात किमान सौजन्य असावे अशी अपेक्षा केली तर त्यात काय चुकलं? माझ्या माहितीतले एक गृहस्थ बोलायला लागल्यावर सुरुवातीलाच तीन चार शिव्या त्यांच्या तोंडी येतात. क्रिकेटच्या खेळातील गोलंदाज ज्याप्रमाणे गोलंदाजी करण्यापूर्वी मागे जातो आणि मग पुढे धावत येऊन गोलंदाजी करतो त्याप्रमाणे हे गृहस्थ असा 'स्टार्ट' घेतात.

एकदा सभेत बोलतानाही त्यांनी 'च्यायला' या शब्दापासून सुरुवात केली. अध्यक्ष बिचकले. ते काहीशा अस्वस्थतेने वक्त्याकडे पाहू लागले. हे वक्ते म्हणाले, 'च्यायला, आमचं हे असंच होतं बघा. अध्यक्ष महाराज, आम्हाला सांभाळून घ्या. शिंची ही मराठी भाषाच अशी...' मराठी भाषेवर खापर फोडून हे गृहस्थ मोकळे झाले.

मराठीचे वर्णन करताना गडकऱ्यांनी 'नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा' असे म्हणून तिच्या सुकुमारतेचीही प्रशंसा केली आहे. सौजन्य आणि मृदुता मनात असली म्हणजे ती भाषेत उतरते. ज्यांची मने रुक्ष असतात, त्यांची भाषा कोरडी, सौजन्यहीन असली तर त्यात आश्चर्य नाही. मराठी माणसांना व्यापार कसा करावा हे कधी कळलेच नाही. व्यापारासाठी प्रथम जिभेवरचे शब्द साखरेत मिसळावे लागतात. ग्राहकांशी बोलताना किंचित अदबीची भाषा वापरून त्यांचा अहंकार सूक्ष्मपणे कुरवाळण्याची कला जशी गुजराती आणि सिंधी व्यापाऱ्यांना जमते तशी आमच्या मराठी व्यापाऱ्यांना केव्हाच जमली नाही. एक गुजराती व्यापारी दुकानात पाऊल टाकताच ग्राहकाकडे पाहून स्वागताचे मंदहास्य करतो. 'साहेबांसाठी खुर्ची आण', असे नोकराला फर्मावून आपल्याला पहिल्या झटक्यात तो साहेब करून टाकतो. 'खास आपल्याला आवडेल असे नवीन डिझाईनचे कपडे आले आहेत. आपल्यासारख्याला अशा कपड्यांची कदर असते म्हणून दाखवतो. इतर गिऱ्हाईकांना याबाबत बोललोही नसतो.' अशी साखर पेरीत हा व्यापारी प्रथम आपल्या मनाचा, नंतर आपल्या खिशाचा ताबा घेतो. दुकानातून बाहेर पडल्यावर हे महागडे कापड आपण उगीचच घेतले असा पश्चातापही होतो. पण सौजन्याची आणि नम्रपणाची व्यापारी भाषा आपल्याला मनातून सुखावून गेलेली असते. आमचे मराठी व्यापारी

स्वत:ला 'टाटा-बिर्ला' समजतात. दुकानात गिऱ्हाईक आले तरी त्याच्याकडे उदासीनतेने आणि परकेपणाने पाहण्याची त्यांना जन्मजात सवय असते. दुकानात मांडलेली एखादी वस्तू दाखवा म्हटल्याबरोबर कपाळावर आठ्या चढवून कोरडेपणाने विचारतात, 'तुम्हाला घ्यायची आहे का? त्या वस्तूची किंमत जास्त आहे. तुम्हाला परवडणार नाही. किती किंमतीपर्यंतची वस्तू दाखवू हे सांगा.' असे दुकानदाराने म्हटल्यावर ग्राहकाचा चेहरा आंबट झाल्याशिवाय राहात नाही.

माझ्या एका परप्रांतीय मित्राचे म्हणणे असे आहे की, मराठी माणसे आम्हाला फटकळ आणि स्नेहशून्य वाटतात. त्यांच्या बोलण्यात एक प्रकारचा अहंगंड जाणवतो. दुसऱ्याच्या कर्तृत्वाचे कौतुकसुद्धा हे लोक तोंड भरून करीत नाहीत. जणू एखादा शब्द अधिक झाला तर यांचे जन्माचे नुकसान होणार आहे. पूर्ण विचार केल्यानंतर मला असे वाटत की, परप्रांतीयांना मराठी माणूस असा दिसतो कारण तो काही प्रमाणात असाच आहे. खरे तर आपण किती तरी बाबतीत इतर प्रांतापेक्षा बरेच मागे आहोत. याची जी अनेक कारणे असतील त्यात अहंगंड आणि अकारण फटकळपणा हेही असावे. दोन पैशासाठी अर्धा तास हुज्जत घालणारा मराठी माणूस म्हणतो, 'अरे, मी पैशासाठी भांडत नाही. मी तत्त्वासाठी भांडतो.' इतकी तत्त्वनिष्ठ माणसे सौजन्याने का बोलत नाहीत? का तत्त्वनिष्ठा आणि सौजन्य यांच्यात अंतर्गत विरोध आहे? उत्तर हिंदुस्थानात मात्र कित्येक ठिकाणी नम्रतेचे व सौजन्याचे अतिरेकी प्रदर्शन केले जाते. उत्तरेकडच्या एका राज्याचे मुख्यमंत्री गुडगुडी ओढीत मऊमऊ गादीवर बसले होते. त्यांच्याभोवती बरेच लोक अति नम्रतेने उभे होते. मुख्यमंत्र्यांशी बोलताना प्रत्येक जण हात जोडून उभा राहतो. एकाला त्यांनी विचारले, 'कहो, कैसे आना हुआ?' तो कमरेपर्यंत वाकून म्हणाला, (त्यापेक्षा अधिक वाकणे त्याला शारीरिकदृष्ट्या अशक्य होते) 'बहोत दिनों से आप का दरसन नही हुआ. इस लिए दरसन करने आया हूं.' आणि असे म्हणून त्याने साहेबांच्या चरणकमलांना हात लावला. ही स्वाभिमानशून्यता म्हणजे कोणत्याही अर्थाने सौजन्य किंवा नम्रता नव्हे. या प्रकारची लाचारी मराठी माणसात सहसा आढळत नाही याचा मला आनंद वाटतो. संत तुकारामांचे वचन नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. 'नसावे ओशाळ। मग मानिती सकळ।।' ओशाळेपणातून आणि मिंधेपणातून आलेली नम्रता केव्हाही समर्थनीय नाही. ती नम्रता नव्हेच. खरी नम्रता आगळी असते. एक अत्यंत विद्वान कुलगुरू एका सर्वसाधारण माणसाच्या पायावर मस्तक ठेवीत आहेत हे मी पाहिले. त्यांनी खुलासा केला, 'मी अध्यात्मशास्त्र जाणतो. त्यावर प्रवचन करू शकतो. पण हा सामान्य शेतकरी अध्यात्म जगणारा आहे. माझं पांडित्य माझ्या मस्तकात आहे. पण याच्या साऱ्या जीवनातच अनुभूतीचं पांडित्य सामावलेलं आहे. तो ते व्यक्त करू शकणार नाही. त्याच्यासमोर नम्र होण्यात मला कसलाही कमीपणा वाटत नाही.' याचे नाव

सौजन्य. काही पदवीधर तरुणांना आपल्या खेडवळ आई-बापांना नमस्कार करण्यातही आपल्या विद्वत्तेचा अवमान वाटतो. यांची सारी विद्वत्ता शर्ट-पँटच्या इस्त्रीत पाहून घ्यावी. ओठात इम्पोर्टेड सिगारेट आणि जिभेवर चुकीचे इंग्रजी शब्द असले म्हणजे यांचे घोडे गंगेत न्हाले! (अरे चुकलो, गंगेत नव्हे, टेम्समध्ये न्हाले. कारण गंगा ही पुन्हा गावंढळ लोकांची ठरणार. टेम्स म्हटल्यानंतर काही तरी पाणीदार बोलण्याचे समाधान मिळते.)

सौजन्याबद्दल आणखी काही लिहून वाचकांच्या सौजन्याची परीक्षा पाहणे बरे नव्हे. सध्या तर 'सौजन्याची ऐशी तैशी' हीच अवस्था आहे, यापेक्षा अधिक काय सांगणार?

□ □ □

# याला
# ⌘
# उत्तर नाही!

हृदयावर कुशलतेने शस्त्रक्रिया करणारे एक शस्त्रवैद्य रुग्णाला सांगत होते, 'माझ्या फी व्यतिरिक्त मी प्रत्येक रुग्णाकडून एक लाख रुपये अधिक घेतो. हे तुम्हाला मान्य असेल तर शस्त्रक्रियेचा दिवस आपण ठरवून टाकू. अधिक विलंब होणं तुमच्या प्रकृतीच्या दृष्टीने घातक आहे. तुमचा निर्णय मला एक तासानंतर कळवा'. त्या नामांकित डॉक्टरांच्या मुद्रेवर रोग्यासंबंधी सहानुभूतीची पुसटही रेषा नव्हती. त्यांनी आपल्या शुष्क, व्यवहारी भाषेत समोर बसलेल्या रोग्याला आपला विचार सांगीतला. खुर्चीत अवघडून बसलेल्या त्या रुग्णाच्या चेहऱ्यावर निराशेच्या, विषण्णतेच्या रेषा पसरल्या. कसेबसे शब्द गोळा करीत तो कळवळून बोलू लागला. 'डॉक्टर साहेब, शस्त्रक्रियेची आपली ठरलेली फी मी कर्ज काढून चुकती करीन. पण फीच्या व्यतिरिक्त आपल्याला काही देण्याची माझ्यात शक्ती नाही. मी शाळेत शिक्षक आहे. माझ्यावर आपण कृपा करावी'. डॉक्टरांनी टेबलावरील घंटा वाजवून आपली मुलाखत संपल्याचे सूचित केले. काहीशा आढ्यतेने आणि तुच्छतेने ते म्हणाले, 'परवडत नसेल तर व्यर्थ माझा वेळ घेऊ नका. एखाद्या सामान्य सर्जनकडे तुम्ही जायला हरकत नाही. व्यवसायाच्या बाबतीत कृपा, सहानुभूती, दया, असल्या निरर्थक शब्दांचा मी विचार करीत नाही'.

तो रुग्ण हताश मुद्रेनं बाहेर पडला. त्याचे हातपाय लटपटत होते. अशक्तपणामुळे आणि डॉक्टरांच्या सहानुभूतीशून्य शब्दांमुळे. मुंबईच्या पेडर रोडवर या यशस्वी डॉक्टरांचा प्रशस्त बंगला होता. त्यांची पत्नी ही देखील नामांकित डॉक्टर होती. मुलगा अमेरिकेतल्या विद्यापीठात शिक्षण घेत होता. संपत्तीच्या आणि कीर्तीच्या लाटेवर त्यांचे कुटुंब तरंगत होते. त्यांची वाट यशाची होती. पण या उच्चविद्याविभूषित डॉक्टरांच्या अंत:करणातली माणुसकीची ज्योत पार विझून गेली होती. त्याचा हात कुशल होता, पण मन मात्र कद्रू होते. आपल्या विद्येच्या भांडवलावर त्यांनी अत्यंत किफायतशीर व्यापार चालवलेला होता. कोणी म्हणेल, यात काय गैर आहे? हा मनुष्य चोऱ्यामाऱ्या करून पैसे मिळवीत नाही. आपल्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या बळावर तो उभा आहे. सर्वच जण जे आपल्यापाशी विकण्यासारखे असेल ते बाजारात विक्रीसाठी मांडून ठेवतात. ज्याच्यापाशी क्रयशक्ती आहे त्याने किंमत चुकवावी आणि ती वस्तू पदरात पाडून घ्यावी. हा सरळ व्यवहार आहे. व्यवहाराच्या क्षेत्रात प्रेम, आपुलकी, माणुसकी वगैरे गोष्टींची काय जरूर आहे? हा खुल्लम् खुल्ला व्यवहार

आहे. या प्रकारचा युक्तिवाद बाह्यत: तर्कशुद्ध वाटतो. पण व्यापार धंद्यात सहानुभूतीचा आणि माणुसकीचा काही संबंध नसतो हे म्हणणे मात्र केवळ चुकीचे नाही तर ते दुष्टपणाचे आहे. शस्त्रक्रियेची अधिकृत फी घेऊन वर पुन्हा अनधिकृत रकमेची मागणी करणे हे माणुसकीच्या तर सोडाच पण व्यापारशास्त्राच्या नीतिनियमात तरी बसू शकते का? व्यापारात सारे काही क्षम्य असते असेही त्याचे कुणी समर्थन करील. पण व्यापाराला देखील मानवी मूल्यांची, नैतिकतेची बैठक असलीच पाहिजे. नाही तर आपले सारेच जीवनव्यवहार नीतीशून्य होऊ लागतील. तसे ते आज बहुतांशी होत आहेत. निष्णात डॉक्टर, कुशल इंजिनिअर, कार्यक्षम प्रशासक, यशस्वी व्यापारी, विद्वान वकील हे सारे आपापल्या क्षेत्रात निपुण असतात. त्यांची समाजाला गरज आहे, पण चांगला व्यापारी, चांगला प्राध्यापक, डॉक्टर प्रथम चांगला 'माणूस' असावा आणि त्यावर त्याच्या कर्तृत्वाची इमारत उभी असावी ही अपेक्षा चुकीची आहे काय? आपल्या स्वार्थावर तिलांजली द्यावी आणि समाजाच्या सुखासाठी धडपडत राहावे, या उच्च ध्येयवादाची आज मी अपेक्षा करीत नाही. असे उदात्त जीवन जगणारे लोक फार थोडे असतात. त्यामुळे सर्वांना या पातळीवर चढणे शक्य नाही. स्वार्थत्याग न करता परार्थासाठी प्रयत्न करणे माणसाला शक्य आहे. निदान इतरांचे शोषण करून आपल्या पोळीवर तूप ओढण्याचे काम त्याने करू नये इतकी किमान नैतिकता जीवनात आणता येईल, पण हे देखील आज दुर्मिळ झाले आहे. डॉक्टरने नियोजित फीपेक्षा अधिक पैशाची अपेक्षा का करावी? या प्रश्नाचे उत्तर इतकेच की, सर्वांचीच सामाजिक जाणीव क्षीण झाली आहे. देवळातला पुजारीसुद्धा देवदर्शनासाठी देवासमोर भक्तांकडून लाच स्वीकारतो. मंदिरातही लाचलुचपत आहे. मग ती बाजारात असेल तर त्यात आश्चर्य कसले? जीवनातली सारी मूल्येच उलथीपालथी झाल्याचे दृश्य आज दिसत आहे. या प्रकारची आता तेवढीशी घृणाही वाटत नाही हे मात्र चमत्कारिक संकट आहे. रोज मरे त्याला कोण रडे!

एका नामांकित विद्यापीठातला एक अधिकारी पीएच.डी.चे प्रबंध नेमलेल्या परीक्षकांकडे लवकर पाठवीत नसे. प्रबंध लेखकाने या कार्याबद्दल आपल्याला उंची भेटवस्तू आणून द्याव्यात अशी त्याची अपेक्षा असायची. तो रोख रक्कम कधीच घ्यायचा नाही. मागेल ती किमती भेटवस्तू देण्याची ज्याची ऐपत नाही त्याचा प्रबंध कित्येक महिने कदाचित वर्ष- दोन वर्षे कार्यालयात पडून राहायचा. वर उल्लेखिलेला शस्त्रकर्मकुशल डॉक्टर आणि हा विद्यापीठातील अधिकारी दोघेही सुविद्य आहेत. आपापल्या क्षेत्रात प्रतिष्ठित आहेत. पण 'माणूस' म्हणून ते अगदीच खालच्या पातळीवर उभे आहेत असे म्हणावे लागते. पशूंचे पशुत्व आणि या तथाकथित माणसांचे माणूसपण यात बहुधा पशूंनाच वरचे स्थान द्यावे लागेल. विद्यापीठीय अधिकाऱ्याने आपल्या वर्तनाचा एकदा खुलासा केला. तो म्हणाला,

'अहो, हेच दिवस आहेत आमचे. नैतिक मूल्यांचा विचार करायला सध्या सवड नाही. चार-पाच वर्षानंतर मी निवृत्तच होणार आहे. निवृत्तीनंतर कोणी माझ्याकडे ढुंकूनही पाहणार नाही. जोपर्यंत संधी आहे तोपर्यंत शहाणा माणूस तिचा उपयोग करून घेतो. निवृत्त झाल्यावर तुमची 'ज्ञानेश्वरी' आणि 'तुकाराम गाथा' घेऊन बसेन. धर्म आणि नीती यांचा विचार उत्तर आयुष्यात करायचा असतो. सगळ्यासारखा मीही वागत आहे. आपण नेहमी मुख्य प्रवाहात असावं. एकाकीपणानं चालू नये.' व्यवहारज्ञानावरचे हे प्रवचन ऐकून माझ्या मनात एकच विचार आला. शिक्षणातून माणूस घडवला जातो हे विधान अगदीच पोकळ आहे. स्वामी विवेकानंदांनी 'माणूस घडवणारे शिक्षण' असा शब्दप्रयोग केला होता. माणुसकीचा विकास शिक्षणातून होऊ शकेल हा आशावाद किती भ्रामक आणि हास्यास्पद आहे याचे स्पष्टीकरण करण्याचेही कारण नाही. शिक्षणातून मनुष्याची बुद्धी धारदार बनते आणि या धारदार सुरीने तो अज्ञानी लोकांचे गळे सफाईने कापू शकतो. आपल्या बुद्धिमत्तेच्या कुटिल जाळ्यात तो इतरांना सहज ओढू शकतो. शिक्षण हे त्याचे प्रमुख भांडवल असते. विवेकानंदांच्या शब्दांत आजच्या परिस्थितीत बदल करण्याची जरूर आहे. 'मॅन मेकिंग एज्युकेशन' असे त्यांनी म्हटले. आता 'डेव्हील मेकिंग एज्युकेशन' म्हणणे हेच योग्य ठरेल.

नीतीचा व धर्माचा विचार म्हातारपणात करता येईल हे त्या विद्यापीठीय अधिकाऱ्याचे विधान अगदीच हास्यास्पद होते. ही मूल्ये केवळ वृद्धांसाठी आहेत, तरुणांचा याच्याशी काही संबंध नाही, असेच त्याने सुचविले. पुराणातली वांगी पुराणातच शोभतात, प्रत्यक्ष जीवनात त्यांचा विचार करायचा नसतो. ही विचारसरणी बहुसंख्य लोकांच्या डोक्यात घट्ट बसलेली आहे. एक बडे पोलिस अधिकारी आपल्या मुलाला व्यवहारज्ञानाचे पाठ देताना सांगत होते. 'आत्म्यानं सततं रक्षेत्' नेहमी स्वत:चं रक्षण करावं. आपला विचार सर्वात प्रथम करावा. दुसऱ्याचं कसं होईल ही चिंता करणारा मूर्ख ठरतो. पाण्यात बुडत असलेल्या माकडिणीनं आपलं पोर पायाखाली घालून त्याच्यावर ती उभी राहिली. हे व्यावहारिक शहाणपण आयुष्यात शिकलं पाहिजे. मी यालाच माणूस घडवणारं शिक्षण म्हणतो. नीती, सदाचार, माणुसकी, सामाजिक जाणीव, दु:खिताना मदत या साऱ्या फावल्या वेळच्या गोष्टी आहेत. आपण मध्यभागी आहोत. आपल्याभोवती जग फिरलं पाहिजे. जगाच्या भोवती आपल्याला फिरण्याची जरूर नाही.' या उपदेशात रोखठोकपणा होता. पण माणुसकीच्या विचाराचा लेशही नव्हता. या तत्त्वाप्रमाणे वागणारा माणूस कोणत्याही व्यवसायात पडला तरी तो स्वत:चे कल्याण करून घेईल. पण त्याच्या मनाचा विकास होणार नाही. एखादे काटेरी झाड वाढत जावे, पण सावलीसाठी त्याचा उपयोग होऊ नये तशी ही अवस्था आहे. आजच्या शिक्षणात व्यवहारचतुर कसे व्हावे याचे वस्तुपाठ आहेत. बुद्धिमत्ता आणि स्वार्थ यांची सांगड कशी घालावी याचा विचार आहे. आजचे शिक्षण

विद्यार्थ्याच्या पोटाशी संबंधित आहे. हृदयाचा मात्र संबंधच येत नाही. मनाला संस्कार देण्याचे समार्थ्य या शिक्षणात राहिलेले नाही. कुणी तरी शंका घेईल की, याच शिक्षणातून फुले, गांधी, नेहरू, आंबेडकर घडले नाहीत काय? हेच शिक्षण घेऊन सुभाषचंद्र बोस यांनी 'आझाद हिंद सेना' स्थापन केली नाही का? आपल्या रक्तामांसाचे खतपाणी घालून स्वातंत्र्याचे रोपटे जोपासणारे ध्येयवादी, स्वार्थत्यागी स्त्री-पुरुष याच शिक्षणातून निर्माण झाले नव्हते काय? प्रश्न बरोबर आहे पण आज शिक्षणातला आत्मा हरवला. त्याचे बाह्य कलेवर मात्र उरले आहे. याचे प्रत्यंतर पावलोपावली येते. शिक्षणातून थोडेफार ज्ञान मिळते. पण हृदय मात्र आकुंचित होत जाते. पन्नास-पाऊणशे वर्षांपूर्वी शिक्षण हा एक संस्कार होता. माणसाच्या हृदयात सुविचाराची पणती पेटवणारी ती एक शक्ती होती. आजचे शिक्षण चारित्र्य घडवीत नाही. ते माणसाच्या स्वार्थी असंस्कृत वासना आणि विकार नकळत फुलवीत राहाते. एका आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य आपली खंत व्यक्त करताना म्हणाले, 'गेल्या दहा-पंधरा वर्षात आमच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांची नैतिक घसरण वेगात होताना मी अगतिकतेनं पाहात आहे. विद्यार्थ्यांच्या निवडणुकात सर्व तऱ्हेचे गैरप्रकार घडतात. हजारो नव्हे लाखो रुपयांचा निवडणुकीत चुराडा करणारे विद्यार्थी पाहिले म्हणजे मला त्यांच्या नव्हे पण देशाच्या भवितव्याबद्दल धास्ती वाटते. सार्वत्रिक निवडणुकीत दारू पाण्यासारखी वाहते. त्याचं अनुकरण आमचे विद्यार्थी यशस्वीपणानं करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या गुंडगिरीत गावातले विविध पक्षांचे नेतेही सामील होऊन मार्गदर्शन करतात. निवडणुकीतला विजय साजरा करताना कोणताच धरबंध ठेवला जात नाही. 'चोली के पीछे क्या है' या गाण्याबरोबर धुंद नृत्य केलं जातं. एखाद्या विद्यार्थिनीचा विनयभंग करण्याचा 'पराक्रमही' अशा मैफलीत गौरविला जातो. पोलिस अधिकारी नको तितके तटस्थ राहतात आणि काही प्राध्यापक मंडळी 'लेट दि स्टुडंटस् एन्जॉय, लेट देम सेलिब्रेट' असं म्हणून विद्यार्थ्यांच्या जल्लोषात मिसळून आपण किती खिलाडू वृत्तीचे आहोत याचं प्रदर्शन करतात. ही बेशिस्तीची लाट थोपवण्याचं सामर्थ्य आमच्यात उरलेलं नाही. भीष्म, द्रोण ज्याप्रमाणं द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी डोळे झाकून बसले त्याप्रमाणं आम्हालाही डोळेझाक करावी लागत आहे. शिस्तीचा बडगा दाखवला आणि या प्रकाराला विरोध केला तर विद्यार्थी संघटना कॉलेज बंद पाडतील ही भीती. 'सबुरीनं घ्या' हा आम्हाला सल्ला मिळतो. निम्म्यापेक्षा अधिक विद्यार्थी वर्गात बसतच नाहीत, पण परीक्षेत मात्र 'आपल्या सामर्थ्यावर' पास होतात. यांच्यातूनच नेते आणि राज्यकर्ते उदयाला येतात. कर्वे, आगरकर आणि भाऊराव पाटील इतिहासजमा झाले.' प्राचार्यांच्या भाषणात कसलीही अतिशयोक्ती नव्हती. आपण केवळ कॉलेजातील पगारी नोकर आहोत. आपण विद्यार्थ्यांच्या मनावर एखाद्या जीवनमूल्याची मुद्रा उमटवू शकत नाही ही विषण्णता त्यांच्या प्रत्येक शब्दात भरलेली

होती. आपण प्राचार्य, अध्यापक, गुरू, मार्गदर्शक कोणीही नसून एका शिक्षणसंस्थेतले पोटार्थी नोकर आहोत. फक्त आपल्याला प्रिन्सिपॉल म्हणतात. यापलीकडे काहीच उरले नाही ही जाणीव त्यांना सारखी बोचत होती. काही वर्षातच ही बोचणी विरून जाईल आणि हा आजचा विचारवंत मात्र परिस्थितीशी जुळवून घेईल. वाहत्या लाटेबरोबर तोही वाहून जाईल. शिक्षणातून 'माणूस' कसा घडवता येईल या प्रश्नाचे उत्तर मात्र मिळत नाही. ज्याची उत्तरे मिळत नाहीत असे प्रश्न विचारू नयेत हाच त्यावरचा चांगला उपाय नाही काय?

□ □ □

# कारागृहाच्या भिंती

तुरुंगाच्या निर्मम, उंच दगडी भिंती पाहताना सामान्य माणसाला काहीशी भीती वाटणे स्वाभाविकच आहे. आत अंधारकोठडीत डांबल्या गेलेल्या कैद्यांच्या छळवणुकीची वर्णने कित्येक वेळा आपण वाचलेली असतात. आतल्या रुक्ष, स्नेहशून्य, भयानक वातावरणाबद्दल ऐकलेलेही असते. पण तुरुंगवासाची कदर न करता स्वातंत्र्याच्या चळवळीत लक्षावधी लोकांनी उडी घेतलेली होती. लाठ्यांनी अनेकांची मस्तके फुटली. बंदुकीच्या गोळ्यांनी हजारो लोकांच्या छातीची चाळण झाली आणि असंख्य लोक तुरुंगात डांबले गेले. या तुरुंगाच्या कठोर भिंतींनी लाखो कैद्यांचे हुंदके ऐकले असतील, किंकाळ्याही त्यांच्या कानावर पडल्या असतील. एकेका कोठडीतील भिंतींना जर वाचा फुटली तर तुरुंगाधिकाऱ्यांनी कैद्यांचा कसा अमानुष छळ केला याची कहाणी सांगतानाही त्या भिंतीनाही करुणेचा पाझर फुटेल. पण स्वातंत्र्य लक्ष्मीच्या दर्शनासाठी तुरुंगाची यात्रा करणे आवश्यक होते. स्वातंत्र्यवीरांनी आपल्या वास्तव्याने तुरुंगांना तीर्थक्षेत्राची प्रतिष्ठा दिली. कवी यशवंतांच्या एका कवितेची आठवण होते. तुरुंगात खितपत पडलेला एक स्वातंत्र्यभक्त आव्हानप्रद स्वरात म्हणतो,

'कारागृहाच्या भिंतींची उंची कितीही वाढली तरी मला त्याची क्षिती नाही. भिंतीच्या उंचीत माझा आत्मा कोंडला जाणार नाही. तो सदैव मुक्त आहे.

शृंखला पायात माझ्या चालताना रुमझुमे घोष मंत्राचा घुमे
लौकरी स्वातंत्र्यभानो! भारती दे दर्शन होऊ तेव्हा पावन

पायातल्या साखळदंडाची आणि सभोवतालच्या अंधाराची दिक्कत न बाळगता स्वातंत्र्याच्या प्रकाश किरणांवर दृष्टी लावून बसलेल्या एका वीराचे हे मनोगत रोमांचित करते. तुरुंगाची भीती कोणाला? त्याचे लोखंडी दरवाजे बुलंद असले तरी गीता सांगणारा कृष्ण जन्मल्याबरोबर त्या बुलंद दारातून सहज बाहेर जातो. कारागृहाच्या दाराशी उभे असलेले सशस्त्र रक्षक श्रीकृष्णाच्या आत्मशक्तीपुढे पराभूत होतात. गीतेचा जनक कंसाच्या तुरुंगात जन्मला आणि गीतेचे रहस्य सांगणारा ग्रंथ मंडालेच्या तुरुंगात लिहिला गेला. याचा अर्थ माणसाच्या आत्मतेजाला, प्रतिभेला तुरुंगाच्या भिंती अडवू शकत नाहीत. त्या माणसाच्या शरीराला बंदीवान करतात. त्याच्या स्वातंत्र्यभक्तीला आणि आत्मिक शक्तीला त्या कधीच कुंठित करू शकत नाहीत.

बंदिवासात पिचत पडलेल्या काही देशभक्तांनी अगतिकपणे कोठडीच्या भिंतीवर आपली मस्तके आपटून रक्तबंबाळ केली, अशीही नोंद इतिहासात सापडते. अंधार कोठडीने आपल्याला गिळंकृत करण्याऐवजी आपणच या जन्माचा तिथे शेवट करावा, असे नैराश्य त्यांना आले असेल. सावरकरांनी आपल्या या मानसिक अवस्थेचे वर्णन 'माझी जन्मठेप' मध्ये केलेले आहे. ते स्वत:शी म्हणाले, 'ह्या तुझ्या शरीराचा आणि कर्तृत्वाचा राष्ट्रेच्या राष्ट्रे उदयास आणण्यासाठी उपयोग व्हावा. आता ते मातीमोल ठरले. मग या अंधकारात उगीच कष्टत का पडतोस? हे जीवन व्यर्थ का धारण करतोस? आता चल, दोरीच्या एका हिसक्यासरशी करून टाक त्या जीवनाचा अंत. त्या दोरीच्या तुकड्याने गळफास लाव आणि करून टाक या कष्टाचा अंत.'

ह्या विलक्षण वैफल्याने सावरकरांच्या गळ्याला घट्ट विळखा घातला होता. अंदमानच्या त्या अजस्त्र, भयाण तुरुंगातल्या असह्य छळातून सुटका करून घेण्यासाठी अनेक कैद्यांनी आत्महत्या केल्या होत्या. जगण्याच्या धगीत होरपळत राहण्यापेक्षा मरणाचा थंडगार स्पर्श त्यांना सुखावह वाटला होता. सावरकर हे इंग्रजांच्या दृष्टीने अत्यंत धोकेबाज शत्रू होते. म्हणूनच तुरुंगातल्या यातनांच्या जाळ्यात त्यांना सतत अडकवून ठेवले होते. या अंधारातच आपण अखेरपर्यंत असेच झिजणार असू तर जगायचे कशाला? या विचाराने त्यांचे मन कुरतडत राहिले. तुरुंग आणि आत्महत्या, तुरुंग आणि फाशी व तुरुंग आणि मानसिक व शारीरिक छळ हे समीकरण अभेद्य आहे. पण स्वातंत्र्यवीर सावरकरांचा मन:पिंड गीतेच्या तत्त्वज्ञानावर पोसलेला होता. आत्महत्येच्या आकर्षणाला मागे रेटीत जीवन विचार पुन:पुन्हा प्रभावी होत होता. आपण लिहिलेल्या एका कवितेची त्यांना आठवण झाली-

अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला मारिल रिपु जगती, असा कवण जन्मला?

मला मारणारा अद्यापि जन्माला यायचा आहे. मी अवध्य आहे. अनादि अनंत आहे, हाच पीळदार विचार भगतसिंगाच्याही मस्तकात उसळ्या मारीत होता. फासाच्या फळीकडे जातना विजेत्याच्या आवेशात तो प्रत्येक पाऊल टाकीत 'वंदे मातरम्' म्हणत चालला होता. तुरुंगातील सारे कैदी आपापल्या कोठड्याच्या गजातून या मृत्युंजयी वीराकडे आदराने पाहात होते. कोणाचे डोळे पाणावले होते. कोणी हुंदके देत होते. बरोबरचे तुरुंगाधिकारी मनात धास्तावले होते. मृत्यूला आलिंगन देण्यासाठी भगतसिंग धीर, वीर वृत्तीने निघाला होता. त्याच्या मुद्रेवर प्रसन्नता होती. कृतार्थतेचे समाधान होते. याच तुरुंगात अनेक गुन्हेगारांना पूर्वी फासावर लटकावले होते. खून आणि दरोड्याच्या आरोपावरून मृत्यूची शिक्षा झालेले ते गुन्हेगार फासाच्या फळीपर्यंत आपल्या पायांनी चालू शकत नव्हते. मरणाच्या भीतीने ते जणू आधीच मरून गेले होते. त्यांना अक्षरश: ओढून न्यावे लागत होते. पण हा स्वातंत्र्यवीर मात्र जेत्याच्या

आवेशात, अभिमानाने सर्वत्र पाहात होता. त्याच्या हिशोबी फाशीचा दोर ही वरमाला होती. तुरुंगाच्या विवाह मंडपात एखाद्या उत्साही नवरदेवाप्रमाणे हा तरुण बोहल्यावर उभा होता. त्याच्या गळ्यात ती वरमाला पडली आणि त्याचे 'शुभमंगल' झाले. फाशी देणाऱ्याचे हात कापत होते.

तुरुंगाधिकाऱ्याची मान लज्जेने खाली गेली होती. जीव घेणारा घाबरला होता. मरणारा मात्र निश्चल होता, निर्भय होता. तुरुंगातल्या इतर कैद्यांनी त्या दिवशी जेवण घेतले नाही. वॉर्डन आणि जेलर त्यांना धमकावीत होते. पण कैद्यांनी जेवण नाकारले. भयानक गुन्ह्यावरून शिक्षा झालेल्या त्या गुन्हेगारांच्या अंत:करणातही माणुसकीचा एक कोपरा होता. प्रत्येकाच्याच हृदयात करुणेचा आणि प्रेमाचा लहानसा पाझर पाझरत असतो. तुरुंगातल्या कठोर आणि कर्मठ हवेतसुद्धा हा पाझर आटत नाही.

इंग्रजांच्या काळात काही भयानक तुरुंग होते. अट्टल गुन्हेगाराला अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये म्हणजे काळ्या पाण्यावर पाठविण्यात यायचे. त्या जेलच्या नुसत्या दर्शनाने कैदी नखशिखांत हादरून जायचे. पायातले साखळदंडाचे ओझे वागवीत, हातांनी अत्यंत कष्टाची कामे कैद्यांना करावी लागत. काळ्या पाण्यापेक्षा मरणाची शिक्षा सुसह्य वाटावी, असा हा अंदमानचा तुरुंग साम्राज्यवाद्यांनी मुद्दाम रखून ठेवला होता. वॉर्डन आणि जेलर आणि इतर अधिकारी यांचा माणुसकीशी फारसा संबंध येऊ नये असेच वातावरण तिथे होते. विनायक दामोदर सावरकरांसारखा एक जिवंत संवेदनांचा, भावसंपन्न तरुण पन्नास वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी अंदमानच्या त्या कुप्रसिद्ध जेलमध्ये दाखल झाला. त्याची कीर्ती तिथे आधीच पोहोचली होती. इतर कैद्यांनी- त्यात कित्येक अमानुष गुन्हेगारही होते. सावकरांकडे कुतुहलाने पाहिले. हळूहळू त्या कैद्यांशी सावरकारांची मैत्री झाली. तुरुंगातही त्यांनी आपल्या नेतृत्वाची मुद्रा उमटवली. कैद्यांची एकजूट केली. तिथल्या रुक्ष वातावरणात बदल होत आहे हे जेलरच्या लक्षात आल्याबरोबर त्याने सावरकरांच्या हालचालींवर आणखी कडक निर्बंध घातले. पण या राष्ट्रवीराच्या हृदयातली उत्कट स्पंदने अंदमानच्या कारागृहातल्या निष्ठुर भिंतींना अडविता येणे शक्य झाले नाही. सेल्युलर जेलमधली एक अंधारकोठडी सावरकरांच्या कवितांनी अंतर्बाह्य रोमांचित होत होती. ज्या अंधारकोठडीने केवळ कैद्यांच्या करुण किंकाळ्या ऐकल्या होत्या, उघड्या पाठीवर बसणारे फटक्यांचे फक्त आवाज ऐकले होते, उसासे आणि हुंदके याव्यतिरिक्त जिने काही पाहिले नव्हते, ऐकले नव्हते त्या अंधारकोठडीत सावरकरांचे एक शृंगारकाव्य फुलू लागले. खडबडीत भिंतीवर घायपाताच्या काट्याने फुलासारखी कोमल कविता आकार घेऊ लागली. मृत्यूच्या छायेत शृंगार कल्पनांचा मोहर बहरून आला. असला विलक्षण चमत्कार कोणत्याही तुरुंगात कदाचित यापूर्वी कधी घडला नसेल. सावरकरांची 'कमला'ही मानसकन्या अंधारकोठडीत जन्मली असली तरी 'प्रकाशकन्या' आहे असे म्हणायला

हरकत नाही. कवीच्या प्रतिभेला असह्य बंदिवासात देखील भरती यावी हे एक आश्चर्य! दु:ख वेदनेच्या कालखंडातच कलावंतांची निर्मितीशीलता उचंबळून येते की काय, कुणास ठाऊक? अंदमानच्या तुरुंगाने मराठी साहित्याला 'कमला' या शृंगारमत्त काव्याची देणगी दिली. अंदमानचे हे उपकार महाराष्ट्र कधी विसरणार नाही. 'काळ्या पाण्याने' सावरकरांच्या लेखणीला आणि वाणीला अधिकच ओजस्वी बनविले. ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात लोकमान्य टिळकांना सहा वर्षे ठेवण्यात आले. स्वदेशापासून, स्वजनापासून दूरच्या तुरुंगात बंदिस्त करण्यात इंग्रजांचा एक हेतू होता. टिळकांचे नीतिधैर्य त्यामुळे कमी होऊन ते अगतिक बनतील, अशी सरकारची कल्पना होती. पण 'केसरी'चा हा संपादक सरकारने पुढ्यात टाकलेल्या गवतावर गुजराण करणारा नव्हता. साम्राज्यशाहीच्या माजलेल्या हत्तीचे गंडस्थळ फोडण्याची ताकद या केसरीत होती. म्हातारपण आणि शरीरातले रोग यावर टिळकांनी मात केली. मंडालेच्या दु:सह उष्ण हवेत या उष्णप्रकृती लढवय्याने 'गीतारहस्य' हा महाग्रंथ लिहून काढला. गीतेवर लिहिलेल्या या तेजस्वी भाष्याचे स्वागत सर्वत्र झाले यात आश्चर्य नाही. वीरोचित कृतीची, कर्मयोगाची पुरुषार्थी शिकवण टिळकांनी यातून दिली. मराठीतल्या दहा मौलिक ग्रंथांचा उल्लेख करायचा झाल्यास 'गीतारहस्या'चा विचार अपरिहार्य आहे. खरे तर 'टिळक जीवन'हेच 'गीतारहस्य' आहे. मंडालेच्या बंदिवासात दुसरा एखादा लेखक हताश झाला असता, पण टिळकांच्या विचारात, आचारात जबरदस्त पीळ होता. तुरुंगाच्या कोठडीतही हा पीळ अभंग राहिला. सर्वसाधारण समज असा आहे की, तुरुंगातल्या भावनाशून्य दु:खद जगात माणूस कोंडला गेला की, त्याची जीवनशक्ती दुबळी होऊ लागते. तो निमूटपणे खाली मान घालून जगण्याचा लाचार प्रयत्न करू लागतो. सामान्य कैद्यांच्या बाबतीत हे खरे आहे, पण ज्यांच्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत स्वातंत्र्याची आणि स्वाभिमानाची भावना उफाळत असते, असे ध्येयवादी वीर तुरुंगासमोर कधी वाकले नाहीत. उलट त्यांच्या वास्तव्याने तुरुंगालाच प्रतिष्ठा मिळाली. विनोबांची 'गीता प्रवचने' कारागृहातच जन्माला आली. विनोबा बोलत असत आणि साने गुरुजी लिहून घेत असत. 'गीतारहस्या'प्रमाणे 'गीता प्रवचने' ही विविध भाषांत भाषांतरित झाली. तुरुंगात प्रकट झालेले हे शब्द माणसाला केव्हाही स्वातंत्र्याची प्रेरणा देऊ शकतात. त्याच्या मरगळलेल्या मनाला चेतना देतात यात काय संशय? अहमदनगरच्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्यात पं. नेहरू, सरदार पटेल यांच्यासारखे स्वातंत्र्यसेनानी १९४२मध्ये बंदिस्त केले होते. या तुरुंगवासात नेहरूंनी भरपूर लेखन केले. भारताच्या इतिहासावर प्रेम करणारा आणि इतिहासावर आपली मुद्रा कोरणारा हा कर्तबगार पुढारी अभिजात रसिक होता. त्याच्या धमन्यातून प्रतिभा झिरपत होती. नेहरूंचे बहुतेक लेखन कारावासातच झाले आहे. त्यांचे वाचन आणि चिंतन बहुतांशाने बंदिगृहात झाल्यामुळे

मुक्त स्वातंत्र्याचा प्रवाह त्यांच्या लेखणीतून झुळझुळत राहिला असे म्हणता येईल. या सौंदर्यवादी रसिकाने तुरुंगावरही प्रेम केले. आपल्या 'जेल डायरी'मध्ये ते म्हणतात, 'आजचा काळ हा औदासीन्याचा काळ आहे. जो तो उदासीन आहे. सारे जीवनच भारभूत वाटू लागते. अशा वेळी कारागृह आपल्या मदतीला येते. येथे आल्यावर आपल्या काही संवेदना जाग्या होतात. आजूबाजूच्या छोट्या गोष्टीतही आपल्याला रस वाटू लागतो. जीवनातील आनंदाची अनुभूती आणखीन तीव्र होते. म्हणूनच जेलचा जयजयकार, त्रिवार जयजयकार, कारण बंदिवासात शरीराबाहेर मनही वयाने वाढत असते, परिपक्व होत असते. या बंदिवासात एका अर्थाने आपण मनाने तरुण होतो.' एखादा कविमनाचा माणूसच या सौंदर्यदृष्टीने तुरुंगाकडे पाहू शकेल. नेहरूंनी बंदिखान्यातच अभिजात ग्रंथ वाचले आणि उत्तम, कसदार लेखन केले. कोठडीच्या खिडकीतून आपण निळ्याभोर आकाशाकडे एकटक पाहात मेघांची अनेक रूपे कशी न्याहाळली, आकाशाचे बदलते रंग कसे दृष्टीत साठवले याचेही वर्णन 'जेल डायरी'त त्यांनी केले आहे. सौंदर्यवादी नेहरू अधिक ताजे टवटवीत होऊन बाहेर पडत असत. जगण्याची आणि लढण्याची पोषणद्रव्ये जणू त्यांना तुरुंगातच लाभली. पंतप्रधान झाल्यानंतर एका मुलाखतीत ते म्हणाले, 'आता माझ्या हातून फारसं लिहून होणार नाही. कारण आता मला कोणी तुरुंगात टाकणार नाही. तुरुंगासारखं चिंतन लेखनाला आवश्यक असलेलं दुसरं स्थळ नाही.' कारागृहाच्या कठोर आणि गंभीर भिंतींच्या आड असलेल्या जगालाही एक अर्थ आहे. त्या जगातही जीवनाचे सुंदरपण आणि कुरूपपण दडलेले आहे.

□ □ □

# 'बहिणाईचे' ॐ शब्द

संतकवी कबीर निरक्षर होते. त्यांनी हातात कधी लेखणी घेतली नाही. वाचनाचा प्रश्नच नव्हता. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, कबीरांच्या मुखातून काव्यगंगा वाहात राहायची. या अक्षरहीन पंडिताने जी विलक्षण, विचार संपन्न 'अक्षर' रचना केली आहे ती वाचताना तथाकथित पंडितांचा अहंकार गळून जातो. वेलीवर फुललेल्या ताज्या टवटवीत फुलांत आणि कारागिराने बनवलेल्या कागदी कृत्रिम फुलांत किती तरी अंतर असते. कृत्रिम फुलांचा रंग कदाचित अधिक आकर्षक असेल. पण वेलीवरच्या टपोऱ्या फुलांचे दर्शन, त्यांचा सुवास, पाकळ्यांची मृदुता यांच्यापुढे कागदी फुलांची काय किंमत? कबीरवाणीतला एकेक शब्द अनुभवाच्या भट्टीतून तावून सुलाखून निघालेला आहे. तो कानावर पडला की, त्याची धग श्रोत्यांच्या मनापर्यंत पोहोचलीच म्हणून समजावे. पंडितांना जिंकणारा हा महापंडित कबीर कोणत्या शाळेत शिकला? काव्यशास्त्र शिकलेले कवी शास्त्राच्या बाहेर फारसे येत नाहीत. कबीर मात्र जीवनाच्या अनेक वाटांवरून आपल्या पायांनी चालत राहिला होता. त्याला काव्याचे शास्त्र कळले नाही हेच बरे! तो म्हणतो.

'जन्मभर पोथ्या-पुराणे वाचून आणि ग्रंथांचे चर्वित चर्वण करून पंडित होता येत नाही. ग्रंथपठणातून फारतर घोकंपट्टी होते. प्रेम ही अडीच अक्षरे जो आयुष्यात शिकतो त्यालाच मी खरा पंडित म्हणतो.' पांडित्याच्या या व्याख्येवर विचार केला तर बऱ्याच पंडितांची पंडिती वस्त्रे सहजच गळून पडतील. एक पंडित कालिदासाच्या साहित्यातील प्रेमभावनेवर भाष्य करणारा ग्रंथ लिहिण्यासाठी बैठक मारून बसले. पीएच.डी. साठी हे लेखन ते सादर करणार होते. कालिदासाच्या काव्यनाटकात हृदयस्पर्शी प्रेमभावना असली तरी या विद्वानाच्या मनात मात्र तिचा लेशही नव्हता. माहेराहून पैसे आणीत नाही या सबबीवर आपल्या पत्नीला दररोज निर्दयपणे मारहाण करणारा आणि तिचा सतत मानसिक छळ करणारा हा पंडित प्रेमभावनेचे बौद्धिक विश्लेषण करणार होता. आडात काही नसताना ते पोहऱ्यात मात्र आहे असे भासवणार होता. असल्या अरण्यपंडिताचा कबीराने आपल्या काव्यातून मार्मिक उपहास केला आहे. तो म्हणतो, 'पंडितवर्या, तुझं माझं कसं जमणार? मी जे प्रत्यक्ष पाहातो ते सांगतो. तू पोथ्या-पुराणातलं पाठ म्हणून दाखवतोस. मी सरळ सोप्या भाषेत बोलतो, तू मात्र क्लिष्ट, दुर्बोध शब्दांतून बोलतोस. माझ्याजवळ अनुभव आहे. तुझ्यापाशी पोथ्या-पुस्तकं आहेत. तुझं माझं कसं जमायचं?' कबीराची काव्यवाणी अनुभवातून

स्फुरलेली, प्रेमातून उचंबळून आलेली आहे. काव्याला केवळ हृदयस्थ प्रेमाची जरूरी असते. पांडित्याच्या दडपणाखाली कविता गुदमरून जाते. ती श्वासोच्छ्वास सुद्धा नीट करू शकत नाही. एखादा नामदेव-तुकाराम, एखादी जनाबाई आपल्या भावबळावर हजारो रसिकांच्या अंत:करणाची तार छेडू शकतात. पांडित्यात हे हळूवार सामर्थ्य असू शकेल का? अक्षरओळख नसलेला कबीर 'मोरी चुनरिमे परि गयो दाग पिया' असे म्हणून आपले आत्मतत्व मलीन झाल्याची खंत करतो आणि ज्ञानाचा साबण लावून आत्मवस्त्र स्वच्छ केले पाहिजे असे म्हणतो. सहजपणे आध्यात्मिक आशयाकडे घेऊन जातो. कोणत्या प्रकांड पंडिताला ही किमया साधली आहे बरे? ते व्याख्याने देतील. परिसंवाद गाजवतील. आपल्या डोक्यातला गोंधळ दुसऱ्याच्या डोक्यात घालतील. अंधारातून काळोखाकडे जातील. पण कबीर बोलतो तेव्हा लख्ख प्रकाश पडतो. जनाबाई बोलते तेव्हा काव्याच्या समईतील वात अधिकच तेजाने तेवत राहाते. अंधार वितळू लागतो. जनाबाई कितपत शिकली होती माहीत नाही. 'नामयाची दासी' असलेली ही जनी भक्तीतून प्रीती शिकली आणि प्रीतीतून तिची कविता उगवली. एका कवितेत ती म्हणते-

डोईचा पदर आला खांद्यावरी।
भरल्या बाजारी जाईन मी।
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा।
आता मज मना कोण करी।।
पंढरीच्या पेठे मांडियेले पाल
मनगटावर तेल घाला तुम्ही।
जनी म्हणे देवा मी जाले वेसवा।
रिघाले केशवा घर तुझे।

स्वैर, नि:संग आणि आक्रमक वाटणाऱ्या मनोवृत्तीतून व शब्दांतून आपल्या भावभक्तीचे कसे बेबंद दर्शन जनाबाईने घडवले. या अभंगात प्रेमिकेचा उन्माद आहे. स्वैरिणीची नि:संग भूमिका आहे. भावनेची उत्तान उत्कटता आहे. असली स्वैर कविता कोणत्या पंडिताला आजपर्यंत लिहिता आली आहे? आपल्या उरात कोंडलेले भक्तीप्रेमाचे सुगंधीवादळ जनाबाईने शब्दांत पकडले आहे. एका दासीची ही कविता दास्य भावनेपासून कशी मुक्त झालेली वाटते. प्रेम ही अडीच अक्षरे आयुष्याच्या पाठशाळेत जनाई शिकली होती म्हणूनच अशी वादळी कविता तिच्या अंतरंगातून बाहेर आली.

स्वत:ला कवी मानणारे माझे एक मित्र कविता 'रचण्याचा' नेहमी प्रयत्न करीत असतात. लगोर रचावी त्याप्रमाणे शब्दांची उतरंड तयार केली की कविता सिद्ध होते अशी त्यांची भाबडी समजूत आहे. डिक्शनरीतले शब्द शोधून ते कविता

'मॅन्युफॅक्चर' करतात. र ला र आणि टी ला टी जुळली म्हणजे आनंदाने सिगरेट पेटवतात. धूर सोडतात. जो भेटेल त्याला आपल्या अपत्याचे दर्शन घडवतात. जणू एखादे महाकाव्य आपण लिहिले आहे अशा अविर्भावाने त्या तुटक्या फुटक्या ओळी आवेशाने वाचून दाखवतात. त्यापूर्वी त्यांनी गरम शिरा खायला घातला असल्यामुळे त्यांच्या कवितेबद्दल गोड बोलणे भाग पडायचे. पण एक दिवशी शिरा खाऊनही त्यांचा एक टीकाकार मित्र त्यांच्यावर उलटला. तो म्हणाला-

'कविराज', तुम्ही काव्यनिर्मितीच्या बाबतीत संततीनियमन करावं असा सल्ला तुम्हाला देतो. तुमच्या कविता अगदीच किडकिडीत आणि मिळमिळीत प्रकृतीच्या असतात. असली संतती पित्याच्या नावाला काळीमा फासणारी. तुमच्यात काव्यप्रतिभा आहे, हा गैरसमज काढून टाका'. शिऱ्याची बशी रिकामी केल्यानंतर हा प्रेमळ सल्ला कवीला त्याने ऐकवला होता. सध्या साहित्याच्या भूमीत कवितांचे उदंड पीक येत आहे. जुळवलेल्या, घडवलेल्या आणि कसलीही चमक नसलेल्या या कवितानी तर आज कहर केला आहे. एकंदरीत कवी हा प्राणी आक्रमक असतो. त्याच्यापासून चार हात दूर राहाणे हेच सुरक्षितपणाचे ठरते असे म्हणावे लागते. अनेक पंडितांनी प्रचंड काव्यरचना केली आहे. पण ती आज कुठे आहे? मोरोपंतांच्या ठायी प्रतिभा होती पण त्यांच्या पांडित्याचा तिला वेढा पडला होता. हा प्रतिभा मयूर त्यामुळे मुक्तपणे नृत्य करू शकला नाही. शब्दपांडित्याच्या पसाऱ्यात मोरोपंत-वामन यांची कविता हरवून गेली.

काळजाला भिडणारे शब्द आणि मेंदूला झुलवणारे शब्द यात कितीतरी अंतर आहे. 'मातेच्या चरणयुग्मावर मस्तक विलीन करण्यातला आनंदानुभव घेतला पाहिजे' या वाक्यांपेक्षा आईच्या पायांवर डोकं ठेवलं. समाधान वाटलं. हे वाक्य चटकन हृदयाला भेटू शकते. उत्कट भावनेतल्या साधेपणातले सौंदर्य विद्वत्तेवर मात करू शकते. आमचे नामदेव-तुकाराम या अर्थाने विद्वान नव्हते म्हणूनच मराठी काव्याची इंद्रायणी त्यांच्या भावबळाने दुथडी भरून वाहू लागली. एकदा ज्ञानकोशकार डॉ. केतकरांकडे एक कवी गेला. त्याने आपली एक कविता त्यांना वाचून दाखवली. क्लिष्ट शब्दांनी भरलेली ती जाडी-भरडी कविता पांडिताच्या भारामुळे वाकून गेली होती.

केतकरांनी शेरा मारला, 'भिकार कविता आहे' कवी चिडून म्हणाला, 'तुम्हाला काव्यातलं काय कळणार? तुम्ही फक्त ज्ञानकोश लिहावेत' केतकर हसून म्हणाले, 'कोंबडीचं अंड मी घालीत नाही ते कोंबडीच घालते. पण अंड्याची चव तिला कळत नाही मला ती सहज कळते. कविता लिहिणाऱ्या कवीपेक्षा वाचणाऱ्या रसिकाला ती अधिक चांगली कळते', बिचारा कवी? खाली मान घालून निघून गेला, पण कविता लिहिण्याचे त्याचे व्यसन बहुधा सुटले नसेल. कधी कधी कविसंमेलनात कित्येकांच्या

कविता ऐकताना मनात विचार येऊन जातो की शासनाने गुटखा आणि कविता यांच्यावर तात्काळ बंदी घातली पाहिजे. गडकऱ्यांनी म्हटले आहे, 'काव्य कराया जित्या जिवाचे जातिवंत जगणेच हवे' हळूवार मनाने टिपलेला जीवनाचा अनुभव जेव्हा सहजपणे शब्दातून दरवळू लागतो तेव्हा कविता निर्माण होते. त्यासाठी कल्पनांचे मजल्यावर मजले बांधण्याचे कारण नसते. अतिरेकी कल्पनाविलास हास्यास्पद होतो. कल्पनेचे कुबेर आणि शब्दांचे सम्राट कवितेच्या प्रांतात अनेक वेळा एखाद्या निरक्षर कवीकडून जिंकले जातात. पांडित्याने झगमगणारी कविता फारशी कुणाच्या लक्षात राहात नाही. पण भावनेने भिजलेली कविता मात्र सुखद सोबत करीत राहते.

बहिणाबाई चौधरी या नावाभोवती आज जे वलय आहे ते पाहून कित्येक विद्वान आश्चर्यचकित झाले आहेत. या अशिक्षित, निरक्षर कवयित्रीच्या काव्यावर जाडजूड प्रबंध लिहून काही जणांनी डॉक्टरेट मिळविली. लिहिण्या-वाचण्यापासून जन्मभर दूर असलेली पण जिवंत हृदयाची देणगी मिळालेली ही सुगृहिणी घरातली आणि शेतातली कामे करता करता कविता गुणगुणायची. मनात दाटून आलेले भाव ओठातून प्रकट व्हायचे. तिची थोडीफार कविता सोपानदेव चौधरींनी लिहून घेतली पण पुष्कळशी कविता वाहून गेली असावी. बहिणाबाईंची गाणी ही भावसौंदर्याची खाणी आहे असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्या काव्याचा विचार करताना प्रश्न विचारावासा वाटतो, 'देवा असं कविमन घडवण्याचं स्वप्न तुला कसं पडलं?' काव्यप्रतिभा 'दैवी' असते असे म्हणायला हरकत नाही. कलावंत निर्माण करण्याची परमेश्वरी खाण काहीतरी वेगळीच असावी. आपल्या एका कवितेत बहिणाबाई म्हणतात.

येहरीत दोन मोटा  
दोनीमदी पानी येक  
मोट हाकलतो येक  
जीव पोसतो कितीक

या ओळी किती अलगदपणे आपल्याला तत्त्वज्ञानाकडे घेऊन जातात. मोटा दोन असल्या तरी त्यात पाणी एकच असते. माणसे अनेक असली तरी 'माणूसपण' एकच असते. आम्ही उगीचंच माणसांच्या कपाळावर काही चिठ्ठ्या चिटकवून ठेवतो. विहीर एकच आहे पाणी एकच आहे. ही एकत्वाची जाणीव बहिणाबाईला होऊ शकली. पण जात आणि वर्ण यांच्या नावाखाली माणसांचा भागाकार करणारे पांडित्य मात्र 'दोनीमदी पानी येक' हे समजू शकत नाही. ज्ञानवंत भेद करतात आणि बहिणाईसारखे कवी एकपणाची महती गातात हा केवढा चमत्कार आहे. कदाचित ज्ञानामुळे मेंदू मोठा झाला तरी अंत:करण मात्र आकुंचित होत असावे. बहिणाबाईंच्या कवितेत निर्मळ मनाचे सहजभाव आहेत. एखादा साधा सार्वत्रिक अनुभव सांगता

सांगता ही कवयित्री एकदम असे जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगून जाते की वाचक स्तिमित होतो. संसाराबद्दल बोलताना त्या म्हणतात, संसार म्हणजे रडगाणे नव्हे. कडू आणि गोड अनुभवांनी तो गच्च भरलेला आहे. हाताला चटके बसल्याशिवाय भाकरी मिळत नाही. चटक्याशिवाय मिळालेली भाकरी गोडही लागत नाही. संसारावरचं हे भाष्य विसरता येणं कठीण आहे. चूल, तवा आणि तव्यावरची भाकर या प्रतीकातून संसाराची गोष्ट सांगणारी ही संसारी स्त्री जो तात्विक विचार सांगते तो भाजलेल्या खरपूस भाकरीसारखा रुचकर आहे.

कधी नगद उधार
सुखदु:खाचा बेपार
अरे संसार संसार
असा मोठा जादूगार

मी संसार या विषयावर अनेक पांडित्यप्रचुर व्याख्याने ऐकली आहेत. कोणी संसाराला मृगजळ म्हटले, कोणाला ते केवळ स्वप्न वाटते. कोणी म्हणतो हे आकाशपुष्प आहे. संसार ही अंधारयात्रा आहे. या यात्रेत पावलोपावली ठेचा लागतात. अशा अनेक प्रकारच्या कल्पना विचारवंतांनी मांडल्या आहेत. पण पेटलेल्या चुलीवर ठेवलेल्या तव्यावरची भाकरी या वास्तवातून बहिणाबाईने केलेले भाष्य अपूर्व आहे. नव्हे हा प्रत्येकाचा अनुभव आहे. अनुभवाच्या शब्दांतून कवितेला खरा आकार येतो. कविता म्हणजे असते तरी काय? सुखदु:खाचा बेपार कधी नगद असतो कधी उधार असतो. हे सांगणारी शक्ती हीच कविता असते. आम्हाला अशाच शब्दांतून कविता भेटावी. एखाद्या मैत्रिणीसारखी, एखाद्या आई-बहिणी सारखी. कवितेतले शब्द 'बहिणाईचे' असावेत 'पंडिताचे' नसावेत एवढीच अपेक्षा. कवितेची शेती करणारे सच्चे शेतकरी आम्हाला पाहिजे आहेत.

□ □ □

# नियतीची ⌘ इच्छा?

भर्तृहरीच्या 'नीतिशतकात' काही ठिकाणी दैववादाचे जोरदार समर्थन केले आहे. मनुष्याचे प्रारब्ध हेच त्याच्या सुखदु:खाचे प्रमुख कारण असते, असे त्याने म्हटले आहे. आपल्या मताच्या पुष्टीसाठी तो एक उदाहरण देतो. कडक उन्हाचा ताप एका टक्कल पडलेल्या माणसाला सहन होत नाही. तो व्याकूळ झाला आणि एका ताडाच्या झाडाखाली सावलीत बसला. तेथे उंचावरून एक मोठे ताडफळ त्याच्या मस्तकावर येऊन पडले. तो जखमो झाला. तात्पर्य- दुर्दैवी मनुष्य जिकडे जातो तिकडे त्याच्या पाठोपाठ संकटेही जात असतात. दुसऱ्या एका श्लोकात तो म्हणतो, 'दैवमेव शरणम् धिक् धिक् वृथा पौरुषम'. पौरुषाचा धिक्कार करून दैवाला शरण जाण्याचा संदेश हा कवी देतो. नियतीवादाचे तुणतुणे आपल्या देशात अनेक शतकांपासून वाजविले जाते. मंदिरातल्या एखाद्या प्रवचनाला आपण जाऊन बसलो तर पुराणिक बुवा हे तुणतुणे आवेशाने वाजवीत असतात. एकदा तर्कशास्त्राचे एक तर्कप्रवीण प्राध्यापक मला सांगू लागले,

'आपण सारी कळसूत्री बाहुली आहोत. आपण कसं आणि किती नाचायचं हे नियती ठरविते. प्रारब्धासारखा बलवान घटक आयुष्यात दुसरा नसतो. आपण अज्ञानानं असं मानतो की, मी माझं आयुष्य घडवतो, मी माझ्या जीवनप्रवाहाला वळण देतो. अरे, तू कोण? तू कोण्या झाडाचा पाला? जे घडणार असतं ते काही केलं तरी घडणारच आहे. ब्रह्मदेव आडवा आला तरी प्रारब्धाला तो अडवू शकत नाही. अहो, रावणानं सीतेचं अपहरण करायचं हे सीतेच्या प्रारब्धातच होतं. ललाटलेख कोण बरे पुसू शकणार आहे? भूकंप होतो, हजारो माणसं मरतात. विमानं कोसळतात. आगगाड्यांचे अपघात होतात. हे सारं विधिलिखितच आहे. म्हणून माणसानं देवाला आणि दैवाला शरण जाण्याशिवाय गत्यंतर नाही. उगीच धडपड करू नये. 'असेल हरी तरी देईल खाटल्यावरी' हे सूत्र नेहमी लक्षात ठेवा, एकेकाळी हजारो रत्नदीपांनी झगमगून निघालेला रावणाचा राजप्रासाद त्याच्या मरणानंतर अंधारात बुडाला. दिवा लावायलाही माणूस उरला नाही. हे सारं ठरलेलंच होतं.' माझ्या प्रारब्धात त्या विद्वान प्राध्यापकाचं पुराण शांतपणानं श्रवण करणं एवढंच होतं. तर्कशास्त्राच्या अभ्यासकांनी पुरुषार्थाला गौण समजून प्रारब्धाची स्तुतिस्तोत्रे मुक्तकंठाने गावीत या प्रारब्धाला काय म्हणावे? रामायण, महाभारतातील उदाहरणे घेऊन त्यांनी दैववादाची जोरदार वकिली केली. दैवाचा एक घटक मानवी आयुष्यात असू शकतो हे मी मान्य करतो. पण

आपले सारे जीवन दैवाच्या कुंचलीनेच चितारले जाते. आपल्या पुरुषार्थाचा त्यात काही वाटा नसतो हे म्हणणे हास्यास्पद आहे. कोणत्याही तर्काच्या मुळाशी सुसंगत विचार असेल तरच त्यातून काही अनुमान काढता येते. कसलाही विचार न करता नियतीवादाच्या पाठीशी आंधळेपणाने उभी राहणारी बहुसंख्य माणसे आहेत. अतिवृष्टी का झाली? यावर्षी दुष्काळ का पडला? नाव पाण्यात कशी बुडाली? 'ईश्वरेच्छा बलीयसी' असे या प्रश्नांचे उत्तर दिले जाते. माणूस बुद्धिमान का आहे? सुदैव म्हणून. तो वेड्यासारखा का वागतो? दुर्दैव म्हणून. ही उत्तरे मानवी बुद्धीचा पराभव करणारी आहेत. एका शाळेत दहावीच्या वर्गात भूकंप कशाने होतो यावर शिक्षक बोलत होते. त्यांनी भूकंपाचे दुष्परिणाम सांगितले. पण मूळ प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले, 'हा सारा नशिबाचा खेळ आहे. दुर्दैव ओढवले म्हणून भूकंप होतो.' पुस्तकात दिलेल्या शास्त्रीय कारणांची चिकित्सा मात्र या शिक्षकाने केली नाही. प्रत्येक कार्याच्या मागे काहीतरी कारण असते. आणि त्या कारणाचे विश्लेषण तर्कवादी दृष्टीने केले पाहिजे हेच लोक लक्षात घेत नाहीत. विचार हा आमच्या जीवनाचा मूलाधार असावा व अखंड प्रयत्नातून आपल्या महत्त्वाकांक्षा सिद्ध कराव्यात ही भूमिकाच दैववादी लोकांना पटत नाही. पुढे होणाऱ्या सर्व घटना आधीच नियतीने ठरविलेल्या असतात, हे सूत्र लोकांनी घट्ट धरून ठेवले आहे. 'मनसा चिंतितम् एकम् दैवमन्यत्र चिंतयेत'. दैववादाचे नगारे वाजविणारी अशी अनेक वचने सर्व भाषांत आहेत.

कुणी काही म्हटले तरी माणूस समर्थ आहे. त्याच्या पंखांना पराक्रमाच्या आकाशाचे निमंत्रण आहे. त्याची कल्पना सात समुद्रांना भेदून पलीकडे जाऊ शकते. तो पर्वत फोडून आपला मार्ग आखू शकतो. संस्कृतीची इमारत त्याच्याच बुद्धिबळावर उभी आहे. माणूस हाच घडविणारा आणि मोडणारा, नवनिर्मिती करणारा परमात्मा आहे असे म्हणायला काय हरकत आहे? मनात आणले तर माणूस स्वर्गावर स्वारी करू शकतो किंवा नंदनवनालाही नरकाची अवकळा आणू शकतो. निर्मिती आणि विध्वंस यांचे प्रतीक माणूसच नव्हे काय? यानेच एके दिवशी हिरोशिमा आणि नागासाकीमधली लक्षावधी माणसे ठार करून ती शहरे बेचिराख करून टाकली. क्षणार्धात लाखो लोकांच्या ललाटीचा जीवनलेख पुसून टाकण्याचे सामर्थ्य याच्या हातात होते, आजही आहे. पण यानेच सहारा वाळवंटातही बागबगिचे फुलविले. नद्यांना धरणे बांधली. खळाळते पाणी शेतीला दिले. नापीक, रुक्ष जमिनीतून अन्नधान्य निर्माण केले. माणसाच्या रक्तातून जणू पुरुषार्थ वाहातो आहे. त्याला वळण लावण्याऐवजी आमचे निराशावादी तत्त्ववेत्ते, पुराणिक आणि कीर्तनकार माणसाच्या दुबळेपणाची करुणगाथा गात बसले. म्हणे, माणूस हा नियतीचा गुलाम आहे! दैव वाकवील त्याप्रमाणे त्याने वाकत राहिले पाहिजे. देवाला आणि दैवाला आव्हान द्यायचे नसते. त्याच्यासमोर म्हणे केवळ लोटांगण घालायचे असते. वाहवा! काय तत्त्वज्ञान

आहे! आपण लोटांगणवादी असावे. आपण नवससायास करून, उपवास करून दैवाला प्रसन्न करून घ्यावे ही शिकवण भारतीय माणसाच्या नसानसात भरली गेली. त्याचा परिणाम असा झाला की, देवळाचे उंबरठे झिजवूनही देव आणि दैव दोघेही पावले नाहीत.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारखा मराठी भाषेचा शिवाजी प्रारब्धाचे गोडवे गात बसला. हा शिवाजी म्हणाला, 'आमचे स्वातंत्र्य गेले याचे कारण केवळ सद्दी फिरली. दैव रुसले. रहाटगाडगे फिरत आहे. आज खाली गेलेले गाडगे उद्या वर येणारच आहे. आमच्या देशाची प्रकृती अगदी साफ आहे.' शास्त्रीबुवांनी केलेली ही अतिमार्मिक चिकित्सा वाचून त्यांच्या विद्वत्तेला हसावे की रडावे तेच कळत नाही. सगळेच सद्दीवर आणि नशिबावर उवलंबून असेल तर मग कारभारच आटोपला. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी उगीच धडपड नको. एक दिवस इंग्रज आपल्याला प्रेमाने जवळ घेऊन म्हणतील, 'वत्सांनो, अरे तुम्हाला स्वातंत्र्यच पाहिजे ना? हे घ्या स्वातंत्र्य!' असे म्हणून आपल्या कोटाच्या खिशात दडवून ठेवलेले स्वातंत्र्य आपल्या हातावर ठेवतील आणि प्रेमळ निरोप घेऊन निघून जातील. हे सगळं रहाटगाडग्याप्रमाणे एक दिवस उत्कर्ष आणि एक दिवस अपकर्ष याप्रमाणे घडणार आहे.

चिपळूणकरांची या प्रकारची मीमांसा बुचकळ्यात पाडणारी आहे. पुरुषार्थी संघर्षाशिवाय, प्राणपणाने झगडल्याशिवाय स्वातंत्र्य पदरात पडत नाही हे काय चिपळूणकरांना माहीत नव्हते? तशा आशयाचे विवेचन 'निबंधमालेत' कित्येक ठिकाणी त्यांनी केलेले आहे. पण आत्मसंतुष्ट वृत्तीने पारतंत्र्याची चिकित्सा करताना त्यांनी दैववादी दृष्टिकोन स्वीकारला. अशा परिस्थितीत कीर्तनकार, पुराणिक व प्रवचनकार यांना दोष देण्यात काय अर्थ?

एका कीर्तनकाराने जे नशिबात असते तितकेच घडते. नशीब नसेल तर सोन्याच्या खाणीत जाऊनही माणसाला दगडाशिवाय काही मिळत नाही अशा आशयाचे कीर्तन केले. शेवटी श्रोत्यांत आरती फिरवली गेली. ताटात किती पैसे पडतात याकडे ते आशाळभूत दृष्टीने पाहू लागले. कोणी हलके नाणे टाकले की निराशा, कोणी रुपया, दोन रुपयांची नोट टाकली की आनंद असे हेलकावे त्यांच्या मनाला बसत होते. मी त्यांना म्हणालो, 'तिकडे लक्ष देऊ नका. तुम्ही फक्त मन लावून आरती म्हणा. नशिबात असतील तेवढेच पैसे तुम्हाला मिळणार आहेत. कमी नाही की जास्त नाही.' माझ्या बोलण्यातला उपरोध त्या दैववाद्याला टोचला. त्याने माझ्याकडे रागाने पाहिले. नशीब माझे!

भ. महावीरांची एक गोष्ट आहे. ते पुरुषार्थाचे उपासक होते. सामान्य माणसात मिसळून; त्यांच्या भाषेतून ते त्यांना उपदेश करीत असत. आपण आपल्या अंतरीची ज्योत आपल्या पुरुषार्थाने पेटवू शकतो. आपल्या आयुष्याला प्रयत्नांचे खतपाणी

घातले तर आयुष्य एखाद्या झाडासारखे पानाफुलांनी बहरून जाते, असा त्यांच्या विचारांचा आशय होता. पण गोशालक नावाचा त्यांचा एक कठोर टीकाकार पुरुषार्थवादाची नेहमीच चेष्टा करायचा. तो नियतीवादी होता. त्याचा शिष्य उद्योगपती सद्दालपुत्र याने महावीरांची भेट घेऊन आपल्या कारखान्यात त्यांना आणण्याची व्यवस्था केली. आपला सारा कारखाना त्याने फिरून दाखविला. वेगवेगळ्या सुबक घाटाची भांडी त्या कारखान्यात तयार होत होती. सद्दालपुत्र म्हणाला,

'भगवन्, माझ्या भांडशाळेतील भांडी इतर कारखान्यांतल्यापेक्षा अधिक टिकाऊ आणि सुंदर आहेत ही नियतीची कृपा आहे.' महावीर हसले. त्यांनी विचारले, 'इतर कारखानदारांवर नियतीची अवकृपा आहे म्हणून त्यांची भांडी तुझ्यापेक्षा कमी प्रतीची आहेत काय?' सद्दालपुत्र म्हणाला, "भगवन्, मी चांगली भांडी तयार व्हावीत म्हणून अधिक काळजी घेतो. माती परिश्रमपूर्वक घोळतो आणि तिला मन लावून कलात्मक आकार देतो. त्यामुळं माझी भांडी अधिक दर्शनीय असतात.' महावीरांनी त्याला पुन्हा प्रश्न विचारला, 'हा तर तुझा प्रयत्नवाद आहे. ही नियतीची कृपा नव्हे. होय ना?' पण सद्दालपुत्राला ते नीटसे पटेना. नियतीच्या कृपादृष्टीमुळे आपला उद्योग भरभराटलेला आहे. ही ठरलेली नियती आहे, अशी ठराविक पोपटपंची तो करू लागला. महावीरांनी विचारले, 'तुझी भांडी चोरांनी चोरली किंवा फेकून दिली तर तू काय करशील? ही नियतीची इच्छा असे म्हणून स्वस्थ बसशील? तुझ्या पत्नीशी कोणी दुर्व्यवहार करण्याचा प्रयत्न केला तर हा नियतीचा लेख आहे असे म्हणून हातपाय गाळून शांत बसशील? का पुरुषार्थ करून त्या नराधमाला तू जमिनीवर लोळवशील?'

सद्दालपुत्राच्या डोक्यात या प्रश्नांच्या सरबत्तीने प्रकाश पडू लागला. त्याने महावीरांच्या चरणांवर मस्तक टेकून म्हटले, 'भन्ते, तुम्ही माझा भ्रम दूर केलात. पुरषार्थच नियतीला आकार देऊ शकतो. माझ्या यशाचं श्रेय नशिबाला नाही, ते माझ्या प्रयत्नालाच आहे.' रामायण, महाभारतासारख्या ग्रंथात पुरुषार्थाचे अनेक वेळा जोरदार समर्थन केले आहे. हे ग्रंथ पुरुषार्थाची पूजा करणारे आहेत. उभ्या-आडव्या धाग्यांनी हातमागावर विणकर वस्त्र विणतो त्याप्रमाणे व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय आपल्या जीविताचे वस्त्र असेच विणावे लागते. दोन्ही हात नसलेला एक तरुण चित्रकार आपल्या तोंडात कुंचली घेऊन फलकावर विलक्षण सुंदर चित्रे काढू शकतो हे पाहिल्यावर त्या कलावंतातच एक अपूर्व निर्माणशीलता त्याने आपल्या प्रयत्नाने पेरली आहे हे जाणवते. डेमॉस्थेनीसची गोष्ट तर सर्वप्रसिद्ध आहे. तो तोतरा होता. नीट शब्दोच्चार त्याला करता येत नव्हते. आवाजही कोता होता. लोक त्याला हसत असत. पण अखंड प्रयत्न करून त्याने आपली वाणी जोपासली, परिपुष्ट केली. सतत वाचन, चिंतन केले. त्याच्या विलक्षण प्रभावी वक्तृत्वाने श्रोते मंत्रमुग्ध होऊ

लागले. याच वाणीच्या माध्यमातून त्याने जनतेला राष्ट्रभक्तीचे धडे दिले.

कोणताही कलावंत, उद्योगपती, सेनापती, इंजिनियर, खेळाडू नियतीने घडत नसतो. 'एका रात्रीतून अमूक कलावंत जगभर लोकप्रिय झाला' असली अतिशयोक्तीपूर्ण वर्णने फसवी असतात. टाकीचे घाव सहन करीत असताना देवत्वाची उपासना करणारे पुरुषार्थी मन ज्या पाषाणात असेल त्याचाच देव घडत असतो. नियती कितीही बलवान असली तरी ठिसूळ दगडातून मूर्ती निर्माण होणार नाही. जी राष्ट्रे आपल्या पायावर उभी राहतात, दैववादाच्या कुबड्या फेकून देतात आणि प्रगतीच्या दिशेने झेपावत राहतात तीच नव्या इतिहासाला जन्म देऊ शकतात. दैववादाचे तुणतुणे वाजविणाऱ्या लोकांना इतिहास कधीच क्षमा करीत नाही हे इतिहासावरून सिद्ध होते. पण मूर्ख लोक इतिहासापासून काहीच बोध घेत नाहीत हा एक लाजिरवाणा इतिहास आहे. जाऊ द्या! नशीब त्यांचे!

□ □ □

# समतेचे गीत
## ॐ
# गाऊ द्या!

भगवान बुद्ध एका रानातून प्रवास करीत होते. उन्हाळ्याचे दिवस. कडक उन्हातून चालल्यामुळे त्यांना तहान लागली. आजूबाजूला सारे माळरान पसरले होते. दूरवर एक लहानशी झोपडी दिसत होती. बुद्ध तेथे आले. झोपडीत त्यांनी डोकावून पाहिले, एक स्त्री चुलीवर अन्न शिजवित असावी, बुद्धांनी त्या स्त्रीला म्हटले, 'भद्रे, मला तहान लागली आहे, पाणी दे' ती स्त्री उठून उभी राहिली पण तिने पाणी मात्र दिले नाही. बुद्धांनी पुन्हा एकदा तेच शब्द अधिक मोठ्याने उच्चारले. खिन्न स्वरात व खाली मान घालून ती स्त्री म्हणाली, 'भदन्त, मी खालच्या जातीची आहे. तुम्हाला पाणी कसे देऊ?' बुद्धांनी हसून म्हटले, 'मी पाणी मागितले. जात मागितली नाही. पाणी वास्तव आहे. जात ही केवळ कल्पना आहे.' हे तर्कशुद्ध उत्तर ऐकून ती स्त्री सुखावली. तिने ताबडतोब स्वच्छ पाण्याचे पात्र बुद्धांच्या हातात दिले आणि त्यांच्या चरणांवर आपले मस्तक टेकले.

अडीच हजार वर्षापूर्वी घडलेली ही घटना- मी जेव्हा बुद्धचरित्रांत वाचली तेव्हा मला विशेष आनंद वाटला. जात ही एक माणसाच्या अहंकारी डोक्यातून निघालेली विकृत कल्पना आहे यात शंका नाही. पंचवीस शतकांपूर्वी या विकृतीवर बुद्ध-महावीरांनी जोरदार वैचारिक हल्ले चढविले होते. खरे तर या दोन युगंधर महापुरुषांच्या समतावादी विचारांना आजपर्यंत या देशात मधुर फळे लागायला हवी होती. वर सांगितलेली गोष्ट आता बरीच जुनी झाली. आधुनिक काळातील एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. जनता सरकारच्या राजवटीत घडलेली ही एक उद्बोधक सत्यकथा.

बाबू जगजीवनराम त्यावेळी भारताचे उपपंतप्रधान होते. त्यांच्या हस्ते वाराणसीत पं. मदनमोहन मालवीय यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले. जगजीवनराम हे मालवीयजींच्या विद्यापीठात शिकलेले विद्यार्थी. त्यांना मालवीयाबद्दल अत्यंत आदर होता. एका श्रेष्ठ व्यक्तीच्या पुतळ्याचे अनावरण करण्याची आपल्याला संधी मिळाली याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. पण दुसऱ्याच दिवशी काही तरुणांनी गंगेचे पाणी ओतून तो पुतळा धुवून काढला. कारण एका अस्पृश्याच्या हस्ते अनावृत्त झालेला तो पुतळा विटाळला गेला, कलंकित झाला, असे त्या 'धर्मप्रेमी संस्कृतिरक्षक' तरुणांचे मत होते. गंगाजलाने धुतल्यानंतर मात्र तो पुतळा 'पवित्र' झाला. अन्यथा

एका अपवित्र हाताच्या स्पर्शाने तो मलिन झाला होता, पंचवीसशे वर्षांपूर्वी बुद्धासारखा धर्मपुरुष माणसांच्या समानतेचा उद्‌घोष करतो. झोपडीतल्या त्या स्त्रीने कृतार्थ होऊन बुद्धाला पाणी दिले होते. विसाव्या शतकात, विज्ञानाचा प्रकर्ष झालेल्या या युगात काही सुशिक्षित तरुणांना मात्र गंगाजलाने पुतळ्याचे शुद्धीकरण करणे आवश्यक वाटले. या दोन परस्परविरोधी घटना मनात विचारांची अनेक वर्तुळे निर्माण करतात. मन अस्वस्थ होते. एकदा एका नामांकित महाविद्यालयातल्या सभेत बोलताना जातीपातींची क्षुद्र आणि हास्यास्पद कुंपणे मोडून काढा. समानतेच्या पातळीवर आपण सारे राहू शकतो. खालचे, वरचे आणि अधिक वरचे असले भेद अज्ञानाचे आणि केवळ अहंकाराचे द्योतक आहेत असा मध्यवर्ती विचार मी मांडला होता. विद्यार्थी-विद्यार्थिनींना हा विचार नवीन नव्हता. समतावादी विचारांचे त्यांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. अध्यक्षीय समारोप करण्यासाठी विद्वान प्राचार्य उभे राहिले. त्यांच्या कपाळावर आठी होती. मनात कसली तरी आढी होती. काहीशा रूष्ट स्वरात ते म्हणाले.

'समतेची भाषा ऐकायला गोड आहे. अलीकडे तर ही फसवी भाषा प्रत्येक व्यासपीठावर ऐकू येते. समतेचा पुरस्कार करणाऱ्यांनी प्रथम हे लक्षात घ्यावे की, निसर्गातच विषमता आहे. प्रत्येक माणूस दुसऱ्याहून वेगळा आहे. कोणी काळा, कोणी गोरा, तर कोणी लाल रंगाचा, कोणी उंच तर कोणी ठेंगणा आहे. समतेचा कितीही जयजयकार केला तरी ठेंगण्याला उंच होता येणार नाही आणि काळ्याला गोरा रंग मिळणार नाही. जे निसर्गाने दिले त्यात समाधान मानले पाहिजे. म्हणून तर संतांनी म्हटले आहे, 'ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असो द्यावे समाधान'. जे माणसाच्या हातात नाही त्याबद्दल शहाणीसुर्ती मंडळी उगाच आदळआपट करतात. बाभळीचं झाड कधीतरी आंब्याच्या झाडाची बरोबरी करील काय? सगळीच झाडे असली तरी त्यात डावे– उजवे असतेच. या कॉलेजात मी प्राचार्य आहे. कोणी कारकून आहे, कोणी शिपाई आहे हे सगळे समान कसे बरे होतील? ॲरिस्टॉटलसारख्या विद्वानाने देखील गुलामगिरीचे समर्थन केले होते. काही लोक गुलाम असतील तेव्हाच इतर लोक सुखासमाधानात जगू शकतील. समतेचे नगारे पिटणे ही अलीकडची एक टूम आहे. उगीच भावनेने विचार करण्यापेक्षा पूर्वजांनी विचारपूर्वक जो मार्ग आखून दिला त्यावरूनच गाडी चालू द्या'. 'एष धर्मः सनातनः'

अध्यक्षांच्या समारोपानंतर उत्तर देण्याचे स्वातंत्र्य मला नव्हते. गावात त्या प्राचार्यांच्या तथाकथित विद्वत्तेचा बराच दबदबा होता. ते धर्मशास्त्रात आणि तत्त्वज्ञानात प्रवीण आहेत असे मी ऐकले होते. पण त्यांचे तर्कशास्त्र इतके केविलवाणे असेल असे मात्र मला वाटले नव्हते. खरे सांगायचे तर विषमतेचा विचार शतमुखांनी पराभूत झालेला आहे. त्याच्या ठिकऱ्या, ठिकऱ्या उडाल्या आहेत. काही महत्त्वाकांक्षी धूर्तांनी

बहुसंख्य अज्ञानी लोकांवर हा विचार जबरदस्तीने लादलेला होता यासाठी पुरावे देण्याची देखील गरज नाही इतके हे प्रसिद्ध आहे. विषमतेविरुद्ध लढाई प्राचीन काळापासून चालू आहे. मुळातच अशास्त्रीय असलेली विषमता पुन्हा पुन्हा ताज्या दमाने उभी राहाते याचे कारण तिच्या बाजूला नेहमीच काही पक्षपाती विद्वान उभे राहात आले आहेत. आधुनिक काळात देखील एखाद्या महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा विद्यापीठाचा कुलगुरू पारंपरिक पद्धतीने विषमतेची वकिली करू लागतो तेव्हा एका बाजूला हसू येते आणि दुसरीकडे मनाला खंतही वाटते. कॉलेजात कोणी प्राचार्य असेल, कोणी कारकून वा शिपाई असेल पण 'माणूस' म्हणून ते सारे समान पातळीवरचे आहेत हे साधे तर्कशास्त्र अजून काही स्तरांत नीट समजून घेतले जात नाही. याचा अर्थ इतकाच की, असल्या विषम समाजरचनेमुळे यांचा अहंगड कुरवाळला जातो. यांचे स्पर्धक कमी होतात. आपले स्पर्धक कमी करण्याचा हा धर्म मात्र सनातन आहे यात शंका नाही. कर्णाशी लढायला नकार देताना अर्जुन समर्थकांनी कर्णाच्या, खालच्या जातीचा उल्लेख केला होता. क्षत्रिय हा क्षत्रियाशीच लढेल. असा गंमतीदार युक्तिवाद पुढे करण्यात आला. दोन वीर परस्परांशी लढतात, जातीशी नव्हे. जात आणि कूळ हे नगण्य घटक आहेत याचा विचार त्या काळात झाला नाही. पण आजच्या प्रगत युगात माणसाच्या अंगभूत कर्तृत्वाला, त्याच्या बुद्धिमत्तेला कूळ जातीची कुंपणे अडवू शकत नाहीत हे अनेक प्रकारांनी सिद्ध झालेले असताना विषमता ही नैसर्गिक असते अस म्हणणाऱ्या या विद्वानांच्या बौद्धिक दिवाळखोरीचे अचूक वर्णन करणारे एखादे विशेषण शब्दकोशात शोधावे लागेल.

काळ बदलला, परिस्थितीत अनेक परिवर्तने झाली पण तरीही समतेला छेद देणारी जातीयवादी विचारधारा आजही तग धरून आहे. ती अडवली तरी अडत नाही. अडवण्यासाठी बांधलेले बंधारे मात्र पुन्हा पुन्हा भुईसपाट होतात. फुले-आंबेडकरांनी जी समतावादाची चळवळ बुलंद बनवली होती तिला आज ओहोटी लागल्याचे दृश्य स्पष्ट दिसते. फुले-गांधी-आंबेडकर हे आता जयजयकाराचे विषय बनले. त्यांना देव्हाऱ्यात बसवून त्यांची यथासांग पूजाअर्चा चाललेली आहे. व्यक्तीपूजन वाढले की वैचारिक रग, बौद्धिक लढाऊपणा क्षीण होऊ लागतो. निवडणुकीतल्या विजयासाठी नेत्यांचा जयघोष उपयोगी पडतो हे आता अनुयायांनी ओळखले आहे. डॉ. आंबडेकरांनी निवडणुकीतले पराभव हसतमुखाने स्वीकारले. तत्त्वाशी कधीही तडजोड केली नाही. विषमतेविरुद्ध अखेरच्या श्वासापर्यंत तीव्र संघर्ष करणाऱ्या या समाजपुरुषाने स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांना प्रतिष्ठा दिली. आंबेडकरानंतर मात्र प्रबोधनाची, समता विचाराची चळवळ मागे हटत गेली. राजकीय सत्ता मिळविण्याच्या कैफात परिवर्तनवादी शक्तींची उपेक्षा सारेच पक्ष करू लागले.

प्रत्येक राजकीय पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात मानवी समतेचा ठळकपणे

उल्लेख केला जातो. पण कोणताही राजकीय पक्ष प्रबोधनवादी भूमिका घेऊन परिवर्तनाला हातभार लावीत नाही. सत्तेच्या राजकारणात जात आणि संप्रदाय, धर्म आणि दैवते यांना विलक्षण महत्त्व आलेले आहे. जाती, धर्मांच्या बळावरच, निवडणुका जिंकण्याचे आडाखे असतात. सत्तेभोवती आशाळभूतपणे प्रदक्षिणा घालताना जातीपातींचाच आधार घेतला जातो. निवडणुकीचे तिकीट देतानाही जातीचाच विचार होतो. आपण जातीयवादी नाही अशी जाहिरात करणारे पक्ष देखील जातीच्या वळचणीला उभे राहून आपले राजकारण करीत असतात. मला वाटते येथेच आम्ही फुले-आंबेडकरांचा पराभव केला. पुनरुज्जीवनवादी शक्ती या परिस्थितीत अधिकच जोमदार झाल्या तर त्यात आश्चर्य कसले? 'जुने ते सोने' असे म्हणून भूतकाळाकडे बालिश कौतुकाने पाहून त्याचे नगारे वाजवण्यात खरोखरच काय अर्थ आहे? आपल्या इतिहासात आणि परंपरेत काही अभिमानास्थळे जरूर आहेत. ज्ञानोपासनेची, कलानिर्मितीची एक उज्ज्वल परंपरा देशाला लाभली होती. पण ज्ञान मिळविण्याचे, साहित्यादी कलांची आराधना करण्याचे अधिकार काही विशिष्ट वर्गालाच असल्यामुळे बहुसंख्य लोकांना त्यापासून वंचित रहावे लागले. इतिहासातली कलंकस्थाने आपल्याला हाच संदेश देतील की, या चुकांचे पुनरुज्जीवन करू नका पण लक्षात कोण घेतो?

परवा एका परंपराभिमानी इतिहासपूजकाचे व्याख्यान ऐकण्याचा योग आला. त्यांनी तर आपल्या भाषणात अतिशयोक्तीची आत्यंतिक उंची गाठली होती. ऐतिहासिक सत्य सांगण्यापेक्षा आपल्या स्वैर सोडलेल्या कल्पनेला अनुसरून ते बोलत होते. त्यांची काही विधाने मला तरी केवळ मनोरंजक वाटली. विसंगत भाषणाचा इतका सुसंगत नमुना त्यांनी सादर केला की, त्यांच्या कल्पकतेला दाद दिल्याशिवाय मला राहवेना. ते आत्मविश्वासाने-आढ्यतेने बोलत होते. असली आढ्यता फक्त अज्ञानातच असते. 'भारत हाच साऱ्या जगाचा उद्धारकर्ता देश आहे. ज्ञान आणि संस्कृती व चारित्र्य केवळ या भारताच्या सुपीक भूमीतच पिकू शकले अशी इतिहास साक्ष देतो. इतर देश रानटी आहेत. त्यांना तर संस्कृतीचा आणि आध्यात्मिक विचारांचा स्पर्शही जेव्हा झालेला नव्हता तेव्हा आम्हीच साऱ्या जगात आघाडीवर होतो. आमच्या परंपरेचे जयगीत जगात जेव्हा दुमदुमू लागले तेव्हा भारताचे नेतृत्व प्राचीन काळी जगाने मान्य केले. ते वैभवाचे दिवस पुन्हा एकदा आम्हीच जगाला दाखवू' भारतमातेचा जयजयकार करून त्यांनी आपले वीर रसात्मक भाषण संपवले. देशाभिमानावर फुंकर घातली म्हणजे श्रोत्यांना बरे वाटते. पण इतिहासाची चिकित्सा खोट्या अभिमानाच्या आहारी जाऊन करावी काय? भारतीय परंपरा नीटपणे अभ्यासली तर एक दुर्दैवी सत्य कुणालाही.जाणवेल की अस्पृश्यांप्रमाणेच स्त्रीलाही उपेक्षेच्या आणि अपमानाच्या अंधारातच कित्येक शतके निमूटपणे जगावे लागले. सामाजिक

न्यायाचा वाटा तिच्याही पदरात कधीही पडला नाही. धृतराष्ट्राला दृष्टी नाही म्हणून गांधारीने जन्मभर अंधत्व पत्करले. या वेड्या त्यागाची आणि पातिव्रत्याची प्रशंसा करताना आमचे कवी, कीर्तकार आणि पुराणिक, गहिवरून गेले. आपले डोळे बांधून घेण्यापेक्षा ते उघडे ठेवून धृतराष्ट्रालाच तिने मार्गदर्शन केले असते, तर तिच्या पातिव्रत्याला बाधा आली असती काय? परिणाम इतकाच झाला की पती आणि पत्नी म्हणजे राजा आणि राणी दोघेही दृष्टिहीन झाले. कौरव राज्यच दृष्टिहीन ठरले. स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक समान पातळीवर आहेत असे दृश्य कधीच दिसले नाही. स्त्रिया आणि अस्पृश्य या दोन्ही वर्गाचा प्रचंड कोंडमारा करणारी ही परंपरा उच्चकोटीची आहे. असे धारिष्ट्याचे विधान कोणी करू शकेल काय? एका संत कवीने तर सांगून ठेवले, 'ढोल, गँवार, पशु, शूद्र, नारी ये सब ताडनके अधिकारी' संतांनाही विठ्ठलात आई दिसली. पण आईच्या जातीत मात्र त्यांना परमेश्वर दिसला नाही याचा खेद वाटतो. संत काव्यातही सांकेतिक वळणाची स्त्री निंदा आढळते.

समतेचा, स्वातंत्र्याचा आणि सामाजिक न्यायाचा विचार आमच्या घटनेत केवळ येऊन चालणार नाही तो मनोरचनेतच उतरला पाहिजे. आकाश जसे सर्वत्र निळे असते आणि एकच असते, अखंड असते तसा हा माणूस सर्वत्र एकच आहे. एकच राहील, कुठेही जा, माणसाचे रक्त एकाच रंगाचे आहे. कोठेही जा, त्याच्या अश्रूतला खारटपणा एकच आहे. त्याच्या डोळ्यात चमकणारी प्रेमाची भावना एकच आहे. कोणत्याही भाषेतले गीत असो, त्यात माणुसकीचा सूर असेल आणि समतेचा नाद असेल तर ते गीत अमर आहे. कोणत्याही सांप्रदायिक पुराण कल्पनांच्या तटबंदी उभारून मानवी समतेचा प्रवाह कुंठित करणे हा गुन्हा आहे. स्वातंत्र्याचे आणि समतेचे गीत आताशा कुठे उमटायला लागले आहे. हे गीत फुलू द्या! या गीताला आपल्या हृदयातल्या स्पंदनांचा ताल द्या. मुक्तकंठाने गाऊ द्या समतेचे गीत.

□ □ □

# जीवनाची वाट
※
# अशी चालावी

एकदा एका पंडितवर्यांच्या प्रवचनाला मला ओढून नेण्यात आले. आध्यात्मिक प्रवचने देणारे व्याख्याते, पुराणिक आणि कीर्तनकार यांचे पाठांतर बरे असते. ग्रंथातले विचार न कळता सांगत राहाण्यात कित्येकांचा हातखंडा असतो. मी सर्वच प्रवचनकारांना दोष देत नाही. पण ज्यांच्या प्रवचनाला मला तोंड द्यावे लागले ते विद्वान आचार्य मानवी आयुष्य कसे निरर्थक आणि नगण्य आहे हा (अ) विचार घोळून घोळून सांगत होते. भाविक श्रोते माना डोलवित होते. त्या पांडित्यपूर्ण प्रवचनाची आपसात भलावण करीत होते. प्रवचनकार मधूनमधून कोणत्याही ग्रंथातले संस्कृत श्लोक सफाईने उच्चारीत होते. मग त्या श्लोकांचा प्रवचनाशी संबंध असो की नसो, न कळणारे संस्कृत श्लोक भाबड्या श्रोत्यांवर निश्चित परिणाम करतात. जे कळत नाही ते अत्यंत महनीय आणि अर्थपूर्ण असते असा पुष्कळांचा समज झालेला असतो. पंडित महाशय आपल्या 'विचार प्रवर्तक' वक्तव्यात म्हणाले,

'आपलं हे आयुष्य पाण्यावरच्या बुडबुड्यासारखं क्षणभंगुर आहे. काचेच्या भांड्यासारखं ठिसूळ आहे. विश्वाच्या जगड्व्याळ पसाऱ्यात तुमच्या आमच्या आयुष्याला काडीइतकंही महत्त्व नाही. मातीच्या क्षुद्र कणासारखीच त्याची अवस्था आहे म्हणून तर संतांनी म्हटलं आहे, 'माती असशी मातीस मिळशी' या क्षुद्र आणि अत्यंत तुच्छ जीविताचा लोभ धरणं, त्याला चिकटून राहाण्याचा प्रयत्न करणं हा वेडेपणा आहे. तुम्ही मिळविलेली सारी धनदौलत, तुम्ही केलेले सारे पराक्रम, तुमची राज्ये आणि साम्राज्ये, सारं सारं व्यर्थ आहे. आभासात्मक आहे. खरं तर जीवन हा एक अपघात आहे. या जीवनाची जो आसक्ती धरतो तो एक मूर्ख!'

जीवन कसे क्षुद्र आणि व्यर्थ असते हा विचार त्या प्रवचनकाराने तास-दीडतास मांडला. प्रवचन संपल्यावर थकवा आलेल्या त्या विद्वानाला शीण घालवण्यासाठी प्याला भरून मसाल्याचे दूध पिणे भाग पडले. चाहत्यांच्या आग्रहापुढे त्याचे काही चालले नाही. तो तरी बिचारा काय करणार?

जीवनाचा इतक्या अतिशयोक्तीपूर्ण भाषेत निषेध करण्याची काय जरूर होती? प्रत्येक प्राण्याला मृत्यू केव्हातरी गाठणारच असतो. पण मरणाच्या भीतीने जीवन काळवंडून टाकणे कितपत योग्य आहे? मृत्यूची जपमाळ हातात घेऊन बसणे खरे तर केवळ हास्यास्पद नसून, अनर्थकारक आहे. निसर्गाने दिलेले हे जीवन

मातीच्या कणासारखे अर्थहीन आहे. हा विचार निरोगीपणाचा वाटत नाही. उठल्यासुटल्या जीवनाच्या क्षुद्रत्वाचे आणि मरणाच्या सामर्थ्याचे तुणतुणे वाजवीत बसलेल्या या लोकांना कोणत्या शब्दांतून उत्तर द्यावे बरे? किंवा अशा पंडितांना उत्तर न देणेच बरे. 'न जाणे न नेणे अशा पामराला, बुझावू शकेना विधाता तयाला' असे एका कवीने पूर्वीच म्हणून ठेवले आहे. ते प्रवचनकार चारसहा दिवसांनी आजारी पडले. प्रकृती चिंताजनक झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांना ते कळवळून सांगत होते. 'अहो, मला जगायचं आहे. तुम्हीच मला जगवू शकाल. मरणाच्या दाढेतून तुम्हीच मला वाचवू शकाल. कसंही करून मला जगवा'.

कोणी काहीही म्हणो या जीवनाला एक अंगभूत असे जबरदस्त आकर्षण असते यात संशय नाही. प्रत्येकाच्याच रक्तात आणि श्वासनिश्वासात जीवनाची अतूट ओढ लहरत असते. मरणाच्या दाट सावलीतसुद्धा जगण्याची इच्छा वठून जात नाही. जीवनाला कोणी अंधारयात्रा म्हणतो, कोणी तो क्षणजीवी बुडबुडा आहे असेही म्हणतो. आयुष्य ही एका वेड्याने सांगितलेली, अर्थ नसलेली कहाणी आहे असे एखादा नाटककार म्हणतो. कालिदासासारखा शृंगारकवीसुद्धा केव्हातरी मरण ही प्रकृती आणि जीवन ही विकृती असे मत व्यक्त करतो. कोणताही निष्कर्ष काढा. कसाही काथ्याकूट करा. जीवनाची आसक्ती सदैव तरुण राहाते. त्यात काहीही चूक नाही. माणसाने जगत राहावे आणि जगता जगता त्याने फुलत राहावे ही आनंदाचीच घटना आहे. 'जीवेत' शरदः शतम्' ही भावना आशावादाची द्योतक आहे. शंभर शरद ऋतू आपल्या जीवनात बहरावेत, शंभर वसंत ऋतूंच्या हिंदोळ्यावर आपण झुलावे, पावसाच्या धारा अंगावर घ्याव्यात, शिशिरातल्या थंडीला हसतमुखाने सामोरे जावे. जीवनेच्छेची पाने सदैव हिरवीगार राहावीत या विचारात काय चुकीचे आहे? का म्हणून हे प्रवचनकार, पुराणिक जीवनाच्या लोभाला दोष देतात? जगताना वाटेत आलेल्या दुःखाचेही हसतमुखाने स्वागत करणारी काही रसिक माणसे मी पाहिली आहेत. असाच एक रसिक मला एकदा म्हणाला, 'दुःखे टाळावित हे खरे आहे पण ती अटळच असतील तर त्यांच्याशी हसतहसत शेकहँड केला तर अधिक चांगले. या माझ्या दुःखानो, मला भेटायला दुरून आलात तुमचं स्वागत असो. तुम्हालासुद्धा आनंदाइतकंच माझ्या जीवनात महत्त्वाचं स्थान आहे. तुम्ही अस्वस्थ करता पण अंतर्मुखही करता. इतके दिवस मी बाहेरच्या जगाकडे पाहात होतो. आता तुमच्यामुळं आत्मनिरीक्षण करू शकेन. सुख भोगताना तुमच्या आठवणीमुळं सुखाला देखील एक नवा अर्थ मिळेल. एक नवा संदर्भ मिळेल. आनंदाची चव वाढवण्यासाठी आम्हाला दुःखांचाही सहवास मिळाला पाहिजे. आनंदानं माणसं बेभान होतात, उन्मत्त बनतात पण दुःखामुळं ती समंजस बनतात. दुःखानो, तुमचंही स्वागत असो', त्या रसिकाच्या रसज्ञ मनाचा रुचिर गंध मला जाणवला. प्रवचनकाराचे शब्द पोकळ होते. ते केवळ ग्रंथांच्या पानात

राहिलेले, अर्थ नसलेले कृत्रिम शब्द होते. पण या रसिक माणसाने दु:खांना नाकारलेले नव्हते. त्यांच्यासाठीही आपल्या मनाचे दरवाजे विचारपूर्वक उघडले होते. 'आमची सर्वात मधुरतम गाणी ही दु:खाचीच गाणी आहेत' असे एक कवी म्हणतो. सुख आणि दु:ख परस्परविरोधी असले तरी त्या दोघांच्या उपस्थितीशिवाय जीवनाचा अर्थ कळू नये ही एक गंमत आहे.

आपले आयुष्य हा ऊनपावसाचा, अंधार आणि प्रकाशाचा सरमिसळ झालेला एक गमतीदार खेळ आहे, जीवनाचा निश्चित आणि नेमका अर्थ कोणता याबद्दल मात्र कोणाचे एकमत होत नाही हेही बरोबर आहे. जशी ज्याची दृष्टी तशी त्यांची विचारसृष्टी. अनुभव सारखे असूनही अनुभवाकडे पाहाण्याची दृष्टी सारखी असू शकत नाही. भर्तृहरी हा तत्त्वज्ञ कवी जीवनाच्या द्वंद्वात्मकतेचे चित्रण गमतीदार पद्धतीने करतो. तो म्हणाला, 'कुठून तरी वीणेचे मधुर सूर कानावर येत आहेत. पण त्याबरोबरच कुणाचं तरी आर्त आक्रंदनही ऐकायला येत आहे. एखाद्या ठिकाणी बुद्धिमंतांचा आनंददायक परिसंवाद चाललेला आहे. तर दुसऱ्या ठिकाणी दारू पिऊन बेताल बडबड करणाऱ्या दारूबाजांची शिवीगाळ चालू आहे. कुठेतरी एखादी लावण्यवती तरुणी दिसते आणि डोळ्यांचे पारणे फिटते. त्याचवेळी एखाद्या सुरकुतलेल्या जराजीर्ण झालेल्या म्हातारीचे केविलवाणे दर्शन घडते. अरे, हे जीवन अमृतमय म्हणावे की विषमय म्हणावे?' भर्तृहरीच्या प्रश्नाला उत्तर नाही. जीवनाच्या पदरात विधात्याने काही फुले टाकली असतील पण काटे मात्र त्याने सढळ हाताने, उदारतेने टाकले ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाची आहे. गोविंदाग्रजांसारखा एक नाटककार आणि कवी जीवनाच्या विपरीततेबद्दल निराश होऊन म्हणतो 'आणि जीविता, लाभ हाच का तुझ्या संगती राहुनिया, असेच जाणे असे सदा का कालौघावर वाहुनिया' जीविताच्या संगतीत राहून कोणता लाभ होणार आहे? काळाच्या अखंड प्रवाहाबरोबर अगतिकपणे वाहात जाणे हेच आमच्या नशिबी असते. आयुष्याचे पाणी फसवे असते. कोणत्याक्षणी ते नाकातोंडात जाऊन तळाशी नेईल हे सांगता येत नाही. काही कवींच्या काव्यात गडद निराशा असते. आयुष्याच्या जुगारात आपण नेहमीच पराभूत होतो हे शल्य त्यांच्या काळजात खुपत असते. त्यांनीच एका कवितेत म्हटल्याप्रमाणे 'काही फुले' स्वर्गीय अप्सरांच्या केशकलापात स्थान मिळवतात. काही देवाच्या चरणांवर विलीन होतात. काही रसिकांना आनंद देतात. पण एखादं फुटक्या नशिबाचे फूल मात्र प्रेताचा शृंगार साजरा करते. एखाद्याचे नशीब असेही असते' नियतीच्या या लहरीला आपण अडवू शकत नाही. काही माणसांच्या आयुष्यात चमत्कार घडू शकतात. त्यांनी हातात माती घेतली तरी तिचे सोने होते. पण काही कमनशिबी हातातल्या सोन्याचीही माती होते. कारणे काहीही असोत. जीवनाचे स्वरूप असे चमत्कारिक असू शकते, पण म्हणून जीवनाचाच द्वेष करून त्याच्याकडे पाठ फिरवणे कितपत बरोबर आहे? जगण्याचा

अधिकार निसर्गदत्त आहे. आपले जीवन वाऱ्यावर उधळून टाकणे हा भयानक अपराध आहे. पहाटेच्या गार वाऱ्याच्या झुळुकीत फुलांचा गंध जेव्हा मिसळून जातो तेव्हा हताश मनालाही जीवनाचे सूर हळूवारपणे भेटतात आणि त्याच्या कानात कुजबुजतात, 'धीर धर, जीवनाची पाकळी फुलत आहे. तूच ती फुलवणार आहेस. तिला तुझ्या हृदयातला प्रेमाचा प्राणवायू मिळाला की ती फुलतच राहील.'

कधी कधी आपले आयुष्य सर्व बाजूंनी निष्फळ होत असल्याचा अनुभव माणसाला येऊ शकतो. दु:ख आणि आपत्ती यांच्या वावटळी येऊ लागतात. आशावाद डळमळीत होतो. नको हे जीवनाचे ओझे ते फेकून द्यावे कुठेतरी आणि एकदाचे मोकळे व्हावे असे अनेक कारणांनी वाटत राहाते. माथ्यावरचे आभाळ फाटत आहे ही प्रतीती खरोखरच असह्य असते. पण असले अनुभव थोडेफार सर्वांच्याच आयुष्यात केव्हाना केव्हा तरी येत असतात, जीवनाचा डावच उधळून टाकावा किंवा आयुष्यापासून पळून जावे हे काही मार्ग नव्हेत. संत ज्ञानेश्वरांनाही एकदा आपल्या मनाच्या ताटीचे दार बंद करून घ्यावेसे वाटले. कारण जगण्याची इच्छाच क्षीण होऊ लागली. पण ताटीचे दार बंद करणे चुकीचे आहे. हे त्यांना पटले. संत तुकोबांच्याही आयुष्यात अनेक वादळे घोंघावत होती. एखादा कच्च्या काळजाचा माणूस असता तर तो रानोमाळ निघून गेला असता. पण 'कठीण वज्रासी भेदू ऐसे' असे मनोबल त्यांच्या ठिकाणी होते. आपल्या हृदयातला पांडुरंग आपल्याला निश्चित वाट दाखवील हा विश्वास त्यांना वाटत होता. निराशेचा अंधार किती गडद आहे हे तुकोबांच्या शब्दांतूनच पाहावे.

ओस झाल्या दिशा मज वाटे भिंगुळवाणे।
जीवलग नेणे मज कोणी।
भय वाटे देखे श्वापदांचे भार।
नव्हे मज धीर पांडुरंगा।
अंध:कारापुढे न चलवे वाट।
लागतील खुंट काटे अंगा।
एकला नि:संग फांकती मारग।
भितो नव्हे लाग चालवया।
तुका म्हणे वाट दावूनी सद्‌गुरू।
राहिला हा दुरू पांडुरंगा।

ज्ञानेश्वर, तुकारामांचा पांडुरंग त्यांच्या मनातच वसती करून राहिला होता. उध्वस्त करणारी एखादी शक्ती उफाळून येते तेव्हा तिचा प्रतिकार करणारी दुसरी रचनात्मक शक्ती आपल्या मनातच निर्माण होत असते. फुले-आगरकर आणि आंबेडकर या क्रांतीकारकांच्या चारित्रात काय कमी वादळे आहेत? वादळांच्या संगतीत

वाढलेली ही वादळी शक्तीची माणसे वादळावर मात करू शकली कारण त्यांचा जीवनशक्तीवर विश्वास होता. ही माणसे नव्या जीवनाला आवाहन करीत होती. ही प्रसंगविशेषी मोडून पडली पण वाकली नाहीत. लव्हाळी होऊन जगण्यापेक्षा वृक्ष होऊन वादळाशी टक्कर देण्यात त्यांचा जीवनानंद सामावला होता.

आम्ही सामान्य माणसे एवढ्या तेवढ्या क्षुल्लक कारणावरून आयुष्याला वैतागतो. जीवनाचे धागे आपल्या मनातल्या प्रेमभावनेने, श्रद्धेने आणि रसवृत्तीने जुळवू लागलो तर जुळतात. सूर जुळले तर संगीत निर्माण होते. शब्द जुळले तर साहित्य साकार होते. आयुष्य सुद्धा जुळवावे लागते. सुट्या सुट्या क्षणांतून एक सुखदु:खात्मक पण हवेहवेसे वाटणारे जीवन आम्हीही उत्कटतेने जगू शकतो. एक नर्तकी नृत्य करताना देहभान विसरून जायची. तिचे अंगप्रत्यांग, तिचे अंत:करण, तिच्या रक्ताचा प्रत्येक बिंदू बेभान होऊन नाचायचा. ती एकदा म्हणाली, 'माझ्या आयुष्यात या घुंगुरांचा नाद आहे. मला तुमचा देव आणि धर्म कळत नाही. माझा देव घुंगुरातून मला साद घालतो. ही घुंगुरं नसती तर मला जगता आलं नसतं. जीवनाचा अर्थ आणि त्याचे स्वरूप यावर मी काही बोलू शकत नाही. कुठल्याशा चित्रपटातल्या गीतातील एक ओळ मला आठवते. अर्थदृष्ट्या ती रमणीय आहे. 'जिंदगी प्यार की दो चार घडी होती है', बस्स जीवनाचे सारे तत्त्वज्ञान या शब्दांत सामावले आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. आयुष्याच्या वाटचालीत एखाद्या कोवळ्या, हळव्या प्रेमगीताचे थोडे सूर माझ्या ओठावर यावेत, श्रद्धेला आणि भक्तीलाही त्यात स्थान असावे, थोडे अश्रू, थोडे हास्य, उत्साह आणि आनंद यांचे एक रसायन भरभरून प्यावे, जीवनाची वाट अशीच चालावी यापेक्षा मला जीवनातले अधिक काही कळत नाही आणि खरे सांगू? अधिक कळण्याची जरूरी वाटत नाही. इतकेच कळावे की, प्रियजनांच्या आठवणींची पाखरे मनात भिरभिरत आहेत. इतकेच कळावे की, कुणाच्या तरी आठवणीने माझ्या डोळ्यात पाणी उभे राहिले आहे.'

□ □ □

# संपत्ती कितपत सुख देते?

जीवनातले सुख संपत्तीवर कितपत अवलंबून आहे, या प्रश्नाचे उत्तर देताना मतभेद होऊ शकतील. ज्यांची अध्यात्माकडे प्रवृत्ती आहे असे लोक भौतिक संपत्तीला फारसे महत्त्व देणार नाहीत. संपत्तीची लालसा हे दुःखाचे आणि अनर्थाचे मूळ आहे असे ते म्हणतील. त्यांचे हे मत एका दृष्टीने सयुक्तिकही आहे. संपत्तीचे व्यक्तीवर आणि समाजावर होणारे दुष्परिणाम पुष्कळ पाहायला मिळतात. एक लक्ष्मीपुत्र पश्चात्तापाने पोळून निघालेल्या स्वरात म्हणत होता; 'मी संपत्तीच्या राशीवर अक्षरशः लोळत होतो, नाना प्रकारच्या चटोर सुखांचा केवळ उपभोग हेच माझे जीवनसर्वस्व बनले होते. आंधळ्या भोगवादी प्रवृत्तीने माझ्या साऱ्या आयुष्यालाच वेटोळे घातले होते. कोणताही शहाणपणाचा शब्द, मग तो कितीही मोठ्या माणसाचा असो मला कधी रुचला नाही. श्रीमंतीची घमेंड माझ्या रक्तातच जणू मुरली होती. आता मनाबरोबरच शरीरही अनेक रोगांचे माहेरघर होऊन बसले आहे. लक्ष्मीची माझ्यावर कृपा नसती तर मी अधिक चांगले जीवन जगू शकलो असतो असे वाटते'.

संपत्ती मिळाल्याबरोबर मनाचा तोल ढासळावा आणि माणसाने बेतालपणे, उन्मत्तपणे वागावे असे प्रकार पुष्कळ घडतात. श्रीमंतीमुळे ज्यांची विचारशक्तीच लटपटते अशा मूर्खांनी लक्ष्मीला दोष द्यावा हे हास्यास्पद आहे. गीतेत या तामसी वृत्तीच्या लोकांना आसुरी संपत्तीचे धारक म्हणून संबोधिले आहे. धनदांडगी उद्धट प्रवृत्ती चांगल्या मूल्यांचा विध्वंस करते. या वृत्तीचा अहंकारी मनुष्य स्वतःला काय समजतो याचे ज्ञानेश्वरांनी वर्णन केले आहे.

मी भोगभूमीचा रावो। आणि सर्व सुखाशी ठावो।।  
म्हणोनिप इंद्रही वावो। मातें पाहुनि।।  
माजिरां अन्नपानी। प्रमदांचा आलिंगनी।।  
मी होईन त्रिभूवनी। आनंदाकारु।।

'मी भोगभूमीचा राजा आहे. सर्व सुखे मी घेत आहे. माझ्याशी तुलना केली तर तो स्वर्गलोकीचा इंद्रदेखील तुच्छ आहे. मद्यपान आणि तरुण स्त्रियांची आलिंगने यांच्यामुळे मी त्रैलोक्यात आनंदाची मूर्ती होईन'. या प्रकारचा वेडा अहंगंड केवळ संपत्तीमुळे माणसाच्या मस्तकात भिरभिरू लागतो. हे विधान मात्र तर्कशुद्ध वाटत नाही. संपत्तीचा आणि ऐश्वर्याचा प्रभाव अविचारी लोकांचा अधःपात करु शकेल पण

विचारशील लोक संपत्तीच्या बळावर आपल्या उद्योगाने यशाच्या पायऱ्या चढू शकतात. श्रीमंतीला दोष द्यायचा आणि दारिद्र्याची प्रशंसा करायची या दोन्ही गोष्टी समूळ चुकीच्या आहेत असे म्हणायला हरकत नाही.

सर्वांगीण प्रगतीसाठी आर्थिक उत्कर्षाची नितांत आवश्यकता असते हे निर्विवाद आहे. धनाची आणि वैभवाची निंदा करणाऱ्याच्या मनातही एक प्रकारचा आध्यात्मिक अहंकार तरी असतो किंवा आपल्याला धन मिळाले नाही म्हणून आलेल्या वैफल्याचा डंख तरी असतो. 'मी पैशासाठी जगत नाही. तत्त्वासाठी जगतो. पैसा काय कोणीही मिळवितो. पण मी माझ्या तत्त्वाला महत्त्व देतो' असले उद्‌गार काढणारे तथाकथित तत्त्वनिष्ठ लोक पैशापैशासाठी हुज्जत घालताना मी पाहिले आहेत. 'द्रव्याची अभिलाषा माणसाला पशू बनविते. पैसा हे अध:पाताचे प्रमुख कारण असते' हे तत्त्व देवळात परिणामकारक शब्दांतून पटवून देणारा प्रवचनकार आपल्या बिदागीसाठी अडून बसतो. हे दृश्यही पाहाण्यात येते. एखादा तुकाराम अपवादात्मक असतो. 'बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले' हे तुकोबांचे शब्द आठवतात. शिवाजी राजांनी पाठवलेल्या अमूप संपत्तीकडे तुकोबांनी डोळा वर करूनही पाहिले नाही. हे त्यांचे नि:स्पृहपण नि:संशय आश्चर्यकारक आहे. आजच्या जमान्यात तुकाराम दिसत नाही. सुखराम मात्र सर्वत्र आढळतात. पण म्हणून संपत्तीची निंदा करण्याचे काय कारण आहे? कोणी काहीही म्हटले तरी सुखस्वास्थ्यासाठी बँकबुक अधिक उपयोगी पडते. म्हणूनच कोणा व्यवहारपंडिताने सांगितले आहे, भूक लागल्यावर व्याकरणाचा उपयोग होत नाही. तहान लागल्यावर काव्यातला रस पिता येत नाही. अन्नपाण्यासाठी द्रव्याची आवश्यकता असते. जगताना भौतिक संपत्तीकडे पाठ फिरवणे सुज्ञपणाचे ठरत नाही. अर्थाशिवाय जीवनाला अर्थ नाही. दारिद्र्य आणि मरण यातले अधिक श्रेयस्कर कोणते याचे उत्तर मरण हेच देण्यात आले आहे. कारण दारिद्र्य पावलो-पावली मरणाचे दु:ख देत असते. त्यापेक्षा एकदाच मृत्यूला सामोरे जाणे सुखाचे नव्हे का?

'महाभारतात' अर्थाची महती अनेक ठिकाणी स्पष्ट केली आहे, भीष्माने युधिष्ठिराला उपदेश करताना म्हटले आहे की, 'सर्व धर्माचा आधार कोष म्हणजे धन हाच आहे. धनाच्या साहाय्याने इहलोक आणि परलोक सिद्ध होतात हे धर्मवचन आहे. धनहीन पुरुष हा असून नसल्यासारखा आहे'. युधिष्ठिरानेही वनवास संपल्यानंतर श्रीकृष्णाला आपली व्यथा बोलून दाखवताना म्हटले होते, 'कृष्णा, धनहीन मनुष्य जिवंत असला तरी तो मेल्यासारखाच आहे'. धन हाच श्रेष्ठ धर्म आहे असे म्हणतात. जोपर्यंत लक्ष्मीच्या कृपेला मनुष्य पात्र असतो तो पर्यंतच पुरुष ही संज्ञा त्याला शोभून दिसते. धनहानी झाली तर धर्म आणि काम हे पुरुषार्थही निस्तेज होतात. मग त्या जिण्याला काय अर्थ आहे? आम्ही राज्यभ्रष्ट झालो, अनेक वर्षे आम्ही विपत्तीत

काढली. आता कोणत्याही न्यायाने आम्हाला संपत्ती मिळविली पाहिजे. प्राणांचीही किंमत देऊन लक्ष्मीला प्राप्त करून घेतली पाहिजे'.

'उद्योगपर्वातले' हे धर्मराजाचे भाषण अर्थाची प्रशंसा करणारे आहे. अर्थ हाच जीवनाचा आणि राष्ट्राचा मूलाधार आहे हे युधिष्ठिराला वनवासानंतर पटलेले आहे. निर्धनाला इहलोकही नाही आणि परलोकही नाही. दारिद्र्य हे एक पातक म्हटले आहे. धर्मप्रेमाच्या आवेगात अनेक वेळा धनाची निंदा केली जाते. पण महाभारतकारांनी अर्थ हा प्रधान पुरुषार्थ आहे अशा आशयाचे काही ठिकाणी विवेचन केले. आजच्या जगातही श्रीमंत राष्ट्रांना जी प्रतिष्ठा आणि अधिकार आहे ती अल्पांशाने गरीब राष्ट्रांना नाही. संपत्तीकडे पाठ फिरविणे केवळ साधुसंतांनाच शक्य आहे. खरे तर त्यांनाही सर्वस्वी पाठ फिरविणे परवडणारे नाही. आजकाल तथाकथित साधूसंन्याशानीही प्रचंड माया गोळा केलेली दिसते. साधुत्वाचा देखावा करणे हा देखील पैसा मिळविण्याचा एक किफायतशीर धंदा होऊन बसलेला दिसतो. कबीर आणि तुकाराम यांनी असल्या बोके संन्याशांच्या द्रव्यलोभी वृत्तीवर घणाघाती टीका केली आहे. हातात जपमाळ घेऊन बसलेल्या एका भगव्या पुरोहितावर शाब्दिक प्रहार करतांना संत कबीर म्हणतात,

पंडित होयके आसन मारै, लंबी माला जपता है।
अन्तर तेरे कपटकतरनी, सो भी साहब लखता है।
ऊंचानीचा महल बनाया, गहरी नेंव जमाता है।
चलनेको मनसूबा नाही, रहनेको मन करता है।

अरे पंडिता, आसन ठोकून तू माळ जपत आहेस. पण तुझ्या हृदयातली कपटकातरी प्रभूला स्पष्ट दिसत आहे. उंच-ठेंगणे महाल बांधतोस. कवडी कवडी माया जोडून जमिनीत गाडून ठेवतोस हे सारे त्या सर्वज्ञ परमेश्वराला दिसत असते. 'हरि जैसेको तैसा है' दांभिक साधूंची ही परंपरा आजही अखंड चालू आहे. संन्याशाच्या वेशात राहणारे काही धनाढ्य साधू आजही आपला व्यवसाय करीत आहेत! धन मिळविण्यासाठी त्यांनी केलेली कित्येक नाटके आता जगाला माहीत झाली आहेत. पण यावरून एकच निष्कर्ष निघतो की, संपत्तीच्या पाठीमागे सारेच उरी फुटेपर्यंत धावत असतात. लहरी आणि चंचल समजली जाणारी लक्ष्मी अनेक वेळा मूर्खांना, अपात्र व्यक्तींना सहज वश होते. इमाने इतबारे तिची पूजा करणाऱ्याला मात्र ती हुलकावण्या देते. संपत्ती हे सुखाचे एक साधन आहे. तिला आपल्या जीवनाचा केंद्रबिंदू मानण्यात मात्र अर्थ नाही. पैसा मिळवताना सत्याचा, न्यायाचा, चारित्र्याचा आणि आत्म्याचा बळी देऊन तो मिळवावा इतका तो अपरिहार्य आहे काय? शील आणि चारित्र्य सप्तपाताळात गाडले गेले तरी चालेल पण मला खोऱ्यांनी पैसा ओढला पाहिजे असे वाटण्याइतपत ही संपत्ती सर्वसमर्थ आहे काय? सोन्यानाण्यांनी आणि वैभवसंपन्न वस्तूंनी ज्यांचे घर भरले आहे ते खरोखरच सुखाची झोप घेऊ शकतात

काय? ते निश्चिंत मनाने हसतखेळत आपल्या कुटुंबात मनमोकळेपणाने रमू शकतात काय? हे प्रश्न खरोखरच मूलभूत स्वरुपाचे आहेत.

साऱ्या गावाला विकत घेऊ शकेल असा एक धनदंड शेठजी डॉक्टरला कळवळून सांगत होता 'डॉक्टर साहेब, मला झोपच येत नाही. तुम्ही दिलेल्या गोळ्यांनी थोडा वेळ ग्लानी येते पण झोप लागत नाही. सुखाची झोप माझ्या नशिबी नाही. निदान थोडा वेळ झोप मिळाल्याचं सुख तरी मिळेल का? वाटेल तेवढे पैसे घ्या' डॉक्टर खिन्न हसत म्हणाले, 'औषधे आणि इंजेक्शने विकत मिळतात पण ती तुम्हाला झोपेचं सुख देऊ शकत नाही. जोपर्यंत तुमच्या मनावर ताण-तणाव आहेत तोपर्यंत सगळी औषधे निरुपयोगी आहेत'. कित्येक धनलोभ्यांच्या गादीत आणि उशीत नोटा भरलेल्या असतात असे ऐकले आहे. पण ही गादी झोप देऊ शकेल का? याचे उत्तर मात्र मिळत नाही. पैशावर लोळणारे लक्ष्मीपुत्र जर आपले जन्माचे समाधान हरवून बसत असतील तर पैसा आणि सुख यांचे प्रमाण व्यस्त होणार हे उघडच आहे. पैसा सुखाकडेही नेतो, दु:खाकडेही घेऊन जातो. आपण कुठे जायचे याचा निर्णय करणारी बुद्धी नसेल तर अध:पाताचा रस्ता अटळ आहे असेच म्हटले पाहिजे. अर्थलोभ काय किंवा काममोह काय जोपर्यंत ते नियंत्रित असतील तोपर्यंत त्यांच्या सहवासात आयुष्याचे नंदनवन करता येते. अर्थ आणि काम या दोन घोड्यांचे लगाम खेचणारे हात जेव्हा दुबळे होतात तेव्हा हे घोडे चौखूर उधळतात आणि असे उधळतात की त्यांना अडविण्याची हिंमत मी मी म्हणणाऱ्या वीरांतही असत नाही. या सैराट सुटलेल्या घोड्यांच्या मागे फरफटत गेलेले, असंख्य लोक असतात. आपण फरफटले जात आहोत हे कळूनही तोल सावरणे त्यांना जमत नाही.

अलेक्झांडरने मरणापूर्वी आपल्या भांडारातली सारी रत्ने अश्रूभरल्या डोळ्यांनी बराच वेळ पाहिली. ही संपत्ती आपण घेऊन जाऊ शकत नाही याबद्दल त्याने दु:ख व्यक्त केले आणि हळहळत प्राण सोडला अशी आख्यायिका आहे. पुढचा प्रवास त्याला रिकाम्या हातांनीच करावा लागला. संत तुकोबांचे भेदक वचन उल्लेखनीय आहे. ते म्हणतात,

धन मेळवूनि कोटी। सवे नये रे लंगोटी।।
पाने खाशील उंदड। अंती जासी सुकल्या तोंडे।।
पलंग न्याहाल्या सुपती। शेवटी गोवऱ्या सांगाती।।
तुका म्हणे राम। एक विसरता श्रम।।

जन्मभर खपून मिळवलेल्या संपत्तीतला एक कण देखील आपण बरोबर नेऊ शकत नाही हे तुकोबांचे बोल जितके विदारक तितकेच खरे आहेत. जमीनजुमला, सोनेनाणे, वस्त्रेपात्रे कशावरच अधिकार उरत नाही. मृत्यूनंतर आपले जर काही उरणार असेल तर आपण केलेली सत्कृत्ये, आपण केलेली निरपेक्ष सेवा, कोणावर तरी

केलेले उत्कट प्रेम, कोणाच्या तरी डोळ्यांतले दु:खाश्रू टिपण्याची कृती, दुसऱ्यासाठी आपण जगलो ते मोलाचे क्षण याच रूपांनी आपण जिवंत राहू शकतो. दिलेल्या आणि घेतलेल्या सद्भावनांची संपत्ती हीच खऱ्या अर्थाने जीवनाला उजळते आणि मृत्यूवरही मात करू शकते. या संपत्तीवरच उच्च मानसिक सुख अवलंबून असते. भौतिक संपत्ती अवश्य मिळवावी, ते पुरुषार्थाचे लक्षण आहे. पण त्या संपत्तीला सर्वभावे शरण जाऊन तिचा दासानुदास होण्यात काहीच अर्थ नाही. अखेर मनुष्य जी विचार भावनांची संपत्ती उत्साहाने गोळा करतो ती त्याच्या मनुष्यत्वाला आणि आनंदाला आकार देते. पैसा हा जीवनाचा एक सामान्य आधार आहे हे खरे. पण तोच पायाभूत आधार आहे, तोच जीवनाचा कळस आहे, तोच ध्येयाचा मध्यबिंदू आहे असे मात्र कधीही समजू नये. या बाबतीतली संतांची वचने काहीशी अतिशयोक्तीपूर्ण वाटली तरी ती वास्तव अनुभवावर आधारलेली आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

जगण्यासाठी पैसा पाहिजे. पैशासाठी जगणे मात्र अखेर दु:खाचेच ठरणार आहे.

□ □ □

# या स्वप्नांनो
# या!

माणूस हा स्वप्ने पाहणारा प्राणी आहे. एखाद्या क्षुद्र झोपडीत लक्तरात राहिलेला माणूस राजप्रासादाची स्वप्ने पाहू शकतो. जितकी ज्याची इच्छाशक्ती तीव्र आणि कल्पनांच्या राज्यात मुक्त संचार करण्याची वृत्ती उत्कट तितकी त्याला अधिक स्वप्ने भेटतात. वास्तव अनेक वेळा भयानक असते. काटेरी असते. अशावेळी मुलायम स्वप्नांच्या मधुर मिठीत माणसाला विसावता येते. त्यातूनच सत्याला सामोरे जाण्याचे धैर्य मिळते. माझी श्रीमंतीची व्याख्या गरिबांना पटल्याशिवाय राहणार नाही. ज्याच्या दृष्टीत अधिकाधिक स्वप्ने तरळत असतात तोच खरा श्रीमंत असतो. कारण त्याच्या स्वप्नांचे रंग झगमगीत असतात. मखमली स्वप्ने पाहायला जीवनाचे आकर्षण असावे लागते. मला वाटते स्वप्ने पाहतो तो माणूस अशी माणसाची सार्थ व्याख्या करता येईल. दुसरा कुठला प्राणी कल्पनांच्या आणि स्वप्नांच्या जगात पाऊल टाकीत असेल असे मला वाटत नाही. पण सारीच माणसे स्वप्नांवर प्रेम करतात, असे मात्र नाही.

एकदा एक विचारवंत म्हणाले, स्वप्नं पाहणं हा एक वेडेपणा आहे. मनाची ती एक विकृती आहे. प्लेटोनं म्हटलं होतं, माझ्या राज्यातून मी कवींना हद्दपार करीन. कारण हे बेटे हवेत स्वप्नं पाहतात. आपल्या स्वप्नांच्या पाठीमागं जनतेलाही ओढून नेतात. कर्तृत्व तर शून्य असतं. तुमच्या त्या गडकऱ्यांची एक कविता चुकून माझ्या वाचनात आली 'प्रेम आणि मरण' हे तिचं नाव. हरे राम! म्हणे एका वृक्षाचं आकाशातल्या विजेवर प्रेम जडलं. तिच्या मीलनासाठी हा तळमळू लागला. एक दिवस ती वीज या झाडावर कोसळली आणि हा म्हणे त्या मीलनाने धन्य झाला. जळून खाक झाला. 'मरण सोसावे, परि पहिले चुंबन घ्यावे'. असल्या विक्षिप्त कल्पना तरुणांच्या मनात कोंबणाऱ्या या कवींना मीदेखील तडीपार करीन किंवा टाडाखाली अटक करीन. बघा बेट्यांनो, वाटेल तेवढी स्वप्नं. अरे, स्वप्नांनी काय पोट भरतं काय? शेती करा. कष्ट करा. पोटात कावळे ओरडू लागले म्हणजे त्यांच्यासमोर तुमच्या स्वप्नांचे तुकडे टाकून चालत नाही. भाकरीशिवाय भूक भागत नाही. त्या विचारवंतांनी कवींची आणि स्वप्नांची भरपूर कुचेष्टा केली. हे स्वत:ला मार्क्सवादी समजत होते. मी त्यांना हसून म्हणालो, अहो, कार्ल मार्क्स हा तर जगातला एक मोठा स्वप्नवादी कवी आहे. कॅपिटल हा त्याचा ग्रंथ अर्थशास्त्रावरचा असेल पण त्यातच त्यानं आपलं एक भव्य स्वप्नं रंगवून ठेवलं आहे. विचारवंतालादेखील स्वप्न पाहावी लागतात आणि आपल्या कल्पनेनं त्यात निरनिराळे रंग भरावे लागतात.

मार्क्सनं कामगार वर्गासमोर आपलं सुंदर स्वप्न ठेवलं आहे. तो म्हणतो, जगातील कामगारांनो एक व्हा. तुम्हाला फक्त आपल्या पायातले साखळदंड गमवावे लागतील आणि त्या मोबदल्यात एक नवं सुंदर जग तुम्हाला मिळेल. आता मला सांगा, कित्येक वर्षांपूर्वी हे स्वप्न मार्क्सनं आपल्या कुंचलीनं चितारून ठेवलं पण हे कितपत खरं झालं? साखळदंड अजूनही पायात खळखळत आहेत. नव्या सुंदर जगाचा अजूनही अरुणोदय झाला नाही. पण लक्षावधी नव्हे कोट्यवधी कामगार हे स्वप्न हृदयाशी कवटाळून घाम गाळीत राहिले. केव्हा तरी स्वप्न खरे होणार हा विश्वास त्यांना वाटतो. स्वत: मार्क्सनंदेखील हे स्वप्न चित्रित केलं तेव्हा तो कंगाल माणूस होता. आजारी मुलांना औषध आणण्याइतकाही पैसा त्याच्या खिशात नव्हता. पोट रिकामं, खिसा रिकामा, पण डोक्यात विचारांची वादळं घोंघावत होती आणि दृष्टीसमोर साम्यवादी स्वप्नं तरंगत होती. कामगारांचं राज्य होणार, भांडवलशाही रसातळाला जाणार ही स्वप्नं मार्क्सच्या लेखणीतून कागदावर उतरली आणि त्यांनी जगभर आपला प्रभाव पाडला. तुम्ही आमच्या गडकऱ्यांची आणि बालकवींची चेष्टा करता. आता मार्क्सबद्दल याच सुरात बोलाल का?

ते विचारवंत गडबडले. पण स्वत:ला सावरून घेत म्हणाले, तुमच्याशी आम्ही वाद करू शकणार नाही. कार्ल मार्क्सनं जगाला एक महान स्वप्न दिलं हे खरं आहे. अहो, पण चार आण्याची भांग घेऊन कल्पना करण्यात काय अर्थ आहे? वेड्याच्या इस्पितळातले वेडेदेखील स्वप्नांच्या राज्यात हिंडत असतात. त्याचा काय उपयोग आहे? स्वप्नं प्रत्यक्षात आणण्याची हिंमत नसेल तर ते पाहण्यात स्वारस्य तर काय? हे त्यांचे म्हणणे मात्र मान्य केले पाहिजे. उगीच एखाद्या काडी पैलवानाने आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवीन असे म्हणण्यात वेडेपणा आहे, यात शंका नाही. पण निदान त्याने तसे स्वत:शी म्हणायला काय हरकत आहे? काशीस जावे नित्य वदावे, अशी एक म्हण आहे. शंभर-दीडशे वर्षांपूर्वी काशीला जाणे हे एक दिव्य होते. त्या काळात त्या स्वप्नांची उजळणी प्रत्येक भाविक माणूस मनाशी करायचा. आज या स्वप्नातली हवाच निघून गेली. कॉलेजातला माझा एक स्वप्नाळू वृत्तीचा सहाध्यायी आठवतो. गबाळग्रंथी, कसलीही कला नसलेला, अभ्यास अगदीच सुमार. पण कॉलेजच्या ब्यूटी क्वीनवर हा बेटा रात्रंदिवस मरत होता. तिचा अनुनय करण्यासाठी काही खेळाडू, दोन-चार कवी आणि सांगायला हरकत नाही पण एक प्राध्यापकही धडपड करीत होते. ती वर्गात असली की तिच्याकडे पाहात ते प्रेमकविता तल्लीनतेने शिकवायचे. तांब्यांच्या प्रेमकविता या सोन्यानं (प्राध्यापकांचं नाव सोनार होतं) अगदी काळजापासून शिकवल्या. त्या ब्युटी क्वीनकडे पाहताना त्याच्या काळजाचे ठोके कमी अधिक होत असतील. असो, मी त्या गबाळ्या सहाध्यायाला म्हणालो, अरे वेड्या, भल्याभल्यांची डाळ शिजली नाही. तू या

प्रेमवीरांच्या रांगेत का असा अवघडून उभा आहेस? अंथरूण पाहून पाय पसरावेत. उगीच आकाशातला चंद्र मिळविण्याचं स्वप्न कशाला पाहतोस?

तो केविलवाणे हसला. एक सुस्कारा सोडीत त्याने म्हटले, मला कळतंय रे सगळं. हे सातासमुद्रापलीकडंचं गुलबकावलीचं फुल कोणत्या तरी राजकुमाराच्या हाती पडणार हे मला माहित आहे. मग निदान आमचा स्वप्न पाहण्याचा हक्क तरी हिरावून घेऊ नका. स्वप्नातच आम्हाला काही गोष्टी मिळविता येतात. आम्हाला आमची स्वप्नं काही काळ तरी वेडेपणानं जपण्याचा शहाणपणा करू द्या. त्याच्या बोलण्यात तीव्र खंत होती. आपले स्वप्न वितळून जाणार आहे, याची त्याला जाणीव होती. पण तरीही त्या स्वप्नानेच त्याला जगण्याची प्रेरणा दिली होती. आपल्या वहीत तो कधी-कधी कवितेच्या ओळी लिहायचा. त्याच्या शब्दात काव्य कितपत होते कुणास ठाऊक? पण त्याच्या मनात मात्र एक कवितेचे रोपटे अंकुरत होते.

नवयौवनातल्या या प्रेमस्वप्नाने तो भारावला होता. जीवन जगण्यासाठी अशीच काही लहान-मोठी स्वप्ने मनात बाळगावी लागतात. त्यातली बहुसंख्य विरून जातात. पण काही थोडी स्वप्ने जेव्हा सफल होतात तेव्हा जीवनाचे गाणे जुळून येते. वैफल्य संपून जाते. स्वप्नेच नसती तर मनुष्य अधिक सुखी झाला असता, अशी एक विचारसरणी आहे. उगीच स्वप्नांचे रंगीबेरंगी फुगे प्राणपणाने फुगवायचे, उंच आकाशात सोडून द्यायचे आणि ते एकामागोमाग एक फुटत चाललेले पाहायचे. स्वप्नभंगाच्या वेदना सहन करायच्या. वास्तवातल्या काट्यांची शल्ये, जाचत असताना चिवट वृत्तीने वाट चालायची. या साऱ्याच गोष्टी निरर्थक नव्हेत का? दररोज स्वप्नांची फुले फुलवायची. त्यांचे निर्माल्य झाले की तो पाचोळा मनातून काढून टाकायचा. यापेक्षा माणसाने वास्तवावरच का प्रेम करू नये? जे वास्तव आहे ते त्याने का स्वीकारू नये? माणूस जर वास्तव निमूटपणे स्वीकारू लागला तर मग माणसात आणि पशुपक्ष्यात काहीच फरक उरणार नाही. अज्ञाताच्या पलीकडे दडलेल्या विश्वाचे रहस्य जाणून घेण्याचे विशाल मनोराज्य उभारणाऱ्या माणसात अल्पसंतुष्ट वृत्ती फार क्वचित आढळते. एक व्यवहारपंडित मला उपदेश करताना म्हणाले, जे मिळतं तेवढ्यावर संतोष मानावा. जगण्यासाठी तेवढं पुरेसं असतं. तुमच्या मर्ढेकरांची 'गणपत वाणी बिडी पिताना' या नावाची एक कविता आहे. फुटपाथवर उभं राहून बिडी ओढताना समोरची टोलेजंग इमारत पाहून मी अशी भव्य माडी बांधणार आहे असे म्हणतो आणि विडीच्या धुरात त्याचे स्वप्न संपून जाते. गणपत वाणीही संपून जातो. यात मला तरी शहाणपणा दिसत नाही. व्यावहारिक दृष्टीने त्यात थोडेफार तथ्य असेल पण मनुष्य व्यवहारात जगत नाही, तो स्वप्नातच अधिक जगतो.

एका गायिकेला आपण अखिल भारतीय कीर्तीची एकमेव गायिका बनणार आहोत, या इच्छेने घेरलेले होते. स्वप्नातदेखील आपल्याला राष्ट्रपतींच्या हस्ते कलेतला

सर्वोच्च पुरस्कार मिळत आहे, असे दृश्य तिला दिसायचे. हजारो श्रोते आपल्या स्वरसौंदर्याने बेभान झाले आहेत. सुरांच्या हिंदोळ्यावर झोके घेत आहेत. आपण त्यांच्या मनात सप्तस्वरांचे चांदणे ओतीत आहोत, या कल्पनेत ती बुडून जायची. पण हा हन्त हन्त! या महत्त्वाकांक्षी कलावतीला घशाच्या कर्करोगाने गाठले. सूर मावळले. तंबोऱ्याच्या तारा तुटून गेल्या. स्वप्नांची पिसे गळून पडली. जीवनगाणे अर्ध्यावरच संपले. स्वप्ने वितळून जातात म्हणून ती कधी पाहायचीच नाहीत काय?

स्वप्नांचेही अनेक प्रकार आहेत. अनेक जाती आहेत. काही स्वप्ने क्षुद्र आणि केवळ आत्मकेंद्रित असतात. स्वार्थभावनेतून पडणारी स्वप्ने व्यक्तीच्या दृष्टीने उपयुक्त ठरली तरी त्यांचा इतरांना काय उपयोग होणार? पण काही स्वप्ने मात्र आकाशासारखी अपार आणि सागरासारखी विशाल असतात. ती स्वप्ने ज्याच्या प्रतिभेला दिसतात त्याच्या संपन्न मनाचे वर्णन करणे कठीण आहे. 'पसायदान' हे ज्ञानेश्वरांचे अतिभव्य आणि उज्ज्वल असे स्वप्नच नव्हे काय? विश्वात्मक देवाजवळ दान मागणारा हा विश्वसंत आणि कवी अवघ्या मानवतेसमोर एक विलक्षण स्वप्न मांडून ठेवीत आहे. त्याच्यापूर्वीही अनेक महापुरुषांनी याच स्वप्नाची रचना केली होती. ज्ञानेश्वर म्हणतात, कलंक नसलेला चंद्रमा आणि तापहीन असा सूर्य या जगाच्या क्षितिजावर उगवावा. सारा अंधार गळून जावा. मंगल प्रभात दृष्टीला पडावी. कल्पतरुंची उद्याने, चैतन्यरूपी चिंतामणीची गावे आणि अमृताचे सागर असलेले जिते जागते ईश्वरनिष्ठांचे समूह जगात मंगलतेचा वर्षाव करीत राहावेत. जो जे वांछील तो ते लाहो. या उत्कट आणि भव्य स्वप्नाचे चित्रण करायला ज्ञानेश्वरांचीच कुंचली समर्थ आहे. जशी त्याची दृष्टी तशी त्याची सृष्टी. स्वप्नाच्या आकृतिबंधावरून स्वप्न पाहणाऱ्याचे व्यक्तिमत्त्व समजते, हेच खरे. आम्हा पामरांची स्वप्ने जमिनीवरून सरपटणारी असतात. कारण आमची दृष्टी आमच्या पायाखालीच खिळलेली असते. माथ्यावर असलेल्या आभाळाकडे नजर जातच नाही. स्वप्न हे माणसाच्या प्रतिभाशक्तीचे मोजमाप आहे, असे म्हणायला हरकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर रात्रंदिवस अशीच स्वप्ने फुलवीत होते आणि हळूहळू त्यात आपल्या कर्तृत्वाची रंगभरणी करीत होते. कोलंबिया विद्यापीठात अर्धपोटी राहून शिकणाऱ्या या तरुणाच्या मनात अनेक स्वप्नांचे मेघ दाटून येत होते. पोटातल्या भुकेकडे दुर्लक्ष करून ज्ञानाची भूक भागविण्यासाठी हा विद्यार्थी कष्टत होता. जन्मभर आंबेडकरांनी आपली तेज:पुंज स्वप्ने कोटी कोटी लोकांच्या पदरात भरभरून टाकली. आपल्या आयुष्याची किंमत देऊन त्यांनी या स्वप्नांची शेती केली होती. ही पेटती स्वप्ने जेव्हा दलितांच्या आणि शोषितांच्या मनात खोलवर रुजली तेव्हा क्रांतीचे वादळ देशभर वाहू लागले. या वादळाला वेसण घालण्याचा कित्येकांनी प्रयत्न केला. पण महापुरुषांच्या वादळी स्वप्नांना पायबंद घालणारी शक्ती अद्यापी

जन्माला यायची आहे. त्यांच्या स्वप्नांना वादळाचे पंख असतात. वणव्याची उष्णता त्यात असते. नवक्रांतीची पहाट जन्माला घालण्याची ताकद प्रतिभावंतांच्या स्वप्नात सामावलेली असते. आंबेडकरांच्या नवसमाज निर्मितीच्या कार्याबद्दल मुद्दाम काही सांगण्याचे कारण नाही. पण या भीमपुरुषाने नव्या युगाला आरंभ केला. कोलंबिया विद्यापीठाच्या वातावरणात जी स्वप्ने त्यांनी पाहिली त्यातूनच नवी शक्ती निर्माण झाली. समर्थांची स्वप्ने ओजस्वी असतात. ती लक्ष लक्ष अंत:करणातल्या ज्योती पेटवतात. अशी सामर्थ्याची आणि सुगंधाची, क्रांतीची आणि शांतीची, सुंदरतेची आणि भव्यतेची स्वप्ने आमच्या मरगळलेल्या मनात पेरणारे क्रांतिदूत आज आम्हाला हवे आहेत. हळव्या आणि दुबळ्या स्वप्नांचा आता वीट आला आहे. आता नवी स्वप्ने, नव्या आशा आम्हाला हव्या आहेत. केशवसुतांनी शब्दांनो मागुते या, असे म्हटले होते. मी स्वप्नांनो, मागुते या असे त्यांना आवाहन करतो. तुम्ही नसाल तर जीवनाचा आधारच संपेल. म्हणून स्वप्नांनो, तुमची सोबत हवी.

□ □ □

# स्तुती आणि निंदा

आपण लोकनेते आहोत, लोकांना आपण उत्तम प्रकारचे नेतृत्व दिले आहे आणि त्यामुळे आपली लोकप्रियता वाढत आहे अशा (गैर) समजुतीत असलेल्या एका गृहस्थाचा एकसष्ठी समारंभ नुकताच साजरा झाला. सुमारे डझनभर वक्त्यांनी गुणवर्णनपर भाषणे केली. एका कवीने (हा स्वत:ला कालिदासाच्या बरोबरीचा समजत होता. बिचारा कालिदास!) आपल्या काव्यात पुढारी महोदय हे आधुनिक काळातले महात्मा गांधी आहेत, असे म्हटले होते. गांधीजींना सध्याच्या काळात वाईट दिवस आले हे यावरून उघड होते. दुसऱ्या एका वक्त्याने छत्रपती शिवाजी महाराजांशी पुढाऱ्याची तुलना केली. एकाने तर राम, कृष्ण इत्यादी विभूतींच्या मालकेत नेते महोदयांना अलगद बसवून टाकले. स्तुतीपूर्ण शब्दांचा पाऊस धो धो पडत होता. पुढारी खुश झाले. आपल्या महानतेची त्यांना खात्रीच पटली. टाळ्यांचा सतत गजर होत होता. (टाळ्या वाजविण्यासाठी काही लोकांची मुद्दाम योजना करण्यात आली होती, असे काही टीकाकार म्हणत होते) गुणगौरवपर भाषणे दोन तासपर्यंत चालू होती. तुकोबांचे एक वचन आहे- 'मोले घातले रडाया, नाही आसू नाही माया'. यात थोडासा बदल करून म्हणता येईल की, 'मोले घातले बोलाया, नाही अर्थ, शब्द वाया'. आपण फार मोठे अलौकिक कार्य केले असून आपला हा सत्कार अत्यंत उत्स्फूर्त स्वरूपाचा आहे, या समजुतीत त्या ग्रामपुढाऱ्याचा तो दिवस अत्यंत आनंदात गेला असेल. पुढे काही दिवस ते लोकप्रिय नेते हवेत तरंगत राहिले असतील. स्तुतीच्या चार शब्दांनी माणसे हुरळून जातात. हे शब्द वास्तव आहेत की आतून बाहेरून पोकळ आहेत, याचा विचारदेखील ते करीत नाहीत. गौरव करताना थोडीफार अतिशयोक्ती असायचीच. जी व्यक्ती गौरवाला पात्र असेल तिच्या बाबतीत थोडीफार अतिशयोक्ती झाली तरी चालू शकेल. एका श्रेष्ठ कादंबरीकाराच्या संदर्भात बोलताना एक रसिक टीकाकार म्हणाले होते, 'या युगप्रवर्तक लेखकाच्या प्रतिभेला मी अभिवादन करतो.' एक अत्यंत खत्रूड टीकाखोर उठून म्हणाले, 'युगप्रवर्तक' हा शब्द मागे घ्या. मला हा लेखक इतक्या योग्यतेचा वाटत नाही'. बरोबरच आहे. त्या टीकाखोराला स्वत:शिवाय दुसरे कोणी 'युगप्रवर्तक' वाटत नव्हते. योग्य व्यक्तीचा योग्य शब्दात कोणी गौरव केला तरी या टीकाखोराच्या पोटात दुखायला लागते. त्याला उत्तर देण्यात आले, 'आपल्या पोटदुखीवर औषध देऊ शकेल असा कोणीही वैद्य अद्यापि जन्मलेला नाही. आपण युगप्रवर्तक आहात आणि आपली पोटदुखीही युगप्रवर्तकच आहे'. एका

समारंभात स्तुतीच्या शब्दांचा अकारण वर्षाव होतो आणि दुसऱ्या ठिकाणी वास्तव गौरवाच्या शब्दालाही हरकत घेण्यात येते. त्या पुढाऱ्याने आपल्याभोवती खुशमस्कऱ्यांचा मेळावा भरवलेला होता. खोटी स्तुती करताना त्याच्या भक्तांनी अतिशयोक्तीची पराकाष्ठा केली होती आणि एका लेखकाच्या जन्मशताब्दी समारंभात एक सार्थ विशेषणसुद्धा मत्सरग्रस्त क्षुद्र माणंसाला टोचले होते. स्तुती आणि निंदा, दोन्ही गोष्टी मनुष्याने बारकाईने तपासून घ्याव्यात, असे मला वाटते. स्तुतीच्या शब्दाआड पुष्कळ वेळा स्वार्थ असतो आणि निंदेच्या पोटात बहुधा रोगट मत्सर असतो. संत तुकारामांच्या काळात काही मत्सरी हरिदास पंडितांनी तुकोबांची निंदा करण्यासाठी भाडोत्री मंडळी गोळा केली असावी. पण तुकोबांचे रसाळ कीर्तन सुरू झाले की, ही मंडळी श्रोत्यांच्या मन:स्थितीचा अंदाज घेऊन मागल्या मागे पलायन करीत असत. तुकोबा हे कवीही नाहीत आणि संतही नाहीत, असे म्हणून त्यांची अर्वाच्य निंदा करणाऱ्या तथाकथित पंडित लोकांचे नावही आज कोणाला माहीत नाही. तुकोबा मात्र काव्यमंदिराचा 'कळस' म्हणून आपल्यासमोर प्रसन्न मुद्रेने उभे आहेत. ज्यांची स्तुती त्या काळात योजनापूर्वक करवून घेतली गेली ते केव्हाच विस्मरणाच्या धुक्यात नाहीसे झाले. काळ हा सर्वांची परीक्षा घेत असतो. जनता हे शेवटचे न्यायासन असते. ते न्यायपीठ काळाच्या मुखाने आपला निर्णय जाहीर करते. मंबाजी हे तुकोबांच्या निंदकाचे नाव केवळ तुकोबामुळे आमच्या लक्षात राहिले. एखाद्या पुढाऱ्याने आपल्या चमच्यांकडून स्वत:ला गांधी-नेहरूंच्या पंक्तीत बसवून घेतले म्हणून काय होणार आहे? समारंभासाठी जमलेले लोक फार तर अनिच्छेने टाळ्या वाजवतात. लोकमनात असल्या हास्यास्पद उपायांनी स्वत:ची प्रतिमा निर्माण करता येत नसते.

सरदार पटेलांना कुणी तरी एकदा म्हटले, 'आपण हा निर्णय घेतलात तर लोक आपल्यावर वाटेल तशी टीका करतील, निंदानालस्ती करतील. आपली इमेज बिघडेल'. सरदार खळखळून हसले. ते म्हणाले, 'देशहिताचे निर्णय घेताना लोक काय म्हणतील याचा विचार मी करीत नाही. लोकांच्या स्तुतीलाही अर्थ नसतो आणि निंदेलाही कारण नसते. माझ्या इमेजची मी पर्वा कधीच केली नाही. जे मला पूर्णपणानं पटतं ते मी करतो'. लोकांना काय वाटेल यापेक्षा मला काय वाटते आणि जे मला वाटते ते कितपत तर्कशुद्ध आहे, कितपत हितावह आहे याचा विचार केला पाहिजे. म्हणून तर 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' ही म्हण प्रचारात आली. ज्यांच्या ठायी कर्तृत्व आहे, आपल्या मनासारखे घडविण्याची ताकद ज्यांच्या मनगटात आहे, ते क्षुद्र लोकांनी केलेल्या निंदेकडे कधीच लक्ष देत नाहीत. कोल्ह्यांच्या कोल्हेकुईची भीती सिंहाला वाटल्याचा दाखला अजून तरी इतिहासात सापडलेला नाही. ज्याला समाजात रचनात्मक कार्य करायचे असते, त्याला जुनाट व्यवस्थेविरुद्ध बंड करावेच लागते.

अशा व्यक्तीची प्रथम उपेक्षा होते. नंतर तिच्यावर निंदेच्या शब्दांचा मारा होतो. उपहास सुरू होतो, पण ही व्यक्ती शांतपणे आणि खंबीरपणे पावले टाकीतच असते. परिस्थितीत बदल घडून येतो. ज्याच्या पदरात निंदानालस्तीशिवाय काही पडलेले नसते त्याच्यावर गौरवाची फुले उधळली जातात. त्यामुळेच स्तुती आणि निंदा या दोन्ही गोष्टींकडे दुर्लक्ष करणेच उत्तम असते.

रवींद्रनाथ टागोरांच्या एका कवितेचा आशय असा आहे, 'तुझ्यासमोरची वाट अंधारी आहे. पण भिऊ नकोस, तुझ्याबरोबर कोणीही असणार नाही. चिंता करू नकोस, आत्मविश्वासाचा कंदिल पेटवून हातात घे. चालत राहा. काही अंतर चालल्यावर तुझ्या लक्षात येईल की, आपल्या पाठीमागे अनेक जण येत आहेत'. एका सुभाषितकाराने गजराज आणि कुत्रे यांचे उदाहरण घेऊन म्हटले आहे, 'सुरक्षित अंतरावरून सामान्य कुत्री भुंकत असतात. डौलदार पावले टाकीत झुलत झुलत जाणाऱ्या गजराजच्या ते गावीही नसते. भुंकणाऱ्या क्षुद्रांकडे तो दृष्टीदेखील वळवत नाही'. आज ज्यांच्या नावाभोवती इतिहासाने प्रकाशवलय निर्माण केले आहे ते अंधारातूनच चालत गेले होते. रामराज्यात रामाचीही निंदा करणारे लोक होतेच. सीतेचाही उल्लेख निंदेच्या सुरात करण्यात आलेला होता. निंदक असल्याशिवाय माणसाच्या कर्तृत्वाला मोहोर येत नाही. निंदकाचे घर नेहमी आपल्या शेजारी असावे. कित्येक वेळा शेजाऱ्याचे घर हे आपल्या निंदकाचेच असते, असे म्हणायला हरकत नाही. काही कवी अत्यंत हळवे असतात. एखाद्या टीकाकाराने प्रतिकूल शब्द उच्चारला तरी ते विव्हळ होतात. कविता लिहिण्यासाठी पुन्हा लेखणी उचलायची नाही, असा निर्णय ते घेतात. खरे तर हा दुबळेपणा आहे. ज्यांनी कधीही कवितेच्या वाटेला चुकूनही जाऊ नये, असे कित्येक लेखणी मजूर स्वत:ला काव्यप्रांताचे राजाधिराज समजतात. त्यांच्या सहवासात बिचारी कविता सुकून गेलेली असते. पण असले तथाकथित कवी चार ·प्रशंसकांच्या बळावर कवितेवर अत्याचार करीतच असतात. अशी परिस्थितीत खऱ्या कवींनी हळवे राहून कसे चालेल? एकदा एका ताज्या दमाच्या कवीचा कोण्या टीकाखोराने मुखभंग केला. तो म्हणाला, 'या कवीला अद्यापी काव्य कशाशी खातात याची अल्पांशानेही जाण नाही. खरं तर याची लेखणी कवीची नसून ती कारकुनाची आहे. या कारकुनानं कवींच्या मेळाव्यात बसू नये.' एका चांगल्या कवीची ही निंदा होती. सौंदर्य हा जसा स्त्रीचा सद्गुण असतो पण तेच काही वेळा तिचे दुर्दैव ठरते. त्याप्रमाणे या कवीच्या प्रतिभेची चमक सहन न झालेल्या एका टीकाकाराच्या पोटात दुखू लागले. त्याने उच्चारलेल्या मूर्ख शब्दांना कवीने केवळ हसायला हवे होते. एक तुच्छतेचे हास्य हेच मत्सरी टीकाखोरांना योग्य उत्तर असते. पण त्या कोवळ्या कवीच्या डोळ्यातून अश्रू आले. अगतिक होऊन सभागृह सोडून तो निघून गेला. निंदकाचे काम झाले. निंदेचे कालकूट पचविण्याची ताकद माणसाच्या

ठायी असली पाहिजे. कितीही शिव्या दे, मी माझा मार्ग तुझ्यासारख्या क्षुल्लक चिलटाच्या विरोधाने मुळीच बदलणार नाही असे म्हणण्याची हिंमत माणसात असावी लागते. नाही तर लांडग्यांचे फावेल आणि सिंहाचे छावे गुहेत दडून बसतील.

आज निंदा करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. स्वार्थी भावनेतून खोट्या प्रशंसेचे ढोल वाजविणारी मंडळी त्याहून अधिक आहेत. स्तुती निंदेच्या गदारोळात व्यक्तीचे आणि कार्याचे मूल्यमापन नीट होत नाही. ही धूळ जेव्हा खाली बसून गढूळलेले वातावरण स्वच्छ होते तेव्हाच इतिहास न्यायाचा धारवाडी काटा हातात घेऊन न्याय देऊ शकतो. ज्याला आपण इतिहास म्हणतो तोसुद्धा कित्येक वेळा मतलबी लोकांनी निंदानालस्तीसाठी किंवा ढोंगी प्रशंसेसाठी लिहिलेला असतो.

इतिहास लेखकाजवळ तरी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन कुठे असतो? शिवाजी महाराज हे एक लुटारू होते. या साहसबाज माणसाने लुटालूट केली. असले धादांत खोटे, मूर्खपणाचे आक्षेप घेऊन काही इतिहास लेखकांनी शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर घाणेरडी चिखलफेक केलेली आहे. शिवाजीचे मूल्यमापन करायला नि:पक्षपाती दृष्टिकोन नसल्यामुळे असले हास्यास्पद निष्कर्ष काढून लेखकांनी इतिहासाला भाकडकथांच्या पातळीवर नेऊन बसविले. एकाने समर्थ रामदासांना औरंगजेबाचे हेर अशी पदवी दिली आहे. रामदास जर औरंगजेबाचे गुप्तहेर असते तर शिवाजी राजासारख्या अत्यंत धोरणी, मुत्सद्दी राज्यकर्त्याला हे कळले नसते काय? 'बुडाला औरंग्या पापी, म्लेंछ संहार जाहला' या ओळी रामदासांनी लिहिल्या असत्या काय? नशीब! अजून महात्मा गांधी हे इंग्रजांचे हेर होते आणि इंग्रजी राज्य बळकट करण्यासाठी ते आतून कारवाया करीत होते, असा जावईशोध एखाद्या इतिहासकाराने लावलेला नाही. पण केव्हा काय लिहिले जाईल हे सांगता येत नाही. संत रामदासांना कोणी आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करतो तर कोणी कादंबरीकार दुसऱ्या बाजीरावाला धीरोदात्त पुरुषांच्या मालिकेत नेऊन बसवतो. दुसरा बाजीराव हा शूरवीर, धर्मनिष्ठ, कर्तबगार पेशवा होता पण त्याला दैव अनुकूल नव्हते, असे म्हणून बाजीरावाला पराक्रमी मुत्सद्यांच्या पंक्तीत बसवले जाते.

इतिहास लिहावा तसा लिहिला जातो. नाटक-कादंबऱ्यांतून तर खऱ्या इतिहासाची दैना उडालेली आहे. जे आपल्याला आवडेल ते खरे मानून त्याच्यावर स्तुतीच्या शब्दांच्या चवऱ्या ढाळायच्या. गौरवाच्या मखरात त्याची प्रतिष्ठापना करायची आणि त्याच्याभोवती एक वलय निर्माण करायचे हा काही लोकांना छंद असतो. जे आवडत नाही त्यावर निंदेचे दगडधोंडे फेकायचे. ते वर येऊ द्यायचेच नाहीत, हा एक उद्योग असतो. सामान्य मनुष्य मात्र जे प्रस्थापित असेल त्याचा निमूटपणाने स्वीकार करतो. त्यावर तो विचार करीत नाही. विचार करून मग निर्णय घेणे ही त्याची कुवत नसते. राजकारणाच्या क्षेत्रात स्तुती आणि निंदा यांचे पाट वाहात

असतात. पण या क्षेत्रातली माणसे निगरगट्ट असल्यामुळे या पाटाबरोबर वाहून जाण्याइतकी ती कच्ची नसतात. एका राजकीय पुढाऱ्यावर विरोधी पक्षाच्या नेत्याने जहरी टीकेची सरबत्ती केली. मग दोघांनीही परस्पर निंदेच्या गढूळ पाण्यात बुचकाळ्या मारल्या. जनता स्तंभित होऊन हा तमाशा पाहात राहिली. पत्रकाराजवळ खुलासा करताना नेता म्हणाला, 'आम्ही दोघेही शिवराळ भाषेत बोललो हे खरं. मधूनमधून अशी धुळवड साजरी केल्याशिवाय लोकांचं लक्ष आमच्याकडे जाणार नाही. पुढारीपण टिकवायचं असेल तर दररोज वर्तमानपत्रात आमचा फोटो आणि भाषण या गोष्टी आल्याच पाहिजेत.' काही तरी सनसनाटी बोलल्याशिवाय वर्तमानपत्रं आमची दखल घेत नाहीत. म्हणून तर स्तुती काय किंवा निंदा काय, अतिरेकी भाषेत करावी लागते. घोषणाही अतिरेकीच कराव्या लागतात. विधानसभेतही निंदेची आणि धिक्काराची भाषा दणदणीतपणाने वापरावी लागते.

ज्याला आक्रमक भाषेत मुक्ताफळं उधळता येतात तो जनतेचा लाडका पुढारी बनतो. बाकी आम्ही कुणाची स्तुती केली किंवा निंदा केली तर ती फार गंभीरपणानं घ्यायची नसते. आम्हीही अशा गोष्टींचा स्वत:ला लेप लागू देत नाही.' स्तुती आणि निंदा यावरचे हे भाष्य मार्मिक नव्हे काय?

□ □ □

# नवी पहाट ꕥ उगवत आहे

कोणत्याही संताच्या चिंतनाचा आणि कार्याचा केंद्रबिंदू 'माणूस' हाच असतो. संतांनी देवाभोवती भक्तिभावाने प्रदक्षिणा घातली हे खरे. पण त्यांचा देव एखाद्या देवळात किंवा प्रार्थनास्थळात नव्हता. तो माणसांतच सामावलेला होता. म्हणूनच तुकोबासारखा संत

तीर्थी धोंडा आणि पाणी। देव रोकडा सज्जनी।।
देव आहे अंतर्यामी। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी।

असे उत्कटतेने म्हणतो. मनुष्याच्या अंत:करणात असलेले देवत्वाचे अंश जागृत करून त्याचे माणूसपण फुलविण्याची आत्यंतिक इच्छा संतांची होती. म्हणूनच ते माणसाला पुन्हा पुन्हा सांगतात, 'तूच आहेस ईश्वरी सामर्थ्याचा आविष्कार. तुझ्यातच दडले आहेत ईश्वरी संगीताचे मधुर सूर. तूच आहेस दैवी संपत्तीचे माहेरघर. प्रयत्न केलास तर तू आपले सारे जीवन उन्नत बनवू शकतोस. निराश होण्याचे कारण नाही. आत्मविश्वासाने आणि नितांत प्रेमभावनेने चालत राहिलास तर तुझ्या पायातळी असलेल्या काट्यांची फुले होऊ शकतील.'

कुणीतरी म्हणेल हा भोळाभाबडा आशावाद आहे. या साऱ्या भ्रांतिष्ट कल्पना आहेत. जगायचे असेल तर माणसाला हातात शस्त्र आणि हृदयात वैरभाव घेऊनच समर्थपणाने जगता येईल. ईश्वरी प्रेम वगैरे कल्पनाविलास आता पुष्कळ झाला. या प्रकारची विचारसरणी नवीन नाही. संगिनीच्या बळावर राज्य स्थापन करणारे तथाकथित शूर वीर इतिहासात पुष्कळ होऊन गेले. खरे तर इतिहासाचे प्रत्येक पान निरपराध मानवी रक्ताने रंगलेलेच आहे. इतिहासाच्या प्रत्येक पानात दुबळ्यांचे अश्रू, त्यांच्या किंकाळ्या आणि प्रबलांनी त्यांचे सांडलेले रक्त आहे. रक्ताचा आणि अश्रूंचा वास येणारा हा इतिहास माणूस बदलू शकेल का? ज्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते त्याच डोळ्यांत जीवनाची सुंदर स्वप्ने फुलवता येतील का? मरणाने उजाड बनलेल्या भूमीवर आनंदी जीवनाची हिरवळ उत्पन्न करता येईल का? हे प्रश्न संतांनी आणि माणुसकीची उपासना करणाऱ्या तत्त्वचिंतकांनी, कवींनी व संशोधकांनी विचारले आहेत. त्यांचा निष्कर्ष असा की, माणसाच्या रानटी मनोवृत्तीत बदल होणे शक्य आहे. माणूस हा मुळातच प्रेमाचा भक्त आहे. सौंदर्याचा तो उपासक आहे. आपण सुंदर व्हावे, आपल्या आजूबाजूचे वातावरण सौंदर्यपूर्ण असावे हीच त्याची इच्छा

असते. अखेर ईश्वराची पूजा म्हणजे तरी काय? आपणच ईश्वर बनण्याची मानसिक उत्कटता अनुभवणे हीच खऱ्या अर्थाने देवत्वाची आराधना असते. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत पोलिस अधिकारी असलेल्या एका माणसाचे आत्मकथन माझ्या वाचनात आले. या निष्ठुर अधिकाऱ्याने स्वातंत्र्याचा जयघोष करणाऱ्या एका जमावावर बेदरकारपणे गोळीबार केला होता. आठदहा लोक ठार झाले. त्यात चौदा वर्षांचा एक कोवळा मुलगाही बळी पडला होता. त्याच्या आईचे आक्रंदन पाहून या अधिकाऱ्याच्या मनात खोल कुठेतरी पश्चातापाची आणि सहानुभूतीची तार छेडली गेली. तिचा करुण झंकार त्याला कंपित करून गेला. हिंदी स्वातंत्र्याचा जयजयकार करणाऱ्या स्वातंत्र्यवादी माणसांवर आपण निर्दयतेने गोळ्या झाडल्या. त्यांचे रक्त सांडले. त्यांचे प्राण हिरावून घेतले. त्यांची घरे उद्‌ध्वस्त झाली. ही जाणीव त्याला जन्मभर जाळीत राहिली. तो म्हणतो, "माझ्यातला तो करडा, निगरगट्ट सहानुभूतीशून्य पोलिस अधिकारी पार जळून गेला. ब्रिटिश सरकारने मला जाहीर केलेले पारितोषिक मी लाथाडले. त्या कोवळ्या पोराची माझ्या हातून झालेली नृशंस हत्या मला रात्रंदिवस असह्य चटके देत होती. ज्या देशभक्तांची मी बीभत्स भाषेत कुचेष्टा केली होती त्यांच्या फोटोंना मी हार घालू लागलो. 'वैष्णव जन तो तेणे कहिये' हे गांधीजींचे आवडते भजन म्हणताना माझे डोळे भरून येऊ लागले. मी पार बदलून गेलो. अन्यायाने मिळवलेली संपत्ती समाजसेवेसाठी वेचली इतके विलक्षण परिवर्तन माझ्यात होऊ शकले याचेच मला आश्चर्य वाटले.'

बाह्य संस्कारांचा परिणाम

पण यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. क्रोध, द्वेष, मत्सर, शत्रुत्व या प्रवृत्तीपेक्षाही करुणा, मैत्री, प्रेम, आनंद या अधिक समर्थ प्रवृत्ती माणसाच्या मनात असतात. बाह्य संस्कारांनी आणि स्वार्थी विचारांनी त्या वर्षानुवर्षे दडपल्या जातात. इतक्या की त्यांना प्रकट व्हायला आपण अवसरही देत नाही. 'इंद्रिया पडिले वळण' अशी अवस्था होऊन जाते. इंद्रिये म्हणतील त्याचे समर्थन बुद्धी करीत असते. मनाचा विरोध हळूहळू क्षीण होत जातो आणि मग मनुष्य आपल्या स्वार्थाच्या पलीकडे पसरलेले एक विशाल जग आहे त्याच्याशी आपण समरस झाले पाहिजे हेच पूर्णपणे विसरून जातो. आपल्याच क्षुद्र सुखदुःखांच्या वर्तुळात तो फिरत राहातो. भोवंड येईपर्यंत फिरतो, पण कोणत्या तरी कारणाने मनुष्याच्या दडपल्या गेलेल्या सात्विक प्रवृत्ती उसळून वर येतात. तो अंतर्मुख होतो. हृदयाच्या तळाशी असलेले प्रेमभावनेचे संगीत हळूहळू त्याच्या जीवनात उमटू लागते. हे संगीत जागे करण्यासाठी आत्मभान येणे आवश्यक आहे. गांधीजी यालाच 'आतला आवाज' असे म्हणत होते. मनाची शुद्धता करणारे हे भावनांचे दिव्य संगीत बाहेरून आणावे लागत नाही. ते अंतर्यामीच असते. पण त्याची बहुसंख्य लोकांना किंचितही जाणीव नसल्यामुळे आजच्या जगात

पावलोपावली माणुसकीची घृणास्पद विटंबना चाललेली आपण पाहातो. सत्तेसाठी, संपत्तीसाठी, स्वार्थी इच्छांच्या पूर्तीसाठी रक्ताचे सडे शिंपताना माणूस लेशमात्रही कचरत नाही. यापेक्षा मूल्यांची अधिक विटंबना काय होऊ शकते? सूडाने पेटलेला दुर्योधन आणि दु:शासन यांनी भर दरबारात द्रौपदीला विवस्त्र करण्याचा प्रयत्न केला. ही महाभारतातली कथा मला तरी अतिशयोक्तीपूर्ण वाटत नाही. सत्तालंपटांनी आणि संपत्तीच्या अंधभक्तांनी आजच्या जगातही संस्कृतीचे आणि सभ्यतेचे निर्लज्ज वस्त्रहरण चालवलेच आहे. आजचे जग विज्ञानाने प्रगत झालेले आहे. चंद्रावर पाऊलखुणा उमटवणारा आजचा शास्त्रसंपन्न माणूस संस्कृतीने आणि अंत:करणाने किती कंगाल, किती क्षुद्र आहे हे सिद्ध करण्यासाठी उदाहरणे देण्याची जरूर नाही. पण म्हणून जग कधीच सुधारणार नाही असला दुबळा निराशावाद संतांच्या मनाला स्पर्श करू शकत नाही. सुधारण्याशिवाय जगाला गत्यंतर नाही. मला जगायचे असेल तर मी दुसऱ्याला जगू दिले पाहिजे. या विचारसरणीकडे वळलेच पाहिजे. अंधार फार झाला अशी कुरकुर करीत अंधारातच बसून राहिलेल्या आणि अंधाराला केवळ शिव्याशाप देणाऱ्या मनोवृत्तीमुळे कधीच पहाट होणार नाही. पहाट जन्माला घालावी लागते. प्रकाशावर प्रेम करणारी भावना जोपासावी लागते.

संतांनी उद्याच्या जगाचे जे चित्र रंगवले आहे ते प्रत्यक्षात साकार करण्यासाठी मानवतेला अजून पुष्कळ चालावे लागेल. एक विद्वान गृहस्थ मला म्हणाले, 'अहो, हे जग असेच राहणार आहे. जसे ते काल होते तसेच आजही आहे. उद्याही त्याच्यात कसलाही बदल होणार नाही. कुत्र्याचे वाकडे शेपूट सरळ झालेले तुम्ही कधी पाहिले आहे का?'

प्रश्न मार्मिक होता. पण म्हणून तो तर्कशुद्ध होता असे मात्र नव्हे. इतिहासाचा अभ्यासक सांगू शकेल की बाह्य जगात ज्याप्रमाणे परिवर्तने होतात त्याप्रमाणे मनुष्याच्या आंतरिक जीवनात आणि प्रवृत्तीत परिवर्तने होत आली आहेत. एकेकाळी गुलामगिरीचे, वेठबिगारीचे, नरबळीचे, सती जाण्याच्या प्रथेचे तावातावाने समर्थन केले जात होते. आज समर्थन तर राहोच पण या प्रकारच्या घटना अगदीच अपवाद म्हणून घडतात आणि त्या घृणास्पद आहेत म्हणून त्यांचा धि:कार केला जातो. मानवी ज्ञानात व जीवनविषयक दृष्टिकोनात सुधारणा होत चालली आहे. तिची गती मंद असेल पण तरीही काही निंदास्पद प्रवृत्तींवर आणि रुढींवर मनुष्याने विजय मिळविला आहे. वाकडे शेपूट सरळ होत नसेल पण ज्ञानेश्वरांच्या इच्छेप्रमाणे,

खळांची व्यंकटी सांडो। तेयां सत्कर्मी रति वाढो।
भूतां परस्परे पडो। मैत्र जिवांचे।।

दुष्ट प्रवृत्ती पराभूत व्हावी ही भावना केवळ संतांची नव्हे तर सामान्य माणसांचीही असते. ही भावना जसजशी उन्नत आणि उत्कट व प्रबल होत जाईल

तसतसे मानसिक परिवर्तन होत जाईल. कुणी काहीही म्हटले तरी शत्रुत्वाला जिंकणारी, द्वेष मत्सराला वितळवून टाकणारी प्रेमभावना माणूस निश्चितपणे जोपासत आहे. कधीकधी त्याला हिंसेचे आणि अत्याचारी विचारांचे प्रचंड झटके येतात. हिरोशिमा, नागासाकीसारखी नगरे हिंसेच्या ज्वालेत भस्मसात होतात. पण आज त्याच भूमीवर हजारो माणसे हातात सुगंधी फुले घेऊन शांतीचा आणि प्रेमाचा जयजयकार करतात. झालेल्या विध्वंसाबद्दल अश्रू ढाळतात. अंधाराला आपल्या प्रकाश किरणांनी छेद देणाऱ्या हजारो, लाखो पणत्या माणुसकीचा संदेश देत आहेत. हे दृश्य पाहिल्यावर आजपर्यंत धर्मसंस्थापकांनी, तीर्थंकरांनी, संत महंतांनी पाहिलेली स्वप्ने कधीच खरी होणार नाहीत असे कुणी म्हणू शकेल काय?

गांधीजी, फुले आणि आंबेडकर यांच्या दृष्टीसमोर एक नवे जग तरळत होते. साऱ्या सांप्रदायिक भेदांच्या ठिकठिकाणी उभारलेल्या कर्मठ भिंती पाडून माणूस एकत्र येऊ शकेल आणि त्याच्या अंत:करणातून एकतेची ललकारी उमटू शकेल असेच त्यांना वाटत होते. त्यांच्या डोळ्यांसमोर या कल्पित जगाचे काही वेळा तुकडे तुकडे झाले. पण त्यांचा धीर सुटला नाही. आपल्याला अभिप्रेत असलेले वातावरण आज नाही तर भविष्यकाळात तरी निर्माण होणार आहे ही आशा त्यांच्या मनात तेवत होती. हिंसा, रक्तपात आणि विषमता, अन्याय यांचा वीट सामान्य माणसाला आलेला आहे. अशावेळी मूठभर सत्ताधीशांना हिंसेचे समर्थन करता येणार नाही. सामान्य मणसाच्या सुरातच त्यांनाही गावे लागेल. अन्यथा त्यांना सत्तेवरून जावे लागेल. एक नवा माणूस, एक नवा समाज, एक नवी संस्कृती, एक नवी पहाट जन्माला येत आहे. मुक्तीचा संदेश देणारा कृष्ण कारागृहातच काळोख्या रात्री जन्माला आला ही घटना जितकी आनंददायक तितकीच परिवर्तनाची कोवळी पहाट उजाडण्याची घटनाही आनंददायक ठरेल. त्या आनंदाची आपण वाट पाहात राहू. त्या आनंदाची वाट चालत राहू.

□ □ □

# पुस्तकाची ※ पाने

एका प्रसिद्ध महाविद्यालयात मराठी विषयासाठी अधिव्याख्यात्याची नेमणूक करायची होती. निवड समितीचे सदस्य उमेदवारांच्या मुलाखती घेत होते. पंचवीस तीस उमेदवारांची त्यांनी चाचणी घेतली. पण नेमणुकीला योग्य असा कोणीही त्या समितीला आढळला नाही. खरे तर बहुतेक उमेदवार विद्यापीठाची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले होते. त्यांची गुणपत्रिका पाहून हे मराठी विषयातले पारंगत विद्वान आहेत अशीच समजूत व्हावी. पण कोणत्याही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मात्र कोणी देऊ शकले नाही. परीक्षेसाठी कोणकोणत्या पुस्तकांचा अभ्यास केला त्यांची नावेही बहुतेकांना सांगता आली नाहीत. याचे कारण ती पुस्तके त्यांनी अभ्यासलेलीच नसावीत. अशा विद्यार्थ्यांना परीक्षेत पहिला वर्ग कसा मिळतो हा एक संशोधनाचा विषय ठरावा. कदाचित उत्तरपत्रिका न वाचता गुणवत्ता ठरवण्याची नवीन पद्धती विद्यापीठात अस्तित्वात आली असावी. साध्या प्रश्नांची उत्तरेही मुलाखतीत नीटशी देता न आल्यामुळे या उमेदवारांच्या गुणपत्रांवर विश्वास ठेवण्यात अर्थ नव्हता. निवड समितीने विचारलेले काही प्रश्न पुढीलप्रमाणे होते-

ज्ञानेश्वरीची रचना कोणत्या शतकात झाली? ज्ञानपीठ पुरस्कार कोणत्या मराठी साहित्यिकांना मिळाला? 'ययाती' या कादंबरीचे लेखक कोण? बालकवींच्या एखाद्या तुम्हाला आवडलेल्या कवितेचे वैशिष्ट्य काय आहे? हे अत्यंत साधे आणि शाळकरी प्रश्न उमेदवारांची पात्रता लक्षात घेता त्यांना विचारावे लागले. या प्रश्नांना मिळालेली उत्तरे ऐकताना एकीकडे करमणूक होत होती आणि दुसरीकडे आमच्या मराठी साहित्याच्या अध्यापनाचे भवितव्य आता या लोकांच्या हातात जात आहे, याचा खेदही वाटत होता. मिळालेली नमुनेदार उत्तरे अशी- 'ज्ञानेश्वरी हा ग्रंथ महाभारताच्या काळात रचला गेला. निश्चित शतक सांगता येत नाही, कारण हा अत्यंत प्राचीन ग्रंथ आहे. 'हरिभाऊ आपटे यांच्या एका खंडकाव्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला.' 'आचार्य अत्रे यांनी 'ययाती' कादंबरी लिहिली. पुढे त्यावर चित्रपटही काढला.' बालकवींची 'झुक झुक झुक आगीन गाडी' ही कविता मला विशेष आवडली. कोणत्याही प्रकारे कल्पनेची किंवा अतिशयोक्तीची भर न टाकता ही काही मासलेवाईक उत्तरे सादर केली आहेत. माझ्या दुर्दैवाने निवडसमितीचा मी एक सदस्य होतो.

दगडापेक्षा वीट मऊ म्हणून त्यातल्या त्यात थोड्याशा 'अभ्यासू' वाटणाऱ्या

एका उमेदवाराची अपरिहार्यपणे निवड करावी लागली. पण त्यानेही मराठी साहित्यातली निर्विवाद श्रेष्ठ समजली जाणारी पुस्तके वाचली नव्हती. वाचण्याची उत्सुकताही या विद्यार्थ्यांना वाटली नव्हती. ज्या महाविद्यालयात आणि विद्यापीठात त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला होता त्यात उत्तम, अद्ययावत ग्रंथालये आहेत. पण तरीही या ग्रंथालयाचे त्यांना काहीच आकर्षण नसावे, परीक्षेत त्यांना केवळ उत्तीर्ण व्हायचे होते. वाचनातून आपले व्यक्तिमत्त्व घडावे, जिज्ञासेला खाद्य पुरवावे, विविध प्रकारची पुस्तके वाचून थोडेफार बहुश्रुत व्हावे ही ओढच आजच्या प्रौढ विद्यार्थ्यात दिसू नये ही एक सांस्कृतिक आपत्ती आहे असे मला वाटते. एम.ए.ची परीक्षा दिलेल्या एका विद्यार्थ्याला मी विचारले होते, 'हॅम्लेट नाटकात हॅम्लेट या पात्राचे एक अत्यंत प्रसिद्ध असे 'स्वगत' आहे, त्याचा आशय निदान त्यातलं एखादं वाक्य सांगशील काय?' तो विद्यार्थी म्हणाला 'मी मराठीचा अभ्यास केला आहे. इंग्रजी हा माझा विषय नाही.' या उत्तराचेही मला हसू आले. डबल ग्रॅज्युएट झालेल्या कोणत्याही माणसाला शेक्सपिअरचं 'हॅम्लेट', कालिदासाचं 'शाकुंतल', रवींद्रांची 'गीतांजली' किंवा प्रेमचंदांची 'गोदान' या साहित्यकृती माहीत असू नयेत ही एक लज्जास्पद घटना आहे. पदवीधर सर्वज्ञ नसतात हे मान्य; तसा कोणीच सर्वज्ञ असत नाही. पण साहित्याच्या क्षेत्रातल्या अग्रगण्य व्यक्तींची आणि कृतींची नावे माहीत नसणे हा माझ्या दृष्टीने एक गंभीर गुन्हा आहे. ज्याच्या जिभेवर ज्ञानेश्वराची एखादीही ओवी कधी आली नाही, तुकोबाचा अभंगही ज्याने कधी उच्चारला नाही त्याला महाराष्ट्रांत राहण्याचा अधिकारच नाही. माझे हे विधान कित्येकांना दुराग्रही वृत्तीचे वाटेल. हा आरोप मान्य करूनही मी म्हणतो की, श्रेष्ठ साहित्यकृतींचा, कलावंतांच्या कलाकृतींचा, आपल्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा ज्याच्या बुद्धीला किंवा अंतःकरणाला ओझरताही स्पर्श झाला नाही किंवा ज्याने तो करून घेतला नाही त्याचा अपराध भयानक आहे. कोणत्याही विद्याशाखेतला विद्यार्थी असो, त्याला आपल्या संस्कृतीचे आणि साहित्याचे स्पर्श झाले पाहिजेत. श्रेष्ठ ग्रंथांतून हे 'जिवंत स्पर्श' वाचकाला होत असतात आणि त्यातूनच त्याच्या मनात एक सुंदर भावविश्व तयार होत असते.

आनंदाचे अनेक प्रकार असतील, पण उत्तमोत्तम पुस्तकांचे वाचन करण्यातला आनंद काही आगळाच असतो. हा आनंद ज्याला उपभोगता येत नाही तो कपाळकरंटाच म्हणावा लागेल. मद्याच्या बाटल्यावर हजारो रुपये उधळणारे उच्चभ्रू लोक मी पाहिले आहेत. त्यातले काही रसिक बाटलीला 'ग्रंथ' म्हणून संबोधतात. या 'ग्रंथांचे' वाचन ते मनःपूर्वक करतात. पुन्हा पुन्हा करतात. पण एखादी उत्कृष्ट साहित्यकृती हाती घेऊन तिच्या आस्वादात ते बुडून गेले आहेत असे दृश्य मात्र कधीच दिसत नाही. पुस्तकांसाठी पैसा वेचणे हे त्यांना व्यवहारशून्यतेचे लक्षण वाटते. पुस्तकांच्या माध्यमातून मिळणारे समाधान इतर भौतिक आनंदापेक्षा अगदीच आगळे असते, हे

त्यांना केव्हा समजणार? ज्ञानेश्वरांनी सरस्वतीचे वर्णन करताना तिला तीन मार्मिक विशेषणे देऊन आपली अभिजात रसिकता प्रकट केली आहे. 'अभिनव वाग्विलासिनी' 'चातुर्यकलाकामिनी' आणि 'विश्वमोहिनी' या शब्दांतून साहित्याचे सारे रमणीय विशेष त्यांनी प्रकट केले आहेत. इतर कोणत्याही गोष्टीची नशा ओसरून जाते. ती नशा मनाला आणि बुद्धीला दुर्बल बनवते, पण साहित्याची नशा कधी ओसरत नाही. वाढत्या वयाबरोबर ती गणितश्रेणीने वाढत असावी. पंचाहत्तरी पार केलेले एक गृहस्थ नित्यनियमाने ग्रंथालयात येतात. नवीन पुस्तके कोणती आली आहेत याची चौकशी करतात. नवे काही मिळाले नाही तर एखादा जुना अभिजातग्रंथ पुन्हा वाचण्यासाठी घेऊन जातात आणि आजपर्यंत या ग्रंथाचे जे रूप दिसले नव्हते ते या वाचनात कसे जाणवले याची उत्कटतेने चर्चा करतात. पुस्तकावरून हात फिरवतानादेखील ते जणू वात्सल्याने एखाद्या बालकाला कुरवाळीत आहेत असे वाटते. कदाचित एखादा पुस्तकशत्रू त्यांना वेडा ठरवील. पण वाचनाच्या वेडाने या माणसाने आपल्या किती तरी दु:खांवर आणि वार्धक्यावर मात केली आहे. या वेडाने त्यांच्या जगण्याला आनंदाचा स्पर्श झाला आहे. आपले लग्न कोणत्या साली झाले हे ते विसरतात. पण मेघदूताचा लेखनकाल कोणता असावा यावर अधिकारवाणीने बोलतात. पुस्तक हे त्यांच्या प्रेमाचे आत्मीय भावनेचे निधान आहे. या पुस्तक प्रेमिकांचे दर्शन झाले म्हणजे मला माझ्या अल्पवाचनाबद्दल खंत वाटते. किती तरी सुंदर साहित्यकृतींचे मी अद्यापि वाचन केले नाही याची दु:खद जाणीव होते.

एकदा एका किराणा मालाच्या व्यापाऱ्याने मला प्रश्न विचारला होता, 'एवढी पुस्तकं तुम्ही वाचलीत, महिन्याला तुम्हाला पगार किती मिळतो? पुस्तकाला हात न लावता मी आज महिन्याकाठी तीस-चाळीस हजार कमवू शकतो. परवा म्युनिसिपॉलिटीच्या निवडणुकीतही निवडून आलो. पुस्तकांच्या फंदात पडलो असतो तर हे यश मला मिळालं असतं का?' त्या व्यापाऱ्याला मी काय सांगणार? जीवनातले सारे सौंदर्य पैशात साठवलेले आहे, ही ज्याची दृढश्रद्धा होती त्याला पुस्तकाची पाने शेंगदाणे बांधून देण्यासाठी थोडीफार उपयोगी पडतील, यापलीकडे त्याला पुस्तकांचे महत्त्व पटणे शक्य नाही. त्याच्याशी कोणताही युक्तिवाद न करता मी माझा पराभव मान्य केला. भवभूतीच्या नाट्य साहित्याकडे उपेक्षेने पाहणारा एक वर्ग त्याच्या कालखंडात होता. ज्यांना साहित्यातले काही कळत नाही त्यांनी साहित्याची समीक्षा करावी, अशी पद्धती त्या काळातही होती. भवभूतीचा उपहास झाला तेव्हा तो इतकेच म्हणाला की, 'त्यांच्यासाठी माझे लेखन नाही. (तान, प्रति, नैष यत्न:) पण केव्हा तरी आणि कुठे तरी मला 'समान धर्मा' रसिक भेटेल. या अफाट पृथ्वीवर आणि अनंत काळात त्याची भेट निश्चित होईल. अरसिकांसाठी माझी नाटकं नाहीत' याच चालीवर त्या श्रीमंत व्यापाऱ्याला मी उत्तर देऊ शकलो असतो, पण तेही त्याला

समजले नसते.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे विलक्षण ग्रंथप्रेमी होते. अनेकविध ग्रंथांच्या वाचनातून त्यांच्या बुद्धीला आणि व्यक्तिमत्त्वाला तजेला आलेला होता. एकदा त्यांच्या पत्नीने त्यांना विशेष आवडणाऱ्या हापूस आंब्याच्या काही फोडी करून ते ताट त्यांच्यासमोर ठेवले. रानडे आपल्या अभ्यासिकेत बसून वाचन करीत होते. आंब्याची एक फोड घेऊन त्यांनी चाखली. ताट बाजूला सारले आणि ते पुन्हा वाचनात बुडून गेले. थोड्या वेळाने पत्नीने विचारणा केली तेव्हा ते म्हणाले, 'आंबा अत्यंत स्वादिष्ट आहे, यात शंकाच नाही. एका फोडीवरूनच इतर फोडींच्या गोडीची कल्पना आली. पण जो ग्रँथ मी वाचतो आहे. त्यातल्या प्रत्येक पानाची रुची वेगळी आणि अवीट मधुर आहे. इतक्या विलक्षण रुचीचा अनादर करून आंबे खात बसण्यात वेळ घालवणं मला श्रेयस्कर वाटत नाही.' रानड्यांचे हे उत्तर सुजाण रसिकतेचे आहे. वाचनाच्या अभिरुचीला ओहोटी लागण्याची अनेक कारणे असू शकतील. आजच्या यंत्रप्रणीत धावपळीच्या जगात पुस्तकाचे शांतपणे वाचन करण्याइतके स्वास्थ्यही कोणाला नाही. पुरेसा वेळही मिळत नाही. बोरिवली ते चर्चगेट या लोकलच्या प्रवासात वेळ घालवण्यासाठी एखादे सुमार दर्जाचे साप्ताहिक चाळणारे 'किंचित वाचक' ग्रंथवाचनाकडे कसे वळणार? हलक्या-फुलक्या भाषेतून लिहिलेले आणि एखादे ढोबळ कथानक असलेले शंभर पृष्ठांपर्यंतचे चोपडे वाचले म्हणजे डोक्यावरून पाणी गेले ही अवस्था आहे. निष्ठेने वाचणारी पिढी आता संपत आली आहे. व्रतस्थ वृत्तीने टी.व्ही. समोर ठाण मांडून बसलेले निष्ठावंत घरोघर दिसू लागले आहेत. जीवनाचा कलह अधिक गुंतागुंतीचा आणि उग्र होत चालला. वाचन, लेखन, चिंतन या गोष्टी कालबाह्य होत चालल्या. अशा परिस्थितीत महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक ग्रंथापासून दूर जात असतील तर त्यात आश्चर्य कोणते? वर्षभरात कॉलेजच्या लायब्ररीत पाऊलही न टाकणारे प्राध्यापक असू शकतील, यावर कोणाचा विश्वास बसेल का? पण ही उदाहरणे खरी आहेत. ती अपवादात्मक राहिली नाहीत. पुस्तकांचे वाचन म्हणजे केवळ शब्दांचे वाचन नव्हे. शब्दांच्या मागे लेखक-कवींचे, विचारवंतांचे व्यक्तिमत्त्व उभे असते. त्या व्यक्तिमत्त्वाला शब्दांच्या माध्यमातून भेटता आले पाहिजे. तुकोबांचा एखादा अभंग वाचताना किंवा ऐकताना अनेक वेळा स्वतः तुकोबाच मनःश्चक्षूसमोर येऊन उभे राहतात. त्यांच्या मुद्रेवरची प्रसन्नता, विनम्रता, सुसंकृतता आपल्याला आकृष्ट करून घेते. अभंगांच्या शब्दांत साठवलेला जीवनरस अंतःकरणात मुरत जातो आणि मग हा कवी परका न राहता आपल्या घनिष्ट मित्रांच्या मेळाव्यात सामावून जातो. हा तुकाराम आपल्यामधून कधीच दूर जाऊ शकत नाही. याच प्रकारचा अनुभव जातिवंत प्रतिभावंतांच्या अनेक पुस्तकांतून मिळू शकतो. उत्तम वाचकाची तुलना रसिक भ्रमराशी करायला हरकत नाही. निरनिराळ्या फुलांतून तो मध शोषून

घेतो. प्रत्येक मधुबिंदूची चव वेगळी असते. या साऱ्या रुचींचे आणि रसांचे समीक्षण तो करीत असतो. अशा मधुकरी वृत्तीच्या वाचकाला जीवनातल्या सुख-दु:खाचा अर्थ आणि रंग-गंध पुस्तकांतून मिळू शकतो. चांगली पुस्तके रसिकांच्या मनात काही भव्य स्वप्नांची पेरणी करू शकतात. कित्येक विचारवंतांच्या आणि क्रांतिकारकांच्या स्वप्नांना फुलवण्याचे कार्य ग्रंथांनीच केले आहे. टिळक-फुले-आंबेडकर-नेहरू या व्यक्तित्वांची उभारणी ग्रंथांनी केली, असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. पण हे जाऊ द्या! आभाळ भरून आले आहे, वारा वाहात आहे, पावसाची चिन्हे दिसत आहेत, अशावेळी आपल्या आवडत्या कवीचे काव्य घेऊन ते वाचावे आणि वाचता वाचता काही रोमांचक आठवणींच्या गर्द झाडीत हरवून जावे, यासारखा दुसरा आनंद असेल का? निदान एक प्रकारच्या अस्वस्थ आनंदासाठी चांगल्या पुस्तकाच्या अंतरंगात प्रवेश करावा, त्याच्याशी मुक्त संवाद करावा. त्यांच्या सान्निध्यात काही मधुर कल्पना फुलवाव्यात, व्याकुळ मनाचे सांत्वन करावे. दूर गेलेल्या प्रिय व्यक्तीला अशा वेळी साद घालावी. प्रतिसाद मिळाल्याशिवाय राहणार नाही. यापेक्षा अधिक काय सांगू? झाडांची हिरवीगार पाने वाळून जातात, पण श्रेष्ठ ग्रंथांची पाने मात्र सदैव रसरशीतच राहतात.

□ □ □

# दुसरे
※
# बालपण

म्हातारपण आणि मरण यांची भीती ज्याला वाटत नाही असा कोणी असेल काय? असल्यास तो मुक्त तरी असावा किंवा वेडा तरी असावा. तारुण्याला वार्धक्याने आणि जीवनाला मृत्यूने वेढून टाकले आहे. कवी मोरोपंतांनी पांढऱ्या केसांना यमाच्या सैन्याची ध्वजा असे संबोधले आहे. तुकारामांनीही 'जरा कर्णमूळी सांगो आली गोष्टी। मृत्याचिये भेटी जवळी आली।।' असे म्हटले आहे. कानाजवळचे केस पांढरे झालेले पाहून आता मरणाची भेट जवळ आली, असेच जणू म्हातारपण कानगोष्टीत सांगत आहे, अशी त्यांनी कल्पना केली. वार्धक्याचे वर्णन अनेकांनी अनेक प्रकारांनी केले आहे. याचे कारण आता आपले सामर्थ्य संपले, स्वप्ने रंगविण्याचे दिवस पाखराप्रमाणे उडून गेले. आता केवळ उरल्या मरगळून गेलेल्या म्हातारपणातल्या अंधाऱ्या रात्री. सांधे दुखत आहेत, खोकल्याची उबळ अनावर होत आहे. कुणाच्या तरी आधाराशिवाय उठता येत नाही, पुढे पाऊल टाकता येत नाही. संवाद ऐकायला कोणी जवळ फिरकत नाही. कान बधिर झाले, शरीर मधून मधून संप करू लागले. या प्रकारच्या अवस्थेला कोण घाबरणार नाही? असले म्हातारपण मरणापेक्षाही भयानक असते हेच खरे! पण म्हातारपणावरही काही कवींनी सुंदर कल्पना केल्या आहेत. तांब्यांची 'रिकामे मधुघट' ही कविता मला नेहमीच तरुण वाटत आली आहे. 'संध्याछाया' आणि 'लागले नेत्र रे पैलतीरी' या शब्दांतून त्यांनी वार्धक्याचे चित्र साकार केले आहे. जीवनातला मध काढण्यासाठी आता बोटात बळ उरले नाही. आता घट रिकामाच राहिला. ही कविता कधीच म्हातारी होणे शक्य नाही. कवीला म्हातारपण येते, पण सुंदर कवितेला त्याचा स्पर्शही होत नाही.

म्हातारपणाबद्दल तक्रार करताना एका रसिक कवीने मिश्किलपणे म्हटले आहे, 'दृष्टी मंद झाली, ऐकण्याची शक्ती क्षीण झाली, चालताना पाय अडखळू लागले, तोंडातले दात कमी होऊ लागले, तरी मला या गोष्टींची मुळीच भीती वाटत नाही. म्हातारपणाला मी केवळ एकाच गोष्टीमुळे घाबरतो. आता सुंदर सुंदर तरुणी माझ्याकडे सहानुभूतीने पाहतील आणि मला आजोबा म्हणून हाक मारतील हीच भीती मला सदैव वाटते.' आपण युवतींच्या करुणेचे विषय बनू आणि त्यांनी केवळ आपल्याकडून शाब्दिक आशीर्वादाची अपेक्षा करावी, याचे शल्य त्या कवीच्या मनाला टोचत होते. 'ययाती'सारख्या भोगलंपट माणसाला वार्धक्याचा तिरस्कार वाटावा आणि त्याने पुन:पुन्हा तारुण्याची याचना करावी हे स्वाभाविकच आहे. त्याची वासना सदैव

तरुण राहिली, अतृप्त राहिली. म्हणूनच आपल्या मुलाचे तारुण्य उसने घेऊन तो वासनेच्या बेहोशीत जगत राहिला. वार्धक्यातही एक प्रकारची शांती, तृप्ती आणि आनंद असतो याची कल्पना त्या विषयांध सम्राटाला कधी येऊ शकली नाही. तारुण्याचा जयजयकार सारेच करतात. एका अर्थाने ते सयुक्तिकही आहे, कारण तारुण्याच्या अवस्थेत मनुष्य सुखमय कल्पनांच्या उंच आकाशात स्वच्छंदी भराऱ्या घेऊ शकतो. त्याच्यापाशी कर्तृत्वाचे व महत्त्वाकांक्षेचे बळकट पंख असतात. आभाळावर स्वारी करून, नक्षत्रांची फुले खुडून ती आपल्या प्रेयसीच्या केशकलापात खोवू शकेन, असा आत्मविश्वास तारुण्यातच असतो. वास्तवापेक्षा स्वप्नावरच त्याचा अधिक भर असतो. वास्तवातल्या काट्याकुट्यांची कदर न करता स्वप्नगीतांच्या धुंद सुरात बुडून जाणे हेच तारुण्याचे लक्षण असते. कुठल्या तरी चित्रपटातले एक गीत आठवते, 'तू मी दोघे मिळुनी सखया, चल चंद्रावर स्वारी करू या' चित्रपटातले हे गीत ऐकत असताना माझ्या शेजारी बसलेले एक म्हातारेसे गृहस्थ म्हणाले,

'शुद्ध मूर्खपणा आहे हा! हे दोघे मिळून म्हणे चंद्रावर स्वारी करणार! दहा बाय दहाची खोली राहायला मिळाली तरी पुष्कळ झालं! बेट्यांनो चंद्र तुमच्यापासून हजारो मैल दूर आहे हे तरी लक्षात घ्या, असल्याच मूर्ख कल्पनांनी ही तरुण माणसं बेताल बडबड करतात.' त्या वृद्धाला तरुण पिढीचे हे स्वप्न किती उन्मादक आहे, किती रोमांचक आहे हे समजणे शक्यच नव्हते. त्याची अवस्था 'विझूनी अता यौवनाच्या मशाली, उरी राहिले काजळी कोपरे' अशी झाली होती. तारुण्यातल्या आशा-आकांक्षा तो आता पार विसरून गेला होता. ऐन तारुण्यातली धुंद प्रेमकहाणी अशाच स्वप्नांनी झगमगलेली असते, हे त्याला या अवस्थेत उमजणे अशक्य होते. एक प्रेमी जोडपे परस्परांशी हितगुज करताना म्हणत होते, 'वर्षे उलटतील, शतकं संपून जातील, चंद्र आणि तारेसुद्धा जेव्हा राहणार नाहीत तेव्हाही आपण असेच एकमेकांच्या करपाशात राहिलेले असू.' अशा प्रकारचा आशावाद कितीही भ्रामक असला तरी तो सुंदर आहे. वेडे स्वप्नरंजन हा तारुण्याचाच आविष्कार आहे. ज्याला तारुण्यात कसलीही स्वप्ने पडत नाहीत, एखाद्या मोहाच्या पाठीमागे ज्याला कधी धावावेसे वाटत नाही त्याला तरुण कशासाठी म्हणायचे? केवळ वय तरुणाचे असले म्हणून ते तारुण्य सार्थ होत नाही. वृत्तीतच तारुण्याची रग पाहिजे. केशवसुतांची 'नवा शिपाई' ही कविता या संदर्भात कुणालाही आठवेल

खादाड असे माझी भूक  
चतकोराने मला न सुख

आपल्या मळ्याला कोणतेही कुंपण असू नये असे नव्या शिपायाला वाटते. ध्येयवादी तारुण्याचा हा जयघोष या कवितेतून प्रकट झाला आहे. तारुण्याने स्वैर असावे, धुंद असावे, साहसी असावे, वादळी असावे, वादळाशी भिडावे. पराभवातूनही

विजयाकडे धावत राहावे. हे वेडेपण असेलही, पण म्हातारपणातले निष्क्रिय शहाणपण घेऊन जगण्यापेक्षा या वेडातच बेहोश होऊन मरण्यातला उन्माद अधिक चांगला आहे. तसे पाहिले तर नवरचनेला तरुण प्रतिभेचीच आवश्यकता असते. ही रचना काव्याची असो किंवा राष्ट्राची असो. आपले उभे तारुण्य साम्राज्यवाद्यांच्या तुरुंगात नेल्सन मंडेलाने उधळून टाकले. वयाने म्हातारा झाल्यावर त्याची सुटका झाली. पण त्याच्या मनातली स्वातंत्र्याची आणि स्वाभिमानाची ज्योत मात्र म्हातारी झाली नव्हती. ती तरुणच होती. तारुण्याचा संबंध यासाठी वयाशी जोडण्यात अर्थ नाही. केस पांढरे झाले म्हणून काय झाले? केसांचा आणि तारुण्याचा केसभरही संबंध नाही. जगाच्या इतिहासात अनेक म्हाताऱ्यांनी तरुणांना खाली मान घालायला लावील अशी वीर कृत्ये केलेली आहेत. ऐंशी वर्षाचा शेलारमामा नसता तर शिवाजीला सिंहगड मिळाला असता काय? 'तुमचा बाप इथं मरून पडला आहे. कुठं पळून जाता? इथंच मारा किंवा मरा' हे जळजळीत शब्द पळून जाणाऱ्या तरुण सैनिकांच्या मनात आग पेटवून गेले. शेलारमामांच्या रक्तातही शौर्याचा वणवा पेटला होता. त्याच्या तरवारीचे पाणी कसे आहे हे शत्रूला समजले. सिंहगड सर झाला. ज्याक्षणी माणूस निराशेने झपाटून जातो, मनाने पांगळा होतो त्या क्षणापासून त्याच्या खऱ्या म्हातारपणाला सुरुवात होते. कारण त्याच्या इच्छाशक्तीचा कणाच मोडलेला असतो. गती आणि कृती ही तारुण्याची अंगे आहेत. जीवनाची प्रीती यातूनच उमलते. वयाच्या नव्वदाव्या वर्षी एक साधू पुरुष चिनी भाषा शिकू लागला. या भाषेची लिपी कठीण आणि गुंतागुंतीची आहे. लिपी शिकण्यातच कदाचित दोन-चार वर्षे जातील. पण हा जिज्ञासू वृद्ध दररोज तासन् तास ती चित्रलिपी शिकत होता. त्याचा उत्साह अनावर होता. चिनी भाषेच्या प्रेमातच तो पडला होता. ही भाषा आत्मसात करायचीच हा त्याचा निर्धार होता. अशा माणसाला वृद्ध कसे म्हणायचे? म्हातारपणाकडे त्याने पाठच फिरवली होती. आपले म्हातारपण विसरणारी माणसे सदैव लोकांच्या आठवणीत राहतात.

बर्नार्ड शॉच्या 'बॅक टू मेथूसेला' या नाटकात शॉने मनुष्याचे आयुष्य निदान तीनशे वर्षापेक्षा अधिक असावे असे मत व्यक्त केले आहे. कारण आजचे साठ-सत्तर वर्षांचे जीवन फारच अपुरे आहे. आपल्या आयुष्याचा बहुतेक भाग बालपण, आजारपण, वृद्धपण आणि चरितार्थासाठी करावी लागणारी धडपड या गोष्टीतच वाया जातो. कर्तृत्व करायला काही अवसरच मिळत नाही. माणूस जन्मत:च तरुण असावा. प्रदीर्घ आयुष्य लाभले तर समृद्ध जीवन जगता येणे शक्य होईल असे शॉला वाटत होते. मेथूसेला ही बायबलमधली व्यक्ती नऊशे एकोणसत्तर वर्षे जगली. दीर्घ जीवन लाभले तर माणसाच्या कर्तृत्वाला बहर येईल असा आशावाद नाटककाराने व्यक्त केला. पण दीर्घायुष्य सध्या तरी अनेकांना संकटासारखे वाटते. रोग आणि म्हातारपण या दोन्ही गोष्टी जीवनातून नाहीशा झाल्या आणि माणूस स्वर्गातल्या देवदेवतांप्रमाणे

चिरतरुण राहिला तर कदाचित त्याच्या कार्यशक्तीला नवे धुमारे फुटतील. अधिक विचार करू लागलो तर असेही वाटते की, दीर्घायुष्यामुळे माणसाचा स्वैराचार फोफावत जाईल. हिंसाचाराला ऊत येईल. आजच उण्यापुऱ्या पाऊणशे वर्षांच्या आयुष्यात माणसे कितीतरी अनाचार करतात. त्यांना वार्धक्याची आणि मृत्यूची भीती वाटत नाही. उद्या काय व्हायचे असेल ते होवो! वर्तमानकाळातला प्रत्येक क्षण बेदरकारपणाने उपभोगायचा. ही दृष्टी ठेवल्यामुळे मनुष्य स्वतःला आणि समाजाला अनेक दुःखात ढकलून देतो. शॉच्या नाटकातला मध्यवर्ती विचार आशावादी असला तरी त्याच्या कल्पनेप्रमाणे मनुष्य सुखी होणार नाही. ऐन तारुण्यात ज्ञानेश्वरांसारखा एक प्रतिभावंत निघून जातो पण आपल्या अंतःकरणातले सुखशांतीचे साम्राज्य जगाला देऊन जातो. भरून आलेल्या मेघाप्रमाणे वर्षाव करून अनंतात विलीन होतो. एवढं अलौकिक कर्तृत्व प्रदीर्घ आयुष्य लाभलेल्या कुठल्या माणसाला अगदी स्वर्गस्थ देवाला तरी शक्य होईल काय? शिवाजी महाराज पन्नाशीतच निघून गेले. पण आपल्या समशेरीच्या टोकाने त्यांनी महाराष्ट्राच्या भूमीवर जो स्वातंत्र्याचा सुवर्णलेख लिहिला, तसा त्यांच्या पूर्वी चार-पाच शतकात कुणी लिहिला नव्हता. त्यांच्या नंतरही हा इतिहास कोणाला घडवता आला नाही. कर्तृत्वाला आणि नेतृत्वाला वय लागत नाही. अनेक शूरवीर, तत्त्ववेत्ते, प्रतिभावंत कवी आणि कलावंत अल्पायुषीच असल्याची नोंद आढळते. उगीच धुमसत राहण्यापेक्षा, धुरकट जीवन दीर्घकाळ जगत राहण्यापेक्षा तेजस्वीपणाने क्षणभर का होईना पण झळाळून उठणे चांगले अशा अर्थाचे संस्कृत सुभाषित आठवते. याचा अर्थ मनुष्याला दीर्घ जीवनाची संधी मिळू नये असा मात्र नाही. झाडावरचे पान पूर्णपणे पिकावे. मगच त्याने शांतपणे गळून पडावे. त्याने ऊन, पाऊस सोसावा, वाऱ्या-वादळाचा अनुभव घ्यावा, वसंतात फुलत राहावे. पाखरांबरोबर आपले हिरवे गीत गावे आणि मग एखाद्या शिशिरात हळूच गळून जावे. सारे रंग आणि गंध त्याने स्वीकारावेत. म्हातारपण म्हणजे नानाप्रकारचे रोग आणि दुःखे हे समीकरण वस्तुतः चुकीचे आहे. आपले उत्तरायुष्य सुखासमाधानात रसिकतेने व्यतीत करीत असलेली कित्येक आनंदी, उत्साही मनाची म्हातारी माणसे मी पाहिली आहेत. शरीराच्या काही व्याधी, उपाधी या वयात त्यांना पीडा देत असतील, पण तरीही ही पिकलेली माणसे जीवनावर संतुष्ट दिसतात. सत्तरीच्या बऱ्याच पुढे गेलेले एक निवृत्त शिक्षक मला म्हणाले, 'माझा आयुष्याचा प्रवास फार सुखाचा झाला नाही. अनेक अडथळे आले, प्रत्येकाच्याच वाटेत तसे ते येत असतात. माझ्यापेक्षाही अधिक खाचखळगे ज्यांच्या वाटेत होते तेही चिवटपणाने चालत राहिले. मीच माझ्या दुःखांचे कशाला प्रदर्शन मांडायचे? माझ्या पायात फाटकी पादत्राणे होती पण कित्येक लोक अनवाणी पायानेच चालत होते. अशा परिस्थितीत माझ्या यातनांची जाहिरात करणं योग्य नाही. माझी प्रापंचिक कर्तव्यं मी माझ्या शक्तीप्रमाणं पार पाडली. पत्नीचा आश्वासक हात हातात

होता. इतर गोष्टीबद्दल तक्रार करण्यात अर्थ नाही. वाट्याला आलेली सारी सुखदु:खं मी गोड मानून घेतली. एका विशिष्ट मर्यादेपलीकडं सांसारिक प्रश्नांत आणि सुखदु:खांत मी स्वत:ला गुंतवून घेत नाही. सकाळी दोन मैल फिरतो. घरी आल्यावर गरम पोहे आणि एक कपभर दूध घेतो. छोट्या नातवंडांच्या बरोबर दंगा करतो. प्राण्यांचे चित्रविचित्र आवाज काढून त्यांना मनमुराद हसवतो. आम्ही सगळे मिळून घर डोक्यावर घेतो. बायको खोट्या रागानं मला दटावते, ' आता लहान आहात का तुम्ही? हे शोभतं का?' मी हसत हसत उत्तर देतो, 'म्हातारपण हे दुसरं बालपणच असतं.' एकदा गेलेलं तारुण्य पुन्हा कधी येत नाही आणि एकदा आलेलं म्हातारपण पुन्हा कधी जात नाही. तारुण्य हरवलं तर हरवू द्या. पण नातवंडांच्या बरोबर खेळताना माझं फार वर्षापूर्वी हरवलेलं बालपण मला पुन्हा भेटलं आहे. त्याची मी जपणूक करतो. बालकांत रमतो. पावसाच्या धारांत त्यांच्याबरोबर भिजतो. थंडीतापाची भीती बाळगत नाही. म्हातारपणातली माझी सुखं पिकत चालली आहेत. 'चित्ती असो द्यावे समाधान' हे तुकोबाचे शब्द आठवतात. मी समाधानी आहे. तृप्त आहे. तारुण्याने माझ्या सुखाला अधिक गोडी आली आहे.'

□ □ □

# शेवटचा दिस

रवींद्रांच्या गीतांजलीतील एका कवितेचा आशय असा आहे. 'ज्या दिवशी मृत्यू तुझ्या दाराशी उभा राहून तुला साद घालील तेव्हा तू त्याला काय देशील? त्या अतिथीला मी रिक्त हस्ताने परत पाठवणार नाही. माझ्या जीवनाचे भरलेले ताट त्याच्या पुढ्यात ठेवीन. आयुष्यातल्या शरद ऋतूंचे सुगंधी दिवस आणि वसंत ऋतूतल्या सुखद रात्री, फार काय जे जे मी मिळवले ते सारे सुंदर आणि संपन्न त्याला सादर करीन.' मृत्यूच्या स्वागताचा हा विचार रोमांटिक आहे यात संशय नाही. अनेक कवींनी आणि कलावंतांनी मरणाकडे सौंदर्यवादी दृष्टीने पाहिले आहे. मृत्यू म्हणजे जीवनाचा अंत नव्हे तर नव्या जीवनाची ती पहाट आहे असे काही कवींना वाटले. कवी गोविंदांची 'सुंदर मी होणार' ही कविता याच दृष्टीची निदर्शक आहे. वास्तव आयुष्यातल्या साऱ्या दु:खाचा आणि दैन्यांचा विलय करून नवजीवनात झेप घेण्यासाठी नवे पंख देणारा हा मृत्यू कित्येकांना वरदानासारखा वाटतो. पण वस्तुत: मृत्यू म्हणजे काय हे कोडे मात्र उलगडलेले नाही. त्यामुळेच त्याला कोणी सर्वसंहारक काळ म्हटले तर कोणी नवनिर्मितीचा अग्रदूत मानले. मरणाच्या पलीकडे एक अतिसुंदर सृष्टी आहे हा आशावाद माणसाच्या मनात असल्यामुळे तो मृत्यूची कल्पना स्वीकारतो. त्याच्या छायेतही आपले जीवन व्यवहार पार पाडीत असतो. काळपुरुषाला उद्देशून एका तत्त्ववेत्याने म्हटले आहे,

'हे जन्मजन्मांतरीच्या प्रियकरा, तुझीच वाट पाहात होतो. माझ्या गाण्यांची मैफल संपत आली. आता भैरवी होऊन तूच शेवट कर. ऐलतीर पाहिलं. या तीरावर बसून अनेक वेळा हसलो असेन, रडलो असेन. आता मात्र पैलतीरावरची बहरलेली सृष्टी मला डोळांभर पहायची आहे.' या तत्त्ववेत्त्याचे हे काव्यमय उद्गार मृत्यूबद्दल आकर्षण निर्माण करणारे वाटतात. पण खरोखरच मरण इतके सुंदर असते का? ते कधीतरी सुंदर होऊ शकेल काय? काही मरणात दिव्यता असते. पाहात राहावे अशी भव्यता असते. पण ही मरणे किती जणांच्या वाट्याला येतात? आज्ञा केल्याबरोबर मृत्यूने सेवकाच्या नम्रतेने यावे आणि आपल्या जीवनाला सहज पूर्णविराम द्यावा असे सहसा घडत नाही.

प्रार्थना करूनही तो येतच नाही. म्हातारी खोडे जिवंत ठेवतो आणि उमलत्या वेलींवरची फुले आपल्या क्रूर हातांनी चुरगाळून टाकतो. असाध्य व्याधीने रात्रंदिवस

तळमळणारा एक रोगी परमेश्वराकडे मृत्यूची याचना करीत होता. असह्य जीवितापेक्षा मरणवेदना सुसह्य वाटाव्यात अशा परिस्थितीत तो होता. पण लहरी मरणाने प्रथम त्याच्या कोवळ्या मुलावर झडप घातली. त्याच्या पत्नीलाही तो घेऊन गेला. हा रोगी मात्र मरणाचा धावा करीत अंथरूणावर तडफडत होता. जीवनमरणाचे हे चमत्कारिक खेळ कोण करतो या प्रश्नाचे उत्तर मात्र कुणीच देऊ शकत नाही.

बहुसंख्य लोकांना मृत्यू भयानक वाटतो. पण त्यालाही तुच्छ समजून, त्याच्या सरहद्दीत बेडरपणे चालून जाणारे कित्येक वीर आहेत. हातात भगवद्गीता घेऊन फासाच्या फळीवर हसतमुखाने चढून जाणारे आणि स्वातंत्र्याचा जयजयकार करणारे शूर या देशाने पाहिले आहेत. कवी कुंजविहारी यांची 'भेटेन नऊ महिन्यांनी' ही कविता म्हणजे हुतात्म्यांच्या अपराजित मनोवृत्तीचे दीप्तीमान दर्शन आहे. फाशीची शिक्षा झालेला एक स्वातंत्र्यवीर तरुण आपल्या रडणाऱ्या आईला म्हणत आहे,

मागेन हेच श्रीहरीला
मातृभूमि उद्धरण्याला
स्वातंत्र्यरणी लढण्याला
तव शुभ उदरी जन्म पुन्हा घेवोनी
भेटेन नऊ महिन्यांनी

ही कविता स्वातंत्र्यलढ्यातल्या सैनिकांचे आशास्थान बनली होती. कुंजविहारींच्या या काव्याने केवळ तरुणांचीच नव्हे तर म्हाताऱ्यांचीही मने पेटवली होती. आज मरावे लागले तरी उद्या नवा जन्म मिळणार आहे ही कल्पना रोमहर्षक आहे. कोणत्यातरी उज्ज्वल ध्येयासाठी मरण्यात पुरुषार्थाची शान आहे हा विचार स्फूर्ती देणारा आहे. याच संदर्भात क्रांतीचे गीत गाणाऱ्या तरुण मनातले कुसुमाग्रजांचे पुढील शब्द थंड रक्तातही बंड निर्माण करतात.

आज आमुची सरणावरती पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते

रात्रीच्या गर्भातून उषःकाल व्हावा त्याप्रमाणे मृत्यूच्या गर्भातून जीवनाची निर्मिती व्हावी असाही सृष्टीचा संकेत दिसतो. मृत्यूचे कितीही तांडव झाले, त्याने कितीही वणवे पेटवले तरी जीवनाच्या भूमीवर हिरवळ उगवतच असते. संहाराचा हात कितीही निष्ठूर असला तरी सृष्टी अधिक वत्सल आहे. तिच्या पोटात जीवनाचे असंख्य झरे लपले आहेत. त्यामुळे या मृत्यूची चिंता करीत बसण्यापेक्षा जीवनाच्या रंगलेल्या नृत्यात हरवून जाणे हेच श्रेयस्कर नव्हे काय?

उत्तम आरोग्यासाठी डॉक्टरचा सल्ला घ्यावा म्हणून एक गृहस्थ नामांकित डॉक्टरकडे गेला. डॉक्टरांनी त्याची सर्वांगीण चिकित्सा करून सल्ला दिला, 'मद्याच्या थेंबालाही कधी स्पर्श करू नका. धूम्रपानाच्या वाटेला जाऊ नका. पानसुपारी सोडून

द्या, नेहमी भुकेपेक्षा कमी खा. स्त्री मोहापासून दूर अंतरावर राहा. सिनेमा, नाटक पाहण्यासाठी जागरण करू नका. असं वागाल तर आणखी दहा वर्षे मृत्यू तुमच्याकडे वळूनही पाहाणार नाही'. हा 'मौलिक' सल्ला मिळाल्यावर तो गृहस्थ म्हणाला, 'ही घ्या आपली फी'. सल्ला दिल्याबद्दल आभारी आहे. डॉक्टरसाहेब, असलं अळणी आयुष्य मला जगायचं नाही. म्हणे, 'मद्याच्या थेंबालाही स्पर्श करू नका' हाय कंबख्त तूने पी ही नहीं' तो दवाखान्याच्या बाहेर पडला आणि समोरून येणाऱ्या एका तरुणीकडे पाहून त्याने हलकीशी शीळ घातली. कडकडीत वैराग्याची भगवी वस्त्रे अंगावर घालायची आणि हातात जपमाळ घ्यायची हे आयुष्य त्याला पसंत नव्हते. पन्नाशी उलटली तरी त्याच्या ओठावर शृंगाराचे गीत नाचत होते. तो मनाशी म्हणाला, 'मृत्यूच्या प्याल्यातली मदिरा मी आनंदानं ओठाला लावीन.'

मृत्यूचे भय बाळगण्यात काही अर्थ नाही असे कितीही म्हटले तरी या अपिरिचित अनुभवाची प्रत्येकालाच थोडीफार धास्ती वाटते. मृत्यूसंबंधीच्या काव्यमय, काल्पनिक भावना बाजूला ठेवून शुद्ध, वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार केला तर जाणवते की, मृत्यू म्हणजे एक भयाण अंधारी, निरर्थक पोकळी आहे. जिच्यात रस, रूप, गंध, नाद आणि स्पर्श काहीही असत नाही. काहीच नसणे हाच मृत्यू. केवळ विराट आणि व्यापक अंधार हेच मरणाचे चित्र. जाणीवही नाही आणि नेणीवही नाही. असल्या मरणाची भीती कुणाला वाटणार नाही? काही माणसांना तर प्रेताची आणि स्मशानाचीही भीती वाटते. नाटककार गडकरी यांना तर स्मशान दिसले की भीतीने हुडहुडी भरायची. त्यांची कोटी प्रसिद्ध आहे. 'मेलो तरी एकटा स्मशानात जाणार नाही. चारचौघांना घेऊन जाईन', अलीकडे स्मशानांचे रूपांतर उपवनात झालेले दिसते. वृक्षवेलींच्या हिरव्यागार सान्निध्यात आणि पाखरांच्या किलबिलाटात मृतांना जीवनानंद मिळत असेल असे मानायला हरकत नाही. जिवंत असताना दहा बाय दहाची खोली देखील न मिळालेल्या माणसाला स्मशानातल्या हिरव्या जगात चिरविश्रांती मिळत आहे, हे दृश्यही आनंददायक वाटावे. शेक्सपिअरने म्हटले आहे, 'कॉवर्डस डाय मेनी टाइम्स बिफोर देअर डेथ.' भित्री माणसे आपल्या मरणापूर्वीच अनेक वेळा मरून गेलेली असतात. पण शूर मनुष्य एकदाच मरतो. खरे तर तो मरूनही जगतच असतो. अशा माणसाला अंतर्बाह्य जिवंत आणि जातिवंत म्हटले पाहिजे. मुर्दाड मनाने जगण्यापेक्षा किंवा जीवनाच्या ताटावर उगीचच आशाळभूतपणे बसून रहाण्यापेक्षा मर्द वृत्तीने मरणाला मिठी मारण्यात आगळे शौर्य आहे. काही संतांनी आपले जीवित कार्य संपले आता अधिक जगण्याचा हव्यास कशासाठी? असा विचार करून जीवनाचा निरोप घेतला. संत ज्ञानेश्वरांची 'संजीवन समाधी' या दृष्टीने मला लक्षणीय वाटते. ऐन तारुण्यात या प्रतिभावंताने जगाकडे पाठ फिरवावी हे संयुक्तिक नव्हे असे मला अनेक वेळा वाटले. 'आनंदे भरीन तिन्ही लोक' ही प्रतिज्ञा करणाऱ्या ज्ञानदेवांनी स्वत:

होऊन जग का सोडावे? पण जगण्याच्या स्वातंत्र्याबरोबरच जगण्याला स्वेच्छेने, आनंदाने, निकोप वृत्तीने पूर्णविराम देण्याचे स्वातंत्र्य माणसाला का असू नये? आज स्वेच्छामरणाची चर्चा जगभर होत आहे. ज्ञानदेवही म्हणाले असतील, 'या जगातले संगीत ऐकले. मी जगाला ते ऐकवले. आता मला माझ्या आत्म्याच्या सतारीतून निघणारे विलक्षण मधुर झंकार स्वत:लाच ऐकवायचे आहेत. त्या नादब्रह्मात मला विलीन व्हायचे आहे'. आत्मसंगीताची अलौकिक ओढ असलेले काही भव्यात्मे असू शकतात. त्यांचे जीवन-मृत्यूचे हिशेब आपल्यासारखे गद्यप्राय नसतात. समाधी म्हणजे मृत्यू किंवा आत्महत्या ही अगदीच व्यावहारिक भाषेतली समीकरणे त्यांच्या बाबतीत चुकीची ठरतात. एखाद्याचे जीवन भव्य सुंदर असते, आणि त्याचे मरण हा तर सुंदर आणि भव्य यांचा अनुपम सोहळा असतो.

जैन धर्माने तर 'मृत्यू महोत्सव' असे म्हटले आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधीला वंदन करताना एक कवी मला गहिवरून म्हणाला 'या चिरतरुण आणि चिरंजीव संतकवीला मी एवढ्यासाठी अभिवादन करतो की त्याच्या मृत्यूने मृत्यूची कुरुपता नाहीशी झाली आणि जीवनाची सुंदरता समृद्ध झाली. मरणालाही जीवन देणारा हा जीवनवादी संत मला वंदनीय वाटतो. या समाधीलाही 'संजीवन समाधी' म्हणतात हे सार्थ आहे.'

हा कवी काही महिन्यापूर्वी मरण पावला. वयाच्या बहात्तराव्या वर्षी त्याला मृत्यू आला. मृत्यूपूर्वी दोन दिवस तो मला म्हणाला होता,

'आता मी जगणं शक्य नाही हे मला कळतं. ज्ञानेश्वर-तुकारामांपेक्षा मला कितीतरी आयुष्य अधिक मिळालं, पण त्यांच्या एका दिवसाच्या जगण्यात जे सामर्थ्य होतं, सौंदर्य होतं ते माझ्या बहात्तर वर्षांच्या आयुष्यात मला मिळवता आलं नाही'. त्याच्या स्वरात व्याकुळता होती. डोळ्यात आर्तता होती. पण त्या क्षणी मला ती व्याकुळताही सुंदर वाटली. मृत्यूची चाहूल लागल्यावर तरी आपल्या आयुष्याचा ताळेबंद एकदा बारकाईने पाहावा असे ज्याला वाटते त्याची जागृती ही समाधानाचीच घटना आहे. बहुसंख्य माणसे मात्र जिवंत असताना जशी धुंद असतात तशीच मरतानाही बेहोष असतात. सुखदु:खाचे क्षण त्यांना आपल्या मुठीत पकडून ठेवता येत नाहीत. पावसाचे पाणी वाहून जावे तसे यांचे सुखदु:खही पार वाहून जाते. त्याची कुठलीच खूण मागे उरत नाही. पण कित्येकांची मरणे त्यांना अमर करून जातात. ख्रिस्त, लिंकन आणि गांधीजी यांची जीवने महान होती. त्यांच्या महानतेत मृत्यूनेही निश्चित भर टाकली आहे. या महापुरुषांचे अखेरचे शब्द प्रथम आठवतात आणि मग त्यांच्या समग्र जीवनाचा भव्य चित्रपट डोळ्यापुढून सरकू लागतो. कधीकधी सामान्य जीवनाला मृत्यू असामान्यतेचे वरदान देऊन जातो. कसे जगावे हे कित्येकांना नीट कळत नाही. पण कसे मरावे याचे उत्तर त्यांच्या जीवनात मिळू शकते. आपल्या

**मरणातूनच** ही माणसे अमर होतात. तुकारामांनी म्हटले आहे, 'शेवटचा दिवस गोड व्हावा' एकदा शेवटचा दिवस सार्थ झाला की साऱ्या आयुष्याला कृतार्थतेचा स्पर्श होऊ शकतो. मरणाच्या झळाळीत जीवनातले खाचखळगेही उजळून निघतात.

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूची कथा ही तेजस्वी जीवनाचीच जणू कविता आहे. वीर संभाजीच्या मृत्यूचे चित्र कथा कादंबऱ्यात, नाटकांत लेखकांनी रेखाटले त्यापेक्षाही वास्तवात ते अधिक सुंदर असले पाहिजे असे वाटते. त्याच्या जीवनचित्रात शृंगार, वीर, मोह, क्षोभ, औदार्य यांचे रंग विशेष गडद होते. या वीराला पकडण्यासाठी काळोखात कपट करावे लागले तेव्हा तो औरंगजेबाच्या हाती लागला. हातापायात साखळदंड असलेला, बंदिवान केलेला हा वाघ जेव्हा बादशहाने पाहिला तेव्हा तो थरारून गेला असेल. कारण संभाजीच्या डोळ्यात निर्भयता होती, मस्ती होती. बादशहाविषयीची तुच्छता होती. बेदरकार आत्मप्रत्ययाची लाली होती. त्याच्या डोळ्यातून बाहेर पडणाऱ्या ठिणग्या झेलण्याचे सामर्थ्य औरंगजेबाजवळ नव्हते. कपटकारस्थानातूनच तो बादशहा बनला होता. संभाजीच्या नजरेला क्षणमात्रच त्याची नजर भिडली आणि ताबडतोब खाली वळली. जणू संभाजीनेच औरंगजेबाला कैद केले होते. या विश्वासघातकी कपटी राजकारणात आपला आता निश्चित बळी जाणार याची छत्रपतीला पुरेपूर कल्पना आली. पण त्याच्या निधड्या छातीत भयाची एकही कळ उमटली नाही. आपले जीवन शत्रूच्या पुढ्यात क:पदार्थ समजून फेकून द्यायला तो नरवीर तयार झाला. कातडी बचावण्याचा, मरणापासून पळून जाण्याचा आणि गुडघे टेकून करुणा भाकण्याचा नामर्द विचार दुबळ्यांच्या चित्तांत येतो. संभाजी पहाडासारखा ताठ होता, मृत्यूला कवटाळणारा हा वीरोत्तम अमर झाला. संभाजीच्या जीवनात कदाचित काही असुंदर किंवा अप्रिय असेही, पण मृत्यूच्या गंगाजळीने ते धुवून निघाले.

मरणालाही सुंदर आणि स्वच्छ मनाने भेटता यावे, पण त्यासाठी सारे जीवन गोड केले तर शेवटचा दिवसही गोड होतो हे मात्र लक्षात घेतले पाहिजे.

□ □ □

# गटबाजी आणि ※ माणूस

राजकारणाच्या क्षेत्रातली गटबाजी पाहून एक कवी वैतागून म्हणाले, 'या नाना प्रकारच्या गटांनी आणि तटांनी सारं राजकारण भरून गेलं आहे. जिथं माणसं गटागटात विखुरलेली आहेत, कोणताही एक पक्ष घेतला तरी त्याच्यातही आणखी कित्येक गट असतात. या चक्रव्यूहात वाट सापडणं खरोखरच कठीण आहे. इथं जातीचे गट आहेत. धर्म आणि भाषांचे गट आहेत. कोणी निष्ठावंत आहेत, कुणी बंडखोर आहेत, कोणी जनवादी, कोणी बहुजनवादी, कोणी समाजवादी तर कोणी नुसताच माजवादी. हे सर्व पाहिल्यावर या राजकारणाची भीती वाटू लागते.

राजकारणाचा या लोकांनी मासळी बाजार करून ठेवला आहे. या बाजारात एक चक्कर मारली तरी मस्तक दुर्गंधीनं भरून जातं. कोणी पत्रकं काढतो, कोणी पताका फडकावतो. कोठे निदर्शनं चालू आहेत. घसा खरडून घोषणा दिल्या जात आहेत. कोणाची तरी प्रतिमा जाळली जात आहे आणि एखाद्या गावगुंडाच्या गळ्यात शेकडो हार पडत आहेत. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. अरे, हे चाललंय तरी काय?'

तो भाबडा कवी काहीशा व्याकूळ स्वराने आपली व्यथा व्यक्त करीत होता. कवीच असल्यामुळे त्याला ही विसंगत दृश्ये पाहवत नव्हती. त्याच्या कोवळ्या, हळव्या आणि दुबळ्या अंत:करणाला हे वातावरण टोचत होते. राजकारणात रस घेणाऱ्या एका व्यक्तीने कवीला म्हटले, 'कविराज, कोणत्या क्षेत्रात गटबाजी नाही ते मला सांगा, अहो, फार प्राचीन काळापासून हे असंच चालत आलं आहे. रामायण, महाभारतातलं राजकारण साधं, सरळ आणि स्वच्छ होतं अस तुम्ही म्हणू शकाल का? कौरवांच्या दरबारातही अनेक गट होते. स्वार्थासाठी ते कधी एकत्र येत, तर कधी परस्परांशी स्पर्धा करीत. गटाची बांधणी केल्याशिवाय राजकारण पुढं रेटता येतच नाही. टिळक– गांधींनी हेच केलं, आताही हेच चालू आहे. राजकारणात तग धरून उभं राहावं लागतं. दुसऱ्याला ढकलून दिल्याशिवाय आपल्याला नीट उभं राहाता येत नाही हीच तर इथली गंमत आहे. आपल्याला हा आट्यापाट्यांचा खेळ आवडतो. तुम्ही मंडळी नैतिक दृष्टिकोनातून हळवेपणानं राजकारणाकडं पाहाता हेच मुळात चुकीचं आहे.

ध्येयवाद, उच्च जीवनमूल्य वगैरे शब्दांचा इथं केवळ उच्चार करायचा असतो.

वारा वाहील तशी पाठ देणारा खरा राजकारणी असतो. फक्त वाऱ्याची दिशा ओळखता आली पाहिजे. कोणाला जवळ करावं आणि काम साधल्यावर त्याला दूर कसं फेकून द्यावं याची धूर्त जाण असलेला माणूस सगळ्या गटांना नाचवू शकतो. एखाद्या दिवशी तोही खाली कोसळतो. दुसरा त्या ठिकाणी उभा राहातो. हा तर एक मनोरंजक खेळ आहे.

राजकारणाचे सारे रहस्यच त्या गृहस्थाने सांगितले. सत्ताधाऱ्यांचे उदय आणि अस्त याच पद्धतीने झाल्याची नोंद इतिहासात सापडते. कितीही बळकट सत्ता असली तरी तिला आतून हळूहळू पोखरणारे काही विरोधी गट तयार होतात. सत्तेच्या वळचणीलाच ते राहिलेले असतात. झाडावरच्या बांडगुळाने झाडाचा जीवनरस शोषून स्वतः वाढत जावे आणि एक दिवस सारे झाड पोखरून काढावे तसे हे घडते. एखादी सत्ता शतकानुशतके अभंग राहिल्याची साक्ष इतिहास देऊ शकत नाही. राज्य रामाचे असो की रावणाचे असो त्यात गट आणि उपगट तयार व्हावेत हे सत्तेचे वैशिष्ट्य असते. सत्तेच्या राजकारणात भावनावश माणसे टिकत नाहीत. ती प्रवाहाबरोबर कुठल्या कुठे वाहून जातात किंवा संन्यास घेऊन मोकळी होतात. सत्ता स्थिर होऊ लागली, ती खोलवर रुजू लागली की तिला डळमळीत करण्याची कारस्थाने सुरू होतात. माडगूळकरांच्या 'सत्तांतर' या कादंबरीत वानरांच्या कळपाची कथा सांगितली आहे. त्यातला सर्वात बळकट नर जोपर्यंत मजबूत असतो तोपर्यंत कळपातले इतर नर स्वस्थ असतात. निमूटपणाने वरिष्ठाच्या आज्ञांकित असतात. पण सत्ता मिळविण्याची त्यांच्यात भावना अंकुरत असते. हुकूमशहा जसजसा म्हातारा होतो तसतसे हे उठाव करतात. एक दिवस आपल्या वरिष्ठाला कळपाबाहेर घालवून देतात आणि त्यातला अधिक सामर्थ्यवान कळपाचा राजा बनतो. प्रत्येक देशात हेच सत्तानाट्य घडत नसते काय? मग ती लोकशाही असो की राजेशाही असो. राजकारणाच्या रंगभूमीवर हे नाटक कित्येक शतके रंगत आहे. ज्याला ते रुचत नसेल त्याने हातात जपमाळ घेऊन परमेश्वर चिंतनात मग्न व्हावे. आमचा हा अतिसंवेदनाशील कवी मात्र राजकारणातल्या गटबाजीमुळे अस्वस्थ झाला होता. खरे तर त्याच्या जगातही गटातटांचे राजकारण चाललेलेच आहे. वानराप्रमाणे साहित्यिकांचेही कळप असतात. साहित्याच्या दरबारातही अनेक गट एकमेकांविरुद्ध शड्डू ठोकून उभे असतात. एक लेखक दुसऱ्या लेखकाला भेटला की, दोघ्यांच्याही चेहऱ्यावर नाटकी हास्याच्या आणि आदर भावनेच्या कृत्रिम लहरी खेळू लागतात. एक नाटककार दुसऱ्या कादंबरीकाराला म्हणतो, 'अहो, तुमची कादंबरी म्हणजे साहित्याच्या क्षेत्रातला 'माईलस्टोन' आहे. मी अतिशयोक्ती करीत नाही. पण तुमच्या कादंबरीनं एका नवीन युगाला सुरुवात केली. हीच कादंबरी इंग्रजीत भाषांतरित झाली, तर तिला 'नोबेल प्राईज' मिळाल्याशिवाय राहणार नाही. बस्स! माझ्या हातात सत्ता असती तर तुम्हाला सर्वोच्च

पुरस्कार जाहीर केला असता. काही म्हणा! मराठी भाषेला आता तुमच्या रूपानं दुसरा ज्ञानेश्वर मिळाला असं म्हणायला हरकत नाही' आपली स्तुती ऐकून हे कादंबरीकार सर्वांगाला गुदगुल्या झाल्याप्रमाणे खुशीने हसत असतात आणि मग त्या नाटककाराच्या पाठीवर प्रेमाने (?) थाप मारून त्याला सांगतात, 'तुमच्यासारख्या माझ्या टीकाकाराला ही कादंबरी आवडली त्याअर्थी ती खरोखरच श्रेष्ठ असली पाहिजे. तुमच्यासारखे सहृदय रसिक मिळतात कुठे? अहो, परवाच्या त्या मासिकात 'एक भिकार कादंबरी' म्हणून तिचा कुणातरी जळक्या टीकाकारानं उल्लेख केला. मूर्ख लेकाचा! कादंबरी कशाशी खातात याची अक्कल या पिढीजात गाढवाला कशी असणार?

तेथे पाहिजे जातीचें! नाटकाच्या क्षेत्रात तर तुम्ही तळपत आहात. किर्लोस्कर, गडकरी आणि खाडिलकर यांच्या प्रतिभेचा अर्क काढून त्यात अत्रे आणि शिरवाडकरांची प्रतिभा मिसळली म्हणजे जे रसायन होईल ते तुमच्या नाटकात आढळतं. तुम्ही आमच्या महाराष्ट्राचे 'शेक्सपिअर' आहात.'

हे दोघेही महनीय लेखक-ज्ञानेश्वर आणि शेक्सपिअर– जवळच्या हॉटेलात जाऊन चहा घेतात. थोडी बिस्किटंही चापतात. बिल देणे मात्र आपल्या नशिबी येते की काय या शंकेने मनात अस्वस्थ होतात. पण परस्परप्रशंसा झाल्यामुळे शेक्सपिअर बिल देऊन या समस्येचे निराकरण करतो. आपापल्या दिशेने जाताना हे दोन युगप्रवर्तक लेखक 'कसं बनवलं लेकाच्याला' असे स्वत:शी म्हणत आणि स्वत:च्या चातुर्यावर संतुष्ट होऊन आपापल्या घरी 'नवनिर्मिती' करण्यासाठी पोहोचतात. जे राजकारणात असते तेच साहित्यातही दिसते. तऱ्हेतऱ्हेच्या मुखवट्यांनी भरलेल्या या जगात कोणाची खरी ओळख पटत नाही. शिक्षणाच्या क्षेत्रातही हेच घडते. एका विद्यापीठाचे कुलगुरुपद आपल्याला मिळावे म्हणून धडपडणाऱ्या गटातटांचे राजकारण जवळून पाहाण्याची मला संधी मिळाली होती. कुलगुरुंची निवड करणारी समिती नियुक्त करण्याच्या प्रक्रियेपासून भिन्नभिन्न गटांच्या हालचाली सुरू होतात. हे गट जातीचाही विचार करतात. बाहेरच्या राजकारणाची सावली विद्यापीठातही पडलेली असते. कुलगुरू होण्यासाठी पात्रतेची फारशी अपेक्षा नसते. कोणातरी मंत्र्याचा शुभाशीर्वाद लागतो. त्या मंत्र्यातही मग आणखी गट असतात. यावेळी आमच्या भागातला कुलगुरू पाहिजे असा प्रादेशिक वादही सुरू होतो. मंत्र्याच्या दारात जो उमेदवार अधिकात अधिक वेळ काढू शकतो अशा 'निष्ठावंत' 'विद्यावंता'ला कुलगुरूची झूल घालण्यात येते. एका गटाचा विजय होतो. पराभूत गटातले काही लोक विजयी गटात घुसतात. हे नवे कुलगुरू 'साहेबांच्या' सल्ल्याशिवाय एकही पाऊल पुढे टाकू शकत नाहीत. त्यांची ही 'योग्यता' पाहूनच त्यांना नियुक्त केलेले असते. हाच खेळ थोड्याफार फरकाने कॉलेजातही चालू असतो. परवा मी एका कॉलेजात काही कामासाठी गेलो होतो. प्राचार्यांच्या सुसज्ज कार्यालयात मध्यवर्ती खुर्चीवर बसलेल्या इसमाच्या

तोंडावरची माशीसुद्धा उडत नव्हती आणि उडालीच तर पुन्हा बसत नव्हती. सदर गृहस्थ प्राचार्यपद भूषवीत होते. शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांच्या घरी दररोज इमानीपणे दोन चकरा मारणे इतकीच त्यांची 'ड्यूटी' होती. हे सारेच प्रकार गटागटांच्या अंतर्गत स्पर्धेतून होत असतात. त्यामुळे केवळ राजकीय क्षेत्रातच गटबाजी विकोपाला गेली आहे ही टीका करण्याचे कारण उरत नाही. 'आम्ही कोणत्याही गटात नाही' असे म्हणणाऱ्यांचाही एक वेगळा गट असतो. इच्छा असो की नसो आपापल्या क्षेत्रात प्रत्येकजण कळत न कळत एखाद्या गटात ओढला जातो.

सर्व प्रकारच्या भेदांचे विसर्जन करून केवळ परमेश्वराची उपासना हेच एकमेव उद्दिष्ट आहे आणि शुद्ध आचारविचारातून ईश्वराची प्राप्ती होते असे मानणाऱ्या अध्यात्मवादी लोकांत देखील नानाप्रकारचे भेद पडलेले पाहिल्यावर आश्चर्य वाटते. आजच्या साधुसंतांत सुद्धा निरनिराळे गट आहेत. कोणी स्वत:ला भक्तिमार्गी, कोणी शक्तिमार्गी कोणी कर्मवादी तर कोणी नैष्कर्म्यवादी म्हणवून घेतो. कोणी होमात लाकडे जाळल्याने स्वर्गप्राप्ती होते असे मानतो तर काही उपवास केल्यामुळे आणि शरीरक्लेशामुळे मोक्ष जवळ येतो असे म्हणतो. एकदा स्वत:ला 'सत्यस्वरूप' 'भगवान' म्हणवून घेणारे, पण एअरकंडिशंड बंगल्यात राहाणारे महाराज आपल्या भक्तांसमोर प्रवचन करीत होते. महाराजांची दृष्टी पुन्हा पुन्हा स्त्री भक्त समुदायाकडे प्रेमाने वळत होती. आपल्या मनगटावर बांधलेल्या परदेशी बनावटीच्या उंची घड्याळाकडे ते मधून मधून पाहात होते. मखमली व्यासपीठावर ते विराजमान झाले होते. ते म्हणाले, 'परमेश्वराने सृष्टी उपभोगासाठी निर्माण केली आहे. स्वर्ग हेही उपभोगाचे ठिकाण आहे. आपण पृथ्वीलाही स्वर्ग बनवू. येथेही अमृत आहे. येथेही अप्सरा आहेत. (महाराजांनी स्त्री समूहाकडे एक प्रेमळ दृष्टिक्षेप टाकला) जीवन उपभोगासाठी आहे' हा मुद्दा त्यांनी घोळून घोळून मांडला. त्यानंतर ध्यानाची वेळ झाली म्हणून महाराज आतल्या दालनात जाऊन ध्यान करू लागले. या महाराजांचेही अनेक भक्त होते. यांच्या विरोधी गटातल्या महाराजांचेही असेच हजारो भक्त होते. भक्तांतही गट होते. साधूतही तट होते. अध्यात्म कुणालाच कळत नव्हते. पण आध्यात्मिक सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा करणारे अनेक गट होते. सर्व भेदभावनांच्या भिंती पाडून टाकण्याची धडपड ज्या श्रेष्ठ संतांनी केली त्या संतांच्या कपाळावरही त्यांच्या अनुयायांनी आपापल्या गटाची लेबले चिकटवलेली दिसतात. त्यामुळे धर्म अनेक झाले पण धार्मिक लोक किती झाले हे मात्र सांगता येत नाही. एका प्रसिद्ध देवळात धोतर नेसणाऱ्यालाच प्रवेश होता. पँट घातलेल्या भक्ताला पुजारी प्रवेश नाकारीत होते. देव बिचारा गप्प होता, त्याला कुणीच विचारीत नव्हते. देव नेहमी गप्प असतो म्हणूनच पुजाऱ्याचे फावते. आता पुजाऱ्यांतही गट असतात हा भाग वेगळा!

मला वाटते, नाना प्रकारची कुंपणे आणि गट आहेत ते कधीही नाहीसे होण्याची शक्यता दिसत नाही. याबाबतीत संत-महंतांनी केलेले कार्य फारसे सफल झालेले नाही. भेद करणे, गट स्थापन करणे, कुंपणे उभारणे हे माणसांच्या रक्तातच आहे की काय ते कळत नाही. पण माणूस जसा आहे तसा तो स्वीकारला पाहिजे. याचा अर्थ आदर्शाकडे झेप घेऊ नये असा होत नाही. कृत्रिम कुंपणे पाडायची, ऐक्याच्या आड येणाऱ्या तटबंदी उद्ध्वस्त करायच्या आणि माणसांनी पुन्हा पुन्हा आपापल्या गटाची भिंत उभी करायची हा प्रकार चालूच राहाणार आहे. मत्सर, ईर्ष्या, द्वेष, रागलोभ आणि अन्य अनेक घटक यातून गटबाजी फोफावत जाते. दोन माणसे घेतली तरी त्यांचे दोन गट तयार झालेले असतात. कधीकधी या विचाराने उद्विग्नता आल्यावर संत तुकोबांचा अभंग 'भेदाभेद भ्रम अमंगळ' हा मनाशी गुणगुणतो. कोणी काही म्हटले तरी तुकोबांनाही त्यावेळच्या आणि आजच्या समाजाने एखाद्या विशिष्ट गटात बसवलेले आहे.

□ □ □

# काळ निघून चालला आहे.

'उत्तराध्ययनसूत्र' या ग्रंथातला एक श्लोक वाचला. मन विषण्ण झाले. त्या श्लोकात एक अनिवार्य सत्य स्पष्टपणे सांगितलेले होते. सत्य नेहमीच मनुष्याला अस्वस्थ करते. ते नाकारण्याकडे मनाचा कल होतो. पण ते अंगभूत ज्वलंत असल्यामुळे त्याचे चटके सहन करावेच लागतात. श्लोकाचा भावार्थ असा होता, 'काळ निघून चालला आहे. रात्री पळून जात आहेत. भोगाची साधने नित्याची नाहीत. वृक्षाची फळे गळून पडल्यानंतर पक्षी त्याला सोडून जातात. त्याप्रमाणे सारे काम भोग आपल्यालाही सोडून जाणार आहेत याची जाणीव मनुष्याने ठेवली पाहिजे.

खरे तर या श्लोकात नवीन काय सांगितले आहे? एक सनातन आणि सर्वमान्य सत्य यात मांडून ठेवले आहे. एका तरुणाला हा श्लोक मी वाचून दाखवला. अर्थ समजावून सांगितला. तो हसून मला म्हणाला, 'काळ निघून चालला आहे. हे सांगण्यात या कवीने निष्कारण काळाचा दुरुपयोग केला आहे. रात्री पळून जात आहेत हे खरेच आहे. पण म्हणून या सुंदर रात्री आपल्या तारुण्याच्या मिठीत पकडून ठेवल्या पाहिजेत. रात्रीचा काव्यमय अंधार हातातल्या मद्याच्या चषकात मिसळून ती मदिरा अधिक गहिरी आणि मादक केली पाहिजे. खाण्यापिण्याची धुंद मैफल रात्री रंगत जाते, चढत जाते. माझ्या दृष्टीसमोर अशा कितीतरी रात्री उभ्या राहतात. संगीताचे आलाप, नर्तकीच्या पायातल्या घुंगुरांचा झंकार, तिच्या काजळी डोळ्यातले आव्हान, मंद दिव्यांची रोषणाई आणि अंगाअंगातून सळसळणारे यौवनाचे गीत ऐकत असताना रात्र उडून जाते. या अनुभवात थ्रिल आहे. अशा अनेकानेक रात्री उगवल्या पाहिजेत. त्या पळून गेल्या तरी माझ्या मनात ठाण मांडून बसल्या आहेत. तुमच्या कुसुमाग्रजांची एक कविता मला आठवते-

'काढ सखे गळ्यातून तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत'

गळ्यातून चांदण्याचे हात कशासाठी काढायचे? दिवसाचे दूत आले काय किंवा यमाचे दूत आले काय जे हात चांदण्याचे आहेत ते गळ्यातच राहावेत. सर्वकाळ प्रेममय जीवन जगण्यात जीवनाची सार्थकता आहे. तुम्ही वाचून दाखविलेल्या श्लोकात वैराग्याचं तुणतुणं आहे. मला ते पटत नाही' त्या तरुणाची ही प्रतिक्रिया होती. पन्नाशीच्या घरात आलेल्या एका कुटुंबवत्सल गृहस्थाला हा श्लोक आवडला. तो

म्हणाला, 'आपला या जगताला मुक्काम फार थोडा असतो. कारण काळ सारखा धावत आहे. दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस पळत आहेत. हे सत्य समजून घेतल्यानंतर मला माझ्या कुटुंबाच्या भविष्याची काही तरतूद करून ठेवली पाहिजे हे लक्षात येते. उगीच कोणत्या तरी कल्पनेत किंवा स्वप्नात गुरफटून जाण्यात अर्थ नाही.' पंचाहत्तरीपार केलेल्या वृद्धाने हा श्लोक वाचला आणि त्याच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. त्याचे ओठ थरथरू लागले. दृष्टीत विकलता आली. आपल्या कापऱ्या आवाजात तो म्हणाला, 'माझ्या तारुण्यात या विचाराची मी टर उडवली होती. काळ निघून जात असला तर त्याला मी बांधून ठेवू शकेन. माझी अवज्ञा काळपुरुष करू शकणार नाही असं मी म्हणत होतो. पण श्लोकात म्हटल्याप्रमाणं झाडाची फळं गळून पडली. म्हाताऱ्या झालेल्या या निष्पर्ण वृक्षाच्या आसऱ्याला एकही पक्षी येत नाही. हंगाम संपल्यानंतर सारे पक्षी उडून गेले. मीही आता पार थकून गेलो. एक चिरंतन असं जळतं सत्य या श्लोकात कवीनं सांगितलं आहे. ते निमूटपणानं स्वीकारलंच पाहिजे.'

हे सत्य नाकारणारे पुष्कळ लोक असू शकतात. वर्तमानातला क्षण हा महत्त्वाचा. तो सर्व अंगांनी भोगून घ्यायचा. भविष्याची चिंता मुळीच करायची नाही. जे व्हायचे असेल ते होवो! अशी बेदरकार, बेमुर्वतखोर मनोवृत्तीची माणसे असू शकतात- नव्हे अशीच बहुसंख्य माणसे असतात. 'एके एकाची पाहतसे दहने। सावध त्या गुणे कारे न व्हा?' असा प्रश्न तुकोबांनी विचारला आहे. पण याचे उत्तर एकच आहे. जात्यातले रडतात सुपातले मात्र हसतात. थोड्याच वेळात आपणही जात्यात भरडले जाणार हे माहीत असूनही सुपातले हसत राहतात. हा विचित्र खेळ जेव्हा या कवीने पाहिला तेव्हाच त्याने हा श्लोक लिहिला असावा. परवा एका स्मशानयात्रेला जाण्याचा योग आला. मृतांवर अंत्यसंस्कार होत होते. पण स्मशानात जमलेली मंडळी पानतंबाकू खाऊन पिचकाऱ्या मारीत होती. एका बाजूला चिता पेटलेली आणि दुसऱ्या बाजूला मंडळी वर्तमानपत्रातल्या चविष्ट बातम्या एकमेकांना सांगत करमणूक करून घेत होती. वातावरणात फारसे गांभीर्य नव्हते. हा प्रकार पाहिल्यानंतर माझ्या मनात विचार आला. हे असेच शतकानुशतके घडत आले आहे. मरणाच्या दाढेत देखील जीवनातले उपभोग सुटत नाहीत याचा अर्थ मरणाच्या पाशापेक्षा जीवनाचे बाहुपाश अधिक दृढ आहेत. मृत्यूला देखील ते सोडता सोडवत नाहीत म्हणूनच मरणाची तलवार मस्तकावर लटकत असतानाही माणूस भोगविलासाच्या वर्तुळात फिरत राहतो. एका खुनी दरोडेखाराची गोष्ट मी तुरुंगाधिकाऱ्याकडून ऐकली तेव्हा मला आश्चर्य वाटले. या दरोडेखोराला फाशी देण्यापूर्वी चार-पाच दिवस विचारण्यात आले. 'तुझी शेवटची इच्छा काय आहे? तो म्हणाला, 'मला बासुंदी, जिलब्या पोटभर दोन्ही वेळा खायला मिळाव्यात एवढीच इच्छा आहे. आता दोन-चार दिवसांत ज्याला जगाचा

निरोप घ्यावाच लागणार आहे त्याने खाण्यापिण्याच्या क्षुल्लक गोष्टींचा मोह मनात का ठेवावा? पण मोहाचे पाश चिवट असतात. हेच खरे. फासावर जाण्यापूर्वी देखील त्या कैद्याने आपली आवडती पक्वान्ने यथेच्छ खाल्ली हे जेव्हा अधिकाऱ्याने सांगितले तेव्हा त्यावर विश्वास ठेवणे कठीण झाले. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत भोगण्याची ही वृत्ती किती दुर्दम्य असते याचे चित्र ज्ञानेश्वरांनी रेखाटले आहे. एका सर्पाने बेडकाला गिळायला सुरुवात केली आहे. मूर्तिमंत मृत्यूच्या जबड्यात अडकलेल्या बेडकाच्या डोळ्यांसमोर आता अखेरची अंधारी येऊ लागली आहे. इतक्यात समोरून उडत जाणाऱ्या एका माशीला खाण्यासाठी सर्पाच्या तोंडातला बेडूक आपली जीभ बाहेर काढतो. हा दृष्टांत देऊन ज्ञानेश्वरांनी माणसाच्या लोभावर, मोहावर आणि आसक्तीवर मर्मभेदक भाष्य केले आहे. खरे तर ही माणसाचीच गोष्ट आहे. आत्यंतिक जीवनासक्ती किंवा भोगासक्ती ही एक विकृतीच म्हणावी लागते. 'एकच प्याला'तला तळीराम मरण्याक्षणी सुद्धा दारूचा घोट घेतो ही अतिशयोक्ती आहे असे वाटत होते. पण माणूस आंधळ्या भोगवादाच्या आहरी जाऊन कसा भरकटत राहातो याची उदाहरणे पुष्कळ पाहायला मिळतात. त्यामुळे काळ निघून चालला आहे. हा तत्त्वज्ञ कवीने दिलेला इशारा ध्यानात ठेवला पाहिजे. ययातीची पुराणकथा बाह्यत: अद्भुत वाटते. पण ययाती हा आजच्या भोगलंपट माणसाचा प्रतिनिधी आहे असे खांडेकरांना वाटले ते यथोचितच आहे. एका मुख्यमंत्रीण बाईंच्या बेडरूममधल्या कपाटात हजारोंच्या संख्येने उंची पातळे, वस्त्रप्रावरणे, पादत्राणे आणि तऱ्हेतऱ्हेच्या असंख्य भोग वस्तू ठेचून भरलेल्या होत्या हे वृत्तपत्रात वाचल्यावर या बाईने ययातीला केव्हाच जिंकले आहे असे वाटून गेले. अलीकडच्या एका युवराज्ञी संबंधी वृत्तपत्रातून वाचण्यात आले की, ती कपडे बदलावेत त्याप्रमाणे आपले प्रियकर बदलत होती. नित्य नवा उपभोग हेच जणू तिच्या आयुष्याचे पालुपद याबद्दल शंका घेववत नाही. एका सिनेमानटीने मुलाखतीत सांगितले होते, 'एकदा नेसलेले वस्त्र मी पुन्हा परिधान करत नाही ते टाकून देते.' मुलाखत ऐकणाऱ्या श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून तिच्या या विधानाचे स्वागत केले होते. लोकभावनांचा लंबक कोणत्या दिशेने झुकत आहे हे त्यावरून लक्षात येण्यास हरकत नाही. कदाचित काळ निघून जात आहे तेव्हा जमेल तितके आपण भोगून घेतले पाहिजे. उद्याचा भरवसा सांगता येत नाही. ही कल्पना त्यामागे असावी. चार्वाकाच्या नावावर एक श्लोक खपवला जातो. त्याचा अर्थ असा की, एकदा हा देह चितेत जळून गेल्यानंतर तो पुन्हा परत येत नाही म्हणून जे काही विलासोपभोग घ्यायचे असतील ते आताच कोणत्याही मार्गाने घेऊन टाका. या विचारातही मला एक प्रकारचे वैफल्य जाणवते. हातात असलेल्या क्षणावर केवळ आपली सत्ता आहे भविष्यकाळाचे मात्र काहीच सांगता येत नाही. हा इहवादी विचार झाला. इहवादी हा शब्द नको असेल तर दुसरा कोणताही शब्द तयार करा. पण उद्या

आपल्या हातात काहीच राहणार नाही हे सत्य यातून प्रकट होते. आत्मवादी शरीराला सोडून आत्म्याचा विचार करतात आणि देहवादी आत्म्याकडे दुर्लक्ष करून केवळ शरीराभोवती पिंगा घालतात. हा वाद अत्यंत जुना आहे आणि तो असाच राहील. 'धम्मपदातही' 'उत्तराध्ययन' सूत्रातल्या वर उल्लेखिलेल्या श्लोकातल्याप्रमाणेच विचार सांगितलेला आहे. तुझे वार्धक्य पिकत चालले आहे. मृत्यु जवळ येत आहे. पुढचा प्रवास दूरचा आहे. पण तुझ्याजवळ कोणतीच शिदोरी नाही. तू प्रवास कसा करणार? मृत्यूनंतरसुद्धा एक अवघड प्रवास करावा लागतो. त्या वाटेसाठी काही शिदोरी बांधून घ्यावी लागते. हा विचार खरोखरच जागवणारा आहे. फार थोडी शहाणी माणसे भविष्यातल्या प्रवासासाठी शिदोरीची तयारी करीत असतात. एक पराक्रमी वीर म्हणाला, 'मी गाजवलेल्या पुरुषार्थाचे काही क्षण माझ्या शिदोरीत आहेत. एका अश्राप बालिकेवर अत्याचार करणाऱ्या चार गुंडांना मी जमिनीवर लोळविले आणि त्यांचे अपवित्र शरीर अनेक जखमांनी रंगवले. त्या बालिकेने भाऊ म्हणून मला मिठी मारली. त्या बहिणीच्या डोळ्यात तरंगणारे कृतज्ञतेचे अश्रू या माझ्या शिदोरीत मी सोबतीसाठी घेतले आहेत. न्यायासाठी मी काही वेळा प्राणांची बाजी पणाला लावली आहे.

दु:खितांच्या मुखावर मी काही वेळा हसू फुलवलं आहे. माझ्या शिदोरीच्या बळावर मला पुढला प्रवास सहज करता येईल.'

या जगण्याला एक समृद्ध अर्थ आहे. एक असा ताल आहे की ज्यामुळे जीवन संगीत भावपूर्ण बनते. काळ धावत आहे म्हणूनच त्या काळावर आपल्या पराक्रमाची एक तेजस्वी खूण करून ठेवली पाहिजे. अशी खूण असावी की जी काळाच्या ओघात देखील अस्पष्ट होऊ नये. काळाला खुशाल धावू द्या. रात्री खुशाल उडून जाऊ द्यात. दिवस-रात्रीच्या कितीही लाटा आल्या आणि गेल्या तरी कित्येक महापुरुषांच्या मूर्तीला किंचितही धक्का लागलेला नाही. सॉक्रेटिससारखा एक तत्त्ववेत्ता म्हणाला.

'अथेन्सच्या न्यायालयानं मला प्राणदंडाची शिक्षा दिली आहे. मृत्यूला मी सामोरा जाईन. माझा लढा न्यायासाठी आहे. मी सत्यासाठी झगडत आहे. सत्य स्वीकारल्यामुळे मला नरकात जावं लागलं तरी मी त्याची पर्वा करणार नाही. कारण सत्य हेच सुंदर आणि कल्याणकारक आहे अशी माझी श्रद्धा आहे. प्राणांत झाला तरी मी सत्याची संगत सोडणार नाही.' सॉक्रेटिसच्या शिष्यांनी तुरुंगातून त्याला पळून जाता यावे म्हणून गुप्तपणे तशी योजना केली होती. त्या मार्गाने निसटून जाणे सॉक्रेटिसला सहज शक्य होते. पण या गोष्टीला नकार देताना तो म्हणाला, 'सत्याच्या पूजकाने पळून जाण्याचं कारण नाही. जिवाच्या भीतीनं एक समाजसेवक, एक तत्त्वनिष्ठ माणूस चोरासारखा पळून गेला अशी माझी अपकीर्ती होईल. माझं कार्य त्यामुळं पूर्णपणाने अयशस्वी होईल. मी पळून गेलो तरी मरण केव्हातरी येणारच

आहे. मग याच तुरुंगात मृत्यूसमोर धीरोदात्तपणानं मी का उभं राहू नये?' सॉक्रेटिसाच्या प्रिय शिष्यांनी त्याची सतत विनवणी केली. पण तो किंचितही विचलित झाला नाही. अखेर शिक्षेच्या दिवशी विषाचा प्याला त्याच्या हातात देण्यात आला. तो शांतपणे पिऊन सॉक्रेटिस मृत्यूच्या मांडीवर झोपी गेला. या घटनेला कितीतरी शतके उलटली. पण काळपुरुष मात्र सॉक्रेटिसला आणि त्याच्या ध्येयवादाला नष्ट करू शकला नाही. 'काळ निघून चालला आहे'. काळाला जाऊ द्या. काळाला पुरून उरणारा माणूस मात्र निर्माण होऊ द्या. मग या काळाला कोण भिणार?

□ □ □

# माणूस माणूस म्हणतात ॐ तो हाच!

मार्कट्वेन या विनोदी लेखकाने माणसासंबंधी केलेले एक विधान वाचण्यात आले. त्या विधानात निखळ सत्य आहे. तो म्हणतो, 'माणूस हे एकच असे जनावर आहे की, जे भूक नसतानाही खाते आणि तहान लागली नसतानाही पिते'. मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण यातून दिसते. काही माणसे सारखी खात असतात. खरे तर चरत असतात. 'चरण्यासाठी जन्म आमुचा' असेच जणू ती सांगत असतात. केशवसुतांनी 'नवा शिपाई' या कवितेत 'खादाड असे माझी भूक', चतकोराने मला न सुख' असे म्हटले आहे. वेळी-अवेळी खात राहाणारी ही माणसे पाहिली म्हणजे खाण्यासाठीच त्यांचा अवतार आहे हे पटते. प्रवासात प्रत्येक स्टेशनवर खाली उतरून काही तरी खाद्यपदार्थ घेऊन येणारे महाभाग आपण पाहिलेले आहेत. अशाच एका खाद्य भक्ताला मी विचारले तेव्हा तो म्हणाला, 'पोट नेहमी भरलेलं असावं. अहो गाडीला नाही का इंधन लागत? तसं आपण आपल्या पोटाची टाकी भरलेली ठेवावी, 'तुम्ही कधी लंघन केलं नाही काय,' असा प्रश्न मी त्याला विचारला. तो म्हणाला, 'लंघनावर माझा विश्वास नाही. मी नेहमी उल्लंघन करतो'. हा माणूस निदान खाद्यपदार्थ तरी खात होता. पण दररोज पैसे खाणाऱ्या माणसांना काय म्हणावे?

माणूस हे एक रहस्य आहे यात शंका नाही. माणसाची व्याख्या करताना कार्लाईलने म्हटले आहे, 'माणसात आणि इतर जनावरांत फक्त ठेवणीत फरक आहे. इतर जनावरे वाकलेली असतात. मानव हे एकटेच जनावर ताठ चालते.' मला वाटते, मनुष्याला पशू म्हणण्यात काही अर्थ नाही. पशू प्रामाणिक असतात. आपल्या गरजा भागल्या की जनावरे संतुष्ट असतात. ती उगीचच कोणावर शिंगे रोखून हल्ला चढवीत नाहीत. कुत्र्यासारखा इमानी प्राणी तर माणसाच्या सुखदु:खात आपल्या परीने सहभागी होतो. मालकाचा मृत्यू झाल्यानंतर दोन– तीन दिवस एका कुत्र्याने अन्नपाण्याला स्पर्शही केला नाही. जिथे मृत्यू झाला त्या जागेभोवती हा कुत्रा फिरत राहिला. आपल्या धन्याचा शोध घेत राहिला. माणूस आणि कुत्रा यात किती फरक असतो हे स्पष्ट व्हावे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चितेवर त्यांच्या लाडक्या कुत्र्याने उडी घेऊन प्राणार्पण केले ही घटना त्याच्या विलक्षण स्वामीनिष्ठेची द्योतक नव्हे काय? माणसाच्या कृतघ्नतेबद्दल काय बोलावे?

सत्तेची कवचकुंडले गळून पडल्यानंतर दीनवाणे झालेले एक पुढारी एके

दिवशी आपली व्यथा सांगत होते. ते म्हणाले- 'मी तऱ्हेतऱ्हेची माणसे पाहिली आहेत. त्यांच्या बोलण्याचे आणि वागण्याचे रंगढंग मी अनेक वर्षे न्याहाळले आहेत. मी सत्तेवर असताना ज्याच्यावर अनंत उपकार केले, ज्याला शून्यातून वैभवसंपन्नतेच्या शिखरावर नेऊन ठेवले अशा माणसानेच माझा कपटाने विश्वासघात केला. माझ्या पाठीत त्याने खंजीर खुसला. नम्रतेचे नाटक त्याने वर्षानुवर्षे केले. त्याची लीनता, त्याच्या शब्दांतला आर्जवीपणा पाहून मी पुरता फसलो. आकाश कोसळले तरी त्याची माझ्यावरची निष्ठा ढळणार नाही अशी मी खूणगाठ बांधली होती. कारण मी केलेल्या अनेक उपकारांच्या ओझ्याखाली तो दबलेला होता. पण एका रात्रीत तो पार बदलला. माझी काही माणसं त्यानं फोडली आणि कसलीही कल्पना न देता त्यानं मला सत्तेवरून ढकलून दिलं. सत्ता गेल्याच्या दुःखापेक्षा त्यानं केलेली हरामखोरी मला जास्त दुःखद वाटते. राजकारणात ढोंग असतं. ओठात हास्य आणि पोटात सूड असतो हे मला माहीत आहे. पण प्रेमानं पाजलेल्या दुधाचं कालकूट होऊन ते माझाच घात करील याची मला कल्पना नव्हती. माणूस हा किती खालच्या पातळीवरून स्वार्थ साधतो हे पाहिल्यावर माणसाबद्दलच घृणा वाटते'. त्या सत्ताभ्रष्ट व्यक्तीच्या मनातले दुःख वादळ किती वेगाने वाहात आहे हे मला जाणवले.

राजकारण हा तर कपटनाटकाचाच खेळ आहे. त्या क्षेत्रात सरळ वाट बहुधा नसते. राजनीती आणि वारांगना दोन्ही कुटिलच असतात. या पुढाऱ्याला पदच्युत करून सत्ता मिळविणारा दुसरा माणूससुद्धा याच मार्गाने केव्हा तरी खुर्ची गमावणार आहे. माणसे अशी का वागतात या प्रश्नाचे उत्तर साधे आणि सरळ आहे. नैतिकतेचा आणि धार्मिकतेचा विचार करीत बसल्यावर स्वार्थ साधता येत नाही. स्वार्थासाठीच माणूस माणसाचा केसाने गळा कापायला तयार होतो. म्हणूनच एका विद्वानाने म्हटले आहे, 'माणसाला सदैव माणसापासूनच सावध राहिले पाहिजे'. माणसाचा सर्वात मोठा शत्रू माणूसच असतो'. हे उद्गार जगातले मानवी व्यवहार पाहूनच त्या विद्वानाने काढले असावेत. जन्मदात्या मातेला आणि पित्याला लाथाडणारी माणसे जगात कमी आहेत काय? माणूस हे एक कधीच न कळणारे गुंतागुंतीचे प्रकरण आहे. साधूसंतांचाही छळ मानवी स्वभावातल्या दुष्टतेमुळे कमी झाला नाही. छळ करणारी माणसे अज्ञानी आहेत. परमेश्वराने त्यांना क्षमा करावी अशी प्रार्थना करीत संतांनी आपला मानसिक आणि शारीरिक छळ निमूटपणाने सहन केला, तुकोबासारख्या संतश्रेष्ठाने माणसाच्या रोगट प्रवृत्तीवर प्रहार केला आहे. ते म्हणतात.

संत मागे पाणी नेदी एक चुळी
दासीस आंघोळी ठेवी पाणी
संतांसी देखोनी होय पाठमोरा
दासीचिया पोरा चुंबन देतो

संतांसी देखोनि करितो टवाळ्या
भावे धुतो चोळ्या दासीचिया
तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका
जातो यमलोका भोगावया

अशा माणसावर तुकोबासारखा संतही रागावला आणि त्याने शापवाणी उच्चारली तर ते स्वाभाविकच आहे. सज्जनांना छळण्यातला आसुरी आनंद दुर्जनांनी भरपूर घेतला आहे. दुष्टबुद्धी लोकांचा प्रतिकार करीत बसण्यापेक्षा केव्हातरी त्यांच्या मनात सद्भावनांची ज्योत पेटू शकेल असेच संतांना वाटते. तुकाराम महाराज निदान प्रखर शब्दांतून आपला राग व्यक्त करतात. पण ज्ञानेश्वर 'माऊलीच्या' तोंडून क्रोधाचा किंवा क्षोभाचा शब्द उमटत नाही, शिवीचे उत्तर शिवीने देण्यात 'जशास तसे' हा न्याय असला तरी मानवी मनात परिवर्तनाची लहर शिव्याशापामुळे कधी उत्पन्न होत नाही. दुष्टत्वाला जिंकणारे एकच प्रभावी अस्त्र आहे आणि ते म्हणजे सुजनत्व. माणसे दुष्ट असण्यापेक्षाही अधिकांशाने मूर्ख असतात. दुष्टपणाच्या मुळाशी अज्ञानच असते. म्हणूनच 'परमेश्वरा तू त्यांना क्षमा कर. कारण आपण काय करतो ते त्यांना कळत नाही' असे येशूख्रिस्ताने म्हटले आहे. याच अज्ञानी माणसांनी ख्रिस्ताला सुळी देण्याचा आत्यंतिक दुष्टपणा केला. तुकोबांच्या अभंगाच्या वह्या याच अज्ञानी लोकांनी पाण्यात बुडवल्या. सॉक्रेटिसला विषाचा प्याला देणारा, कोपर्निकस आणि ब्रुनो या शास्त्रज्ञांना सत्य सांगितल्याबद्दल छळणारा, गांधीजींना गोळी घालणारा माणूसच होता. 'नरेचि केली हीन किती नर' हे उद्‌गार अगतिकपणाने काढून स्वस्थ बसणे भाग आहे. कारण माणसाची ही चाल रामायण-महाभारत काळापासून चालूच आहे. या माणसांत अजून तरी फारसा बदल झालेला नाही. पूर्वीच्या काळात त्याची भाषा उन्मत्तपणाची होती आणि वागणे रानटीपणाचे होते. आज सुटाबुटातला 'मॉड़र्न' माणूस सौजन्याची व्याकरणशुद्ध भाषा बोलतो आणि रानटीपणाने वागतो. इतकाच फरक पडला आहे. आजही दुर्योधन, दुःशासन आहेत. आजही द्रौपदीचा पदर निर्लज्जपणे खेचला जातो. माणसाचे हे चित्र काळेकुट्ट आहे याबद्दल वाद नाही. पण ही चित्राची एक बाजू झाली. माणूस उत्पाती, दांभिक, अन्यायी आणि केवळ स्वार्थसाधू आहे असे एकतर्फी विधान करता येणार नाही. कारण याच माणसाने सुळावर दिलेल्या येशूख्रिस्ताला जगाचा उद्धारकर्ता मानून त्याची पूजा सुरू केली आहे. माणसांमधूनच संस्कृतीची रचना करणारी, जीवनाला आकार देणारी प्रतिभासंपन्न माणसे निर्माण झाली आहेत. साऱ्या मानवजातीवर प्रेमाचा वर्षाव करणारी श्रेष्ठ माणसे इतिहासाने दिली आहेत. सम्राट अशोकाने एका अटीतटीच्या युद्धात पराक्रमाने मगधाचा विशाल भूभाग जिंकला. त्याला आपल्या सामर्थ्याचा अभिमान वाटला पण सारी रणभूमी रक्तलांछित झाली होती. जिकडे-तिकडे माणसांचे छिन्न भिन्न अवयव विखुरलेले होते. हजारो सैनिकांच्या

प्रेतांनी भयाण वाटणारी ती भूमी अशोकाने पाहिली. मृत सैनिकांच्या विधवांनी आणि आप्तनातलगांनी आकांत मांडला होता. गिधाडांची मेजवानी चालू होती. हजारो घरातले दिवे आपण विझवून टाकले. हिंसा आणि रक्तपात यांचे वणवे पेटवले ही जाणीव झाल्याबरोबर अशोकाच्या हातातली ती विजयी तलवार गळून पडली. त्याच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. तो स्वत:शी म्हणाला, 'मी राज्यलोभानं कत्तली केल्या. माणसांच्या रक्तामांसाचा या जमिनीवर चिखल केला. मी सम्राट आहे खरा पण माणूस म्हणवून घेण्याचा मला अधिकार उरला आहे काय? हजारो, लाखो माणसांचा मी संसार उद्ध्वस्त केला. माझे हात माणसांच्या रक्तानं बरबटलेले आहेत हे स्वच्छ कसे होतील?' अशोकाचा शोक वाढत गेला, भगवान बुद्धाची शांत वत्सल मुद्रा त्याच्या दृष्टीसमोर उभी राहिली आणि त्याच्या ओठातून शब्द बाहेर पडले.. 'बुद्ध सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामिं'. सत्तेची लालसा, स्वामित्वाची तहान मावळून गेली. करुणेची आणि प्रेमाची ज्योत त्याच्या मनात तेवू लागली हा देखील माणसाचाच एक आविष्कार नव्हे काय? हिंसेचे वादळ निर्माण करणारा माणूस अहिंसेच्या मधूर सुरांकडे ओढला जातो. वादळ विरून जाते आणि माणुसकीचे गीत आसमंतात निनादू लागते. माणूस असाही आहे. त्याच्यात राक्षसाची महत्त्वाकांक्षा आहे तशीच संताची निरुपम शांती आणि प्रेमही आहे.

आपल्या विध्वंसक हातांनी माणसाने जगात उच्छेद मांडला असला तरी याच माणसाच्या हृदयात नवनिर्मितीची आकांक्षा आहे. जग सुंदर व्हावे, जगात आनंदाचा गंध दरवळत राहावा अशीही ऊर्मी त्याच्या अंत:करणात उचंबळत असते. आपण कविता लिहावी, मनोहर चित्र रेखाटावे, एखादे असामान्य शिल्प उभे करावे ही इच्छा त्याच्या मनात अनावर होते. संस्कृतीचा चोळामोळा करणारे रानटी हात जसे माणसाला आहेत तसेच संस्कृतीची सुवासिक फुले निर्माण करणारे कलावंत हातही माणसाला आहेत. त्यामुळेच त्याच्यात परस्परविरोधी लाटांची खळबळ माजलेली असते. कधी बहर असतो तर कधी शिशिर असतो, कधी अंगार बरसतो तर कधी अमृताचा पाऊस पडतो. कधी माणूस सुंदर मंदिरे बेचिराख करतो तर कधी वर्षानुवर्षे भव्य मूर्तीची घडण करीत राहातो. असा कसा हा माणूस? माणूस माणसाला कधी कळलाच नाही. हजार वर्षापेक्षा अधिक काळ लोटला त्यावेळची ही गोष्ट. अरिषनेमी नावाचा एक शिल्पकार एका भव्य डोंगरावर उभा होता. आजूबाजूचा निसर्ग प्रसन्नपणे हसत होता. झाडे डुलत होती. वारा आपले स्वैरगीत गात होता. आरिषनेमीच्या मनात एकाएकी नव्या कल्पनेची वीज लखलखली. तो म्हणाला,

'या डोंगराच्या पाषाणातून मला एक अतिभव्य गोमटी मूर्ती आमंत्रण देत आहे. माझ्या छिन्नीने मी अशी मूर्ती घडवीन की जी 'गोमटेश्वर' ठरेल. भव्यता आणि सुंदरता यांचं महाकाव्य या पाषाणात मला खोदायचं आहे' अरिषनेमी झपाटून गेला.

निळ्या नभाखाली डोंगरावर तो दिवसन् दिवस त्या प्रचंड शिळेवर आपल्या कलात्मक हातांनी संस्कार करीत राहिला. त्या प्रचंड पाषाणखंडावर तो प्रेम करू लागला. हळूहळू ती शिला हसू लागली. गाऊ लागली. सुंदर होऊ लागली. महाकाव्याला रूप येऊ लागले. किती ऋतू आले आणि गेले. किती वसंत आणि शिशिर आपल्याला प्रदक्षिणा घालून गेले याची अरिषनेमीला कल्पनाही आली नाही. त्याच्या हृदयातले नवनिर्मितीचे गीत गुंजत राहिले. त्याच्या हातातली छिन्नी एखाद्या नृत्यांगनेसारखी नृत्य करीत होती. अरिषनेमी स्वत:च त्या नृत्यात आणि संगीतात हरवून गेला होता. बाहेरच्या जगाचे भान त्याला उरले नव्हते आणि काय आश्चर्य तो डोंगर दररोज- नव्हे प्रतिक्षणी रोमांचित होत होता. एक दिवस एक प्रचंड महाकाय, अतिसुंदर, गोमटेपणाचा अर्क असलेली बाहुबलीची महान मूर्ती सिद्ध झाली. अरिषनेमी या कलावंतांने एका अमर कलाकृतीला जन्म दिला होता. आज हजार वर्षानंतरही ती मूर्ती जगाला आपल्या प्रसन्न स्मितातून वीतरागतेचा आणि शांतीचा संदेश देत उभी आहे. माणसाचा हात एका बाजूने उध्वस्त करणारा असतो तर दुसऱ्या बाजूने तो नवरचनाही करू शकतो. माणूस हे नेमके कशाचे प्रतीक आहे? शांतीचे आणि प्रेमाचे की हिंसेचे आणि द्वेषांचे? याच माणसांतून राम, कृष्ण, बुद्ध यांच्यासारखे महावीर झाले. ज्यांच्या प्रतिभेतून संस्कृती बहरली आणि माणसांतूनच चंगीजखान, तैमूरलंग आणि हिटलरही निर्माण झाले. कुणी नंदनवन निर्माण केले तर कुणी मसणवटी उत्पन्न केल्या. खरोखर माणूस म्हणजे एक अजब कोडे आहे. माणसाने माणसाला कोड्यात टाकले आहे. तो असाही आहे आणि तसाही आहे. माणसा, तुझा रंग कसा? माणसा! हे अजब माणूसपण तुला कुठे मिळाले?

□ □ □

चिंतनशील वृत्तीचा गंध घेऊन आलेले हे ललित लेखन वाचकांना अस्वस्थ आनंद देऊ शकेल. माणसाचे मन, त्यातल्या नानाविध वृत्ती व प्रवृत्ती, संगती आणि विसंगती यांचा वेध घेण्याचा प्रयत्न निर्मलकुमार फडकुले यांनी सहजतेने केला आहे. त्यांच्या अंतर्मुखतेची व संवेदनशीलतेची साक्ष देणारे हे ललित लेख वाचकांच्या पदरात प्रसन्नतेबरोबरच विचारगंभीरतेचे काही क्षण निश्चित टाकतील.

चिंतनाच्या विविध वाटा चोखाळणाऱ्या या लेखकाची शब्दकळा प्रवाही आणि प्रभावी आहे. त्याची जीवनविषयक जाणीव प्रगल्भ असल्याचा प्रत्यय या लेखनातून येतो. विविध विषयांवरील हे उत्कट चिंतन चिंतनाच्या अनेकविध वाटांचे दर्शन घडवते.

आपल्या अस्वस्थ मनाचे पदर उलगडून दाखवणारे हे ललितलेख वाचकांना काहीतरी मन:पूर्वक सांगतील.

मेहता
पब्लिशिंग
हाऊस